# हल्दी घाटीतून कुलू घाटीत

सौ. मेधा काळे



म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ६५०

REFBK-0024387

संदर्भ
भू प्रवास
६५८
२४३८८
८।११।८४



REFBK-0024387

शालीमार प्रकाशन
अहमदनगर

# हल्दीघाटीतून कुलूघाटीत

लेखिका

© प्रा सौ मेघा यशवंत काळे

प्रकाशक
शालीमार प्रकाशन
माळीवाडा, फुले रोड
अहमदनगर ४१४००४

मुद्रक
श्री. म. शं परभाणे
सुभाष प्रिंटिंग प्रेस
३९० क, शनिवार पेठ
पुणे ४११३०

मुखपृष्ठ
श्री अनंत सालकर
पुणे ३०.

मुखपृष्ठ छपाई
स्वरूप मुद्रण
पुण ३०

मूल्य
रुपये बावीस

प्रकाशन क्रमाक
४
आवृत्ती पहिली
१९८१

बहुरगी ब्लॉक
धारगळकर प्रोसेस प्रा. लि
दादर,
मुबई ४०००२८

फोटो ब्लॉक्स
व्ही. जोशी अँड कपनी
पुणे ३०

मलपृष्ठ
कुलू देवता

# हल्दी घाटी

हल्दीघाटी – मेवाडच स्वातंत्र्यप्रेम ज्याच्या रोमारोमात भिनलं होतं अशा महाराणा प्रतापने मोठ्या शौर्याने युद्धतीर्थावर – बली वेदीवर सर्वस्व चढवले, ती समरांगण भूमी आपल्या धन्याच्या रक्षणार्थ प्रयत्नाची शर्थ करून मूक चेतकने येथेच प्राणाची आहुती दिली! अरवलीचा लोहपुरुष महाराणा प्रताप व स्वामीभक्त चेतक याच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी प्रवासाला निघालो होतो– हळदीसारख्या पिवळ्या रंगाची माती असलेल्या हल्दीघाटीला.... .




# कुलू घाटी

हिमालयात आर्यांनी ज्या ठिकाणी प्रथम वस्ती केली ती ही घाटी वेदाचे सकलन व पुराणाची रचना याच शांत परिसरात झाली

ही घाटी आहे 'देवतांची घाटी'। या घाटीतील ठिकठिकाणच्या देवतांना दसऱ्याच्या सणाच्या वेळी कुलूला सन्मानाने आणले जाते कुलूला देवदेवताचे जणू समेलन भरते।

कुलू घाटीतील हिमाच्छादित पहाडातून उच उच तजेलदार वृक्षांच्या सान्निध्यात युगायुगांतरातून निनादत, हिमाचलच्या महान सस्कृतीची कहाणी गुफत झुळझुळ वहाते बियास – व्यास



महाभारताची रचना केलेल्या महर्षी व्यासांचा आश्रम या बियास नदीच्या उगमस्थानी साडेतेरा हजार फूट उंचीवर रोहतांगला होता. बियासने महर्षी व्यासांना शापातून मुक्त केले म्हणून बियासचे पुराणातील नाव होते विपाशा.



कुलूघाटीचा निरोप घेताना या घाटीतील रोहतांग, मनाली, कुलू या बियासतटीच्या निसर्ग सुंदर स्थळांच्या पाशात – बंधनात मात्र आम्ही अडकलो होतो.

१९७४ साली शालीमारपासून दीर्घ प्रवासाची सुरू झालेली वाटचाल चालूच आहे १९८० च्या दिवाळीत महिनाभर राजस्थान व हिमाचल प्रदेशच्या दीर्घ प्रवासाचा योग आला शालीमारच्यावेळी प्रवास करणारा छोटा प्रवासी उदय आता अकरा वर्षांचा झाला तर माझे श्वशुर ती काका सत्तर वर्षांचे झाले पण सर्वांचा उत्साह कायम आहे किंबहुना वाढला आहे राजस्थानमधील ऐतिहासिक महत्त्वाच्या हल्दीघाटीपासून सुरू झालेल्या प्रवासाचे शेवटचे टोक होते, कुलूघाटीतील रोहतांग येथील बियासनदीचे उगमस्थान—व्यासकुंड या प्रवासाच्या अनुभूतीमधून साकार झाले आहे चौथे प्रवासवर्णन 'हल्दीघाटीतून कुलूघाटीत'

पूर्वीच्या तिन्ही पुस्तकाप्रमाणे याही पुस्तकाचा हेतु सर्वसामान्य पर्यटकांना माहिती देणे व पर्यटन स्थळांचे सौंदर्य उकलून दाखवणे हाच आहे हे पुन्हा स्पष्ट करावेसे वाटते पुस्तकाच्या वाचनाने वाचकामध्ये पर्यटनाची आवड निर्माण होत आहे किंवा त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळत आहे हे ठिकठिकाणहून आलेल्या निरनिराळ्या क्षेत्रातील अपरिचित वाचकांच्या अनेक पत्रांवरून जाणवते. यावेळी आलेल्या उल्लेखनीय पत्रामध्ये कल्याणचे ८५ वर्षांचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक गुरुवर्य श्री भिडे यांचे पत्र आहे पुस्तक वाचून आशीर्वादपर दोन शब्द त्यांनी कळविले मालाड-मुंबई येथील हौशी पर्यटक श्री माधव मोरे जेव्हा अनपेक्षितपणे पर्यटन स्थळांची वेधक छायाचित्रे भेट म्हणून पाठवतात तेव्हा मन खरोखर भारावून जाते

## 'हल्दीघाटीतून कुलूघाटीत वाचण्यापूर्वी–

प्रवास आखण्यापासून माझे पती श्री यशवंत यांनी उत्साह दाखविला' पुस्तक आकर्षक करण्यासाठी चोखंदळपणे सूचना केल्या मुद्रणप्रत तयार करण्यासाठी नगरचे कवी श्री विलास गिते यानी आस्थेवाईकपणे मदत केली

सकाळ, लोकसत्ता, स्वराज्य, महाराष्ट्र टाइम्स, लोकप्रभा, ललित इ. वृत्तपत्रानी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करणे माझे कर्तव्यच आहे

आमचे स्नेही चित्रकार श्री अनंत सालकर, सुभाष प्रिंटिंग प्रेसचे श्री मधुकर परभाणे व कर्मचारी, ब्लॉक मेकर्स श्री व्ही जोशी व श्री. धारगळकर, स्वरुप मुद्रणचे श्री सोनवणे इ. सर्वांनी तत्परतेने, आपुलकीने अल्पावधीत पुस्तक आकर्षकरित्या सादर करण्यास सहकार्य केले सर्वांची मी आभारी आहे

माझे वडील ती श्री रा ना. उर्फ अण्णासाहेब झोळ व श्वशुर ती श्री. काका-ह. कृ उर्फ बाळासाहेब काळे याचे आशीर्वाद पाठीशी आहेत.

रसिक वाचक आणि हौशी पर्यटक यांच्या ऋणातून मुक्त होणे अवघड आहे त्यांच्या सदिच्छेवरच प्रवासाची वाटचाल चालू आहे.

अहमदनगर

ता १-७-१९८१

सौ. मेधा काळे

१४६ डाऊन नवजीवन एक्सप्रेस ... .. ९
उदयपूरची पुनर्भेट ... १५
हल्दीघाटी – स्वातंत्र्य रक्षणाची गाथा .. ... २०
वैभवशाली नाथद्वारा ... . .. २५
भक्ती आणि कला यांचे संगमतीर्थ श्रीराणकपूर ... ... ... ३४
जोधपूर ... ... ... ४१
नक्षीदार झरोक्यांचे सोनेरी शहर जैसलमेर ... ... ... ६०
बिकानेर .. ... ... ७६
सतलजकाठची सायंकाळ .. ... .. ९०
फिरोझपूर ते पठाणकोट . ९७
लॉर्ड डलहौसीची देणगी–डलहौसी ... ... .. १००
रावी तीरावरील चम्बा ... ... . १०६
धवलगिरी धर्मशाला ... . ११४
श्री ज्वालामुखीदेवी ... ... .. १२३
सुरम्य कांगडा घाटी ... १२९
कांगडा घाटीतून कुलघाटीकडे .. १३४
कुलू – देवतांची घाटी ... .. १४०
पार्वती घाटीतील रम्य मणिकर्ण ... . ... १४५
मनाली, प्रीती जडली तुजवरी ... ... ... १४९
'प्रेतांच्या मैदानाची' रोमांचकारी सफर ... ... ... १५९
मनाली ते सिमला .. ... ... १६७
सिमला – पहाडातील निसर्ग सुंदर शहर .. ... ... १७०
सिमल्याचा रमणीय परिसर ... ... ... १७६
सिमला ते दिल्ली ... ... १८७
१७८ अप् झेलम एक्स्प्रेस ... ... ... १९१

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
९५५
२७३८७
२५-७-१९८७
शाखा

# १४६ डाऊन नवजीवन एक्सप्रेस

प्रवासाला निघण्याच्या दिवशी सर्वांच्या उत्साहाला पारावार नव्हता. तीन मोठ्या प्रवासाचा अनुभव जमेला होता त्यामुळे बॅगा झटपट आवरून झाल्या उल्का अजूनमधून विसरलेल्या गोष्टींची आठवण करून फायनल टचेस् देत होती कपडे वाळवण्यासाठी प्लॅस्टिकची दोरी घेण्याची आठवण तिनेच वेळेवर करून दिली जरुरीची कामचलाऊ औषधे आणायला उदयला डॉक्टराकडे पिटाळले होतेच भेट द्यावयाच्या गावांचे नकाशे, फोल्डर्स अनुक्रमाने लावण्यात यशवंत सकाळपासूनच गर्क होते. अशावेळी लिंक तुटलेली त्यांना मुळीच आवडत नाही आणि आम्हाला तर नसते प्रश्न विचारल्याशिवाय रहावत नाही म्हणून नाईलाजानेच सर्वजण त्यांच्या-पासून दोन हात दूर रहात होतो दुपारची जेवणाची वेळ झाली सर्व काही आवरले गेले आहे अशी खात्री वाटली. त्यामुळे निर्धास्तपणे जेवणावर ताव मारला महिनाभर बाहेरचे खावे लागणार या विचाराने दोन घास जास्तच गेले नगर रात्री सोडायचे होते. म्हणजे दुपारी विश्रांतीसाठी भरपूर वेळ होता. पण झोप कुठली येतेय ? बारीकसारीक कोणकोणत्या वस्तू घ्याव्या आणि काही विसरले का याची चर्चा होई उल्का-उदयच्या आग्रहास्तव

पत्याचा कॅट घेतला. मुक्कामाच्या ठिकाणी सकाळी उठून गाडी पकडण्यासाठी गजराचे घड्याळ घ्यावे अशी माझी सूचना होती पण उदयने माझे म्हणणे खोडून काढले तो म्हणाला, "पपाच गजराचे घड्याळ आहेत ते पहाटे पाचलाच काय तीनलाही वेळेवर उठणारच त्याच्यामुळे तर शनिवारी मी वेळेवर शाळेत जातो " खेळीमेळीची अशी चर्चा अधार पडला तरी चालूच होती बाकी आमचे काका सगळ्यामध्ये उत्साही ! होल्डाल जास्ती मोठा न होता सुटसुटीत कसा होईल याकडे त्याचे लक्ष होते. हिमाचल प्रदेशच्या थडीला तोंड देण्यासाठी घेतलेल्या ब्लँकेट्स, चादरी, शाली, सतरज्या त्यानी होल्डालमध्ये व्यवस्थित ठेवल्या. हवेची एक उशी उल्कासाठी घेतली पण पुन भांडण नको म्हणून उदयसाठीही आणखी एक उशी घेतली रात्रीचे नऊ वाजून गेले तेव्हा मंदिरात जाऊन श्रीगणेशमूर्तीचे मनोभावे दर्शन घेतले व दीर्घ प्रवास निर्विघ्न पार पडो अशी त्या विघ्नहर्त्याजवळ प्रार्थना केली

यावेळचा दीर्घ प्रवास होता राजस्थान आणि हिमाचल प्रदेशचा ! उत्तर भारताच्या मागील प्रवासात राजस्थानचा चितोडगड, उदयपूर, अजमेर व जयपूर हा भाग पाहिला होता. वेळेअभावी हल्दीघाटी न पाहिल्याची रुखरुख होतीच तेव्हा हल्दीघाटीहून हा प्रवास सुरू करायचा होता स्वातंत्र्यरक्षणार्थ आयुष्यभर मोगलाशी संघर्ष केलेल्या महाराणा प्रतापला आणि त्याच्या विश्वासू चेतकला हल्दीघाटीत प्रणिपात करायचा होता जेथे मंदिराला भेट मिळणारे शुद्ध तूप साठवायला संगमरवरी विहिरी आहेत अशा वैभवशाली नाथद्वाराची भेट चुकवून चालणार नव्हती. 'आबूकी कोरनी व रानकपूरकी माडनी ' असे ज्या मंदिराबद्दल अबूभेटीच्या वेळी ऐकले होते त्या श्रीराणकपूरच्या विशाल जैन मंदिराच्या भेटीची ओढ होतीच जोधपूरचा भव्य किल्ला आणि उम्मेदभवन राजवाडा याची वर्णने असलेली माहितीपत्रके वाचल्याने ती पहाण्याची जशी उत्कठा लागली होती तशी अब्दुल्लाह सिनेमा पाहिल्यापासून जैसलमेरजवळचे वाळवट तुडविण्याची उत्कंठा उल्का–उदयला लागली होती. जैसलमेरच्या नक्षीदार झरोक्याची शिल्पकृती पहाण्यासाठी यशवंत खूपच उत्सुक होते. शिल्पकृती हा त्यांचा वीकपॉईंट तर इतिहास हा माझा मला ओढ लागली

होती बीकानेरच्या म्युझियममधील शिवाजीमहाराजांच्या आग्रा भेटीच्या वर्णनाचे कागदपत्र पहाण्याची प्रवासाला निघण्याअगोदरच यशवंत म्हणाले की बीकानेरला उंट प्रजनन केंद्रात जाऊन सांडणीच्या दुधाचा चहा घ्यायचा बरं का ! उदय म्हणाला आई बीकानेरजवळ उंदरांचं मंदिर आहे ना ते नक्की पहायचं ..राजस्थानची अशी एक ना अनेक दर्शनीय ठिकाणे पहायची होती पुढे हिमालयात जाताना सतलजकाठचे शहीद भगतसिंग स्मारक पहायची सर्वांनाच उत्सुकता वाटत होती इंग्रजांनी वसवलेले डलहौसी, धर्मशाला, सिमला ही थंड हवेची ठिकाणे व तेथील हिमाच्छादित शिखरे जशी पहायची होती तशीच रावीच्या तीरावरील चंबा व कांगडा खोऱ्यातील ज्वालामुखीदेवी यांच्या दर्शनाची ओढ वाटत होती उदयला सिमल्याजवळील चैल या ठिकाणी असलेले जगातील सर्वात उंच ८००० फूट उंचीवरील क्रिकेट ग्राऊंड पहायची ओढ लागली होती. तो म्हणायचा " पपा, हे ग्राऊंड वेंगसरकरला फार आवडते हं ! " प्रवासाचा शेवटचा टप्पा होता कुलूघाटी. महर्षी व्यासांच्या पदकमलांनी पुनीत झालेल्या बियास नदीकाठच्या निसर्गरम्य कुलूघाटीबद्दल तसेच मनुऋषींनी वसवलेल्या मनालीबद्दल व तेथील हिडिम्बा मंदिराबद्दल आकर्षण होतेच मनालीहून शेवटी साडेतेराहजार फूट उंचीवरील रोहतांगला–जेथे जाताना महाराजा रणजितसिंहाचे हजारो घोडेस्वार अचानक झालेल्या हिमवर्षावा-खाली गाडले गेले होते भेट द्यायची ठरवले होते हिवाळा सुरू झाल्याने निसर्ग साथ देतो का नाही याबद्दल शंकाच वाटत होती

मध्यरात्रीचे बाराचे टोल पडले आणि आम्ही पाचजण चार सुटकेस, एक होल्डाल, एक हँडबॅग, एक शबनम थैली आणि वॉटर बॅग यांच्यासह दोन रिक्षा करून नगर स्टेशनवर पोहोचलो सर्क्युलर टूर तिकीट फर्स्ट-क्लासचे होते तरी ठिकठिकाणी सीट अथवा बर्थ मिळतील का नाही याची काळजी होतीच बरं ह्यांना त्याबाबत जास्त चर्चा केलेली, सारखी काळजी केलेली किंवा बारीक सारीक प्रश्न विचारलेले मुळीच आवडत नाही त्यांच म्हणण बघू काय होईल ते मार्ग निघेलच आणि पुढच्या चिंता आतापासून कशाला ? बाकी त्यांचा आत्मविश्वास दांडगा. गेल्या तीन प्रवासात अडचणी काही कमी नव्हत्या आल्या पण मार्ग काढला

जायचा आणि या वेळेस तो काका बरोबर होते. त्यांचा मोठा आधार होता. शिवाय तेही मोठ्या आनंदी वृत्तीचे, उत्साही

वीस मिनिटे लेट असलेल्या नवजीवन एक्सप्रेसने धाड्धाड् करीत स्टेशनमध्ये प्रवेश केला स्टेशनमास्तर श्री जगताप यांच्या आपुलकीच्या मदतीमुळे जागा मिळण्यात अडचण आली नाही दहाच मिनिटानी कर्कश शिटी ठोकून नवजीवनने नगर सोडले अहमदाबादपर्यंतच्या प्रवासाचा पहिला टप्पा सुरू झाला नवजीवन एक्सप्रेस ! खरच, किती समर्पक नाव ठेवल आहे मद्रासहून अहमदाबादकडे धावणाऱ्या या गाडीला अहमदाबाद ही तर म गाधींची कर्मभूमी ! साबरमती आश्रमातून त्यानी भारतीय स्वातंत्र्याची सूत्रे हलवली. नवजीवन आणि हरिजन ही वृत्तपत्रे त्यांनी काढली मद्रास ते अहमदाबाद हे १९०५ किलो मीटर अतर ३५ तासात पार पाडणारी ही सुपरफास्ट गाडी प्रवाशाना वरदानच अहमदनगर सोडल्यावर गाडीचा वेग वाढला होता प्रत्येकाने बर्थचा ताबा घेतला. उल्का–उदय पहाता पहाता झोपी गेले पण दिवसभर दगदग होऊनही मला कुठली झोप येतेय ? उगीच चिता करण्याचा माझा स्वभाव. सर्व प्रवास सुखरूप पार पडेल का ही चिता सतावीत होती अर्थात् याला कारणही होते गेले वर्षभर वर्तमानपत्रात येणाऱ्या ठिकठिकाणच्या दगलीच्या, अपघाताच्या बातम्या आठवून मन बेचैन होत होते शेवटी हे म्हणाले " प्रवासाची चिता करीत असशील पण परमेश्वर कृपेने प्रवास निर्विघ्न पार पडेल परमेश्वरावर श्रद्धा ठेव आणि काळजी करू नकोस " रात्री साडेतीनच्या सुमारापर्यंत गाडी कोपरगावपर्यंत पोहोचली होती. मनातल्या मनात शिर्डीच्या साईबाबांना म्हटल, " आमचा लांबचा हिमालयापर्यंतचा प्रवास सुखरूप होऊ द्या बाबा " बाबाची मनोमन प्रार्थना केली आणि मग गाढ झोप लागली

' गरम दूध ' या आरोळीने सकाळी जाग आली तेव्हा कळल की गाडी जळगाव स्टेशनमध्ये उभी राहिली आहे मुखमार्जन करून उत्साहानं दुधाचे ग्लास मागवले पण खानदेशच्या पाणीदार दुधाने निराशा केली. इजिनने या स्टेशनवर दिशा बदलली आणि गाडी सुरतच्या दिशेने धावू लागली. दोडाईचा स्टेशनवरून गाडी गेली तेव्हा माझ्या धाकट्या

मावाची– रविकिरण झोळ यांची तीव्रतेने आठवण झाली गाडी या लहानशा स्टेशनवर थाबत नाही म्हणून उल्का–उदयने खिडक्यातून डोकावून स्टेशनच्या दर्शनावरच प्रिय मामाच्या भेटीची तहान भागवून घेतली पुढे आले अमळनेर स्टेशन श्री साने गुरुजींची अमळनेर ही तर कर्मभूमी त्यानी व्यतीत केलेले येथील दिवस, त्याचे कार्य– सारे काही आठवले दुपारी बाराच्या सुमारास महाराष्ट्रातील शेवटच मोठ स्टेशन नंदूरबार लागल महाराष्ट्र–गुजरात सीमारेषेवरील शेवटच स्टेशन पार करून महाराष्ट्राचा निरोप घेतला मराठी मायभूमीत आता एक महिन्याने परतायच आहे या जाणीवेने उचंबळून आले नवजीवन गुजरात राज्यात शिरली तेव्हा गुजरातच्या सुपीक भूमीत डुलणाऱ्या हिरव्यागार पिकाचे दर्शन झाले दुपारी एकच्या सुमारास खिडकीतून दूरवर उच धुरकांडी दिसू लागली यशवंत म्हणाले, " सुरत आले " दोन वर्षांपूर्वी गुजरातच्या दौऱ्यावर जाताना आणि परतताना सुरत अधारात पाहिले होते आणि आताच हे दुपारच दर्शन ! सुरत नावाच्या गणिकेवरून सुरत हे नाव पडल हे आठवल गणिकेच्या नावावरून ओळखले जाणारे असे हे गाव भारतात तरी एकुलते एक असावे सुरतच्या भव्य प्लॅटफॉर्मवर गाडी विसावली. स्टेशनवरून ताजे पाणी आणले घरून आणलेला डबा सोडला पुरी भाजी चटणी आणि लोणचे मस्त बेत जमला होता सगळा डबा फस्त करून तृप्त झालो खरच प्रवासात घरच्या जेवणाची चव काही औरच असते

जेवण आटोपले तेवढ्यात डब्यात बातमी पसरली की नवजीवन पुढे अहमदाबादपर्यंत जाणार नाही तीन दिवसांपूर्वी सौराष्ट्र मेलला बडोदा स्टेशनच्या अलीकडे मियागावजवळ अपघात झाला होता पण अद्याप वाहतूक सुरू झाली नाही आणि गाडी पुढे जाणार नाही या बातमीने प्रवाशांमध्ये एकच हलचल माजली आणि मग बातम्यावर बातम्या यायला सुरुवात झाली कुणी म्हणायचे गाडी थोड्यावेळात सुटेल पण मियागाव स्टेशनच्या अलीकडे थांबेल तेथे उतरून पलीकडे थांबलेली दुसरी गाडी पकडावी लागेल. कुणी म्हणायचे तिकीटाचे रिफंड घ्या टॅक्सी वा बसने बडोद्यापर्यंत जाऊ मग रेल्वेने अहमदाबादपर्यंत जाता येईल काहीजण

टॅक्सीची चौकशी करून आले पण टॅक्सीवाले मनाला येईल ते भाडे सांगू लागले पुढचा प्रवास कसा पार पडेल याबद्दल सगळेच चिंतातूर झाले वर, रेल्वेकडून नक्की आणि पक्की घोषणाही नाही गाडी सुटणार का? सुटल्यास केव्हा काही कळेना शेवटी ह्यांनी गार्डला विचारले की नक्की काय ते सांगा गार्ड म्हणाला, "मला ऐंशी टक्के अशी आशा वाटते की तीन तासांनी गाडी सुटेल राहिलेल्या वीस टक्क्यासाठी गॉड विल हेल्प आणि खरच ठरल ते आम्ही चिकाटीने गाडीत बसून राहिलो जेव्हा एकला आलेली गाडी चारच्या सुमाराला बडोद्याच्या दिशेने धावू लागली तेव्हा सर्वांनीच सुटकेचा नि श्वास टाकला

अंधार पडायच्या सुमारास मियागाव स्टेशन आले गाडीचा वेग पूर्ण मंदावला मुंगीच्या वेगाने गाडी आस्ते आस्ते रूळावरून जात होती झालेल्या भीषण अपघाताची कल्पना त्या अंधारातही आली डब्यावर चढलेले डबे, इंजिन, प्रचंड मोडतोड, मोठमोठ्या क्रेन सारे काही अंगावर शहारे उभे करीत होते अपघाताच्या जागेजवळचा प्रचंड ढिगारा उपस-ण्याचे काम गॅसबत्त्या लावून चालू होते शेकडो माणसे ते काम करीत होती यापूर्वी रेल्वेचा अपघात सिनेमात पाहिला होता पण प्रत्यक्ष पाहि-ल्यावर भीषणतेची कल्पना आली अपघातानंतर तीन दिवसांनी मुंबईहून अहमदाबादकडे जाणारी नवजीवन ही पहिलीच गाडी सर्वजण काळजीतच होते. पण परमेश्वरकृपेने अपघाताच्या जागेवरून गाडी व्यवस्थित गेली बडोदा स्टेशनमध्ये गाडी रात्री आठच्या सुमारास पोहोचली प्लॅटफॉर्मवर दुर्गंधीच दुर्गंधी सुटली होती. अपघातामुळे गुजरातमधून मुंबईकडे जाणाऱ्या मासळीची असंख्य पार्सले अडकून पडली होती त्यामुळे मासे कुजून दुर्गंधी सुटली होती दिवसभरचा प्रवास, सुरतेला लागलेला विलंब आणि आता ही दुर्गंधी—सगळजण कटाळून गेलो कधी एकदाचे अहमदाबाद येईल असे वाटत होते उंचच्याउंच धुरकुंड्यांनी वेढलेल्या अहमदाबादमध्ये रात्री साडेदहाला म्हणजे पाच तास उशीरा पोहोचलो ब्रॉडगेजचे प्लॅट-फॉर्म ओलांडून मीटरगेज प्लॅटफॉर्मवर आलो रात्री बाराच्या अहमदाबाद-उदयपूर गाडीने निघालो दमल्यामुळे बर्थवर पडल्यापडल्या सर्वजण झोपी गेलो. ☐ ☐

# उदयपूरची पुनर्भेट

सकाळी नऊच्या सुमारास उदयपूर शहरात प्रवेश केला तेव्हा उदयपूर-बाबत एका परकीय पर्यटकाने लिहून ठेवलेले वाक्य आठवले.

" उदयपूर पहा आणि पुन्हा पुन्हा पहाण्यासाठी दीर्घकाळ जिवंत रहा "

खरच होत ते उदयपूर या धवलनगरीत सहा वर्षांनी परत उत्साहाने प्रवेश केला. उदयपूरला दोन दिवस रहायचे होते. तेव्हा स्टेशनवर उतरताच प्रथम जोधपूरला जाण्यासाठी तिसऱ्या दिवसाचे सध्याकाळी पाचच्या मारवाड एक्स्प्रेसचे रिझर्वेशन करण्याचे काम यशस्वी केले हो, यशस्वीच कारण वेटींगलिस्टची टागती तलवार टळली होती.

टागेवाल्याला सांगितल्याप्रमाणे त्याने ज्योती लॉजवर आणले या लॉज-मध्ये सहा वर्षापूर्वी उतरलो होतो. पण आता लॉजच्या खाणाखुणा पटायला वेळ लागला कारण लॉजचे वाटप दोन भावात झाले होते मधोमध भिंत घातली होती एका प्रशस्त लॉजचे दोन लॉज झाले होते एक ज्योती तर दुसरे न्यू ज्योती लॉज ज्योती लॉजमध्ये तळमजल्याचा हॉल मिळाला. या प्रशस्त हॉलमध्ये सलग्न बाथरूम, गरम पाणी अशी चागली व्यवस्था होती " तुम्ही जेवण वगैरे आटपा तोपर्यंत तुम्हाला उदयपूर दाखवण्यासाठी

मी परत येतो" असे म्हणून टांगेवाला निघून गेला एक दिवस चुकलेले स्नान गरम पाण्याने आटोपल्याने सर्वजण फ्रेश झालो आता सर्वांनाच खूप भूक लागली होती समोरच्या चौकातच एका गुजराती हॉटेलमध्ये चांगले गुजराती जेवण मिळाले तीन-चार भाज्या, गरम फुलक्या असे मस्त जेवण होते हवे तेव्हढे मिळणारे पापड यामुळे उदयने, तर भरपूर चविष्ट लोणचे यामुळे उल्काने जेवणावर चागलाच ताव मारला जेवण आटोपून लॉजवर परतलो तेव्हा टांगेवाला वाटच पहात होता. सहा वर्षानंतर परत उदयपूरचा फेरफटका मारायला निघालो उदय म्हणाला, "माझ्या नावाच गाव परत पाहू" उदय-उल्काला पूर्वी पाहिलेल उदयपूर आठवत नव्हतं तर आम्ही उदयपूरच सौंदर्य परत पहायला सिद्ध झालो

उदयपूर पहायचं म्हणजे पहायला हवा उदयपूरचा वैभवशाली सिटी पॅलेस पिचोला तळ्याकाठचा हा राजप्रासाद पधराशे फूट लांबीचा व सातशे फूट रुंदीचा इतका भव्य आहे राजवाडा पहाण्यासाठी तिकीट काढले पूर्वी राजवाडयात काम केलेला एक वयस्कर सेवक आमचा गाईड होता राजवाड्यासमोरच्या मोकळया पटांगणात जेथे हत्तींची झुंज होई ती जागा प्रथम पाहिली राजवाडयातून झुंज पहाण्यासाठी खास झरोके आहेत प्रवेशद्वाराजवळ नक्षीदार कमानी आहेत महाराणांची सुवर्णतुला अथवा रौप्यतुला झाल्यान्तर तेथे साधू, सत, गोरगरीबांना दान होई. महाराणा जगतसिंहाने केल्ले रत्नाने बनविलेल्या वृक्षाचे 'कल्पवृक्षदान' जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण आहे राजवाडयात प्रवेश केल्यावर उदयपूरच्या राजघराण्याचे मानचिन्ह दिसले. मध्यभागी सूर्य कोरला असून त्याच्यामध्ये चितोड किल्ला कोरला आहे तसेच 'जो दृढ राखे धर्मको तिही राखे करतार' असे लिहिले आहे

एका दालनात मेवाडच्या राजघराण्यातील राजाची भव्य तैलचित्रे आहेत मेवाडच्या राजघराण्यात २२ राजे राज्य करून गेले राजपूत राजे स्वत ला सूर्यवंशीय मानतात सूर्यदर्शन झाल्याशिवाय राजपरिवार भोजन करीत नसे. वर्षाऋतुत सूर्यराज दिसणार नाहीत म्हणून सूर्यप्रतिमा त्यांनी तयार केली व त्या प्रतिमेचे तेव्हा ते दर्शन घेत १०८ तोळयाची अस्सल सोन्याची सूर्यमुखाची प्रतिमा पाहून डोळे तेजाने दिपले राजवाडयातील

हल्दीघाटीकक्षात युद्ध प्रसंगाची विविध चित्रं आहेत. चेतककक्षातील राणा प्रतापचा विश्वासू चेतक हल्दीघाटी युद्धात अखेरचा श्वास घेतानाच्या प्रसंगाचे चित्र मन हेलावून टाकते महाराणा प्रताप कक्षात अरवलीच्या लोहपुरुषाच्या- राणा प्रतापच्या जीवनातील विविध प्रसंग चित्रीत केले आहेत ही चित्रे त्यांच्या धीरोदात्त जीवनावर प्रकाश टाकतात महा-राणांचे चिलखत, शिरेटोप, धनुष्यबाण, ढाल, भाला ह्या वस्तू तेथे आहेत. महाराणा वनवासात असताना चटईवर झोपत व पत्रावळीवर जेवत. प्रतीक म्हणून चटई, पत्रावळी ठेवल्या आहेत

महालाच्या चौथ्या मजल्यावर आल्यावर तेथे मोठमोठी झाडे दिसली. हा महाल टेकडीच्या उतारावर बांधला आहे म्हणून चौथा मजला टेकडीच्या समान उंचीवर आहे त्यामुळे तेथे झाडे दिसतात. तेथे शेजारी महाराणा करणसिंहाने निर्माण केलेले कुंड आहे अखंड संगमरवराच्या या कुंडात जेव्हढी नाणी मावतील तेव्हढी नाणी महाराजा जेव्हा गादीवर बसत तेव्हा दान दिली जात तेथे जवळच एक मंडप असून अखंड संगम-रवराचा हौदही आहे रंगपंचमीच्या सणाच्यावेळी त्यात रंग कालवीत आणि राजेराण्या हौसेने रंग खेळत या राजप्रासादातील कलात्मक महाल आहे 'शीशमहल.' तेथे छतावर व भिंतीवर काचेचे व आरशांचे रंगीबेरंगी तुकडे अगदी चपखलपणे बसवले आहेत गाईडने एक मेणबत्ती पेटवून हलवली तेव्हा एका ज्योतीच्या हजारो ज्योती त्या आरशात जणू नाचताना दिसल्या.

राजवाड्यातील मोरचौकात रंगीबेरंगी काचेच्या तुकड्यांपासून मोराची सुंदर चित्रे तयार केली आहेत मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी, त्याची अप्रतिम चित्रे पाहून आनंद वाटतो मोतीमहालमध्ये खिडक्यांना निरनि-राळ्या रंगाच्या रंगीत काचा लावल्या आहेत त्यातून उदयपूर शहर त्या त्या रंगात म्हणजे—मोरपिशी, निळे, लाल, हिरवे दिसते पण उदयपूर आहे एक धवलनगरी. येथील सर्व इमारती व राजवाडाही पांढऱ्याशुभ्र रंगाचा आहे वरच्या मजल्यावरून पश्चिमेकडे दिसते सुंदर पिचोला तळे व त्यातील राजवाडा! महाराजाची चांदीची बग्गी, चांदीचा हौदा, पालखी सर्व जतन करून ठेवले आहे तसेच हत्ती, घोडे यांचे दसऱ्याला

जेव्हा पूजन केले जाई त्यावेळी वापरले जाणारे मौल्यवान साज दिसतात महाराजाची जुनी रोल्स राईस कारही दिसली. त्यावेळी तिची किंमत होती दीडलाख रुपये. उदयपूरच्या राजवाड्यातील दालनामागून दालने पार करताना राजपुतांच्या शौर्याची व अलौकिक कर्तबगारीची प्रचिती आली

राजवाड्याच्या शेजारी आहे जगदीशमंदिर सुमारे तीनशे वर्षांपूर्वी महाराणा जगतसिंहाने हे मंदिर उभारले. त्याकाळात पंधरालाख रुपये खर्च आला. हे मंदिर उंच चबुतऱ्यावर आहे मंदिराच्या प्रवेशद्वारी असलेली हत्तीची जोडी भाविकाचे स्वागत करते मंदिरात श्रीविष्णुची चतुर्भुज दगडी मूर्ती व पितळी गरुडमूर्ती आहे. आत साडेतीनशे वर्षापूर्वीचा शीलालेख कोरलेला आहे राजवाडा, जगदीश मंदिर पाहून निघालो मोतीमगरी टेकडीकडे !

फत्तेसागर तळ्याच्या काठाकाठाने टांगा धावत होता थोड्याच वेळात मोतीमगरी टेकडीच्या पायथ्याशी आलो या टेकडीवर चढून गेल्यावर दिसतो उंच चबुतऱ्यावरील महाराणा प्रतापचा चेतकवर आरूढ झालेला भव्य पुतळा ! हा पुतळा महाराणाच्या जाज्वल्य देशाभिमानाची व स्वातंत्र्य रक्षणाच्या जिद्दीची जणू ग्वाही देतो पुतळ्यासमोर कारंजी आहेत मात्र ती सुरू करायला एक रुपया फी आहे मऊ हिरवळीत बसून कारंजी सुरू झाल्यावर त्यातून उडणाऱ्या तुषारात इंद्रधनुष्याची शोभा पाहिली तेथे जवळच एक कलात्मक मंडप असून तेथून दुर्बिणीतून उदयपूर शहराचे विहंगम दृश्य पहाता येते मोतीमगरीचा दुतर्फा हिरवीगार झाडे असलेला रस्ता उतरून खाली आलो त्यानंतर टांगा निघाला 'भारतीय लोककला मंडल' या राजस्थानी कला संस्कृतीविषयक म्युझियमकडे ! म्युझियमची छोटीशी वास्तु, तिचा अर्धा गोलाकार वर निरुंद होणारा दर्शनी भाग व त्यावरील कलात्मक घुमट शोभिवत आहे या म्युझियममध्ये राजस्थानच्या कला, संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या विविध वस्तु, वाद्ये, कपडे आकर्षकरीत्या मांडल्या आहेत तेथील शेवटच्या दालनात कठपुतलीचा, मनोरंजक खेळ पहायला मिळाला अनेक परदेशी पर्यटकही तेथे आले होते. ध्वनिमुद्रित केलेले राजस्थानी मधुर संगीत सुरू झाल्यावर राजस्थानी महिलेच्या नाजूक बोटाच्या हालचालीने संगीताच्या तालावर नाचणाऱ्या

बाहुल्या पाहून मन हरपून गेले. कार्यक्रम केव्हा संपले ते कळलेच नाही इतके सारेजण तल्लीन झाले होते.

सध्याकाळचे सहा वाजले तेव्हा 'सहेलियांका बारी' या सुंदर बगीच्यात टांगेवाल्याने आणून सोडले. महाराजा संग्रामसिंहने अठराव्या शतकात हा कलात्मक बगीचा निर्माण केला. राजपरिवारातील स्त्रियांसाठीच हा बगीचा होता. तेथील कारंजी, नक्षीदार छत्र्या, कमलकुंड, हत्तीच्या सोंडेतून उडणारी कारंजी पाहून खूप आनंद वाटतो. येथेही कारंजी सुरू करायला फी आहे. थुई थुई उडणारी असंख्य कारंजी सुरू झाली की एखाद्या इंद्रनगरीचा भास होतो.

शेवटी आलो उदयपूरच्या बाजाराच्या रस्त्यावर. याच बाजारातून गाईड सिनेमात रोझी (वहिदा रेहमान) पायात घुंगरू बांधून गाईड राजूबरोबर (देव आनंद) फेरफटका मारतानाचे दृश्य आहे. विविध लाकडी खेळणी, टेबललॅम्प्स, शोभेच्या वस्तू यांनी दुकाने गच्च भरलेली होती. हौशी प्रवाशांनी प्रत्येक दुकानातून खरेदीसाठी गर्दी केलेली दिसत होती. आम्हीही लाकडी खेळण्यांची खरेदी केली. उदयपूरचा धावता फेरफटका आता पूर्ण झाला होता. लॉजसमोरच्याच चौकातील हॉटेलमध्ये रात्रीचे जेवण आटोपले व लॉजवर परतलो.

उदयपूरच्या मागच्या भेटीत उदयपूरच्या परिसरातील हल्दीघाटी, नाथद्वारा, कंकरोळी, एकलिंगजी, नागदा या ठिकाणांना भेट द्यायची राहिल्याने चुटपूट लागली होती. दुसऱ्या दिवशी वरील ठिकाणे पहायचा कार्यक्रम होता. सर्व ठिकाणे एका दिवसात पाहून पूर्ण करायची तर गाडीची व्यवस्था करणे जरूर होते. वाहन हाती असले म्हणजे मनाप्रमाणे निवांत स्थळे पहाता येतात. लॉजमालकाशी याबाबत बोलणे केले. सर्व ठिकाणे दाखविण्यासाठी त्यांनी कारची व्यवस्था केली.

□ □

# हल्दीघाटी–स्वातंत्र्य रक्षणाची गौरवगाथा

सकाळी आठच्या सुमारास सर्वजण आवरुन तयार होतो कार घेऊन लॉजच्या मालकांचा मित्र बरोबर साडेआठ वाजता हजर झाला प्रथम निघालो गोगुदामार्गे हल्दीघाटीकडे हल्दीघाटी म्हटले की नजरेसमोर उभी रहाते एक पवित्र समरांगणभूमी जेथे मेवाडच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ महाराणा प्रतापने बलाढ्य शौर्याने प्रखर झुंज दिली

हल्दीघाटीच्या युद्धात सम्राट अकबराने अजमेरहून पाठवलेल्या मोगल सैन्याने बनास नदीच्या बाजूला मैदानात तळ दिला होता तर राणा प्रतापच्या कुंभलगडहून निघालेल्या सैन्याने हल्दीघाटीच्या अलीकडे आठ मैलावर डेरा दिला होता राणा प्रतापजवळ होते ३००० घोडेस्वार, दोनशे पायदळ व शभर हत्ती तर अकबराजवळ होते पाचहजार घोडेस्वार· विशेष म्हणजे राणा प्रतापचा सेनापती होता पठाण हकीम सूर तर मोगलाचा मानसिंह। दोन्ही सैन्यामध्ये दहा एक मैलाचे अंतर होते दोन्ही सैन्यांची पहिली झटापट 'बादशहा बाग' या हल्दीघाटीच्या रस्त्यावरील मैदानात झाली प्रथम याच बादशहा बागजवळ आम्ही उतरलो दाट वृक्षराजींनी वेढलेले हे मोकळे मैदान सर्व बाजूनी अरवली पर्वताच्या

ह्या डोंगरांनी घेरलं आहे हे मैदान पाहून पुन्हा गाडीत बसलो. गाडी आस्ते आस्ते निरुंद घाटरस्त्याने जाऊ लागली थोड्या अंतरावर एका निरुंद व अवघड घाटाजवळ बोर्ड दिसला 'हल्दीघाटी.' आणि मग गाडीतून उतरून साधारण दोन मैलाचा हल्दीघाटीचा रस्ता पायीच चाललो. असं म्हणतात की ऐतिहासिक महत्त्वाच्या या घाटीतून एका वेळी दोन घोडेस्वार पार होत नसत इतकी ती अरुंद होती बाजूला खोल दरी आहे तर दुसऱ्या बाजूला पिवळसर रंगाच्या दगडाचे मोठमोठे पहाड! डोंगर फोडून आता तेथे रस्ता रुंद केला आहे

१८ जून १५७६ ची सकाळ! आपल्या प्रिय चेतकवर स्वार होऊन पाठीशी स्वतंत्र मेवाडचा ध्वज बांधून महाराणा प्रताप आपल्या राजपूत सैन्यानिशी स्वतः मोगल सैन्यावर चालून आले चेतकचा डौल त्यावेळी काही न्याराच होता हत्तीच्या सोंडेसारखी दिसणारी झूल त्याने मस्तका-वर धारण केली होती त्यामुळे दुरुन पहाणाऱ्याला वाटावे की राणाप्रताप हत्तीवरुनच चाल करून येत आहेत मोगल सैन्याचे अधिपत्य करणाऱ्या राजपुताला— मानसिंहाला पहाताच राणा प्रताप त्याच्यावर चाल करून गेले मानसिंह हत्तीवर स्वार होता चवताळलेल्या चेतकनेही मानसिंहाच्या हत्तीवर पाय टेकवले राणाने आपल्या भाल्याने मानसिंहावर प्रहार करा-यला सुरुवात केली मानसिंह हत्तीवरच्या पोलादी हौद्यात बसून वार चुकवत प्रत्युत्तरी हल्ला करीत होता. नशीबानेच तो वाचला दोघांचे तुंबळ युद्ध सुरु असतानाच मानसिंहाच्या हत्तीने आपल्या सोंडेत असणाऱ्या तलवारीने चेतकच्या पायावर प्रहार केला चेतकच्या पायाला गंभीर जखम झाली त्या मूक प्राण्याने जणू ओळखले की रणक्षेत्रात थांबण्याइतके सामर्थ्य आता त्याच्याजवळ उरले नाही धन्यावरील संकटाची चाहूल त्याला लागली युद्धभूमीत हजर असलेल्या झालामन्ना या राणांच्या विश्वासू सरदाराने बांका प्रसंग ओळखला त्याने महाराणांना युद्धभूमी सोडून जाण्याची विनंती केली पण महाराणा युद्धभूमी सोडून गेले असा गवगवा झाला तर मेवाडचा पराभव झाला असे समजून सैन्याचा धीर खचेल आणि मोगल सैन्य त्वेषाने या सैन्याला निपटून काढील हे त्याने जाणले. झाला-मन्नाचे रुप राणा प्रतापसारखेच होते. मोगलांनी राणाचा पाठलाग करू

नये म्हणून त्याने महाराणाच्या पाठीशी असलेले राजछत्र स्वत धारण केले आपण महाराणा आहोत असे भासवून मोगल सैन्याचे वार तो स्वत वर झेलू लागला आणि इकडे स्वामीभक्त चेतक अगात त्राण नसतानाही प्राणप्रिय महाराणांना वाचविण्यासाठी मोगलाचे वार चुकवत चुकवत सर्व सामर्थ्यानिशी वायुवेगाने बाहेर पडला

महाराणा रणागणातून बाहेर पडले तरी हल्दीघाटीच तुवळ युद्ध तीन प्रहरपर्यंत चालूच होत जय मेवाड, जय एकलिंगजी या गर्जना देत राजपुतानी पराक्रमाची शर्थ केली भिल्ल सैनिकानी तर पहाडावरून शीळा फेकल्या ऊन खूप तापले होते त्यामुळे जमीन आग ओकत होती युद्धभूमी रक्ताने लालेलाल झाली होती सकाळी विजय समीप आला अस राजपुतांना वाटत होत, पण दुपारी युद्धाच पारड फिरल विजय दुर्दैवाने हिरावून नेला स्वामीभक्त झालामन्नाने अतुलनीय शौर्य गाजवून बलीदान केले खरोखर त्याच्या स्वामीभक्तीला तोड नाही शिवाजीराजासाठी बलिदान देणाऱ्या शिवा काशीदची तीव्रतेने आठवण याप्रसगी होते राणाच्या बाजूने लढणारे ग्वाल्हेर नरेश राजाराम व त्याचे दोन सुपुत्रही धारातीर्थी पडले. त्यांचा रामप्रसाद नावाचा हत्ती मोगलाच्या ताब्यात गेला.

इकडे स्वामीभक्त चेतक तीन पायानी, सर्व सामर्थ्य एकवटून धावत होता शरीरातून रक्त व तोंडातून फेस गळत होता हल्दीघाटीमधले ओबडधोबड दगड धोंडे, डोंगरातील कडीकपारे, ओढे, नाले याची पर्वा न करता वाऱ्याच्या वेगाने धावणारा चेतक एका मोठ्या नाल्याजवळ आला. पाठीमागे होते पाठलाग करणारे मोगलसैन्य आपल्या स्वामीच्या रक्षणार्थ घायाळ चेतकने लांबच्यालांब उडी मारून नाला पार केला पाठलाग करणारे मोगल सैनिक निराशेने पलीकडच्या काठावरून परतले आता चेतकाच्या शरीरात त्राण उरले नव्हते त्याने महाराणाला सुरक्षित पोहोचवण्याची अतिम जबाबदारी पार पाडली होती महाराणांनी चेतकला थांबवले खाली उडी टाकली चेतकला थोपटले त्याच्यावरून ममतेने हात फिरवला इमानी चेतक जणू याच क्षणाची वाट पहात होता. धन्यावरील सकट दूर झाल्याचे उमगून त्याने प्राण सोडला अचेतन चेतकच्या शवाला आलिंगन देऊन महाराणा अश्रू ढाळू लागले. धन्य तो चेतक ! एका मुक्या


प्राण्याने आपल्या स्वामींच्या रक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती दिली दिली होती चेतकच्या मृत्यूने हळव्या झालेल्या महाराणांच्या पायाशी त्याचवेळी त्यांचा धाकटा भाऊ शक्तिसिंह याने लोटांगण घेतली वर्षापूर्वी महाराणांना सोडून मोगलांना मिळालेला शक्तिसिंह आपल्या चुकीबद्दल क्षमायाचना करू लागला. या रामभरताच्या मीलनाला चेतकचे शव जणू साक्षीदार होते शक्तिसिंहाने दिलेल्या घोड्यावर स्वार होऊन राणा प्रताप कलोडा गावी घायाळ अवस्थेत पोहोचले तेथे त्यांच्या घावांवर इलाज करण्यात आले तथापि आपला प्रेमळ साथीदार चेतक याच्या मृत्यूचा बसलेला घाव मात्र त्यांच्या उर्वरित आयुष्यात कधीही भरून निघाला नाही।

हल्दीघाटीचा रस्ता पायी पार केल्यावर बलीचा गावी बाजूला दिसतो पत्थर- चुन्याने बनवलेला चेतक चबुतरा तेथे छत्री असून अश्वमूर्ती आहे तसेच बाजूला शिवमंदिर असून पलीकडे नाला आहे गर्द झाडींनी तो वेढला आहे हल्दीघाटीच्या युद्धात बलीदान केलेल्या झालामन्ना, हकीम सूर तसेच रामशहा व त्याचा पुत्र या शूरांची स्मारके म्हणजे अनमोल ऐतिहासिक स्मृतीस्थळे आहेत अलौकिक पराक्रमाची स्मृती करून देणारी ही अलौकिक स्थळे


हल्दीघाटीच्या ऐतिहासिक युद्धाला आज चारशे वर्षे होऊन गेली पण या युद्धाच्या आठवणीने अजूनही शरीर रोमांचित झाल्याशिवाय रहात नाही महाराणा प्रतापला इतर राजपूत राजांप्रमाणे अकबराशी तडजोड करता आली नसती का ? स्वतःचा पुत्र उदयसिंह याला अकबराच्या दरबारात दाखल करून धन, धरती, वैभव, सिंहासन मिळवता आलं नसतं का ? पण नाही त्याच्या रोमारोमात भिनलं होतं मेवाडचं स्वातंत्र्यप्रेम. म्हणून तर त्याने हल्दीघाटीच्या युद्धतीर्थावर-बलीवेदीवर- सर्वस्व चढवले. स्वतः जंगलात वणवण फिरत राहिले हल्दीघाटीची लढाई संपली होती पण संघर्ष संपला नव्हता. १९ जानेवारी १५९७ पर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत २१ वर्षे हा संघर्ष चालूच होता तो पर्यंत ते गुहेत शिळेवर झोपले, कोरड्या घासाची रोटी खाल्ली. पण निष्ठेने स्वाभिमानभंग होऊ

दिला नाही. धन्य तो अरवलीचा लोहपुरुष की ज्याने स्वतंत्र मेवाडच्या हल्दीघाटीच्या पिवळसर सुवर्णमय मातीत शौर्याने मोगलांशी मुकाबला केला ! या दुर्गम घाटीची तांबूस व पिवळसर रंगाची, हळदीच्या रंगासारखी माती जणू शौर्यशाली राजपूताच्या रक्ताने लालेलाल झाली. हल्दीघाटीची ही पवित्र माती बरोबर घ्यायला उदय विसरला नाही. महाराणा प्रताप व चेतक यांच्या पराक्रमाच्या स्मृती घोळवतच हल्दीघाटीच्या साक्षीने पुढचा प्रवास सुरू केला

□ □




↑ राजप्रासाद, उदयपुर ↓ सहेलियोंकि बारी, उदयपुर





श्री राणकपुर मंदिर



जैनमंदिर, लोद्रुवा

# वैभवशाली नाथद्वारा

हल्दीघाटी पार करून गाडी नाथद्वाराच्या दिशेने निघाली साधारण पंधरा किलोमीटर गेल्यावर गाडी उदयपूर–अजमेर राजमार्गाने धावू लागली दुपारी बाराच्या सुमारास नाथद्वाराला पोहोचलो येथील मंदिर बस स्थानकापासून सुमारे एक कि मी अतरावर आहे रस्त्याच्या दुतर्फा मिठाईची तसेच विविध वस्तूंची अनेक दुकाने आहेत. गावाच्या मध्यभागीच मंदिर आहे

वल्लभसंप्रदायाचे मुख्य पीठ असलेले नाथद्वारा म्हणजे एक भले मोठे संस्थानच आहे मंदिराच्या सेवेत असलेल्या एखाद्या पुजाऱ्याबरोबर जेव्हा तुम्ही फेरफटका माराल तेव्हा 'संस्थान' का म्हटल याची प्रचीती आल्याशिवाय रहाणार नाही सर्वप्रथम पुजारी दाखवेल खर्चभांडार. या ठिकाणी श्रीनाथजीसाठी लागणारे अन्नधान्य, तेल, तूप यासारख्या वस्तूंचा साठा केलेला दिसतो वर्षासाठी येथे किती सामुग्री लागते हे पुजाऱ्याकडून ऐकून आपण थक्कच होतो गहू दोन हजार क्विंटल, तांदूळ पाचशे क्विंटल, साखर पंधराशे क्विंटल, जव पाच हजार तर हरबरा पाचशे क्विंटल, मूग तीनशे, उडीद शभर तर खडीसाखर पन्नास क्विंटल याशिवाय दोन क्विंटल

पिस्ता, पाच क्विंटल बदाम, चार क्विंटल चारोळे, वीस किलो केशर एक किलो कस्तुरी, पाच क्विंटल विलायची आणि नऊशे क्विंटल तूप महिन्याला लागणारे दीडलाख रुपयांचे साडेसात हजार किलो तूप साठवायला संगमरवराच्या विहिरी पाहून आश्चर्याला पारावार उरला नाही. प्रत्येकी एक हजार मण तूप मावेल अशा चार विहिरी आहेत ! बदाम-पिस्ते यानी भरलेले ड्रम तेथे आहेत श्रीनाथजींवर लोकाची एव्हढी श्रद्धा आहे की दररोज शेकडो मनीऑर्डर्स, बँकड्राफ्ट येथे येत असतात. चेक्स, रेल्वेपार्सलरीसीट तर शेकडोंनी येतातच पण रोख पैशाचा तर अक्षरश पाऊस पडत असतो !

त्यानतर आहे श्रीकृष्ण भांडार या ठिकाणी मदिराच्या जमाखर्चाचा सर्व हिशेब ठेवला जातो त्यासाठी वेगवेगळे विभाग आहेत मदिराच्या सर्व मौल्यवान वस्तू–सोने, चांदी, हिरे, माणके, केशर, कस्तुरी, भरजरी वस्त्रे येथे ठेवल्या आहेत केशर दळण्यासाठी चांदीची चक्की आहे तर कस्तुरी दळण्यासाठी आहे पाचशे तोळे सोन्याची चक्की खरोखर यावरूनच मदिराच्या सधनतेची कल्पना येते 'गहनाघरात' नाथजींची बहुमूल्य आभूषणे ठेवली आहेत. मदिरात जमा होणाऱ्या भाजीसाठी स्वतत्र 'शाकघर' आहे तेथे निरनिराळ्या भाज्यांचे ढीग पाहून आपण एखाद्या भाजीमडईत तर आलो नाही ना असा भास होतो दररोज सोळा तऱ्हेची पाच मण भाजी येथे लागते स्वच्छतेसाठी सेवक वर्गाने तोंडाला पट्ट्या लावलेल्या दिसल्या. 'खासा भांडारात' श्रीनाथजींच्या प्रसादाची सामग्री स्वच्छ करण्यात येते पानाचे विडे तयार करण्यासाठी 'पानघर' आहे श्रीनाथजीच्या श्रीमुखाला त्रास होऊ नये म्हणून पानाच्या एक एक शिरा कष्ट घेऊन काढल्या जातात चुना व काताच्या छोट्या छोट्या गोळ्या भरून सावधपणे कलात्मक विडा तयार करणारे अनेक सेवक दिसतात

पानघराजवळ आहे 'फूलघर' प्रत्येक ऋतूत जी फुले उपलब्ध असतात त्यांचे ढीग तेथे लागलेले असतात विशेषत गुलाब व चमेली ही फुले तर जास्त प्रमाणात वापरली जातात. भगवानासाठी उत्सवानुसार पुष्पमाला, मुकुट व साज कलापूर्णरीत्या केले जातात वरच्या मजल्यावर आहे

'दूधघर'. या ठिकाणी श्रीनाथजींसाठी दुधाचे दूधमलाई, दूधपुडी असे पदार्थ बनवले जातात तेथे दिसतात उकळत्या दुधाच्या कढयाच कढया महाप्रसादाच्या दुधात दोन तीन बोटे तूप तरगत असते पुढे आहे 'मेवाघर' तिथे निरनिराळ्या प्रकारची मेवामिठाई तयार केली जाते बदाम- पिस्ते यांच्या अनेक टोकऱ्या तेथे दिसतात केशर-कस्तुरीयुक्त, सोन्या–चांदीचे वर्ख लावलेली मिठाई मदिराची सपन्नता दर्शवते दररोज तेथे बारा मणाचा प्रसाद लागतो 'पातलघर' येथे श्रीनाथजीच्या प्रसादाचे सामान एकत्र केले जाते तेथे मोठमोठी भाडी, भट्टी पाहून आपण चकित होतो श्रीनाथजी साठी मथुरेहून यमुनाजल मागवण्यात येते. ते साठविण्यासाठी टाकी आहे एका कोठीत सोन्याचांदीची भाडी ठेवली आहेत गुलाबजल व अत्तर यासाठी आहे 'गुलाबघर' श्रीनाथजीना निरनिराळ्या उत्सवाच्या वेळी जी वस्त्रे परिधान करण्यात येतात ती सुरक्षित ठेवण्यासाठी 'वस्त्रघर' आहे. नवीन कपडे शिवण्यासाठी 'दर्जीघर' आहे तिथे भगवानासाठी दररोज नवा पोषाख शिवला जातो तेथे आठ शिपी दिसले समोर 'नौबतखाना' आहे मदिरासाठी येणारे धान्य दळण्यासाठी खास गिरणीही बाजूला आहे रसोईघरात प्रसादवितरणाची व्यवस्था होते, तर प्रसादी-भडारात सेवकवर्गाला व भक्ताना महाप्रसाद वाटला जातो प्रसादासाठी रोज आठ हजार रुपये म्हणजे वर्षाला पचवीस लाख रुपये खर्च होतात

श्रीनाथजी याठिकाणी कसे अवतीर्ण झाले यामागे इतिहास आहे कली-युगात लोकाच्या उद्धारासाठी भगवान श्रीकृष्णाने श्रीनाथजीचे रूप धारण केले असे मानले जाते श्रीनाथजी व्रजभूमी मथुरेजवळ गिरीराज गोवर्धन पर्वतावर पधराव्या शतकात प्रकट झाले चपारण्यातील महाप्रभू श्रीवल्लभाचार्य तीर्थयात्रेनिमित्त भ्रमण करीत असताना त्यांना श्रीनाथजीने स्वप्नात दर्शन दिले त्यात श्रीवल्लभाचार्यांना गोवर्धन पर्वतावर येऊन प्रतिष्ठापना करण्याची प्रेरणा दिली तिथे त्यांच्या प्रेरणेने मूळ छोटे मदिर बाधले गेले त्यानतर पजाबमधील पूरणमल यानी स्वप्नातील आदेशा-नुसार श्रीनाथजींच्या मदिराचा विस्तार केला त्यासाठी एक लाख रुपये खर्च केले इ स १५०८ ला सुरू झालेले निर्माणकार्य १८ वर्षांनी पूर्ण झाले. तोपर्यंत श्रीनाथजीचे वैभव खूपच वाढले होते. शेकडो गायींची


भेट मिळाली होती. तेथे कीर्तन करणाऱ्यात भगवान सूरदासही होते. त्यानंतर मंदिराची व्यवस्था पहाणाऱ्या गोस्वामींची सम्राट अकबराशी भेट झाली. त्यांच्या भक्तिभावनेने, त्यागाने, तपस्येने अकबर प्रभावित झाला. आपल्या क्षेत्रासाठी अधिकार देणारे फर्मान त्याने गोस्वामींना दिले ते फर्मान आजही गोस्वामी श्रीविठ्ठलनाथजी यांच्या वंशजाजवळ सुरक्षित आहे विठ्ठलस्वामींच्या मृत्यूनंतर त्यांच्या सात मुलांना सात पीठे देण्यात आली.

त्यानंतर औरंगजेबाने व्रजभूमीत १७२६ मध्ये आक्रमण केले मथुरेची मंदिरे उद्ध्वस्त करून तो गिरीराज गोवर्धनकडे निघाला त्यावेळी मंदिराची व्यवस्था पहात होते श्रीगोविंदजी महाराज १७२६ च्या आश्विन पौर्णिमेला त्यांनी मूर्ती गिरीराजहून सुरक्षिततेसाठी हलवली अडीच वर्षांच्या प्रवासानंतर मूर्ती नाथद्वाराला आली तेथून ती पुढे हलेना तेव्हा तेथेच मंदिर १७२८ मध्ये उभारण्यात आले येथे बनास नदी उत्तरवाहिनी आहे ती यमुनेसारखीच पवित्र मानली जाते

सध्याचे महंत तिलकायत गोस्वामी श्रीगोविंदलालजी 'मोतीमहल' या निवासस्थानात रहातात दुपारी बारा ते एक महंतांचे चरणस्पर्श करण्याची वेळ आहे येथील व्यक्तिगत संग्रहालयात प्राचीन हस्तलिखिते आहेत अकबराने दिलेले फर्मानही त्यात आहे

मंदिराच्या सभोवती मजबूत दगडी तटबंदी आहे मंदिराला शिखर नाही. लाल दरवाजामार्गे मंदिरात प्रवेश करण्यासाठी प्रथम आलो गोवर्धनपूजाचौकात दिवाळीच्या सणाच्या वेळी तेथे गायींची पूजा होते. बाजूला सिंहपोल दरवाजा आहे नंतर आलो भव्य कमलचौकात. प्रवेशद्वार दोन हत्तींच्या चित्रांनी सजले आहे कमलचौकात संगमरवरी फरशीच्या मध्यभागी कलात्मक अष्टदल कमलफुलाचे डिझाईन केले आहे तेथील दर्शनोत्सुक भाविकांमध्ये आम्हीही जाऊन बसलो ठीक अकरा वाजता मंदिराचा दरवाजा खुला झाला मंदिराच्या प्रार्थनामंडपात मग प्रवेश केला मागील उभ्या लोकांना दर्शन व्हावे म्हणून टप्पे केले आहेत रत्नजडित, शृंगारलेल्या श्रीनाथजीच्या मूर्तीच्या दर्शनाने तृप्त झालो. मूर्ती काळ्या संगमरवराची असून तिचे मुख उत्तरेकडे आहे देव्हाऱ्यात

श्रीनाथजीच्या मूर्तीजवळ केवळ पुजारी होते बाकी कुणालाच प्रवेश नव्हता देव्हाऱ्यात छतावर सुशोभित सुदर्शन चक्रराज आहे त्यावर सप्तध्वज दिमाखाने फडकत असतात मंदिरातर्फे व भक्तांतर्फे दररोज सुदर्शन-चक्राला अत्तराचे स्नान घातले जाते मूर्तीच्या मागे श्रीनाथजींचे विविध अविर्भाव रंगवलेले पडदे सोडले आहेत श्रीनाथजींना रोज आठ वेळा सजवले जाते प्रातःकाली मंगलभोग, शृंगार, राजभोग, संध्याकाळी, उत्थापनभोग, संध्याआरती व शयन अशा एकूण आठ 'झांकी' असतात. प्रत्येक वेळी वेगळा शृंगार केला जातो कृष्णभक्तीपर कवितांचे रागदारीत गायन होते.



असे हे नाथद्वाराचे मंदिर ! साक्षात् कुबेराने येथ भगवानाच्या पायाशी जणू लोळण घेतली आहे, ऋद्धीसिद्धी चवऱ्या ढाळीत आहेत तर लक्ष्मी जणू पाणी भरीत आहे येथील प्रत्येक दिवस म्हणजे जणू दिवाळीच -दिवाळीत तर उत्साहाला उधाण येते श्रीचा दिवाळीतील शृंगार असतो श्वेत जरीच्या वस्त्रांचा. पांढऱ्या हिऱ्यांनी मढवलेली पगडी, मोती, माणके, हिरे, रत्ने यांनी शृंगार केला जातो गोवर्धनपूजेची तयारी होते तिलकायत गोस्वामी नंदवंशाच्या गायींचे पूजन करतात. गायींना सजवले जाते, वाद्ये वाजवली जातात यमुनाजल, दूध, कुंकू यांनी पूजा केली जाते गोवर्धन-पूजेनंतर अन्नकूट-महोत्सव होतो पाच द्राविडी ब्राह्मणांना आमंत्रित केले जाते हा अन्नकूट-महोत्सव छत्तीस प्रकारच्या मिठाईंनी सजवला जातो दोनशे मणांचा तांदूळ शिजवला जातो अन्नकूट-सामग्रीच्या दर्शनानंतर जमलेले भक्तगण, तसेच आदिवासी, भिल्ल यांना गरम गरम भात व भाजीच्या टोकऱ्या वाटल्या जातात

श्रीनाथद्वारात रामनवमी, संवत्सरी, अक्षयतृतीया, रक्षाबंधन, जन्माष्टमी, नंदोत्सव, विजयादशमी, मकरसंक्रांत, होळी, अधिकमास हे महोत्सवही धूमधडाक्यात साजरे होतात नाथद्वाराच्या व्यवस्थेसाठी १५०० कर्मचारी आहेत दररोजचा खर्च सुमारे सोळाहजार रुपये होतो, तर वर्षाचा साठ लाख ! मंदिराच्या मालकीची नाथद्वारात ८२९ दुकाने आहेत त्यांचे वार्षिक उत्पन्न ऐंशीहजार रुपये आहे तसेच १३४४८ बिघे जमीन व विशाल गोशाला आहे. मंदिराची भारतभर ठिकठिकाणी ८४ केंद्रे आहेत मंदिराच्या मालकीची बचत सध्या सुमारे ८४ लाख रुपये आहे खरोखर हे एक वैभवशाली मंदिर आहे

नाथद्वारात चित्रकला, मीनाकारी व साडीछपाई हे मुख्य तीन व्यवसाय आहेत तथापि वीसहजार वस्तीचे हे छोटे गाव संपूर्णपणे मंदिरावरच अवलंबून आहे म्हणून म्हटले जाते–

नाथद्वारा, भावना रहो प्रेमके साथ ।
राधारानी स्वामिनी, स्वामी हैं श्रीनाथ ।।

नाथद्वाराच्या श्रीनाथजींचे दर्शन घेतल्यावर कंकरोळीकडे निघालो. उदयपूर–अजमेर मार्गावर नाथद्वाराच्या पुढे १७ कि. मी. अंतरावर वैष्णवांचे दुसरे तीर्थ आहे कंकरोळी असे मानले जाते की नाथद्वाराची केलेली यात्रा कंकरोळीच्या श्रीद्वारकाधीशाच्या दर्शनाशिवाय पूर्ण होत नाही हे विशाल मंदिर कंकरोळीच्या 'राजसमंद' या सरोवराकाठी उंचावर आहे महाराणा राजसिंहाने १६७१ मध्ये या मंदिराची निर्मिती केली. मंदिरात श्रीद्वारकाधीशाची सुंदर मूर्ती आहे

कंकरोळीच्या 'राजसमंद' या विशाल सरोवराची निर्मितीही महाराणा राजसिंहानेच केली सरोवराच्या बाजूला सुंदर बगीचा आहे हे जलाशय बांधण्याचे काम चौदा वर्षे चालले होते चार मैल लांब, दोन मैल रुंद आणि साधारण पचावन्न फूट खोल असलेल्या या जलाशयासाठी चाळीस लाख रुपये खर्च झाला १६७६ मध्ये जेव्हा या जलाशयाचे उद्घाटन झाले. त्या प्रसंगी महाराणा, महाराणी व त्याचे कुटुंबियांची सुवर्णतुला झाली व ६५ लाख रुपयांच्या सोन्याचांदीच्या वस्तूंचा दानधर्म करण्यात आला.

या सरोवराच्या एका बाजूला तीन कि मी. अंतरावर प्रसिद्ध 'पाल नौचौकी' आहे ती पहाण्यासाठी गाडीने पुढे निघालो या ठिकाणी सरोवराकाठी काटकोनात बांधलेल्या पायऱ्यांची संख्या सगळ्या बाजूंनी मोजली तर नऊच भरते. तसेच नक्षीदार छत्र्याही नऊच आहेत, तीन काठावर दिसतात तर सहा पाण्यात बुडालेल्या आहेत. प्रत्येक बाजूने संख्या नऊच असल्याने नौचौकी हे नाव पडले छत्रीचे छत, स्तंभ व तोरण यांच्यावरील सुंदर मूर्तिकाम, शिल्पकला व नक्षीदार तोरण माउंट अबूच्या दिलवाडा मंदिराची आठवण करून देतात पायऱ्या उतरून खाली गेल्यावर सर्वात खालच्या पायरीवर दिसतात गजमूर्ती.

कंकरोळीचा विशाल जलाशय पाहून उदयपूरकडे जाणाऱ्या रस्त्याने भगवान एकलिंगजीच्या दर्शनासाठी निघालो. उदयपूरच्या अलीकडे २२ कि मी अंतरावरील कैलाशपुरी गावात उतरलो रस्त्याच्या कडेलाच भगवान एकलिंगजीचे भव्य मंदिर आहे भगवान एकलिंगजी हे मेवाड महाराणाचे आराध्यदैवत आठव्या शतकात मेवाडच्या बाप्पा रावळने हे मूळ मंदिर

उभारले. मंदिरासमोर हात जोडून उभा असलेला बाप्पा रावळचा पूर्णाकृती दगडी पुतळा आहे. नंतर महाराणा मोकलने मंदिराची दुरुस्ती करून चारी बाजूला भक्कम तटबंदी उभारली. महाराणा कुंभाने जीर्णोद्धार केला तर महाराणा रायमलने मंदिराला सध्याचे स्वरूप दिले उदयपूरच्या महाराणांनीही मंदिर सुंदर पांढऱ्या संगमरवराने सजविले महाराणांचा राज्याभिषेक समारंभ या मंदिरात होई

मंदिरात काळ्या संगमरवराची श्रीसिद्धजींची चतुर्मुखी मूर्ती आहे. पश्चिमद्वाराजवळ नंदीची पितळी मूर्ती आहे. मंदिराच्या बाहेरच्या भिंती-वरील शिल्पकला दर्शनीय आहे कळसासमोर आकर्षक तोरण उभे आहे. तसेच येथील मंडप वैशिष्ट्यपूर्ण आहे मंदिराच्या चारी बाजूला अनेक मंदिरे आहेत त्यातील गणेश, दुर्गा व कलिका ही मंदिरे दर्शनीय आहेत. मंदिराजवळच्या दोन सरोवरात सुंदर कमलपुष्पे आहेत जवळच सुंदर बगीचाही आहे. एकलिंगजीचे मंदिर म्हणजे प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुनाच ! एकलिंगजीचे हे मंदिर उदयपूर राणांचे खाजगी देवस्थान आहे.

एकलिंगजी मंदिरापासून दोन कि मी अंतरावर पश्चिमेला थोडे आडवळणी असलेल्या नागदा गावी मुद्दाम गेलो तेथे पहायचे होते सासबहूमंदिर एक छोटे सरोवर व एक टेकडी यांच्यामधून रस्त्याने गेल्यावर एका चबुतऱ्यावर हे मंदिर दिसते

नागादित्याने सहाव्या शतकात मेवाडच्या राजधानीच्या रूपाने नागदानगरी वसवली तसेच या मंदिराचीही निर्मिती केली सुलतान अल्तमशने आक्रमण करून मंदिराच्या शिल्पकृतीचा विध्वंस केला पण तरी ज्या शिल्पकृती आज अस्तित्वात आहेत त्याही प्रेक्षणीय आहेत मंदिरात पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या सेवकवर्गाशिवाय कोणीही नव्हते त्यांनी मात्र मंदिराचे बारकावे आगत्यपूर्वक दाखवले मंदिराच्या आत चार नक्षीदार स्तंभ आहेत आठ ब्रॅकेट आहेत पैकी एक चोरीला गेली मंदिराला गोला-कार घुमट असून तांडवनृत्य करणारा शिव, ब्रह्मा, प्रभु राम, हिरण्यकश्यपू, वराहअवतार, महिषासुरमर्दिनी, शस्त्रधारी विष्णु अशा अनेक प्रेक्षणीय शिल्पकृती आहेत या मंदिरावर प्रेमी युगुलांच्या अनेक शिल्पकृती असल्याने याला राजस्थानचे खजुराहो असेही म्हटले जाते

नागदाची भेट आटोपली तेव्हा सूर्यास्त होऊ लागला होता गाडी पुनः अजमेर–उदयपूर राजमार्गाने वेगाने धावू लागली. स्वत' गाडीचा मालकच ड्रायव्हिंग करीत होता तो खूपच बोलका असल्याने प्रवासात कंटाळा कसा तो आला नाही अर्ध्या तासातच उदयपूरला पोहोचलो हल्दीघाटी, नाथद्वारा, कांकरोळी, एकलिंगजी व नागदा या उदयपूरच्या आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळाच्या दर्शनाने एक आगळे समाधान लाभले.

□ □

## भक्ती आणि कला यांचे संगमतीर्थ श्रीराणकपूर

बरोबर सात वाजता उदयपूर स्थानकावरून बस उदयपूर-जोधपूर रस्त्याने निघाली राणकपूर उदयपूरहून १०० कि मी अंतरावर आहे तेथे आहे सुंदर जैनमंदिर. दोन वर्षांपूर्वी माउंट अबूची जैनमंदिरे पाहिली तेव्हा ऐकलं होतं–

'आबूकी कोरनी और रानकपूरकी मांडनी !'

त्यामुळे राणकपूरच्या प्रतीक्षेत मोठ्या उत्सुकतेने प्रवास करीत होतो वाटेत प्रथम गोगुंदा हे छोटेखानी गाव लागले. महाराणा प्रताप यांचा राजतिलक जेथे झाला ते हे गाव ! ऐतिहासिक महत्त्व असलेलं हे गाव आज पडीक, भग्नावस्थेत आहे

बसमध्ये हौशी बंगाली प्रवाशांची संगत असल्याने गप्पा रंगल्या होत्या. बस एका स्थानकावर थांबली तेव्हा रडण्याचा मोठा सूर ऐकू आला एक वयस्कर राजस्थानी स्त्री तीन-चार वयस्कर स्त्रियांच्या व पुरुषांच्या गळ्यांत पडून रडत होती कुणाच्या तरी मृत्यूचे हे दुःख असावे असे वाटून आम्हीही सारेच गंभीर झालो गाडी सुरू होण्याच्या वेळी ती

वयस्कर स्त्री स्फुदत स्फुदत गाडीत चढली. नतर तिच्याबरोबरचा तिचा नातूही रडू लागला चौकशी केली तेव्हा बसमधली एक राजस्थानी स्त्री म्हणाली की वृद्ध स्त्री सासरी चालली आहे तिच्या माहेरच्या या स्त्रिया तिला रडून निरोप देत आहेत हे ऐकल्यावर बगाली प्रवासी म्हणाला, "आपल्याकडे लग्नानतर पहिल्यादा सासरी जाताना मुली रडतात तेही आजकाल कमी झालय म्हणा ! नातू असलेल्या आजीन सासरी जाताना रडायच म्हणजे फारच झाल बुवा ! " त्याच्या या उद्गारानी मात्र सर्व-जणच खदखदून हसले पण बाहेर मात्र रडण्याचा सूर अधिकच जोर धरीत होता आणि ती राजस्थानी स्त्रीही अधिकच मुसमुसू लागली, तिचा ' पोता ' ही परत गळे काढू लागला

सकाळी अकराच्या सुमाराला बस राणकपूरला थाबली राणकपूरला स्टँड नाही एका हॉटेलजवळ बस थांबली तेथून रस्त्याने पायी थोडे मागे आल्यावर मदिराचे आवार लागते रस्त्याच्या एका बाजूला मेघाई नदीचे पात्र दिसत होते मदिराच्या मोठ्या आवारात प्रवेश केला मदिराच्या सपूर्ण आवाराला लांबच्या लाब दगडी भितीची तटबदी आहे प्रवेशद्वारी अनेक उच झाडे आहेत प्रथम तेथील मदिराच्या कार्यालयाजवळ आलो. तेथील भोजनालयाच जेवणाच प्रत्येकाच तिकीट काढल. समोरच उतरण्यासाठी स्वतत्र खोल्या, प्रशस्त हॉल आहेत. अर्थात् आमच्याजवळ सामान काही नव्हतच आणि मुक्कामाचाही प्रश्न नव्हता नळावर हात-पाय स्वच्छ धुऊन मदिराच्या प्रवेशाच्या पायऱ्याजवळ आलो. प्रवेशद्वारी देवाला वहाण्यासाठी गुलाबाची ताजी फुले मिळाली. हे विशाल मदिर उच चबुतऱ्यावर विराजमान आहे.

खरोखर भगवान आदिनाथाच्या वास्तव्यासाठी किती सुदर, किती शात जागा निवडली आहे झुळझुळ वहाणाऱ्या झऱ्याप्रमाणे असणारी छोटी मेघाई नदी, ऋषीमुनीप्रमाणे स्थिर आसनस्थ झालेल्या अरवलीच्या पर्वतरांगा आणि शात एकात निसर्गसौदर्य या त्रिविध सौंदर्यांच्यामध्ये राणकपूरचे हे भव्य, गगनचुबी मदिर आहे सुदर कोंदणात हिरा अधिकच शोभून दिसावा तसे वाटते निसर्गसौदर्य आणि मानवनिर्मित कलासौंदर्य यांचा अपूर्व सगम येथे साधला आहे

मंदिराच्या पायऱ्या जसजशा चढू लागलो तसतशी मंदिराच्या विशालतेची कल्पना येऊ लागली. प्रवेशद्वाराच्या छतावर एक चेहरा व पाच शरीरे असलेली मूर्ती कोरली आहे. मंदिराच्या विशाल सभामंडपाजवळ उंचच्या उंच घडवलेले नक्षीदार स्तंभ पाहून क्षणभर मुग्ध झालो. या मंदिराची कहाणी ऐकायला उत्सुक झालो होतो. गुजराती पद्धतीची शुभ्र साडी परिधान केलेली एक हसतमुख युवती गाभाऱ्याजवळ उभी होती. मंदिराची माहिती सांगणारा कुणी गाईड इथे आहे का असे विचारल्यावर ती हसत म्हणाली, "मीच तुम्हाला मंदिराची सर्व हकीकत सांगते. चला माझ्याबरोबर." प्रेमलता शर्मा हे तिचं नाव. मंदिराच्या पुजाऱ्याची ती कन्या होती. प्रेमलता सांगू लागली –

पंधराव्या शतकातील हकीकत आहे. मेवाडच्या गादीवर राणा कुंभ राज्य करीत होता. कुशाग्र बुद्धी व तीव्र कार्यशक्ती या गुणामुळे धरणाशाह याची राणा कुंभानी मंत्रीपदावर नियुक्ती केली. राणकपूरजवळील नांदिया गावी रहाणारे धरणाशाह होते पोरवाल वंशातील. पंधराव्या शतकात आचार्य सोमसुंदरसूरी हे एक प्रभावशाली जैन आचार्य होऊन गेले. त्यांच्या प्रेरणेने मंत्री धरणाशाह धार्मिक प्रवृत्तीचे बनले. वयाच्या केवळ बत्तिसाव्या वर्षी ऐन तारुण्यात महान जैन तीर्थक्षेत्र शत्रुंजय या ठिकाणी त्यांनी आजन्म ब्रह्मचर्याचे कठीण व्रत अंगिकारले.

मंत्री धरणाशाहना एका रात्री सुंदर स्वप्न पडले. त्यात भगवान ऋषभदेवाचे भव्य मंदिर बनविण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. धरणाशाह यांनी मनोहारी शिल्पकृतींनी सजलेले भगवानाचे मंदिर बांधण्याचा संकल्प सोडला. अनेक कुशल शिल्पकाराकडून त्यांनी नकाशे मागवले. अनेकांनी नकाशे सादर केले. त्यातून मुंडारा गावाचा शिल्पकार देपाक याचा नकाशा आणि मंदिराचे चित्र याचा स्वीकार केला. धरणाशाह यांच्या निर्मल भक्तिभावनेने प्रभावित झालेल्या देपाकने मनोहर आणि विशाल अशा मंदिराच्या निर्मितीत आपले सर्वस्व ओतायचे जणू ठरवले. मंत्री धरणाशाहच्या विनंतीला मान देऊन राणा कुंभानेही उदारतेने प्राचीन मादगी गावाची अरवलीच्या मादी पर्वताच्या तळाजवळची ही भूमी मंदिर उभारण्यास

दिली राणानी जमीन दिली म्हणून या नगरीचं नाव राणपूर ठेवण्यात आलं कालांतराने त्याचेच राणकपूर हे सध्याचे नाव प्रचलित झाले

मंदिर-उभारणीला चौदाव्या शतकाच्या अखेरीस सुरुवात झाली मंदिराच्या पायाभरणीत सात प्रकारचे धातू व कस्तुरीसारख्या मूल्यवान वस्तू वापरल्या १५०० कारागीर व २७०० मजूर देपाक यांच्या नेतृत्वाखाली अखंड काम करीत होते नंतर पन्नास वर्षे पूर्ण झाली तरी मंदिरनिर्मितीच काम पूर्ण होण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा धरणाशाह यानी आपल्या वृद्धावस्थेचा विचार करून इ स १४४६ मध्ये आचार्य सोमसुंदरसूरी याच्या हस्ते मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केली. संपूर्ण मंदिर पूर्ण व्हायला ६३ वर्षे लागली त्या काळात मंदिर निर्मितीसाठी सुमारे ९९ लाख रुपये खर्च झाले

राणकपूरच्या या मंदिराची विशालता काय वर्णावी ? मंदिराचे क्षेत्र चाळीस हजार चौरसफूट इतके भव्य आहे. मंदिर तीन मजली असून चार दिशेला चार मोठे मंडप आणि वीस छोटे मंडप आहेत मंदिराला चार दरवाजे असून पाच मुख्य शिखरे आहेत ७६ घुमट आहेत. या मंदिराचे खरे वैशिष्टच आहे त्याच्या १४४४ स्तंभामध्ये. या प्रत्येक स्तंभावरील शिल्पकला वेगळी आहे. कुठल्याही दोन स्तंभाच्या शिल्पकृतींत साम्य नाही हे स्तंभ शिल्पकारानी इतक्या नाजूकतेने साकार केले आहेत की त्याला तोड नाही मंदिरात ठायी ठायी दिसणारे हे स्तंभ शिल्पकारांनी अशा कुशलतेने उभारले आहेत की गर्भगृहातील भगवानाच्या दर्शनास कुठूनही पाहिले तरी अडथळा येत नाही. इतक्या अचूक, रेखीव मांडणीचे हे स्तंभ पाहिल्यावर 'आबूकी कोरनी और रानकपूरकी मांडनी' याचा प्रत्यय येतो.

मंदिरनिर्मितीची कहाणी तर ऐकून झाली होती. आता प्रेमलताने शिल्पकृतीतील बारकावे दाखवण्यास सुरुवात केली मंदिराच्या घुमटधारी मोठ्या गोलाकार मेघनाद मंडपात सोळा भव्य स्तंभ असून त्यावर वेगवेगळी वाद्ये वाजवणाऱ्या सोळा देवतामूर्ती आहेत घुमटाखालील छतावर नक्षीकाम मोहक व नाजूक आहे. मंडपातील विविध स्तंभ १०८ तोरणानी

जोडले होते आता त्यातील फक्त तीन राहिले आहेत कारण मुसलमानांनी केलेला विध्वस ! तरी पण हे स्तभ, त्यावर मोत्याच्या माळेसारखे लटकणारे नाजूक तोरण, घुमटाखाली गोलाकार छतावर कोरलेल्या मूर्ती व बारीक नाजूक शिल्पकृतीने सजलेली लोलकासारखी शिल्पकृती या मन्त्रमुग्ध करतात बाजूला उजवीकडे एका स्तभावर मदिराचा प्रमुख शिल्पकार देपाक याची मूर्ती कोरली आहे हा शिल्पकार साधूच्या वेषात रहात असे म्हणून त्याची मूर्तीही साधूच्या वेषातील आहे डाव्या बाजूला मत्री धरणाशाह याची मूर्ती कोरली आहे तेथून गर्भगृहाकडे दृष्टी टाकली तर कुठलाही स्तभ मध्ये न येता भगवानाचे दर्शन होते. स्तंभरचनेची ही मांडणी खरोखर अलौकिकच शिवाय मदिरात स्वच्छ प्रकाशही भरपूर होता मदिरात २५० किलो वजनाच्या दोन पितळी घटा असून दोन्हीचा आवाज वेगळा आहे त्याचा आवाज तीन मैलांपर्यन्त ऐकू जातो सकाळी १० ला व सध्याकाळी ७ ला आरती होते मदिराच्या मूळ गर्भगृहात भगवान आदिनाथाची विशाल व चारी बाजूनी दर्शन देणारी भव्य मूर्ती आहे

मुख्य छतावर ॐच्या आकाराचा कोरलेला कल्पवृक्ष शिल्पकाराच्या कारागिरीची किमया दर्शवतो समोर हत्तीच्या मूर्तीवर आदिनाथाच्या मातेची मूर्ती आहे मडपाच्या डाव्या बाजूला शिल्पकारानी रायनवृक्ष साकार केला आहे खाली भगवानांच्या पादुका आहेत एका भिंतीवर पालिटानापट, महावीर भगवान याचे समोसरण कोरले आहे

या मंदिरात पूर्वी एकेकाळी नऊ भुयारी मार्ग होते. मुसलमानांच्या आक्रमणाच्या वेळी भगवानाच्या मूर्ती सुरक्षित रहाव्यात हा हेतू होता. हल्दीघाटीच्या युद्धाच्यावेळी मूर्ती आत लपवल्या होत्या सध्या मात्र एकच भुयारमार्ग चालू आहे मदिराची व्यवस्था पहाणाऱ्या एका सेवकाने तेलाचा दिवा आणला त्याच्यामागोमाग निरुद टप्प्याटप्प्याच्या मार्गाने तळघरात फेरफटका मारला ताजी हवा येण्यासाठी ठिकठिकाणी व्यवस्था केली आहे. आत अनेक दगडी ओटे असून भिंतीला टेकून या ओट्यावर मूर्ती ठेवल्या जात. जैन मूर्ती व त्यांचे अवशेष तसेच मूर्ती ठेवल्याच्या खुणा दिसत होत्या.

मंदिराचे विशाल स्तंभ तळघरापर्यंत आलेले असून मंदिराच्या मजबुती-साठीही त्यांचा उपयोग झाला.

तळघरातून वर आल्यावर अपुरे काम असलेला एक स्तंभ दिसला त्या-संबंधी प्रेमलताने सांगितले की, सर्व मंदिर प्रधानाने बांधले मग राणा कुंभाला वाटले की मी एकच खांब असा उभारेन की ज्या खांबाकडेच सर्व-जण आकर्षित होतील पण त्याची मनीषा पूर्ण होऊ शकली नाही दररोज केलेले बांधकाम रात्री पडायचे त्यानंतर दुसऱ्या दिशेच्या भव्य मंडपात आलो पहिल्या मंडपापेक्षा या मंडपाच्या छतावर जास्त कारागिरी आहे. भगवान पार्श्वनाथाच्या गुळगुळीत मूर्ती तेथे आहेत भगवानाच्या काळ्या रंगाच्या या दोन मूर्तीखाली मंत्री धरणाशाह यांची मूर्ती आहे मंदिराच्या तिसऱ्या विशाल मंडपात तर कारागिरी अधिकच आहे या ठिकाणी एक उल्लेखनीय शिल्पकृती म्हणजे पाच देह व एक चेहरा अशी पंचशरीरधारी मूर्ती ! इंद्राने पर्जन्यवर्षाव केला तेव्हा सर्पांनी तपस्या करणाऱ्या आदि-नाथावर छत धरले हा प्रसंगही शिल्पकृतीत साकार केला आहे सापाच्या मुखाच्या अकरा रांगा आणि शेपटयाही कोरल्या आहेत

चौथ्या आणि शेवटच्या सभामंडपाचे काम सुरू झाल्यावर मंत्री धरणा-शाह यांचा मृत्यु झाला पण कारागिरीचे काम सुरूच होते धरणा-शाहचा भाऊ रतनशहा याने या मंडपाचे उर्वरित काम पूर्ण केले त्याचीही मूर्ती एका स्तंभावर कोरली असून बाजूला मोक्षचक्रही कोरले आहे


मुख्य मंदिर पाहून झाले होते नंतर जिन्याने वरच्या मजल्यावर आलो. त्या मजल्यावरही खालच्या मुख्य मूर्तीच्यावर चारी बाजूला चार आदि-नाथमूर्ती आहेत त्यानंतर तिसऱ्या मजल्यावर आलो तेथेही खालच्या मजल्याप्रमाणेच भगवानाच्या मूर्ती होत्या मंदिरात भगवानाच्या एकूण ३५० मूर्ती आहेत तेथे भगवानाची आसनस्थ मूर्ती मध्ये आणि चारी बाजूला चार खांब असे मोक्षद्वार आहे. जो कोणी त्या खांबातल्या अरुंद मार्गातून चालू शकेल तो पुण्यवान असे मानले जाते शिल्पकृतीने सजलेले मंदिराचे गगनस्पर्शी शिखर म्हणजे जणू नलिनीगुल्मविमान ! नलिनीगुल्मविमान हे स्वर्गलोकातील सर्वांगसुंदर विमान मानले जाते खरोखर हे मंदिर पहाताना असे वाटते की आपण एखादे सुंदर स्वप्न तर पहात नाही !

त्यानंतर या मंदिराच्या समोर असलेल्या पार्श्वनाथ मंदिराकडे प्रेमलताने नेले ती म्हणाली की मूळ मंदिराच्या कारागिरांनी सुटीच्या वेळात काम करून हे मंदिर उभारले मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर प्रेमी युगुलांच्या मूर्ती ठिकठिकाणी दिसतात


त्यानंतर प्रेमलताने दाखवले हिंदूंचे सूर्यमंदिर ! जैन मंदिरांच्या आवाराबाहेर एक दगडी भिंत आहे ती ओलांडल्यावर हे मंदिर दिसते हे मंदिर राणाकुंभाने बांधले गर्भगृहाचे तोंड पूर्वदिशेला असून सूर्याची प्रात:काळची कोवळी किरणे थेट गाभाऱ्यात शिरतात. गाभाऱ्यात सूर्य व त्याची माता यांच्या प्रतिमा आहेत बाहेरच्या भिंतीवर ठिकठिकाणी दिसतात दोन पायावर उभ्या असलेल्या अश्वमूर्ती

मंदिरे पाहून झाली होती. प्रेमलताचा निरोप घेतला मोठ्या नम्रतेने ती म्हणाली, 'याद रखना बहेनजी !' या चुणचुणीत मुलीने सर्व मंदिरांचे बारकावे खरोखर फार व्यवस्थित दाखवले तिच्या आकर्षक निवेदनशैली-वर तर सारेच खूष होतो आता सर्वांनाच भूक लागली होती. तेव्हा भोजनगृहाकडे आलो गरमगरम पुरी, पिठले, चटणी व भात यावर ताव मारला. सर्वत्र अतिशय स्वच्छता होती जेवल्यावर अर्धा तास विश्रांती घेतली. चारच्या बसने उदयपूरकडे निघालो बस हळू हळू जात होती तसेच प्रत्येक लहान स्थानकावरही थांबत होती आठच्या सुमारास उदयपूरला पोहोचलो.

□ □



स्तंभावरील शिल्पसौंदर्य, श्री राणकपूर मंदिर



उम्मेदभवन राजप्रासाद, जोधपुर



वीरगन्या मूर्ति, मण्डोर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५५
२३०८५
क्र. ०११५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# जोधपूर

उदयपूर स्टेशनवरून पाच वाजता मारवाड एक्स्प्रेस निघाली पांढऱ्या-शुभ्र इमारती एकामागून एक नजरेआड झाल्या. उदयपूर पुन: पाहिले होते समाधान जरी वाटत होते तरी उदयपूरच्या पुनर्भेटीची ओढ लागली होती 'उदयपूर परत पहाण्यासाठी दीर्घकाळ जिवंत रहा' असं म्हटलं गेलं आहेच तेव्हा परत उदयपूर-भेटीची आशा मनात ठेवून उदयपूरचा निरोप घेतला

रात्री सातच्या सुमारास मावली जंक्शन आले तेथून एक फाटा चितोड-गडकडे जातो. त्या दिवशी उपवास असल्याने दुधाची रबडी घेतली केळी, बटाटावेफर्स, चहाही मिळाला गाडी मारवाडच्या दिशेने निघाली अंधार पूर्ण पडला होता प्रत्येकाला स्वतंत्र बर्थ असल्याने सगळेजणच खूष होते उत्काने रबरी उशांमध्ये हवा भरली. काकांनी होल्डाल सोडले शाली ब्लँकेट, चादरी घेऊन जो तो निद्राधीन झाला गाडी बाराच्या सुमाराला मारवाड जंक्शनमध्ये आली तेव्हा थोडी जाग आली. आमची बोगी जोधपूर-कडे जाणाऱ्या गाडीला जोडली गेली. परत निद्राधीन झालो. सकाळी नऊच्या सुमाराला गाडी जोधपूर स्टेशनच्या भव्य प्लॅटफॉर्मवर थांबली. सामान उतरवून घेतले

ती. काका व यशवंत यांनी प्लॅटफॉर्मवरील मिलिटरीच्या कार्यालयात जाऊन आमचे आप्त मेजर श्री. चितळे यांच्या बंगल्यावर फोन केला मग दोन रिक्षा करून शास्त्रीनगर येथील त्यांच्या बंगल्यावर पोहोचलो सौ आशाताई व त्यांची मुले चि संजय, अनिता व संगीता यांनी मोठ्या उत्साहाने आमचे स्वागत केले प्रथम सर्वांचा चहा झाला तोपर्यंत मेजर-साहेब आले. त्यांनी जातीने सर्वांची चौकशी केली सर्वांचे स्नान आटोपते आहे तोपर्यंत नाष्टा तयार होताच आम्लेट, ब्रेड व टोस्ट असा चांगला व भरपूर नाष्टा झाला खूप दिवसांनी भेटी झाल्याने इकडच्या तिकडच्या गप्पांना रंग चढला होता रविवारचा दिवस असल्याने सर्व काही आरामात चालल होत कुणालाही घाईगर्दी नव्हती दोन वाजता पुन जेवणावर ताव मारला घरगुती चवदार जेवणामुळे सगळेच तृप्त झाले जेवण झाल्यावर मस्तपैकी ताणून दिली आणि प्रवासाचा सर्व शीण घालवला साडेचारच्या सुमाराला उठल्यावर चहा झाला. आवरून सर्वजण मंडोर बगीच्याकडे बसने निघालो

जोधपूरपासून आठ कि. मी अंतरावर उत्तरेला एका टेकडीच्या पायथ्याशी मंडोर बगीचा आहे जोधपूर शहर स्थापन होण्यापूर्वी जुन्या मारवाड राज्याची राजधानी होती मंडोर ! माडू ऋषींच्या वास्तव्यामुळे मंडोरचे पूर्वीचे नाव होते मांडव्यपूर ! रावणाची पत्नी मंदोदरी ही येथील होती तिच्या नावावरूनच मंडोर हे नाव रूढ झाले असावे असे काहींचे मत आहे मंडोरवर प्रथम नागवंशी राजपूत, त्यानंतर परमार व नंतर परीहार राजे राज्य करीत होते १४ व्या शतकात राठोड राजा चूंडा याने परीहार राजपुताकडून जिंकून घेतले. एके काळचे राजधानीचे ठिकाण असलेले मंडोर आज भग्नावस्थेत आहे परंतु एका छोट्या डोंगराच्या कडेने पायथ्याशी वसवलेला बगीचा मंडोरचे खास आकर्षण आहे

बगीच्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून गेल्यावर आत रस्त्याच्या दुतर्फा असलेले उंचच उंच वृक्ष जणू आपले स्वागत करतात या वृक्षांमुळे पडलेल्या दाट छायेतून गेल्यावर एक मोठा वैशिष्ट्यपूर्ण मंडप दिसतो तेथे एका प्रचंड शिळेत सोळा वीरांच्या पूर्णाकृती मूर्ती कोरल्या आहेत या मूर्तींचे शिल्पकाम महाराजा अभयसिंह यांच्या कारकीर्दीत १८ व्या शतकात

करण्यात आले. भगवान सूर्य, रामचंद्र, श्रीकृष्ण, ब्रह्मदेव, शिव या देवतांच्या तसेच राजपूत वीराच्या भव्य अशा या सोळा मूर्ती आहेत काही घोड्यावर कोरलेल्या आहेत, तर काही हत्तींवर मूर्तींना चुन्याचे प्लॅस्टर करून रंग दिला आहे

मंडोरच्या राजघराण्यातील महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचं शेवटचं क्रियाकर्म ज्या ज्या ठिकाणी केलं त्या त्या ठिकाणी स्मारक म्हणून छत्र्या उभारल्या आहेत तांबड्या दगडात उत्कृष्ट शिल्पकलेने घडवलेल्या या छत्र्यांना देवल असेही म्हणतात राजा मालदेवच्या पूर्वीच्या छत्र्या मंडोरच्या टेकडीवरील पचकुंड येथे आहेत नंतरच्या राजांची स्मारके दक्षिणोत्तर एका सरळ रेषेत मंडोरच्या या मोतीसिंह बगीच्यात उभारली आहेत त्यापैकी पहिले आहे रावमालदेव देवल

रावमालदेव हा जोधपूरच्या राजघराण्यातील १६ वा वंशज इ स १५३१ मध्ये तो गादीवर आला जोधपूर शहराभोवती तटबंदी यानेच केली. अजमेर व नागोर प्रांतावर विजय मिळवले रावमालदेव उत्साही, महत्त्वाकांक्षी व पराक्रमी होता मारवाडच्या भरभराटीची सुरुवात त्याच्याच काळात झाली त्या वेळी दिल्लीच्या तख्तावर मुगल बादशहा हुमायून याचा पराभव करून शेरशहा राज्य करीत होता शेरशहाने मारवाडवर आक्रमण केले रावमालदेवने त्याच्याविरुद्ध ऐंशी हजारांची फौज उभी केली तथापि शेरशहाने कपटाने विजय मिळवला त्यानंतरही मोगल सम्राट् अकबराने १६ व्या शतकात मारवाडवर स्वारी केली रावमालदेवने याही वेळी पराक्रमाची शर्थ केली पण त्याचा पाडाव झाला १५६२ मध्ये तो मरण पावला. त्याचे हे स्मारक राजा उदयसिंहाने १५९१ मध्ये बांधले

दुसरे स्मारक आहे मोटा राजा उदयसिंह यांचे राजा उदयसिंह यांनी १५८१ ते १५९५ पर्यंत राज्य केले त्यांची शरीरयष्टी मोठी होती म्हणून त्यांना मोटा राजा म्हणत सम्राट् अकबराने त्यांना राजा ही पदवी दिली. मारवाड विजयाच्या वेळी रावमालदेवकडून जिंकलेला केवळ अजमेर प्रांत उदयसिंह यांना अकबराने परत दिला तसेच माळवा प्रांतातील काही भागही त्यांनी मिळवला. शेवटचे दिवस लाहोरला मोगलसेनेत नोकरीत

घालवल्यावर तेथेच ते मरण पावले राजा उदयसिंहाचे हे स्मारक राजा सूरसिंहाने १६११ त बांधले

तिसरे स्मारक आहे सूरसिंह या राजाचे १५९५ मध्ये गादीवर आलेल्या या राजाला सम्राट् अकबराने 'सवाई राजा' ही पदवी दिली. गुजरात व जालोर प्रांतांवर सूरसिंहाने विजय मिळवला तसेच जोधपूरमध्ये भव्य प्रासाद बांधले ते १६२० मध्ये मरण पावले राजा गजसिंहाने' हे त्याचे स्मारक १६२२ मध्ये बांधले

चौथे स्मारक आहे राजा गजसिंहाचे ! तो जहांगीरच्या खास विश्वासातील होता जहांगीरने त्याला दख्खनचा सुभेदार नेमले होते राजपुत्र खुर्रम् ऊर्फ शहाजहानने केलेल्या बंडाचा उपशम करण्यात राजा गजसिंह याने जहांगीरला मदत केली त्यावेळी जहांगीरने राजा गजसिंहाच्या हाताचे प्रेमाने चुंबन घेतले त्यांचा मृत्यू १६३८ मध्ये आग्रा येथे झाला महाराजा जसवंतसिंह राठोड यांनी त्याचे स्मारक १६४९ मध्ये बांधले

पाचवे भव्य स्मारक आहे जसवंतसिंह राठोड याचे राजा गजसिंह यांचा ज्येष्ठपुत्र अमरसिंह तापट स्वभावाचा होता म्हणून धाकटा भाऊ जसवंतसिंह राठोड १६३८ मध्ये गादीवर आला. तेव्हा त्याचे वय केवळ बारा होते २८ वर्षे तो औरंगजेबाबरोबर दख्खन मोहिमेत होता. राजा जसवंतसिंहाचे जीवन शौर्य, धडाडी, पराक्रम यांनी भरलेले आहे ते जसे योद्धा, राजकारणी तसेच कलाप्रेमीही होते हिंदी, संस्कृत, पर्शियन या तीन भाषा त्यांना उत्तम अवगत होत्या त्यांची एकूण कारकीर्द चाळीस वर्षांची औरंगजेबाने त्यांना प्रथम शिवाजीविरुद्ध मोहिमेत पाठवले होते नंतर गुजरातचा सुभेदार नेमले शेवटी त्यांना औरंगजेबाने काबूलला बंड मोडण्यासाठी पाठवले, आणि इकडे त्याच्या मुलाला – राजपुत्र पृथ्वीसिंहला बोलावून विषारी पोषाख घालून कपटाने मारले. तिकडे काबूलमध्येही जसवंतसिंहाचे दोन पुत्र मरण पावले अत्यंत पराक्रमी अशा जसवंतसिंहाचा पेशावरमध्ये वयाच्या ५२ व्या वर्षी मृत्यू झाला जसकुंवर जदमानजी व कछवाई राणी या त्याच्या दोन महाराण्यांना सती जाण्यापासून परावृत्त करण्यात आले कारण दोघी गर्भवती होत्या राजा जसवंतसिंहाचे स्मारक महाराजा अजितसिंहाने १७२० मध्ये बांधले

सहावे स्मारक आहे अजितसिंह यांचे १६७९ मध्ये लाहोरला त्यांचा जन्म झाला काबूल मोहिमेनंतर दिल्लीला परतलेल्या औरंगजेबाने राठोड-घराण्यातील या शेवटच्या वंशजाची मागणी केली. तथापि सेवक दुर्गादास राठोडने हुशारीने राणी व राजपुत्र यांची जोधपूरला रवानगी केली औरंगजेबाने मारवाडविरुद्ध मोहीम यशस्वी होण्यासाठी जंगजंग पछाडले पण ही मोहीम यशस्वी झाली नाही अजितसिंह मोठा झाल्यावर गादीवर आला मोगलाविरुद्ध जयपूर व उदयपूरच्या राजाना एकत्रित केले १७२४ मध्ये अजितसिंहाचा त्याच्या मुलानेच खून केला. केवढे हे दुर्दैव ! महाराजा अभयसिंहाने अजितसिंहाच्या स्मारकाचे सुरू केलेले काम महाराजा भीमसिंहाने पूर्ण केले

वरील सहा स्मारकांखेरीज महाराजा अभयसिंह, बख्तसिंह, मानसिंह, तख्तसिंह यांची लहान स्मारके आहेत मंडोर बगीच्याच्यावर टेकडीवर जुनागड किल्ल्याचे भग्नावशेष आहेत त्यानंतर सुमारे दीड कि मी. अंतरावर टेकडीच्या सपाट पृष्ठभागावर दगडी फरसबंदी केली आहे त्या ठिकाणी सर्वात अगोदरच्या जोधपूर राजघराण्यातील राजाच्या छत्र्या आहेत राव चूडा, जोधपूर वसवणारा राव जोधा, राव गंगा या राजाच्या नक्षीदार छत्र्या पंचकुंडाजवळ आहेत मारवाड राण्यांच्याही काही छत्र्या आहेत त्यांपैकी महाराजा मानसिंहाची राणी कछवाईजी हिची छत्तीस स्तंभ असलेली भव्य छत्री तेथे आहे

मंदोरच्या सुंदर बगीच्यातला अर्ध्या दिवसाचा फेरफटका मजेत झाला. तांबड्या दगडातील राजांची नक्षीदार स्मारके, वीरांच्या शिल्पकृती, छोटा जलाशय, त्यातील कमळपुष्पे, कृत्रिम धबधबा, रंगीबेरंगी बोगनवेली, आल्हाददायक रेशमी हिरवळ व उंच उंच प्रचंड हिरवेगार वृक्षराज या सर्वांमुळे मन कसे सुखावून गेले

जोधपूरच्या वास्तव्यातील दुसरा दिवस उजाडला. गरम गरम आलू-परोटे, दही, लोणचे असा मस्त ब्रेकफास्ट झाला त्यात आणि सौ. आशाताईंचा प्रेमळ आग्रह. नऊ वाजता सर्वजण स्टेशनवर आलो. रात्री आठच्या जैसलमेर गाडीचे रिझर्वेशन केले दुसऱ्या दिवशी जैसलमेर पाहून तेथून रात्रीच्या गाडीने जोधपूरला तिसऱ्या दिवशी परतणार होतो.

तिसऱ्या दिवशी रात्री बीकानेरला जायचे होते तेही रिझर्वेशन केले दोन्ही रिझर्वेशन्स मिळाल्याने निर्धास्त झालो. " आज सर्व जोधपूर पाहू या " या हृयाच्या म्हणण्याला सर्वांनीच होकार दिला टूरिस्ट डिपार्टमेंटची कंडक्टेड टूर माणशी बारा रुपये घेते. मुलानाही पूर्ण तिकीट शिवाय मनासारखे भरपूर वेळ थांबून प्रत्येक स्थळ निवांत पहाता येणार नव्हते म्हणून एका रिक्षावाल्याला गाठले त्याच्याकडे सर्व प्रेक्षणीय स्थळांची यादी दिली. पंचेचाळीस रुपयात दिवसभरात सर्व स्थळे दाखवण्याचे त्याने कबूल केले सर्वजण रिक्षात बसलो रिक्षा प्रथम निघाली जोधपूरच्या किल्ल्याकडे.

किल्ल्याकडे जाताना वाटेत जहाजाच्या आकाराची एक भव्य पण जुनी इमारत दिसली त्याला शिपहाऊस म्हणतात पूर्वी राजाचे ते खाजगी आकाशवाणी केंद्र होते आज तेथे इरिगेशन खात्याची कचेरी आहे

राव जोधाने इ स १४५३ मध्ये जोधपूर या नव्या राजधानीच्या नगरीचा पाया घातला मारवाडची पूर्वीची राजधानी मंडोर सुरक्षिततेच्या दृष्टीने अयोग्य वाटल्याने राजधानीचे ठिकाण म्हणून निवडले गेले जोधपूर शहर जोधपूरच्या प्रख्यात किल्ल्याला ' मयूरध्वज ' नाव देण्यात आले. जोधपूर गावाच्या सभोवताली सर्व वालुकामय सपाट प्रदेश आहे. पण गावापासून सुमारे तीन कि मी. अंतरावर १२५ मीटर उंचीचा लालसर गुलाबी रंगाचा एकुलता एक प्रचंड खडक आहे या खडकावर साधारण ४५० मीटर लांब व २२५ मीटर रुंदीच्या जागेत अनेक महाल व बरॅक्स आहेत. किल्ल्याभोवती भक्कम तटबंदी आहे रिक्षाने प्रथम आस्ते आस्ते चढाई संपवली रिक्षा थांबवून, उतरून किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पायी चालण्यास सुरुवात केली ज्या ठिकाणी किल्ल्याचा पाया प्रथम घातला त्या भिंतीजवळ थांबलो तेथे १४५९ मध्ये भावी राज्यकर्त्यांच्या सुयशासाठी बम्भी रजिया नावाच्या चर्मकार माणसाचा जिवंत बळी देण्यात आला

किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराचे नाव आहे जयपोल या नावामागेही आहे एक ऐतिहासिक घटना जयपूरचे महाराज जगतसिंह यांनी जोधपूरच्या या किल्ल्यावर १८०६ मध्ये हल्ला केला किल्ला घेरला या प्रवेशद्वारावर तोफा डागल्या भिंतीवर तोफा डागल्याच्या खुणा अजूनही दिसतात पण

जोधपूर-महाराजा मानसिंह यानी जयपूर-महाराजाचा हा हल्ला न डगमगता धीराने परतवला विजय मिळवला या विजयाच्या स्मरणार्थ जयपोल हा दरवाजा उभारला. हा दरवाजा खास अहमदाबादहून आणण्यात आला त्यानंतरचा लोहापोल हा भव्य दरवाजा शिसवाचा असून त्यावर भाल्यासारखी लोखडी टोके ठिकठिकाणी आहेत शत्रूच्या हत्तीनी धडक मारू नये म्हणून ही योजना या दरवाजाच्या बाजूच्या भितीवर राजपूत वीराबरोबर सती गेलेल्या राजपूत स्त्रियांच्या स्मरणार्थ त्याच्या हाताचे पजे शिल्पकृतीत कोरले आहेत एका बाजूला एकतीस व दुसऱ्या बाजूला पाच पजे कोरले आहेत सतीचे हात पाहून त्यांच्या धैर्याबद्दल आदर व दु:खाबद्दल सहानुभूती वाटली

यानतर लागणारा फतेहपोल महाराजा अजितसिहाने मोगलांवर १७०७ मध्ये मिळवलेल्या विजयाप्रीत्यर्थ उभारला किल्ला व आतील महाल पहाण्याची प्रवेश फी प्रत्येकी तीन रुपये आहे तिकिटे काढली किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळच केसरी रगाचा फेटा आणि जोधपुरी कोट घातलेले तिघेजण सनई चौघडा वाजवून येणाऱ्या पर्यटकाचे स्वागत करताना दिसले. अनेक परदेशी पर्यटक मोठ्या कौतुकाने त्याच्याकडे पहात होते मग सनई, चौघडा वाजवणाऱ्या, पारंपारिक पोषाख केलेल्या त्या तिघांचे बरेच फोटो त्यानी काढले सनई वाजवून स्वागत करायचा प्रकार आगळा वाटला.

पायऱ्या चढून प्रथम शृगारचौकी या चौकात आलो तेथे फुलाचे नाजूक डिझाईन असलेले एक सगमरवरी आसन दिसले जोधपूर राजघराण्यातील नव्या राजाचा गादीवर बसण्याचा विधिवत कार्यक्रम येथे होतो. बगाली सिनेमा ‘तृष्णा’ आणि ‘सीता’ याचे येथे शूटिग झाले अशी माहिती गाईडने दिली शृगारचौकीतून पायऱ्या चढून वर आल्यावर दिसतो चदनमहाल महाराजांचा कार्यालयाचा कारभार येथे चाले त्यावेळी तेथे जशी रचना असे तशीच आजही ठेवली आहे. समोर दीपकमहाल असून तेथे दिवाण व मत्री बसत. या महालाच्या भिती लाल पत्थराच्या असून खाली सर्व सगमरवर आहे. कवडी चुन्याचे आवरण असलेले स्तभ चमकताना दिसतात.

चदनमहालातील दुर्गादास राठोड याचे भव्य तैलचित्र लक्ष वेधून घेते.

या चित्रात दुर्गादास राठोड घोड्यावर आरूढ झालेला दिसतो समवेत लहान राजपुत्र अजितसिंहही घोड्यावर आहे. औरंगजेबाने पाठवलेल्या मोगल सैनिकांचा पाठलाग चुकवीत चुकवीत त्याचा प्रवास चालू असताना वाटेत दुर्गादासला भूक लागते. चित्रात त्याचे सैनिक रस्त्याच्या कडेला जाळ पेटवून स्वयपाक करताना दिसतात मोगल सैनिक पाठलागावर असल्याने दुर्गादासला घोड्यावरून उतरायला सवड नाही. एक राजपूत सैनिक मोगल सैन्याची टेहळणी करताना दिसतो जोधपूर नरेश जसवतसिंह राठोड हा मोगल दरबारात शहाजहान बादशहाचा सुभेदार होता शहाजहानने त्याला माळव्याचा सुभेदार नेमले होते त्यावेळी दुर्गादास महाराजाचा विश्वासू सेनापती होता दरम्यान शहाजहानच्या आजारपणाच्या बातमीने दिल्लीचे तख्त मिळवण्यासाठी दख्खन मोहिमेवर असलेला औरंगजेब आग्र्याकडे त्वरेने निघाला उज्जैनजवळ जसवतसिंहने त्याचा आग्र्याकडे जाण्याचा रस्ता रोखण्याचा प्रयत्न केला घनघोर युद्ध झाले ही घटना १६५८ मधील. त्यावेळी जसवतसिंह व दुर्गादास दोघेही गभीर जखमी झाले. दोघे शौर्याने लढले पण उपयोग झाला नाही. इकडे औरंगजेबाने आपला मोठा भाऊ दारा याचा पराभव केला आग्र्याचा किल्ला जिंकला शहाजहानला आग्र्याच्या किल्ल्यात कैदेत टाकून स्वत: राजपदावर आरूढ झाला. त्याने नतर जसवतसिंहाला शिवाजीराजाविरुद्ध शाईस्तेखानाला मदतनीस म्हणून पुण्याला पाठवले होते तो काही दिवस माळव्याचा व नतर गुजरातचा सुभेदार होता पण सशयी औरंगजेबाच्या मनात जसवतसिंहाबद्दल शका आणि रागही होताच शेवटी त्याची नेमणूक काबूलप्रांतात ठाणेदार म्हणून झाली वयाच्या ५२ व्या वर्षी तो पेशावरला मरण पावला तेव्हा जोधपूर गादीला कुणी वारस नव्हता. कारण एका राजपुत्राचा वध कपटाने औरंगजेबाने केला होता दोन राजपुत्र मरण पावले होते मात्र महाराजाच्या दोन महाराण्या गर्भवती होत्या विश्वासू दुर्गादासने दोघींची काळजी घेतली पेशावरहून परतताना वाटेत लाहोरला दोन्ही महाराण्या प्रसूत होऊन दोन राजपुत्राचा जन्म झाला त्यापैकी एक राजपुत्र अजितसिंह व महाराणी याना दिल्लीमार्गे जोधपूरला पोहोचवेपर्यंत दुर्गादास राठोडने अत्यत कष्ट घेतले. औरंगजेबाने या राजपुत्राची मागणी केली पण

त्याच्या सैनिकाचा ससेमिरा चुकवून स्वामिभक्त दुर्गादासने त्यांना जोध-पूरला पोहोचवले अजितसिंह १८ वर्षांचा होऊन राज्यकारभार सभाळे-पर्यंत त्याने त्याची सेवा केली. दुर्गादासमुळेच जोधपूरचे राज्य खालसा होऊ शकले नाही खरोखर त्याच्या कर्तव्यतत्परतेला, स्वामिनिष्ठेला तोड नाही. चित्रकाराने दुर्गादासचे अगदी जिवत चित्रण केले आहे.

महालाचे पुढचे दालन आहे झांकीमहल तेथे राजपुत्राच्या बालपणी वापरलेले नऊ सुदर पाळणे ठेवले आहेत त्यातला वीजेवर चालणारा पालणा उल्लेखनीय आहे या पाळण्याच्या दोन बाजूला तो ओढणाऱ्या स्त्रियांच्या दोन मूर्ती आहेत छतावरही सुदर पेंटिंग आहे. बाजूला पॅसेज असून त्याला नक्षीदार झरोके आहेत

महालाचे यापुढचे दालन आहे मोतीमहल ऊर्फ दरबार-ए तख्त येथील मोठे तख्त राजासाठी असे बाजूला राजकुमारासाठी खुर्ची आहे मत्र्यासाठी वेगळी लाल रगाची आसने आहेत छतावर काचेचे नाजूक नक्षिदार काम असून सोनेरी रगाचे पेंटिंग आहे आजही या पेंटिंगचा रग जसाच्या तसा आहे महाराणा सूरसिंह याना पाच राण्या होत्या, म्हणून त्याच्यासाठी पाच स्वतत्र झरोके आहेत झरोक्यांना रगीबेरगी काचा लावलेल्या आहेत होळीचा सण महालात धूमधडाक्यात साजरा होई त्यासाठी खास सगमरवरी चौक असून महाराजासाठी तेथे सगमरवरी आसन आहे

पुढे आहे हवामहल तेथे सोंगटया खेळण्यासाठी वापरण्यात येणारा, छोटया मण्यांनी मढवलेला पट शोकेसमध्ये ठेवला आहे तेथील निर-निराळ्या शो-केसेसवर लाखेचे पेंटिंग, हस्तिदती काम आहे एका शोकेसमध्ये श्रीकृष्णाची मूर्ती आहे तर दुसऱ्या बाजूला आहे देवघर गणगौरीच्या मूर्तीही आहेत

पुढील दालन 'पेंटिगहॉल' म्हणून ओळखले जाते होळीचा सण, कृष्णलीला, घोड्यावरचा पोलो खेळ ही चित्रे तेथे आहेत बुदीचा राजा सिंहाची शिकार करताना चित्रित केला आहे नावेत बसलेला अकबर बादशहा व त्याचा दिवाण बिरबल यांचेही चित्र आहे उदयपूर, जैसलमेर

येथील राजांची चित्रे जशी आहेत तसेच जोधपूर राजा सवाई माधवसिंह यांचेही चित्र आहे या महाराजांची उंची साडेसात फूट व घेर चार फूट होता

त्यानंतरचा शीशमहल चारशे वर्षांपूर्वी सूरसिंह यांनी उभारला आतील छतावर काचेची सुंदर झुंबरे आहेत या महालात राणी पूजाअर्चा करी तेथे राम, कृष्ण, हनुमान वगैरे देवांची चित्रे आहेत हस्तिदंताचे काम केलेली शीशमची आकर्षक खुर्ची आणि अक्रोडाच्या लाकडाचे अतिसुंदर टीपॉय आपले लक्ष वेधून घेतात महाराजा उमेदसिंह यांना चीनहून भेट मिळालेल्या या टीपॉयच्या काचेवर सिंहाचे चित्र आहे

पायऱ्या चढून वर आलो तेथे २५० वर्षांपूर्वीचे महाराज तख्तसिंहांचे शयनघर आहे मजबूत पाय असलेला तेथील पलंग भव्य आहे राजकुमारासाठी वापरला जाणारा सुंदर लाकडी पाळणा जतन करून ठेवला आहे भिंतीवर सोन्याचे पेंटिंग असून देवदेवतांची चित्रेही काढलेली आहेत अडीचशे वर्षांपूर्वीचा काश्मिरी गालीचा सुंदर आहे महाराजा अजितसिंह यांच्या 'अजितविलास'मध्ये आहे सोन्याची झूल असलेली पालखी ही कलात्मक आणि किंमती झूल एका जाळीआड ठेवली आहे या जाळीतून ही मोहक झूल दिसते महाराजा अभयसिंह यांनी जिंकलेली २२ किलो वजनाची चांदीची गणगौरही तेथे आहे शोकेसमध्ये छोट्या राजकुमाराची टोपी, हाताने कलाकुसर केलेली मच्छरदाणी, राणीसाहेबांचे सतरा मीटर लांबीचे घागरे, महाराजांचे अंगरखे अशा उल्लेखनीय वस्तू जतन करून ठेवल्या आहेत. एका शोकेसमध्ये महाराजा गजसिंह यांची रखेली अनारा बेगम हिच्या बांगड्या, तसेच तिची मोजडीही आहे मोजडी म्हणजे पायात घालायचे नाजूक बूट. या मोजडीच्या वरची हिरेमाणके चमकताना दिसतात या मोजडीमागे मजेदार इतिहास आहे, असे तेथील गाईड म्हणाला आम्ही त्याला तो इतिहास सांगण्याची विनंती केल्यावर त्याने एक गमतीदार पण महत्त्वाचा प्रसंग सांगितला. महाराजा गजसिंहांना दोन राजपुत्र होते ज्येष्ठ पुत्र अमरसिंह व धाकटा जसवंतसिंह एकदा अनारा बेगम महाराजांबरोबर बागेत फिरत असताना तिने ही मोजडी काढली पुढे गेल्यावर राजपुत्रांना तिने मोजडी आणायला सांगितली थोरल्या

राजपुत्राने मोजडी आणण्यास नकार दिला तो तिला तुच्छ लेखीत असे. धाकट्या जसवतसिंहाने मात्र सांगितले की ही स्त्री आमच्या वडिला-बरोबर असल्याने आम्हाला मातेसमान आहे त्याने तिला आदराने मोजडी आणून दिली अनाडाबेगमने गजसिंहाला पूर्णपणे वश केले होते त्यामुळे जसवतसिंहाला उत्तराधिकारी बनवावे या तिने केलेल्या सूचनेला महाराजानी समती दिली अशाप्रकारे अनाडा बेगमची मोजडी उचलल्याचे फळ जसवतसिंहाला मिळाले. तो लहान असूनही गादी त्याला मिळाली. थोरल्या अमरसिंहाला नागोर परगण्याला पाठवण्यात आले तो इतिहास ऐकून त्या मोजडीकडे परत परत पहात महालातून बाहेर पडलो

वरचे सर्व महाल हिडून झाले होते जिन्याने उतरून खालच्या महालात आलो तो आहे डान्सिंग हॉल तीनशे वर्षांपूर्वी महाराजा अभयसिंह यांनी हा कलात्मक हॉल बांधला या हॉलच्या छतावर केलेल्या कलाकुसरीला तोड नाही ८० किलो वजनाचे सोने कलाकुसरीसाठी वापरण्यात आले महाराजासाठी खास बैठक असून मागे जोधपूर राज्याचे बोधचिन्ह आहे त्यावर रणबका राठोडची आकृती कोरली आहे. बाजूला दोन मोठे आरसे असून जोधपूरच्या २१ महाराजांची भव्य तैलचित्रे आहेत

डान्सिंग हॉल पाहून जिना उतरून खाली आलो त्या दालनामध्ये प्रथम एका शोकेसमध्ये दिसते साडेसतरा किलो वजनाचे तीन किल्ल्यांनी उघडणारे कुलूप. तसेच आणखी एक चार किल्ल्याचे मोठे कुलूप आहे खजिन्याच्या रक्षणासाठी ही कुलूपे वापरत दुसऱ्या एका शोकेसमध्ये राजपरिवारातील व्यक्ती वापरत असलेली विविध व्यायाम-साधने मांडून ठेवली आहेत पाहुण्यासाठी वापरली जाणारी खास बैठकही तेथे दिसते अक्रोडाच्या लाकडापासून तयार केलेले व काचा लावून सुशोभित केलेले पाच मोठे सोफासेट तसेच सहा पायांचे नक्षीदार टीपॉय दिसले मद्य पिण्यासाठी राजे वापरत असलेल्या विविध, कलात्मक सुरया एका शोकेसमध्ये दिसतात त्यातील एक तर शुद्ध सोन्याची आहे तिची चमक काही आगळीच होती राणीसाहेब वापरत असलेली दागिने ठेवण्याची चांदीची पेटी तेथे आहे गुलाबजल ठेवण्यासाठी चांदीच्या नक्षीदार गुलाबदाण्या जशा आहेत

तशाच अत्तर ठेवण्यासाठी अत्तरदाण्याही आहेत ताबूलपात्र, गुडगुडी, हुक्केही आहेत पुढच्या एका शोकेसमध्ये आहे संपूर्ण हस्तिदंती काम केलेली शृंगारपेटी पुढे एक अतिशय सुंदर असे तीन चौरस फुटांचे टेबल आहे त्याची किंमत एक लाख रुपये आहे हे टेबल काबूल, अफगाणिस्तान येथील पिवळे, काळे, निळे, हिरवे असे रंगीत पत्थर कलात्मकरीत्या जोडून इतक्या चपखलपणे तयार केले आहे की पाहाताना वाटते हे टेबल एकाच अखंड रंगीबेरंगी पत्थराचे बनवले आहे. एका शोकेसमध्ये राज-परिवाराच्या विवाहाच्या वेळी प्रवेशद्वारी वापरण्यात येणारे नक्षीदार तोरण ठेवले आहे त्यात मध्ये गणेशमूर्ती आहे या दालनामध्ये अनेक मौल्यवान वस्तू आहेत त्यांत आहेत चंदनी पेटया, हस्तिदंती फूल, हस्तिदंती मोटार, रेल्वेचे मॉडल, हस्तिदंती व चांदीचे पानदान यासारख्या वस्तू

शेवटी तळमजल्यावरील शस्त्रांचे भव्य दालन पहायला सुरुवात केली या विभागात दिसतात चिलखते, टोप, ढाली, तलवारी, भाले, बंदुका, कटयारी, सुरे, धनुष्यबाण, अंकुश, पिस्तुल, कुऱ्हाडी, शिरस्त्राणे महाराजा अमरसिंह यांच्या अनुक्रमे सतरा व बारा किलो वजनाच्या तलवारी तेथे जशा आहेत तशाच देवीला बळी देण्याच्यावेळी वापरल्या जाणाऱ्या वेग-वेगळ्या तलवारीही आहेत हत्तीसाठी वापरण्यात येणारे अंकुश तसेच माणिक, मोती लावलेल्या ढालीही आहेत पिस्तुल व तलवार संलग्न असणारे वैशिष्टयपूर्ण शस्त्र लक्ष वेधून घेते छोटया राजकुमाराची शस्त्रे वेगळी आहेत सर्व आयुधे घातल्यावर जर खाज आली तर खाजविण्यासाठी लांब काठी असलेला पोलादी पंजाही तेथे ठेवला आहे पंजा पाहून सर्वांना खूप हसू आले

शेवटचे दालन होते हत्तीवरील अंबारी अथवा चांदीच्या हौद्याचे अनेक अंबाऱ्यामध्ये मोगल बादशहा शहाजहान याने १७ व्या शतकात जोधपूर नरेशाला भेट दिलेली अंबारी सुंदर आहे त्यावर बाजूला चांदीचे सिंह कोरले आहेत येथील हत्तीची चांदीची झूल, सोंडेवर घालायची नक्षीकाम केलेली सोन्याची झूल प्रेक्षणीय आहे पालखी विभागात राणी वापरत असलेल्या अनेक नक्षीदार पालख्या आहेत महाराजा अभयसिंह यांनी गुजरातच्या विजयात प्राप्त केलेली पालखी सुंदर होती

या दालनाबाहेर आलो जोधपूरच्या किल्ल्याची भेट आता संपली होती दालनामागून दालने पाहून पाय थकले होते पण नेत्र सुखावले होते वैभवाने ओतप्रोत सजलेल्या दालनांचा हा महाल अगदी वेगळ्या जगात घेऊन जातो.

जोधपूरचा किल्ला पाहून रिक्षात बसलो रिक्षाने थोडे अंतर पार केल्यावर त्याच डोंगरावरील तळ्याकाठी असलेल्या 'जसवंतसिंह थडा' या भव्य स्मारकाजवळ पोहोचलो. जसवंतसिंह राठोड (दुसरा) या कर्तबगार जोधपूर नरेशाची कारकीर्द इ स १८३७ ते १८९५ अशी होती त्याचा दहनविधी या भूमीवर झाला तेथेच हे भव्य पांढऱ्या संगमरवराचे स्मारक उभारले आहे. त्यांच्यानंतरच्या जोधपूर राजपरिवारातील व्यक्तींचा दाहसंस्कार येथेच होतो हे स्मारक घडवताना राजस्थानातील मकराना येथील खास पांढरा संगमरवर वापरला आहे सर्वजण पायऱ्या चढून वर आलो तेव्हा स्मारकाच्या विशालतेची कल्पना आली या स्मृति भवनात जोधपूर घराण्यातील ३४ पिढ्यांतील राजांची चित्रे आहेत. आतील छोट्या वतन्यावर नवस फेडताना बांधलेल्या रिबीनी दिसल्या भिंतीचा संगमरवर इतका शुद्ध व पारदर्शक आहे की काही ठिकाणी त्यातून सूर्यप्रकाश आत येतो हे स्मारक पाहून बाहेर आल्यावर बाजूला दिसतात राजपरिवारातील इतर व्यक्तींच्या स्मरणार्थ उभारलेल्या छत्र्या येथून जोधपूर शहराचेही विहंगम दर्शन होते.

जसवंतसिंह थडा पाहिल्यावर महामंदिर स्टेशनजवळील महामंदिर येथे आलो हे मंदिर राजा मानसिंहने १८१२ मध्ये आपले गुरू देवनाथ यांच्यासाठी बांधले शंभर स्तंभांचा मंडप हे या मंदिराचे वैशिष्ट्य दुसरे म्हणजे विविध योगासनांच्या रंगीत आकृत्या भिंतीवर चित्रित केल्या आहेत परंतु आता हे यातील रंग बरेच फिके झाले आहेत. अशा प्रकारे योगासने चित्रीत केलेले हे भारतातील एकमेव मंदिर असावे मंदिरात आम्ही गेलो तेव्हा तिथे चिटपाखरूही नव्हते मंदिराच्या आवारात शाळेसाठी जागा दिली आहे.

## उम्मेदभवन राजप्रासाद

जोधपूर गावाच्या बाहेर छीतर सरोवराच्याजवळ एका छोटया टेकडीवर विशाल उम्मेदभवन राजवाडा आहे राजवाडयाच्या प्रवेशद्वाराजवळ रिक्षा थांबली हा राजप्रासाद पहाण्याची माणशी फी तीन रुपये आहे तिकिटे काढून राजवाडयाच्या विशाल आवारात प्रवेश केला. महालाच्या समोर विस्तृत उद्यान व हिरवळ असून कडेला रंगीत ध्वज उभारले होते महाराजाचे राजवाडयात वास्तव्य असले की रंगीत ध्वज उभारले जातात. विद्यमान महाराज गजसिंह तेथे वास्तव्याला होते गुलाबसर रंगाच्या रेखीव घडवलेल्या दगडांनी बांधलेल्या या भव्य महालाच्या सुंदर शिल्पकृतीच्या दर्शनाने मोहित झालो महाल आतून पहाण्याची उत्कंठा लागली

महाराजा उमेदसिंह यांनी त्यांच्या कारकीर्दीत १९२८ साली या विलक्षण महालाचा शिलान्यास केला त्या काळात पडलेल्या दुष्काळात लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून या महालाचे काम सुरू करण्यात आले या महालाचा आराखडा प्रसिद्ध ब्रिटिश आर्किटेक्ट मि लेन्केस्टर यांनी केला चार हजार मजूर वीस वर्षे महाल उभारणीचे काम करीत होते मजुरी खर्चच मुळी दीड कोटी रुपये झाला १९४८ साली महालाचे काम पूर्ण झाले तत्पूर्वी महाराजा उमेदसिंह १९४२ साली येथे वास्तव्याला आले राजकुमार हनवंतसिंह यांच्या विवाहाप्रीत्यर्थ स्वागतसमारंभ येथे आयोजित केला होता सुमारे साडेसहा लाख चौरस फूट इतक्या विस्तृत आवारात उभारलेल्या या महालात एकूण ३६५ दालने आहेत सर्व महाल उत्कृष्ट घडवलेल्या दगडाचा असून वातानुकूलित आहे महालाचा तीन चतुर्थांश भाग महाराजांच्या परिवारासाठी राखून ठेवला आहे तर राहिलेल्या एक चतुर्थांश भागात पंचतारांकित हॉटेल आहे महालाचा काही भाग पर्यटकांना दाखवला जातो

गाईडने आम्हाला प्रथम नेले दिवाने-आम-दरबार हॉलमध्ये तेथे ३३ वर्षांचे विद्यमान महाराज गजसिंह व त्यांचे पिताजी महाराजा हनवंतसिंह यांचे फोटो आहेत. महाराजा हनवंतसिंह उत्कृष्ट वैमानिक होते

जोधपूरला त्यानी स्वतःच्या खाजगी मालकीचा विमानतळ उभारला. त्याचा मृत्यू १९५२ साली विमान अपघातातच झाला त्या विमानाची प्रतिकृती येथे आहे १९४२ साली गुजरातमधील सस्थानिकाच्या कन्ये-बरोबर त्याचा विवाह झाला होता त्याचे छायाचित्रही आहे एका भिंतीवर किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वीर दुर्गादास राठोड व मोगल बादशहा औरगजेब याच्यातील युद्धाचे भव्य चित्र काढले आहे महाराज वापरीत असलेली पालखीही तेथे ठेवली आहे या विशाल हॉलचे छत आर्चटाईप असून मध्ये प्रशस्त चौक आहे

गाईडने नतर आणले दिवाण-ए-खास मध्ये या महालाचे वैशिष्टय म्हणजे विदेशी चित्रकार एस् नोरब्लीन यांनी १९४६ मध्ये काढलेली भित्तीचित्रे. भिंतीवर रामायणातील राम-रावण युद्ध, जटायूवध, अशोक-वनातील सीता, लकाविजयानतर परतताना राम, लक्ष्मण, सीता, लवकुश, सीतेचे भूगमन असे विविध प्रसग चित्रातून साकार केले आहेत चित्रकार परदेशी असल्याने राम-सीता याच्यासह सर्वांचेच चेहरे भारतीय न वाटता विदेशी वाटतात दिवाण–ए–खासच्या छतावर सोन्याचे पॉलीश केलेले असल्याने सर्व छत चमकते महाराजाच्या खुर्चीवरही सोन्याचे पॉलीश आहे तर मत्र्यासाठी किमती सोफासेट आहेत गुलाबजल उडविण्यासाठी असणारी दोन सगमरवरी कारजी सौंदर्यात भर घालतात


यानतर गाईडने आणले महाराजांच्या लायब्ररीहॉलमध्ये विविध विषया-वरची महाराजा उमेदसिंह यांनी सग्रहित केलेली पुस्तके विषयानुसार निरनिराळ्या कपाटात व्यवस्थित रचून ठेवली आहेत. त्यात सायन्स, टेक्नॉ-लॉजी, सोशिआलॉजी आर्ट, अशी विविध विषयाची पुस्तके आहेत महाराजाचे लिहिण्याचे टेबल, टीपॉयही तेथे माडून ठेवले आहे या दालनात महाराजानी शिकार केलेले विविध प्राणीही भुसा, पेंढा भरून भिंतीवर लावले आहेत. त्यात आफ्रिकेत शिकार केलेले सिंह, माऊट अबूत शिकार केलेले वाघ, आफ्रिकन जगली म्हैस असे प्राणी आहेत. आफ्रिकन हत्तीचे मोठे कानही त्यात लावले आहेत

पुढील दालनात आहे विविध घड्याळांचा सग्रह. तेथील घड्याळाचे शेकडो प्रकार पाहून खूप मजा वाटते. अगठीतील घड्याळ, इअर-रिंग-

मधील घड्याळ, रथाच्या चाकात बसवलेले घड्याळ, तारीख, वार, हवामान दर्शविणारे घड्याळ – किती प्रकार सांगावेत ! विंडीमधील डिझा-ईनचे घड्याळ जसे आहे तसे संगीतमय घड्याळही आहे. चिडीयाघडीमध्ये चिमणीचे संगीत ऐकू येते. विविध मजेशीर घड्याळे पहाताना करमणूक झाली. वेळ कसा गेला तेही कळले नाही.

गाईडने नंतर नेले स्वागतकक्षदालनात. तेथील छत आकर्षक असून दोन्ही बाजूला संगमरवरी गोलाकार जिने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तेथून महाराजाच्या खाजगी निवासस्थानाकडे रस्ता जातो. उमेदभवनमधील डान्सिंग हॉलही भव्य असून त्याचे छत कमानीकृती आहे. तेथील सुंदर झुंबरे विलोभनीय आहेत. या हॉलचे फ्लोअरिंग लाकडाच्या फळया वापरून केले आहे. उमेदभवनची एक लाकडी प्रतिकृतीही शोकेसमध्ये ठेवली आहे. या हॉलमध्ये राजपरिवारातील स्त्रियांसाठी खास बाल्कनीची व्यवस्था केली आहे. या हॉलमध्ये महाराजा तख्तसिंहाचा दोनशे वर्षांपूर्वीचा पलंग आहे. त्यावर चांदीचे आवरण आहे. चार कोपऱ्यात चार पियानो आहेत. महाराजा उमेदसिंहाचे बालपणातील, तारुण्यातील फोटो आहेत. विमान-दलाच्या गणवेशातीलही त्यांचा फोटो आहे. तसेच जयपूर महाराजा सवाई मानसिंह, उदयपूरचे भोपालसिंह व विद्यमान महाराज गजसिंह यांचेही फोटो आहेत. या हॉलशेजारी खाजगी ऑडिटोरियम असून तेथे राजपरिवार व निमंत्रित यांच्यासाठी सिनेमा व नाटकांचे प्रयोग होतात.

उम्मेदभवनच्या मध्यभागी घुमटाखाली जो विशाल गोलाकार हॉल आहे त्याची उंची आहे ११० फूट ! त्यावर चाळीस फूट उंचीचा घुमट आहे. गोलाकार घुमटातून हवा व प्रकाश येण्यासाठी अनेक खिडक्या आहेत. सोळा स्तंभांनी हा घुमट पेलला आहे. मध्यभागी जोधपूरच्या किल्ल्याची चांदीची प्रतिकृती शोकेसमध्ये ठेवली आहे. या हॉलच्याखाली पायऱ्या उतरून गेल्यावर तीस फूट उंचीच्या तळमजल्यावर पोहण्याचा सुंदर तलाव आहे. तळमजल्यात तलाव असलेला हा भारतातील एकमेव राजवाडा असावा. या गोलाकार तलावाच्या बाजूला पॅसेज असून कडेला स्नानगृहे आहेत. तलाव पाच ते आठ फूट खोल असून ताज्या, गरम व थंड पाण्याची योजना केली आहे. तलावाला निळसर रंगाच्या टाईल्स बसवल्या



नक्षीदार झरोक्यातील राजपूत रमणी, जैसलमर



जैसलमेर दुर्ग

असून मंद निळा प्रकाश तलावावर सोडला आहे बाजूला बारा राशींची चित्रे आहेत तलावात पोहोण्याची फी तासाला १५ रुपये आहे असे गाईड म्हणाला परदेशी पर्यटक तलावात पोहोताना दिसले तळघरातला हा मंद निळसर प्रकाशातला तलाव पाहिल्यावर आपण अरेबियन नाईटमध्ये वर्णन केलेल्या एखाद्या स्वप्ननगरीत तर आलो नाही ना असा भास होतो

तलाव पाहून वर आलो वरच्या हॉलच्या उजवीकडे मध्यवर्ती मोठा पॅसेज आहे तेथून पंचतारांकित हॉटेलच्या खोल्या आहेत. अशा ४७ प्रशस्त खोल्या येथे असून प्रतिदिनी २०० ते ५०० रुपये हा दर आकारला जातो. हॉटेलचा विशाल डायनिंग हॉल गाईडने जाता जाता दाखवला महाराजा हनवंतसिंह यानी प्राचीन काळापासून ते अद्यावत तयार करण्यात येणाऱ्या विविध खाद्य पदार्थांबाबत एक ग्रंथरचना केली होती अशी माहिती मिळाली या डायनिंग हॉलच्या स्वयंपाकघराची व्यवस्था तज्ज्ञ, अनुभवी व पिढीजा स्वयंपाक्याकडे सोपवली आहे अनेक परदेशी पर्यटक हॉलमध्ये वास्तव्याला आलेले दिसले खरोखर, उम्मेदभवन राजवाडा केवळ जोधपूरचे नव्हे भारताचे भूषण ठरावा

उम्मेदभवन पाहून उमेदबगीच्यात म्युझियम पाहायला आलो शेठ रामनारायण रामप्रसाद यांनी १९३५ साली हे म्युझियम बांधले प्रथम प्रस्तावना - कक्षामध्ये गेलो. तेथे ८ व्या शतकातील विष्णुमूर्ती, तसेच आणखी अनेक मूर्ती, १० व्या शतकातील मातीचे विविध मोठे घडे आहेत प्राणीकक्षात सुसर, वाघ, सिंह यासारखी जंगली श्वापदे पेंढा भरून ठेवली आहेत. शिकार करणाऱ्या राजाचे फोटोही आहेत औद्योगिक कलादालनात राजस्थानात सापडणाऱ्या सैंधव मीठ याच्या खड्यांपासून बनवलेले हत्ती; फ्लॉवरपॉट यासारख्या सुंदर वस्तू आहेत. शस्त्रास्त्रकक्षात विमाने, जहाजे, पाणबुड्या यांच्या प्रतिकृती आहेत. ढाली, शिरस्त्राणे, बंदुकी, तलवारी आहेत पुरातत्व दालनात ११ व्या शतकातील शेषशायी विष्णु, १२ व्या शतकातील सूरसुंदरी, पार्वती या मूर्ती उल्लेखनीय आहेत तैलचित्र विभागात सर्व जोधपूर नरेशांची चित्रे वंशावळीसह आहेत. महावीरकक्षात भगवानांचे पुतळे, चित्रे आहेत म्युझियममध्ये काही जुने अभिलेख, कठ-

पुतली खेळाचे नमुने, जुन्या पितळी थाळ्या, पितळावरील मीनाकाम, पितळी दिवे, सुरया, सोनेरी काम केलेला झूला या वैशिष्टयपूर्ण वस्तू आहेत या म्युझियमच्या भेटीने मारवाडच्या लोककला, संस्कृती याचा ओझावता परिचय झाला

जोधपूर भेटीत शेवटचे दर्शनीय स्थान होते कुंजविहारी मंदिर जुन्या जोधपूर गावाच्या बाजारच्या रस्त्याला हे मंदिर आहे. प्रवेशद्वारी दोन गजमूर्ती आहेत मंदिराच्या मंडपात रामायण, महाभारतातील प्रसंगांची चित्रे आहेत संत नामदेवांचा पुतळा तेथे पाहून विशेष आनंद वाटला

एक दिवसाच्या जोधपूर भेटीत जोधपूर नरेशांच्या कर्तबगारीचा परिचय जोधपूर दुर्ग व तेथील महाल यांच्या दर्शनाने झाला, तर उमेदभवनाच्या भेटीने भव्य शिल्पकृतीचे दर्शन झाले सध्याकाळी घरी गेलो तेव्हा गरम गरम जेवण तयारच होते जेवण आटोपून स्टेशनवर आठ वाजता आलो जैसलमेरला जाणाऱ्या गाडीची वेळ रात्री नऊची होती, पण स्टेशनवर आल्यावर कळले की त्यादिवशी कोळशाअभावी सकाळी आठची जैसलमेर गाडी रद्द झाली व रात्री नऊची गाडी दोन तास अगोदर म्हणजे सात वाजताच सोडण्यात आली त्यामुळे वेळेवर येऊनही सर्वजणच हिरमुसले. जोधपूरचा एक दिवसाचा मुक्काम वाढला होता दुसऱ्या दिवशी सकाळी जोधपूरहून ओसिया येथील मंदिरे पहाण्याचा कार्यक्रम ठरवून सध्याकाळच्या गाडीने जैसलमेरला जाण्याचे ठरवले. रात्री मुक्कामाला परत बंगल्यावर आलो

जोधपूरपासून ४२ कि. मी अंतरावर असलेल्या ओसियाला जाण्यासाठी सकाळी साडेआठ वाजता स्टँडवर आलो नऊ वाजता निघालेली बस वालुकामय प्रदेशातून प्रवास करीत करीत अकराच्या सुमाराला ओसियाला पोहोचली ओसिया हे छोटेसे गाव प्रसिद्ध आहे तेथील मंदिरासाठी ! आठव्या ते बाराव्या शतकांत ही मंदिरे बांधण्यात आली. प्रथम 'सच्चाई माता' मंदिरात दर्शनासाठी गेलो छोटया टेकडीवरील या मंदिराला संपूर्ण दगडी तटबंदी आहे माताजींनी ज्याठिकाणी प्रथम दर्शन दिले त्या ठिकाणी हे मंदिर बांधण्यात आले मंदिर उंचावर असल्याने टप्प्या-टप्प्याच्या पायऱ्या चढून जावे लागते या पायऱ्या चढताना आठ नक्षीदार सुंदर

तोरणे लागतात मंदिराच्या मंडपात जुन्या स्तंभावर रंगीबेरंगी काचा नव्याने लावल्या आहेत मंडपात उत्तम संगमरवरी फरशी आहे. छतावर नक्षीकाम सुंदर असून शिखर आहे मंडपातील तोरण व ब्रॅकेट यावरील नक्षीकामही प्रेक्षणीय आहे गाभाऱ्यात सच्चाईमातेची मूर्ती आहे प्रथम गाभाऱ्यासमोर दहा मिनिटे शांतचित्ताने बसलो मंदिरात फारशी गर्दी नसल्याने निवांत दर्शन घेता आले मंदिराच्या भिंतीवर संपूर्ण रामायण कोरले आहे शेजारीच सूर्यमंदिर असून त्यात सूर्यदेवतेची रथात बसलेली मूर्ती आहे सूर्यमंदिरासमोर संपूर्ण कृष्णलीला शिल्पांकित केल्या आहेत. बाजूला महालक्ष्मी मंदिर आहे तेथे शेषशायी भगवान विष्णु व त्याच्या पायातील काटा काढणारी लक्ष्मी अशी मूर्ती कोरली आहे आणखी थोडे बाजूला गणेश व शंकर यांची मंदिरे असून दुसऱ्या बाजूला संतोषीमाता व शीतलादेवीचे मंदिर आहे. मंदिराच्या बाह्य भिंतीवर पाने फुले याचे नक्षी-काम, गजमूर्ती, वाद्यधारी नर्तिका, देवदेवता यांच्या उत्कृष्ट मूर्ती आहेत आश्विन व चैत्र या महिन्यात मेळा भरतो तेव्हा येथे यात्रेकरूंची गर्दी होते हिंदू तसेच जैनधर्मीयही दर्शनाला येतात

ओसियातील दुसरे प्रेक्षणीय मंदिर म्हणजे आठव्या शतकातील जैन मंदिर. प्रतिहार राजाच्या काळात या मंदिराची निर्मिती झाली मंदिरात गोलाकार छत असलेला मंडप असून आठ नक्षीदार स्तंभ आहेत बाजूला महावीर स्वामीचे मंदिर असून चार उपमंदिरे आहेत मंदिराची प्राचीन शिल्पकृती उल्लेखनीय आहे आठव्या व बाराव्या शतकांपर्यंत वैभवाने तळपणारे ओसिया एका साधूच्या शापामुळे वालुकामय व निर्जन झाले. ओसियाचे मूळ नाव उकेषा प्रतिहारराजाच्यावेळी उप्पला लोकांनी येथे आश्रय (ओसिया) घेतला अपभ्रंश होऊन ओसिया नाव रूढ झाले

मंदिर पाहून गल्लीबोळातून मार्ग काढीत स्टँडवर पोहोचलो बसने जोधपूरला जायला तीन वाजले जोधपूर स्टेशनवर जाऊन रात्रीच्या जैस-लमेर गाडीची निश्चित वेळ कोणती याची माहिती घेऊन मुक्कामी परतलो रात्री आठला स्टेशनवर येऊन बर्थचा ताबा घेतला. जैसलमेरचा एका रात्रीचा प्रवास सुरू झाला.

□ □

## नक्षीदार झरोक्यांचे सोनेरी शहर
## जैसलमेर

दिवस उजाडला होता. सूर्याच्या कोवळ्या सोनेरी किरणात न्हाऊन निघालेले छोटेखानी जैसलमेर रेल्वेच्या डब्यातूनही दूरवरून दिसत होते राजस्थानातील रेल्वेच पश्चिमेकडच शेवटच स्टेशन जैसलमेर. आठच्या सुमारास गाडी येथे विसावली. रात्री झोप चागली झाल्याने उत्साह वाटत होता स्टेशनवर उतरताच प्रथम रात्री आठच्या जैसलमेर–जोधपूर गाडीचं बर्थचं परतीच रिझर्वेशन केल नतर तेथील वेटिंग रूममध्ये सर्व आवरून निघालो गाव स्टेशनपासून साधारण एक कि मी अंतरावर आहे पायीच चालत निघालो

भगवान श्रीकृष्णाच्या यादव वशातील भाटी राजपुतांनी नववी राजधानी बसवलेले अतिम स्थान म्हणजे जैसलमेर

काशी मथुरा, प्रयागवर गजनी, अरु भटनेर
दुगम दिरावर लोद्रुवा नवा जैसलमेर ।।

भाटी राजपुतानी काशी, मथुरा, प्रयाग, गजनी (अफगाणिस्तानमधील पूर्वीचे कधार), भट नेर (राजस्थानमधील हल्लीचे हनुमानगढ), दुगम

(तनोर), दिरावर (पाकिस्तानमधील बहावलपूरजवळ), लोद्रुवा आणि शेवटी जैसलमेर या नवव्या ठिकाणी आपली शेवटची राजधानी वसवली होती या भाटी राजपुतानी पश्चिम भारतात पहिल शहर निर्माण केलं अफगाणिस्तानातील कधार प्रदेशातील गजनी येथे राजा गजने हे शहर स्थापन केले होते म्हणजे प्रभावशाली राजपुतानी सिंधू नदीच्या पलीकडे पंजाब अफगाणिस्तानपर्यंत अधिकार केला होता उदयपूरचे राजपूत राजे स्वत.ला सूर्यवशातील मानतात तर जैसलमेरचे चद्रवशातील. भाटी राजपूत वशातील या राजपुतांची १२ व्या शतकापर्यंत राजधानी होती लोद्रुवा. आज हेच छोटेखानी उजाड गाव जैसलमेरपासून पधरा कि मी वर असून सिंधूची उपनदी काक हिच्या काठी आहे महारावळ भोजदेवच्या वशातील राव जैसल यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने १२ व्या शतकात जैसलमेरची स्थापना केली परकीय आक्रमणामुळे होणारे नुकसान आणि युद्धाच्या दृष्टीने असुरक्षित स्थान यामुळे राजे जैसल यांनी लोद्रुवाहून राजधानी येथे हलवली एका लहानशा पहाडावर किल्ला बाधला व शहराची स्थापना केली मोगल बादशहा हुमायून याचा शेरशहाने पराभव केल्यावर त्याने जैसलमेरचा काही काळ आश्रय घेतला होता स्वातत्र्यापूर्वी जैसलमेर होते राजस्थानमधील एक सस्थान आज मात्र ते जिल्ह्याचे ठिकाण असून तेथील लोकसख्या आहे सुमारे तीस हजार तेथून पाकिस्तान सरहद्द सुमारे २०० कि मी अतरावर आहे रेताड भूमीतल्या या गावाच्या नशीबी दुष्काळ नेहमीच पाचवीला पुजलेला असतो कारण वर्षाला फक्त तीन इच पाऊस येथे पडतो याबद्दल एक मजेशीर वर्णन असे आहे –

**पग पुगल, धड कोटरे**
**बाहा बाडमेर, भूलो चुकौ जोधपूर**
**भवो जैसलमेर**

दुष्काळ जणू म्हणतो की "माझे पाय पुगलपर्यंत पोहोचले आहेत, शरीर कोटरापर्यंत तर बाहू बारमेरपर्यंत. चुकून कधी तरी जोधपूरमध्येही माझे वास्तव्य असते, तर जैसलमेरमध्ये मात्र माझे वास्तव्य कायमचे असते"

अशा या जैसलमेरमध्ये प्रवेश केल्या केल्या नजरेत भरते ते पहिले

वैशिष्टच म्हणजे पिवळसर रंगाच्या दगडाच्या इमारती राजस्थानच्या येथील रखरखीत बाळूकणांचा रग आहे सोनेरी त्या वाळूपासून बनलल्या वालुकाश्म पत्थराचा रग आहे पिवळसर सोनेरी अशा दगडाच्या अनेक खाणी या जिल्ह्यात असून हा दगड इतर देशातही निर्यात होतो पिवळसर रंगाच्या पत्थरांनी बांधलेली घरे. राजवाडा किल्ला असलेले भारतातील हे एकमेव गाव आहे

जैसलमेरचे वैशिष्टच आहे तेथील हवेल्याच्या शिल्पकृतीमध्ये ! पटुआची हवेली, नथमलची हवेली तसेच सालीमसिंह हवेली या येथील तीन प्रख्यात हवेल्या गल्लीबोळाच्या रस्त्याने प्रथम पोहोचलो पटुआंच्या हवेलीकडे ' शेठ पटुआ या जैसलमेरच्या प्रख्यात व्यापाऱ्याच्या बलुचिस्तान, सिंध, कोचीन, पश्चिम आशिया येथपर्यंतही व्यापारी पेढ्या होत्या. शेठ पटुआ केवळ व्यापारी नव्हता तर विद्वान व शिल्पकलाप्रेमीही होता. त्याने आपल्या धनसपत्तीने चार मुलाच्या नावाने विशाल हवेल्या बांधल्या. या हवेल्या म्हणजे आगळ्या शिल्पकृतीचे नमुनेच ! या हवेलीजवळ पोहोचलो तेव्हा तिचे अद्वितीय शिल्पसौंदर्य पाहून अवाक्च झालो या चार मजली हवेलीला तळघरही आहे. या हवेलीचे नक्षीदार झरोके अप्रतिम आहेत एका एका पत्थरावर केलेल जाळीदार नक्षीकाम अधूनमधून डोकावणाऱ्या कलात्मक बाल्कनी व नक्षीदार झरोके डोळ्यांचे पारणे फेडतात एखाद्या नाजूक झरोक्यात जेव्हा राजस्थानी वेषातील एखादी नाजूक सुदरी डोकावताना दिसते तेव्हा,

नरदो निपजो मारवाड<br>
नारी जैसलमेर<br>
सिंधन तुर्‍हीगजहिंनो<br>
करहाल बीकानेर

या ओळी आठवून सौंदर्यशाली स्त्रियांसाठी जैलसमेर का प्रसिद्ध आहे याची प्रचीती येते या हवेलीतील प्रत्येक पत्थर इतक्या चपखलपणे जोडला आहे की सर्व हवेली एकाच पत्थरात घडवली आहे असा भास होतो कागदावर बारीक कातरकाम करावे अशी नक्षी पत्थरात कोरलेली पाहून

शिल्पकारांबद्दल कौतुक वाटते सर्व इमारत म्हणजे जणू एखादी घडवलेली नाजूक मजुषाच !

जैसलमेरची दुसरी प्रसिद्ध हवेली आहे दिवाण नथमलजीची ! नथमलजी दिवाण हे जैसलमेरच्या राजाचे विश्वासू दिवाण राजाच्या सेवेत असताना त्यांनी पैसा गोळा केला व ही सुंदर हवेली बांधली राजाकडे जेव्हा तक्रारी गेल्या की दिवाण नथमलजीने राज्यकारभारातील पैशाने स्वत साठी हवेली बांधली तेव्हा राजा स्वत हवेली पहायला आला प्रसंगावधानी नथमलजीने राजाला सांगितले की आपल्यालाच अर्पण करण्यासाठी हवेली बांधली आहे झाले, प्रकरणावर पडदा पडला या भव्य हवेलीच्या नक्षीदार दरवाजाच्या बाजूला दोन उत्कृष्ट गजमूर्ती कोरल्या आहेत – प्रदर्शकाच्या जणू स्वागताला याही हवेलीचे नक्षीदार झरोके नाजूक व अप्रतिम आहेत हवेलीचे आगळे शिल्पकाम पाहून वाटते की दगडासारख्या कठीण माध्यमाला घडविण्या-साठी त्या शिल्पकाराजवळ कोणती अद्भुत हत्यारे होती कोण जाणे !

दोन्ही हवेल्या पाहून निघालो सालीमसिंह हवेलीकडे. सालीमसिंहची हवेली गावातील किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या अलीकडे आहे जैसलमेरचा महारावळ मूलराज यांचा ज्येष्ठ पुत्र रायसिंह हा होता या राजपुत्राने राज्याचा दिवाण स्वरूपसिंह यांचा भर दरबारात तलवारीने वध केला राजाने रायसिंहाला त्यानतर जोधपूरला पाठवले मृत दिवाण स्वरूपसिंह याचा मुलगा सालीमसिंह याला प्रधानपदी नियुक्त केले. सालीमसिंह हा झाल गेल विसरून जाणाऱ्यांपैकी नव्हता त्याला आपल्या वडिलाना मारणाऱ्या राजकुमाराचा व त्याच्या साथीदार सामंतांचा बदला घ्यायचा होता युवराज अभयसिंह व त्याची राणी याना त्याने वाड्याला आग लावून जाळून टाकले दुसऱ्या राजकुमाराला विषप्रयोग करून ठार मारले यानतर सालीमसिंह प्रजेवरही मन मानेल तसे अत्याचार करू लागला त्याने निर्दयपणे लोकाची धनसपत्तीच केवळ लुटली नाही तर कुलीन स्त्रियाची अब्रूही लुटली हैराण झालेले ब्राह्मण, जैन नागरिक जैसलमेर सोडून मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे व्यापार-उद्योगांसाठी गेले असे म्हणतात की जैसलमेरच्या आसपासच्या १८४ खेड्यातील नागरिक त्याच्या

अत्याचाराने हैराण होऊन एका रात्रीत गाव सोडून गेले. आणि जैसलमेर उजाड झाले तर इकडे जुलमी सालीमसिंह रहाण्यासाठी सुंदर हवेली बांधण्यात मग्न होता. शेवटी त्याच्यावर तलवारीने हल्ला झाला त्यातच त्याचा अंत झाला मृत्युसमयी त्याच्याजवळ दोन कोटी रुपयांच्यावर धन होते सालीमसिंहाची हवेली पहाताना त्याच्या सर्व दुष्कृत्यांची आठवण झाली. एकीकडे हवेली घडवणाऱ्या कलाकाराबद्दल आदर वाटत होता तर दुसरीकडे अत्याचारी सालीमसिंहाबद्दल घृणाही वाटत होती हवेली मात्र सुरेख असून तिचा आकार एखाद्या जहाजासारखा आहे. छतावर बारीक नक्षीकाम आहे

सालीमसिंह - हवेली पाहून किल्ल्याकडे निघालो आजूबाजूच्या प्रत्येक घरावर काही ना काही सुंदर नक्षीकाम दिसत होते असे म्हणतात की जैसलमेरमध्ये अगदी गरीबातल्या गरीबाच्या घरावरही थोडेतरी नक्षीकाम असतेच ! थोड्याच वेळात येथील प्रख्यात किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ आलो. तेवढ्यात अनेक परदेशी पर्यटक किल्ला बघण्यासाठी उंटावर बसून आले जयपूरच्या अंबर किल्ल्यात परदेशी पर्यटक हत्तीवरून फेरफटका मारताना दिसतात तर येथे ते उंटावरून आले होते उंटांना खाली बसवण्यात आले आणि कॅमेरा सरसावून हे पर्यटक किल्ला पहाण्यास निघाले

**गढ दिल्ली, गढ आगरो, अद्ध गढ बीकानेर**
**भलो चुणायो भाटियो, सिरे तो जैसलमेर**

राजस्थानी कवीच्या या दोह्यानुसार जैसलमेर भारतातील सर्वश्रेष्ठ दुर्ग मानला आहे समुद्रसपाटीपासून ९५९ फूट उंचीवरील छोट्याशा त्रिकुट पर्वतावरील जैसलमेरचा हा किल्ला पिवळसर रंगाच्या पत्थरात घडवलेला आहे १२ व्या शतकात बांधलेल्या या किल्ल्यात प्रवेश करताना लागणारा पहिला दरवाजा ‘ अखे पोल ’ नावाने ओळखला जातो महारावळ अखेसिंह यांनी तो बांधला. शेजारी पन्नास फूट खोल असलेली विहीर आहे तेथे मृत्युदंडाची शिक्षा देत शेजारी आहे झुंझार चौतडा अल्लाउद्दीन खिलजी याने या किल्ल्यावर हल्ला केला तेव्हा महारावल मूलराज यांच्या नेतृत्वाखाली केशरिया वस्त्रे परिधान करून ज्यांनी बलिदान केले त्यांच्या

स्मृतिप्रीत्यर्थ हा चौतडा उभारण्यात आला. त्यानंतर पुढे आहे मुख्य दरवाजा– 'सूरजपोल' उगवत्या सूर्याच्या दिशेने हा दरवाजा असल्याने सूरजपोल असे त्याचे नाव आहे.

जैसलमेरच्या या किल्ल्याचा इतिहास चितोडगडच्या किल्ल्याइतकाच रोमांचकारी आहे. चितोडच्या इतिहासात जसे तीन वेळा जोहार झाले तसेच येथेही तीनवेळा. जैसलमेरच्या गादीवर १३ व्या शतकात महारावळ जैतसिंह विराजमान होते. त्यांच्या दोन राजपुत्रांनी मुलतानहून दिल्लीकडे जाणारा दागिने व सोन्या - चांदीची मौल्यवान नाणी असलेला खजिना लुटला. हा खजिना चालला होता अल्लाउद्दीन खिलजीकडे. सातशे बैलगाड्यातून हा खजिना राजपूत्रांनी वाहून आणला, चितोडवर स्वारी करायला निघालेल्या अल्लाउद्दीन खिलजीने दोन सुभेदाराच्या नेतृत्वाखाली निम्मी फौज जैसलमेरला पाठवली. आठ वर्षेपर्यंत त्यांनी किल्ल्याजवळ तळ दिला. दरम्यान महाराजा जैतसिंहाचा मृत्यू झाला. महारावल मूलराज गादीवर आले. किल्ल्यातील अन्नसामग्री संपल्याने शेवटी राजपूत सैन्य हतबल झाले. महाराणी रत्नाने केशरिया वस्त्रे परिधान करून बावीस हजार स्त्रिया-सह चंदनाच्या चितांमध्ये जोहार करून आपल्या शीलाचे रक्षण केले. या नंतर फिरोजशहा तुघलक याच्या कारकीर्दीत असाच हजारो स्त्रियांनी जोहार केला. फिरोजशहाचे बहुमूल्य घोडे जैसलमेरचा साहसी वीर दूदा याने पळवले. त्यामुळे युद्धाला तोंड लागले. परत आठ वर्षे युद्ध चालू राहिले. धान्यसामग्रीअभावी किल्ल्यातील सेना भुकेने तडफडू लागली. पुन्हा सोळा हजार स्त्रियांनी जोहार केला. रक्ताच्या नद्या वाहिल्या व युद्ध समाप्त झाले. तिसरा प्रसंग महारावल लूणकरणजी यांच्या काळातील. कंधारचा पठाण अमीरअल्ली याने आपली बेगम अंतःपुरातील राण्यांना भेटायला येत आहे असा निरोप राजाला पाठवला. प्रत्यक्षात मात्र स्त्रीवेष-धारी सैनिक त्याने पाठवले पण क्षत्रिय राजस्त्रियांनी तलवारीनी आपले बलीदान दिले. या जोहाराच्यावेळी अग्निज्वाला प्रज्वलित झाल्या नव्हत्या तर तलवारीनी बलीदान केले गेले ! असा हा हृदयद्रावक तिसरा जोहार.

या किल्ल्याचा उद्धार चौदाव्या शतकात घडीसा रावल या पराक्रमी राजाने केला. नंतर १७ व्या शतकापर्यंत किल्ल्याच्या आवारात मंदिरे व

राजप्रासाद उभारले गेले. सूरजपोल नतरचा 'गणेशपोल' हा दरवाजा दृष्टीस पडतो त्याठिकाणी गजाननाचे मदिर असून मदिरात प्रवेशासाठी दोन्ही बाजूने पायऱ्या आहेत या मदिराच्या नक्षीदार महिरपी नाजूक आहेत नंतरच्या दरवाजाला 'हवापोल' हे नाव तेथे थडगार वारे वहातात म्हणून देण्यात आले नतर दिसतो भव्य चारमजली गजविलास प्रासाद त्याच्यावरील नाजूक मेघडबरी व कलात्मक झरोके अनुपमच. शेजारी उच उच पायऱ्या दिसतात त्याला 'सतीयोकी सीढीयाँ' म्हणतात. याच ठिकाणी राजपूत वीरांगनानी शीलरक्षणार्थ आत्मबलीदान केले.

किल्ल्यामधील प्रेक्षणीय भाग म्हणजे जैनमदिराचा समूह. आचार्य जीनराज सुरी, जीनभद्र व जीनचद्र सुरी यांच्या प्रेरणेने १४ व १५ व्या शतकात ही मदिरे निर्माण झाली मंदिराबाहेर जैन धर्मीयाच्या स्नान-पूजेसाठी खास व्यवस्था आहे स्नान करून, गध लावून, पूजेची वस्त्रे नेसून जैनधर्मीय मदिरात पूजेसाठी येत होते मंदिराच्या प्रवेशद्वारी दोन नक्षीदार स्तभ दिसतात त्यावर महिरपी तोरण आहे स्तभावर विविध भावमुद्रेतील नर्तिका कोरल्या आहेत मदिराच्या सभामडपात गोलाकार स्तंभ असून त्यावर ब्रॅकेट्स व तोरण आहे स्तभांवर विविध भावमुद्रांतील नृत्यागना कोरल्या आहेत या विलोभनीय नारीसौंदर्याच्या दर्शनाने देहभान हरपून जाते लवचिक कटी, सुडौल बांधा आणि नेत्रकटाक्ष यामुळे ही नाजूक नारी पहाणाऱ्याला जणू घायाळ करते शृंगार करणारी, भागात सिंदूर लावणारी, नृत्याच्या आविर्भावातील महिषासुराची बाणाने शिकार करणारी, दर्पणात पाहून नट्टापट्टा करणारी, स्नान करून प्रेमपत्र लिहिणारी तसेच वात्सल्याने बालकाला कुरवाळणारी अशी नारीची विविध रूपे शिल्पकृतीत साकार केली आहेत स्त्रीच प्रेम आणि वात्सल्य शिल्पातून साकार करण्यात कारागीर कमालीचे यशस्वी झाले आहेत.

गर्भगृहात जैन तीर्थंकर पार्श्वनाथजी याची पाढरीशुभ्र अलंकृत मूर्ती आहे. मूर्ती इतकी सजीव आहे की कितीही वेळा दर्शन घेतले तरी समाधान होत नाही. बाजूला तपकिरी गुळगुळीत दगडात घडवलेल्या तीर्थंकराच्या मूर्ती आहेत. या जैनमदिरात मुख्य पाच मूर्तींखेरीज लहानमोठ्या ७००० दिव्य पाषाण मूर्ती आहेत. त्यात हिंदू देवतांच्याही मूर्ती आहेत. सभामडप, स्तभ, तोरण

या सर्व ठिकाणी मूर्ती कोरल्या आहेत. चिंतामणी पार्श्वनाथ मंदिराच्या सभामंडपाच्या छतावरील एक शीर व चार दिशेला चार शरीरे असलेली मूर्ती आकर्षक आहे जैनमंदिराच्या आवारात सीतलनाथजींचे मंदिर असून तेथे पंचधातूची मूर्ती आहे बाजूला तीर्थंकराच्या मूर्ती आहेत. महावीर-स्वामींचे मंदिरही तेथे आहे

या जैनमंदिराचे प्रमुख आकर्षण आहे 'जीनभद्रसुरी ज्ञानभांडार' आचार्य जीनभद्रसुरी यांनी ५२५ वर्षांपूर्वी या ग्रंथभांडाराची निर्मिती केली त्यांनी विविध ठिकाणाहून जुने व दुर्मिळ ग्रंथ आणले या ज्ञानभांडारात म्हणजे पुस्तकालयात ताडपत्रीवर, कागदावर तसेच लाकडावर लिहिलेली प्राचीन हस्तलिखिते आहेत ताडपत्रावर पाडुलिपीत लिहिलेल्या ११२६ तर कागदावर लिहिलेल्या २२५७ हस्तलिखितांचा संग्रह येथे आहे या लिपीखेरीज संस्कृत, मागधी, व्रज अशा अनेक भाषांमधील अनेक ग्रंथांचा संग्रह येथे आहे सर्वांत प्राचीन कागद १२ व्या शतकातील आहे येथील संग्रहात जैन साहित्य तसेच वैदिक, बौद्ध साहित्य न्यायशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाकोष, वैद्यक, ज्योतिष, शृंगार या विविध विषयावरील हस्तलिखितांचा संग्रह आहे वाळवीपासून बचावासाठी ही हस्तलिखिते अॅल्युमिनियमच्या नळकांड्यात ठेवली आहेत देशातील सर्वोत्तम ज्ञानभांडारात याची गणना होते प्राच्यविद्या संशोधकांना हा अनमोल खजिनाच वाटतो भेटीला येणाऱ्या जैनधर्मीयांमध्ये जो जास्तीत जास्त रक्कम बोलेल त्याच्या हस्ते हे ज्ञान-भांडार उघडले जाते अशी माहिती मिळाली मुसलमान आक्रमकांपासून रक्षण व्हावे यासाठी हे ज्ञानभांडार तळघरात स्थापन केले गेले

मंदिराबाहेर आल्यावर मंदिराचे गगनचुंबी शिखर दिसते त्यावर मोर, कबुतर, चित्ता, सिंह अशा विविध पशुपक्षांच्या सुंदर मूर्ती आहेत नंतर परत हवापोलमधून बाहेर आल्यावर टीकमरायजींचे भव्य वैष्णवमंदिर दिसले १६ व्या शतकात बांधलेल्या या मंदिराची मेघडंबरी प्रेक्षणीय आहे. अल्लाउद्दीन खिलजी व फिरोझ तुघलक यांनी या मंदिरावर हल्ले केले होते. १७ व्या शतकात महाराजा जगतसिंहने मंदिराचा जीर्णोद्धार केला हे तेथील शिलालेखावरून समजते. मंदिराजवळ सतीचे स्मृतिस्तंभ आहेत जैसलमेरच्या या किल्ल्याला एकूण ९९ बुरूज आहेत जैसमेरच्या २५ हजार लोकसंख्ये-

पैकी एक चतुर्थांश लोक किल्ल्यात रहातात रक्षणासाठी पूर्वी तेथे असलेल्या अनेक तोफा आजही दिसतात त्यापैकी एक तोफ पाहिली बुरुजावरून सर्व गाव दिसते

जैसलमेरच्या हवेल्याची आणि किल्ल्याची भेट आटोपून बाजारच्या रस्त्याने राजप्रासादासमोर आलो दुपारची भोजनाची वेळ झाली होती एका हॉटेलमध्ये राजस्थानी पद्धतीच्या जेवणावर ताव मारला, लज्जतदार मोठा पापड चविष्ट होता हॉटेलमालक मुंबईत काही वर्षे राहिला होता म्हणून त्याला थोडेफार मराठी येत होते आमच्याशी मोडक्या तोडक्या का होईना मराठीत गप्पा मारून जेवणाचा आग्रह करीत होता

जेवण करून राजप्रासादाच्या भव्य आवारात शिरलो आवारात पडीक अवस्थेतील मोठी विहीर दिसली नौबतखाना, तोफखाना जुन्या राजवैभवाच्या केवळ खुणाच दर्शवीत होते, कारण आज सर्व पडीक अवस्थेत आहे जैसलमेरच्या राजवाड्याचे नाव आहे 'जवाहरविलास' महाराजा-जवाहरसिंह यांनी ३६ वर्षे राज्य केले ह्याच्याच कारकीर्दीत हा राजवाडा बांधला गेला राजाच्या पदरी पूर्वी घोड्याची देखभाल केलेला सेवक आता गाईडचे काम करीत होता जुन्या हकीकती सांगताना तो अगदी रंगून गेला होता तो म्हणाला, हा राजवाडा बांधला तेव्हा रोजदारी मजुरीचा दर फक्त तीन आणे होता. एक रुपयाला साडेचार शेर शुद्ध तूप बारा शेर मूग, सोळा शेर दूध मिळे दूध इतके स्वस्त व मुबलक असे की म्हटले जाई 'दूध और पूत कौन बेचेगा ?'

जवाहरविलासच्या समोर संगमरवरी, उत्कृष्ट डिझाईन असलेला प्रशस्त चौक आहे तसेच जैसलमेर राज्याचे प्रतीकचिन्ह पण कोरले आहे दोन्ही बाजूला दोन हरीण आणि मध्ये इंग्रजीत जैसलमेर लिहिलेले व तलवार कोरलेले हे प्रतीकचिन्ह आहे. जवाहरविलासची वेगवेगळ्या डिझाईनची पिवळ्या पत्थरात कोरलेली जाळी उत्कृष्ट शिल्पकृतीचा नमुना आहे. बाजूला अडीचशे वर्षापूर्वी बांधलेला जनानामहल आहे. त्याच्या प्रवेशद्वारी सुंदर नक्षीकाम केलेले आहे आत प्रशस्त चौक आहे एकाच पत्थरात कोरलेले नक्षीदार झरोके प्रेक्षणीयच आहेत.

राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ खालच्या बाजूला कृष्णाचे मंदिर आहे. प्रवेशद्वारी लाकडी चौकट असून बाजूला दोन हत्ती कोरले आहेत. याठिकाणी राजांचे तुलादान होई. कृष्णमंदिराच्या भिंतीवरील मोराच्या डिझाईनची रांग कलात्मक वाटते. जवाहरविलासच्या बाजूला शिल्पकृतीत घडवलेला एक कलात्मक मनोरा आहे. मोहरमच्या ताजियासारखा दिसणारा आणि कलाकुसरीने ओतप्रोत सजलेला हा मनोरा महाल घडविणाऱ्या मुस्लीम कारागीरांनी राजाला भेटीचे प्रतीक म्हणून फावल्या वेळात घडवून दिला. उंच आकाशाला गवसणी घालू पहाणारा हा मनोरा बादलविलास या नावानेही ओळखला जातो. हे पिढीजात शिल्पकाम करणारे बहुतेक कारागीर पाकिस्तान निर्मितीनंतर तिकडे गेले.

राजवाडा पाहून तेथील प्रशस्त आवारातच तासभर विश्रांती घेतली. मग जैसलमेरनजीकची दर्शनीय स्थळे पहाण्यासाठी जीप ठरवली. प्रथम निघालो जैसलमेरपूर्वी राजधानीचे ठिकाण असलेल्या लोद्रुवा गावी.

लोद्रुवा ऊर्फ लोद्रवपूर आहे जैसलमेरहून १५ कि. मी. अंतरावर. सिंधु नदीची उपनदी असलेल्या काक नदीच्या काठचे हे गाव म्हणजे एक समृद्ध नगर होते. आज ही नदी कोरडी आहे. ब्रह्माचे पुत्र काकमुनी हे या नदीकाठी तपस्या करीत. त्यांच्या नावावरूनच या नदीलाही काक हे नाव पडले. आठव्या शतकात यादव भाटी राजपुतांची राजधानी असलेल्या या विशाल नगरीला संपूर्ण तटबंदी व बारा प्रवेशद्वारे होती. बाराव्या शतकापर्यंत हे राजधानीचे गाव होते. याच शतकात शहाबुद्दीन घोरीने या नगरावर हल्ला केला. मंदिरातील मूर्ती तोडल्या, घरांचा नाश केला, राजप्रासाद लुटला, मोडतोड केली, अपार संपत्ती लुटून नेली. राजस्त्रियांनी जोहार केला. शिल्पकार, कारागीर, व्यापारी इतरत्र निघून गेले. लोद्रुवा अगदी उजाड झाले.

प्रथम लोद्रुवाच्या प्रसिद्ध जैन मंदिराबाहेर गाडी उभी केली. उंच चबुतऱ्यावर विराजमान असलेले हे मंदिर आहे जैन श्वेतांबर श्री सहस्रफणा पार्श्वनाथ स्वामींचे. सुमारे बावीसशे वर्षांपूर्वी बांधलेले हे मूळ जैन मंदिर ८३५ वर्षांपूर्वी महमद घोरीच्या आक्रमणात उद्ध्वस्त करण्यात आले.

साधारण ३५० वर्षांपूर्वी श्री संघवी थाहरुशाह यानी मंदिराचा जीर्णोद्धार आचार्य जीनसूरजी यांच्या प्रेरणेने केला मंदिराच्या प्रवेशद्वारी दोन स्तंभ असून त्यावर उत्कृष्ट शिल्पकृतींचे २५ फूट उंचीचे तोरण आहे तोरणावर कोरलेली हत्तींची शिल्पकृती आकर्षक आहे गर्भगृहात मध्यभागी चांदीचा देव्हारा आहे सहस्रफणा पार्श्वनाथाची कसोटीपत्थरात घडवलेली मूर्ती नेत्राचे पारणे फेडते मूर्तीच्या मस्तकावर दैदिप्यमान हिरा आहे असे सांगतात की ही मूर्ती घडवणाऱ्या कारागिराने आपल्या सर्व आयुष्यात ही एकच मूर्ती घडविली थाहरुशाह यानी या मूर्तीच्या वजनाइतके सोने त्या कारागिराला बिदागी म्हणून दिले या मूर्तीला तीन वेळा निरनिराळ्या साजशृंगाराने सजवले जाते. मूर्तीचे सकाळचे रूप असते बालकरूप, दुपारचे युवा तर सायंकाळचे वृद्ध रूप मूळ मंदिरात शिलालेख कोरला असून त्यात विद्वान व कारागीर यांचा प्रशस्तीपर उल्लेख केलेला आहे

या मंदिरातील मूर्ती जितकी विलोभनीय आहे तितक्याच विलोभनीय व वैशिष्ट्यपूर्ण आहेत या मंदिराभोवती बसवलेल्या तिरप्या, कोनाकृती, नक्षीदार जाळ्या मंदिराभोवती प्रदक्षिणा घालताना या जाळ्यांच्या सौंदर्याने मन मोहून जाते संपूर्ण मंदिराचे शिखर व जाळ्या घासून काढल्याने अगदी स्वच्छ, तुकतुकीत दिसत होत्या मंदिराची स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. विशेषत दिवाळीनिमित्त साफसफाईचे काम जोरात सुरू होते. मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गाच्या बाजूला तीस फूट उंचीचा एक कल्पवृक्ष शिल्पकारांनी साकार केला आहे या कल्पवृक्षाच्या बाजूला तपकिरी रंगाच्या तीन भिंतींची रचना टप्प्याटप्प्यात आहे सर्वात खालच्या भिंतीवर तीर्थंकर नेमीनाथ यांच्या लग्नाच्या वरातीचे दृश्य कोरले आहे त्यात दिसतात हत्ती, बैलगाडी, घोड्याचे रथ दुसऱ्या भिंतीवर हिंसक व अहिंसक प्राणी एकत्र अन्न पाणी घेताना कोरलेले दिसतात त्यामध्ये चित्ता, वाघ, सिंह, मोर, गाय, हरीण एकत्र कोरले आहेत सर्वात वरच्या भिंतीवर समोसरणाची दृश्ये कोरली आहेत अगदी वर आहे कल्पवृक्ष त्यावर निरनिराळ्या धातूची पाने, फुले व फळे दिसतात या कल्पवृक्षाखाली बसून केलेली मनातील इच्छा पूर्ण होते असे जैन पुजारी सांगत होता आम्ही सर्वांनी कल्पवृक्षाखाली बसून आमची यात्रा सफल होऊ दे अशी मनोमन प्रार्थना

केली. या कल्पवृक्षासमोर मंदिराच्या जोत्यावर जाळीखाली एका सापाचे चित्र कोरले आहे असे म्हणतात की जो कुणी खऱ्याखुऱ्या भक्तिभावाने दर्शन करील त्याला तेथे बाजूला असलेल्या खोल बिळातून येऊन प्रत्यक्ष नागराज साक्षात् दर्शन देतो

मुख्य मंदिराच्या उजव्या बाजूच्या छोटया मंदिरात थाहरुशाह यांच्या शेठाणीने खरेदी केलेली आसनस्थ मूर्ती आहे ही मूर्तीही कसोटीपत्थराची असून डोळयात हिरे बसवल्याने ते चमकतात मूर्तीच्या मस्तकावर फणा आहे आसनावर शिलालेख आहे तसेच मूळ मंदिराच्या डाव्या बाजूला आणखी एक उपमंदिर आहे त्यात पांढरीशुभ्र मूर्ती आहे मंदिराबाहेर जैन धर्मशाळा असून तेथे एक प्राचीन लाकडी रथ ठेवला आहे. त्यावरील कलाकाम दर्शनीय आहे याच रथातून श्रीचिंतामणीपार्श्वनाथ स्वामींची मूर्ती गुजरातहून आणली होती

जैनमंदिर पाहिल्यावर शुष्क काकनदीच्या काठावर '<u>मूमलकी मेडी</u>' हे भग्नावशेष पाहिले ते पाहून डोळयासमोर नाचू लागली राजस्थान-मधील एक लोकप्रिय लोककथा लैला–मजनू, सोनी-महिवाल, हीर-रांझा यांच्यासारखीच ही प्रेमकथा आहे हजार वर्षे झाली या लोद्रुवा नगरीत मूमल आणि सूमल या दोन भगिनी रहात होत्या दोघी गुणरूपाने सुंदर होत्या मूमल काकनदीच्या किनारी महालात रहात असे या महालाची रचना अगदी रहस्यमय होती प्रवेश करणाऱ्या नवीन माणसाला आतपर्यंत पोहोचणे अशक्य असे मूमल केवळ सुंदर नव्हती तर बुद्धिमानही होती तिला आपल्या गुणवत्तेनुरूप पती हवा होता पतीची निवड करण्यासाठी ती इच्छुक व्यक्तीला अवघड प्रश्न विचारी पण योग्य उत्तर मिळाले नाही की त्याला कैदेची शिक्षा देई. मूमलच्या गुणाची, सौंदर्याची कीर्ती हिंदुस्थानबाहेरही अफगाणिस्तान, इराण, इराक, सिंध या ठिकाणी पोहोचली पण तेथील राजे मूमलशी विवाह करू शकले नाहीत सिंध प्रदेशातील अमरकोट याठिकाणी महेंद्र नावाचा एक शूर व देखणा राजपूत रहात होता उंटावरून सवारी करण्यात तो तरबेज होता आपल्या उंटाला सजवून तो जेव्हा लोद्रुवा येथे आला तेव्हा त्याने झरोक्यात बसलेल्या

मूमलला पाहिले तिच्या अप्रतिम रूपाने मोहित होऊन त्याने तिला प्राप्त करण्याचा जणू निश्चयच केला. त्यासाठी त्याने तिच्या दासीशी सधान बाधले महालाचे रहस्य जाणून घेतले महालात प्रवेश केला तेव्हा त्याल जबडा उघडलेले दोन अक्राळविक्राळ सिंह दिसले. पण हे सिंह मातीचे आहेत हे ठाऊक झाल्याने तो निर्धास्तपणे पुढे गेला पुढे त्याला दिसला एक जलाशय. पण फरशीने घडवलेला तो कृत्रिम जलाशय आहे हे त्याला ठाऊक होते आणखी पुढे गेल्यावर त्याला विषारी सर्प, अजगर दिसले पण तेही कृत्रिम होते महेंद्राने कृत्रिम अडथळे पार करून महालात प्रवेश केला अलिशान महालात मखमली गादी असलेल्या पलगावर मूमल बसली होती सर्वत्र सुगध दरवळत होता. महालात अचानक आलेल्या तरण्याबांड अनोळखी युवकामुळे ती आश्चर्यचकित झाली तिने त्याला शेजारच्या पलगावर बसण्याची खूण केली पण महेंद्रला ठाऊक होते की शेजारच्या कच्च्या दोऱ्याने विणलेल्या पलगावर वसलो तर खाली खोल विहिरीत पडावे लागेल म्हणून तो तिच्याच पलगावर बसला मूमलला आजपर्यंत ज्या तरुणाची प्रतीक्षा होती तो तिला महेंद्राच्या रूपाने गवसला होता तिने घेतलेल्या बौद्धिक ज्ञानपरीक्षेत तो उत्तीर्ण झाला. मग दोघे विवाहबधनात बद्ध झाले सुख व आनद यात जीवन व्यतीत करू लागले

काही दिवसानतर महेंद्राने स्वदेशी जाण्याची इच्छा प्रगट केली पण मूमलच्या आग्रहाखातर काही दिवस त्याने मुक्काम वाढवला पुढे विरहाच्या कल्पनेने ती अश्रू ढाळू लागली त्या वेळी महेंद्राने वचन दिले की मी रोज रात्री तुझ्याकडे येईन महेंद्र लोद्रुवाहून अमरकोटला आला मात्र रोज रात्री आपल्या 'चीखल' नावाच्या चपळ उंटावर बसून तो चाळीस कोस जाई व तिला भेटून परत येई काही दिवसानी महेंद्रच्या आई वडिलाना शका आली हा रोज रात्री जातो कुठे? त्यानी गुपचूप शोध घेतला तेव्हा 'चीखल' या उटावर स्वार होऊन तो रोज रात्री जातो. आणि परतल्यावर त्याचे मस्तक भिजलेले असते हे त्यांना समजले महेंद्राच्या वडिलांच्या सूचनेनुसार त्याच्या आईने परतलेल्या महेंद्रच्या डोक्याखाली एक भांडे ठेवले त्यात टपकणारे जलबिंदू गोळा केले त्या पाण्याची परीक्षा केल्यावर महेंद्रच्या वडिलांना कळून चुकले की हे पाणी लोद्रुवाकाठच्या



जवाहरविलास राजप्रासाद, जैसलमेर



सँडड्यून्स, सम, जैसलमेर



रावी तीरावरील चम्बा

पवित्र काक नदीचे आहे त्यांनी अनुमान केले की महेंद्र रोज लोद्रुवाला जातो त्याच्या पित्याने त्याचा 'चीखल' हिसकावून घेतला चीखल म्हणजे महेंद्रचा प्राणच पण त्यामुळे न घाबरता त्याने कळपातून वेगात पळणारी एक सांडणी निवडली आणि त्यावर स्वार होऊन लोद्रुवाला जाऊ लागला

मूमलची बहीण सूमल ही एकदा सासरहून आली असताना तिने महेंद्रला पहाण्याची इच्छा व्यक्त केली मूमलने तिला सांगितले की तू ढोलकी-वाल्याचे कपडे घालून रात्री सारंगी वाजव तो रात्री आल्यावर त्याला गाणे ऐकव आणि पाहून घे पण त्या रात्री सांडणीचा पाय खराब झाल्याने महेंद्र वेळेवर पोहोचू शकला नाही रात्री खूप उशीर झाल्याने महेंद्र आज येणार नाही असे समजून त्या दोन बहिणी पलगावर एकत्र झोपल्या रात्री खूप उशीरा पोहोचलेल्या महेंद्राने पाहिले की मूमलच्या पलगावर कोणी अज्ञात व्यक्ती झोपली आहे त्याचा सताप अनावर झाला व तो तडक घरी परतला सकाळी मूमल उठल्यावर तिला त्याचे उमटलेले पाय दिसले तिला खूप काळजी वाटू लागली काय प्रकार झाला असावा याची तिला कल्पना आली आपल्या बहिणीचीच मग ती निंदा करू लागली तीन दिवस झाले पण महेन्द्र परतला नाही विरहाने व्याकूळ झालेल्या मूमलने त्याला सदेश पाठवला तरी तो आला नाही शेवटी त्या दोघी बहिणी दोन खेडूत स्त्रियाचा वेष घेऊन अमरकोटला आल्या महेंद्राची क्षमायाचना केली खरी हकीकत सांगितली पण महेंद्राने क्षमा न करता उलट दुराचारी म्हणून तिची निर्भत्सना केली त्याच्या प्रेमाने वेडी झालेली मूमल इकडेतिकडे भटकू लागली. काही दिवसांनी सूमलने पुन: प्रयत्न केला. ढोलकीवाल्याचे कपडे घालून ती महेंद्रसमोर आली आपल्या मूमलजवळ निद्रिस्त झालेला हाच तो तरुण हे जाणून महेद्राने तिला खूप सुनावले पण सूमलने पुन वस्त्रे बदलून स्त्रीचा वेष परिधान केला आपले खरे रूप दाखवले ते पाहून महेंद्राच्या डोक्यात प्रकाश पडला. तो त्वरेने मूमलला भेटायला लोद्रुवाला आला पण उशीर झाला होता. अतृप्त भावना हृदयात ठेवून मूमलने प्राणत्याग केला होता. लोद्रुवा आणि काकनदीच्या परिसरात

घडलेली ही प्रेमकथा आज हजारो वर्षे होऊन गेली तरी राजस्थानच्या लोक-गीतातून अजूनही गायिली जाते.

ही प्रेमकथा आठवतच चारच्या सुमारास लोद्रुवाहून निघालो जैसलमेरच्या भेटीत शेवटी जायचे होते सम येथील वालुकामय प्रदेशात. सम आहे जैसलमेर जिल्ह्यातील एक तहसिलाचे गाव वर्षाला केवळ पाच सहा इंच पाऊस पडणारी ही रेताड भूमी जैसलमेरहून समला जाणाऱ्या निर्जन, रेताड, वालुकामय भूमीतून जीपचा प्रवास सुरू झाला वाटेत कुठे-तरी ओयासिससारखी हिरवी झुडुपे नाहीतर क्वचित् कुठे शेती दिसायची. अधूनमधून उंट व त्यावर स्वार झालेले खेडूत दिसायचे पाचच्या सुमाराला एका मोठ्या वाळूच्या टेकडाजवळ गाडी थांबली. हेच होते समचे 'डयून्स्' साधारण दोन कि मी लांब एक कि मी रुंद

आमच्याप्रमाणे आणखी दोन तीन गाड्यांमधून पर्यटक आले होते सूर्य मावळण्याची वेळ होऊ लागली तसतशी गर्दी वाढू लागली जिकडे पहावे तिकडे बारीक पिठीसाखरेप्रमाणे असलेल्या पिवळसर रंगाच्या वाळूच्या टेकड्याच टेकड्या सर्वांनीच त्या वाळूत मनमुराद उड्या मारल्या जोराने चालताना गुडघ्यापर्यंत पाय वाळूत जायचा ही वाळू इतकी मुलायम होती की त्यावरून सरपटत जाणाऱ्या किड्यांच्या बारीक पायाच्या खुणा त्यावर उमटायच्या अर्थात वाऱ्याच्या झोताबरोबर उडणाऱ्या वाळूमुळे त्या खुणा लगेच पुसल्या जायच्या लाटालाटांसारख्या वळकट्या असलेल्या या टेकड्या वाऱ्याचा वेग मोठा असेल तर आपली जागाही बदलतात म्हणे या रेताड भूमीतला केवढा हा चमत्कार मावळतीच्या सूर्याची ताम्बूस किरणे जेव्हा या वाळूच्या असंख्य टेकड्यावर पसरली तेव्हा ती पिवळसर वाळू सोनेरी भासू लागली सूर्य एकच पण त्याचा तेजस्वी अस्त प्रत्येक ठिकाणाहून किती वेगळा भासतो जगाचा आधारस्तंभ अशा या भगवान सूर्यनारायणाचा तितकाच तेजस्वी, विविध रंगांची उधळण करणारा कन्याकुमारीजवळचा अस्त पाहिला होता विशाल सागरात मावळणारा सूर्य सागरालाही वेगळेच तेज प्राप्त करून देतो काश्मीरमध्ये हाच सूर्यनारायण सध्याकाळी चारलाच पांढऱ्याशुभ्र उंचउंच बर्फाच्छादित गिरीशिखरांना सोनेरी मुलामा देत देत

नजरेआड होतो विशाल वाळवटात लांबवर पसरलेली आपली सोनेरी किरणे आवरून घेत घेत सूर्यनारायण अस्तास जात होते हे दृश्य पहायला दोन नेत्र जणू अपुरे वाटत होते या दृश्याची आठवण जवळ असावी म्हणून सर्वांनी कॅमेरे सरसावले

समच्या या सँड ड्यून्समध्ये घालवलेला एक तास केवळ अविस्मरणीयच ! याच वाळवटात 'अब्दुल्लाह्' या चित्रपटाचे शूटिंग झाले असे जीपड्रायव्हर म्हणाला निर्दय माणसांच्या जगात ओॲसिसप्रमाणे माणुसकीने वागणारा अब्दुल्लाह् याच वाळवटात रहातो पण निर्दय माणसे त्याचे घर उद्ध्वस्त करतात, त्याचे हालहाल करतात वाळवटातील घोडदौड, बाजूच्या गावाला लागलेली आग, उटांच्या काफिल्यावरून प्रवास हे सारे शूटिंग येथेच झाले.

ते वाळवट पहात असताना मनात विचार आले खरच, भारतदेश भौगोलिकदृष्ट्याही किती विविधतेने नटला आहे ! कुठे हिरवीगार शेते तर कुठे बर्फाच्छादित डोंगर, कुठे समुद्र आणि विशाल सरिता तर कुठे वाळवट ओसाड वालुकामय समची सफर एक आगळावेगळा अनुभव होता

वाळवट पाहून जीपने तासाभरातच जैसलमेरला पोहोचलो. अंधारातून निर्मनुष्य रस्त्याने प्रवास करताना भीती वाटत होती रेल्वेस्टेशनवर पोहोचलो तेव्हा सुटकेचा निःश्वास टाकला स्टेशनबाहेरच्या छोट्याशा हॉटेलमधून आणलेल्या जाड पोळ्या व तिखटभाजी यावर भूक शमवावी लागली गाडी लागल्यावर बर्थचा ताबा घेतला गाडी हलली आणि झरोके हवेल्या यांनी नटलेल्या जैसलमेरचा निरोप घेतला.

म ठो ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५८
नं. क्र. २७३८०
दि. ८/११
शाखा (स्थळ

□ □

# बिकानेर

जैसलमेरहून निघालेली गाडी सकाळी नऊला जोधपूरला आली. बिका-
नेरला जाण्यासाठी गाडी रात्री होती. मेजर चितळे यांच्या कुटुंबियांशी
गप्पाटप्पा करण्यात, विश्रांती घेण्यात व चवदार भोजनाचा आस्वाद घेण्यात
दिवस कसा गेला कळलेही नाही. रात्री आठ वाजले तेव्हा श्री चितळे
यांच्या कुटुंबियांचा प्रेमळ निरोप घेऊन जोधपूर स्टेशनवर पोहोचलो
जोधपूरची दोन दिवसांची सफर आणि जैसलमेरची एक दिवसाची भेट
म्हणजे एक सुखद अनुभव होता. [illegible]
संस्कृतीचा धावत्या भेटीत परिचय झाला होता बिकानेर हे आमच्या
राजस्थान भेटीचे शेवटचे पर्यटनस्थळ! मारवाड एक्स्प्रेसमधील बिकानेर-
मधील प्रवेश केला. एक स्वतंत्र चार बर्थचे कंपार्टमेंट होते त्यामुळे सर्व-
खूष होतो स्टेशनवर दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर उभी होती 'मरुधर एक्स्प्रेस.'
रेल्वे डब्यावर जोधपूर किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर उंटांचा काफिला चित्रीत
केला होता मरुभूमीतून जाणाऱ्या गाडीचे मरुधर एक्स्प्रेस नाव यथार्थ
वाटते

रात्री बाराच्या सुमारास मारवाड एक्स्प्रेस बिकानेरकडे निघाली असावी.

आम्ही सर्वजण झोपेतच होतो सकाळी आठ वाजता बिकानेर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर पोहोचलो रेल्वे रिटायरिंग रूमची इमारत दुमजली होती. मिळालेल्या रूममध्ये सामान ठेवले आवराआवर केली स्टेशनवरच चहा ब्रेड घेतला प्लॅटफॉर्मबाहेरील रिझर्वेशन ऑफिसमधून रात्री भतींडाला जाणाऱ्या गाडीचे रिझर्वेशन केले सकाळचे दहा वाजले होते स्टेशनसमोर उभ्या असलेल्या कारपैकी एक कार ठरवली कारण एक दिवसात बिकानेरचा फेरफटका पूर्ण करायचा होता. बिकानेर पहायला उत्साहाने निघालो.

बिकानेरच्या भेटीत प्रथम पहायचे ठरविले दहा कि मी अंतरावरील सरकारी उंट - प्रजनन - केंद्र (कॅमल फार्म) आपल्याकडे पोल्ट्री फार्म किंवा कॅटल फार्म पहायला मिळतात. पण केवळ भारतातीलच नव्हे तर आशियातील एकमेव अशा उंट - प्रजनन - केंद्रात पोहोचलो तेव्हा उंटांच्या शेकडो लहान लहान बच्च्यांनी आमचे स्वागत केले। फार्मच्या आवारातील भिंतीजवळ हा कळप गवत खाण्यात गुंग होता

फार्मवरील इन्स्पेक्टर श्री शर्मा हे मोठे उत्साही गृहस्थ आहेत त्यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे उंटाबद्दल थोड्या वेळात बहुमोल माहिती सांगितली बिकानेरचे हे उंट प्रजनन केंद्र इ स. १९५६ साली राजस्थान सरकारने सुरू केले दोन हजार एकर क्षेत्र असलेली फॉरेस्ट जमीन उंटांना चरण्यासाठी राखून ठेवली आहे हे केंद्र बिकानेरच्या व्हेटरनरी कॉलेजशी संलग्न केलेले असून तेथे उंटविषयक खास संशोधन विभाग उघडण्यात आला आहे. या केंद्रात सध्या चारशे उंट आहेत डिसेंबर महिन्यात उंटाची निपज होते त्या वेळी या केंद्रात साधारण तीस ते चाळीस बच्च्यांची पैदास होते उंटाच्या तेथील बच्च्यांच वय तीन महिन्यापासून अकरा महिन्यापर्यंतचे आहे सांडणीचा गर्भकाळ तेरा महिन्याचा असतो

बिकानेर पूर्वीपासून उंटासाठी कसे प्रसिद्ध आहे यासंबंधीची राजस्थानी कहावत त्यांनी सांगितली

नरदो निपजे मारवाड
नारी जैसलमेर
सिंधन तुऱ्हीगजहिनो
करहाल बीकानेर

म्हणजे–

> देखणे पुरुष मारवाडच
> सुंदर स्त्रिया जैसलमेरच्या
> उत्तम घोड्यांची पैदास सिंधमध्ये
> तर उत्तम उंट बिकानेरचे

उंटाबद्दलची किती तरी नाविन्यपूर्ण माहिती ऐकायला मिळाली. पूर्वीच्या काळात व्यापारी लोक उंटाच्या काफिल्यावर माल टाकून मध्य-पूर्वेपर्यंत व्यापार करीत त्या वेळी बिकानेर हे काफिल्याच्या मार्गावर होते लढाईच्या वेळीही उंटाची उपयुक्तता खूपच असते उंटांच्या पाठी-वरून तोफांची वाहतूक केली जाई आजच्या मोटारीच्या काळातही उंटाचं महत्त्व कमी झालेले नाही कारण वाळवंटातूनही तो सहज चालू शकतो, म्हणून त्याला 'वाळवंटातील जहाज' म्हणतात उंट शेतातही नांगर ओढून राबत असतो विहिरीतून पाण्याच्या मोटा ओढतो आणि शेतात पिकणारे धान्य पाठीवर वाहून बाजारात जातो. गाड्यानाही त्याला जुपले जाते जेथे कोणतेही वाहन जात नाही तेथे डाक टपाल पेटी व पोस्टमन बरोबर जाऊन टपाल वाहतूकही करतो ! खरोखर उंटासारखे कष्टाळू, सहनशील, सेवाभावी, शांत, तसेच भित्र जनावर नाही उंटाचे खाद्य झाडपाला असे साधेच आहे राजस्थानातील पाण्याच्या दुर्भिक्षतेची त्याला जणू कल्पना आहे म्हटलेच आहे–

> 'घी धूले तो मारो कुछ नही बिगाडो ।
> पानी धूले तो जीयो जल जाय ।'

'तूप सांडले तर पर्वा नाही पण पाणी सांडले तर सर्वनाशच !' अशा या पाण्याच्या टंचाईसाठी प्रसिद्ध असलेल्या राजस्थानात पाचसहा दिवस खाणे न घेता किंवा पाणी न घेताही उंट व्यवस्थित रहातो कधी कधी अगदी सलग सहा महिनेही तो पाणी न पिताही राहू शकतो भारतात उंटांची संख्या सुमारे पंधरा लाख आहे उंटाचे वजन चारशे किलोपर्यंत असते उंटाचे सरासरी आयुर्मान चाळीस वर्षे आहे ज्याची मदार मोठी तो जास्त ताकदवान उंट ताशी सोळा किलोमीटर वेगाने उंट

सतत अठरा तासपर्यंत काही न खाता पिता पळू शकतो. त्याच्या डोळयाला दुहेरी जाड पापण्या असल्याने वाळवटातील वाऱ्याने उडणारी गरम वाळू त्याच्या डोळयात जाऊ शकत नाही. नाकपुडया व कानही तो गच्च बद करून घेऊ शकतो त्याचे ओठ जाड व रबरासारखे असल्याने काटेदार झाडाचा पालाही तो सहजरीत्या खाऊ शकतो खूप कोरडया असलेल्या उटाच्या शेणापासून केलेल्या गोवऱ्यांचा उपयोग जळण म्हणूनही चांगला होतो उट एक वर्षाचा झाला म्हणजे त्याच्या अगावरची लोकर आपोआप गळते. ती मऊ असते. नतर दरवर्षी ती कापावी लागते मुद्दाम कापलेली लोकर थोडी रखरखीत असते. या लोकरीपासून ब्लँकेट, सतरज्या कापड, चादरी, गालिचे तयार करतात. उट मरण पावल्यावर त्याच्या चामडयापासून तबू, राहुटया व भाडीही बनवतात

असा हा बहुगुणी उंट मरण पावताना आपल्या जन्मभूमीची आठवण काढत मारवाडच्या दिशेने पहातो असे म्हटले जाते. यासबधी राजस्थान-मध्ये खालील म्हण प्रसिद्ध आहे.

‘ उट मरै जद मारवाड सामो जो वै । ’

श्री शर्मा याच्याबरोबर फार्मवर चक्कर मारली. उट वाढवण्याचे ज्याना परपरागत ज्ञान आहे अशा राजस्थानी पगडी, धोतर वेषातील जुन्या सेवकाचे उटाच्या पैदाशीबाबत अनुभवपूर्ण मार्गदर्शन होते. एका राजस्थानी अनुभवी गृहस्थाने गव्हाणातील बाधलेला चागला पुष्ट उट बाहेर काढला उल्का, उदय समवेत त्याचा फोटो काढला

फार्मवर चक्कर मारून प्रयोगशाळेत आलो. तेथील काचेच्या कपाटात साडे नऊ महिन्यानतर पूर्ण वाढीआधी मरण पावलेले सांडणीचे पिलू पहायला मिळाले. उंटाच्या खाद्यांचे अनेक नमुनेही तेथे होते उटाच्या वाळलेल्या कातडयापासून तयार केलेली गोलाकार भांडी पाहून आश्चर्य वाटले तल, तूप, ठेवण्यासाठी त्याचा उपयोग होतो या कातडीला पाहिजे तसा आकार देता येतो

खरोखर उंट हे राजस्थानच्या लोकजीवनाचे परंपरागत प्रतीकच म्हणाना ! जेव्हा मोटारी नव्हत्या, तेव्हा पायाला घुगरू बाधून सजवलेल्या उटावरून ग्रामीण राजस्थानी नवविवाहित जोडपी शहरात यायची. लैला-

मजनू या प्रेमकथेतील लैला उंटावर बसूनच मजनूला सोडून सासरी गेली होती

श्री शर्मा यानी साडणीच्या दुधापासून तयार केलेला चहा सर्वांना दिला. चहाची चव थोडी तुरट वाटत होती साडणीच्या दुधाचे दही होत नाही कारण त्यात स्निग्धता नसते एक साडणी दररोज सरासरीने चार लिटर दूध देते व गायीच्या दुधापेक्षाही ते पौष्टिक असते असे ते म्हणाले नतर त्यानी त्याचे व्हिजीट बुक दाखवले अनेक थोर मोठ्या देशी-परदेशी पर्यटकानी फार्मचे कौतुक केले होते आम्हालाही त्यानी अभिप्राय लिहिण्याची विनती केली उटप्रजनन-केंद्राची भेट एका वेगळ्याच विश्वास घेऊन गेली मात्र या विख्यात केद्राकडे येण्याचा मार्ग फारच खराब आहे त्याबद्दल श्री शर्मा याना म्हटल्यावर त्याबाबत प्रयत्न सुरू आहेत असे ते म्हणाले

उट-प्रजननकेंद्र पाहून बिकानेरकडे परतताना दोन मदिरे पाहिली प्रथम पाहिले शिवमदिर या मदिराला तांबड्या दगडाची तटबदी आणि भित असून चार बाजूला चार बुरुज आहेत प्रशस्त आवार आहे महाराजा डूगरसिहने १०४ वर्षांपूर्वी हे शिवमदिर बाधले आवारात पाण्यासाठी विहीर असून ती उत्तमप्रकारे बाधली आहे तिच्यावर नक्षीदार छत्री आहे. हे मदिर उच्च चबुतऱ्यावर आहे मदिराला चारी बाजूला चादीचे दरवाजे आहेत आतील मडपात तांबड्या रगाच्या दगडाच्या स्तभाच्या दुहेरी रागा आहेत पितळी नदी आहे गर्भगृहात शिवलिंग असून भितीवर शिलालेख आहे छतावर श्रीकृष्णाच्या जीवनचरित्रातील प्रसग चित्रीत केले आहेत शांत, एकात ठिकाणच्या या शिवमदिराची भेट आटोपून परत निघालो 'नागणेचेजी मदिर' हे बिकानेरचे आणखी एक प्रसिद्ध मदिर छोट्या टेकडीवर आहे समोरच्या गडावरून यातील मूर्ती दिसते मंदिरातील ही चादीची मूर्ती महिषासुरमर्दिनीची असून तिला अठरा हात आहेत. ही मूर्ती जोधपूरहून महाराजा रायसिह यानी जिकून आणली हे मदिर बिकानेरच्या गगासिह महाराजानी बाधले याही मदिराला बाजूला उच्च भिती आहेत

यानतर पोहोचलो बिकानेरच्या म्युझियममध्ये सर्किट हाऊससमोर हे म्युझियम आहे एका एकमजली, गोलाकार भव्य आकर्षक इमारतीत. बिकानेरचे महाराजा कर्णसिंह बहादूर यांनी ४ सप्टेंबर १९५४ मध्ये या म्युझियमचे उद्‌घाटन केले. बिकानेरचे स्वर्गीय महाराजा गगासिहजी (दुसरे) याच्या यादगार फडातून या म्युझियमची उभारणी झाली.

म्युझियमच्या निरनिराळ्या दालनात बिकानेरच्या कलाकौशल्याची पुरातन काळापासून आधुनिक काळापर्यंतची झलक दिसते उत्खननातील अवशेषांपैकी कलापूर्ण सरस्वती सुदर आहे गुप्त व कुशाण काळातील अवशेष मूर्तीही दर्शनीय आहेत राजस्थानी तसेच मुगल शैलीची विविध आकर्षक चित्रे आहेत. बिकानेरची ऐतिहासिक युद्धचित्रे बिकानेरच्या नरेशाची कर्तबगारी दर्शवतात महाराजा गगासिहजी या कर्तबगार नरेशाने गगानगरचा प्रसिद्ध कालवा बांधून राजस्थानात पाणी आणले. त्याच्या जीवनाची चित्रमय झलक एका दालनात दिसते. एका दालनात मोगल बादशहा जहांगीर याने राजा रार्जसिहाला प्रदान केलेला रेशमी अगरखा आहे

सोळाव्या शतकातील जुनी मोगलशाही फरमाने,हस्तलिखिते येथे आहेत. शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीबद्दल अनेक मूळ पत्रेही आहेत त्यातील एक वैशिष्टचपूर्ण पत्र आहे औरगजेबाच्या दरबारातील बिकानेरच्या वकीलाचे शिवाजीमहाराजाच्या आग्राभेटीविषयी पाठवलेल्या पत्रात त्याने म्हटले आहे–

"महाराजाच्या समवेत २०० ते २५० निवडक घोडेस्वार आहेत. महाराजाची उंची त्यामानाने थोडी कमी आहे शरीर कृश आहे महाराज गौरवर्णीय आहेत त्याना दाढी असून त्यांचा चेहरा अत्यंत तेजस्वी आहे. त्यांचा नऊ वर्षांचा राजपुत्र संभाजी राजबिंडा, देखणा आहे महाराजाच्या मिरवणुकीपुढे हत्ती असून त्यावर मराठ्याचा ध्वज फडकत असतो. महाराजांचा घोडा सोन्या-चांदीने सजलेला आहे मोगल बादशहांशी महाराजांनी धैर्याने सभाषण केले' शिवाजीराजाच्या व्यक्तिमत्वावर महत्त्वाचा प्रकाश टाकणारी अनेक पत्रे बिकानेरच्या या म्युझियमच्या सग्रहात पाहून आश्चर्य तसेच आनदही वाटला

म्युझियम पाहून दुपारचे जेवण आटोपले. मग बिकानेरचा प्रसिद्ध किल्ला पहायला आलो प्रत्येकी तीन रुपये प्रवेश-फी भरली. राठोड राजपूत राव बिकाजीने इ स १४६५ मध्ये बिकानेर शहर स्थापन केले शहरनिर्मिती झाल्यावर अकबर बादशहाच्या सेवेत असलेल्या राजा रायसिंह या सेनापतीने हा किल्ला इ. स १५८८ ते १५९३ या काळात बांधला. गावात असलेल्या या भुईकोट किल्ल्याचा परीघ हजार मीटर असून त्याला ३७ बुरूज आहेत गाईडबरोबर किल्ला पहाण्यास निघालो या किल्ल्यात भव्य अशी ३७ दालने आहेत असे तो म्हणाला

किल्ल्याच्या प्रवेशद्वाराचे नाव सूरजपोल असून बाजूला दोन गजमूर्ती आहेत स्तभासाठी वीस–वीस फूट उंचीचे अखड दगड वापरले आहेत होळी खेळण्यासाठी प्रशस्त सगमरवरी चौक असून तेथे मोठा हौद रग कालवण्यासाठी आहे. तसेच बाजूला संगमरवरी जाळी आहे सुदर चायना टाईल्सचा वापर केलेला आहे पार्श्वभागी भिंतीवर पचम जॉर्जचा मोनोग्राम आहे बाजूला सिंह व मध्ये कबुतर कोरले आहे मध्ये लिहिले आहे 'जय जगलधर बादशाह '

यानतर प्रथम गेलो कर्णमहालात. हा महाल ३४० वर्षापूर्वीचा आहे कर्णसिंह महाराजा मुस्लीम होण्यास नकार देतात हे चित्र तेथे आहे. छतावर लाकडी सीलिंग आहे स्तभावर नक्षीकाम असून त्याला सोन्याचा मुलामा दिलेला असल्याने ते सर्व नक्षीकाम चकाकते आपले पिताजी कर्ण-सिंह यानी औरगजेबाच्या आक्रमणाचा वीरतापूर्वक सामना केला त्या-स्मृतिप्रीत्यर्थ महाराजा अनुपसिंह यानी हा महाल बाधला मोगलशैलीने बनविलेल्या या महालाचे छत व कमानीवरील चित्रकाम प्रेक्षणीय आहे. पुढे आहे अनुपमहाल ३२० वर्षापूर्वी महाराजा अनुपसिंह यांनी तो बाधला. राजाचा राजतिलक समारभ येथे होत असे तेथील गालिचा कलात्मक आहे या महालाच्या भिंती, छत, दरवाजे सोनेरी पेंटिंगकामाने सजले आहेत तेथे उत्कृष्ट मेघडबरी असलेले सिंहासन आहे थीफ ऑफ बगदाद, लैला-मजनू या चित्रपटांचे शूटिंग येथे झाले असे गाईड म्हणाला नावा-प्रमाणेच खरोखर हा महाल अनुपम आहे

त्यानतरचा महाल आहे बादलमहाल महाराजा सरदारसिंह या १९ व्या राजाने बादल महाल उभारला. त्याचे भव्य तैलचित्र तेथे आहे या महाराजाना सगीत आराधनेची आवड होती अनेक वाद्याचा सग्रह तेथे आहे. भिंतीवर सुदर चित्रे असून त्यातील एक चित्र वीज चमकतानाच्या दृश्याचे आहे रगीत चायना टाईल्सचा वापर महालात चपखलपणे केला आहे महाल वातानुकूलीत रहाण्यासाठी खास व्यवस्था केली आहे अरुद जिन्याने वरच्या मजल्यावर आलो महाल इतके भव्य, मग जिने एवढे अरुद का, असे विचारल्यावर गाईड म्हणाला की दरोडेखोरानी चट्कन पळून जाऊ नये म्हणून जिने अरुद ठेवले आहेत वरच्या दालनात हाताने पेंटिंग केलेल्या अप्रतिम चायना टाईल्स वापरल्या आहेत. खिडक्यामधून आवारातील छापखाना, बाग, हस्तीशाळा दिसते नतर पोहोचलो चद्रमहालात तेथील भिंती व छत यावर चारशे वर्षापूर्वीचे केलेले पेंटिंग आहे रगवलेल्या देवदेवताच्या मूर्तीनी महालाची शोभा वाढवली आहे हे सर्व सुदर पेंटिंग उस्ताफ नावाच्या पेंटरने केले आहे या महालात राजाराणी प्रार्थना करीत नतरच्या शीशमहालातील काचकाम दर्शनीय आहे राजा रायसिंह यांच्या काळातील उर्जा बेगम या स्त्रीचे चित्र तेथे आहे ही बेगम गुप्तहेरगिरीचे काम करीत असे

फूलमहाल उत्कृष्ट आरशानी सजला आहे बिकानेर स्थापन करणाऱ्या राव बिकाजीचा चादीचे पाय असलेला वैशिष्टचपूर्ण पलग येथे आहे महाराजाचे पाय पलगाबाहेर येत. शत्रूने जर घातपात करून पलगाला बाधले तर पलगासकट उभे राहून राजा लढाई करण्यासाठी सज्ज होई पुढे आहे भोजनचौक नृत्य, भोजन यासाठी प्रशस्त असलेल्या या जागेत नक्षीदार टाईल्स असून फ्लोअरिंग छान आहे महाराज रायसिंह याचा फोटो व ते वापरीत असलेला चादीचा हौदा तेथे आहे. भिंती सगमरवरी असून लाकडी दरवाजावर पेंटिंग आहे महाराजा गजसिंह यांनी २३५ वर्षापूर्वी बाधलेल्या गजमदिरात नतर आलो तेथे पाळण्यात बाळकृष्णाचा फोटो आहे स्तभ शिसमच्या लाकडाचे असून त्यावर सोनेरी नक्षीकाम केले आहे भिंतीवर व छतावरही भरगच्च पेंटिंग आहे तसेच वारा घेण्यासाठी कापडी पंखा लावायला छताला कड्या आहेत महालात महाराज

गजसिंह व त्याच्या राणीचा पलंग आहे श्रीसूरविलास महालात महाराज करणीसिंह यांच्या मातोश्रींनी काढलेली चित्रे आहेत या राजमातेला चित्रकलेचा शौक होता महाराजा करणीसिंहांना नेमबाजीची आवड होती त्यांचे पितामह श्री गंगासिंहजीमहाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व कडक शिस्तीखाली लहानपणापासूनच निशाणबाजीचा छंद त्यांनी जोपासला त्यांचा बंदूक धारण केलेला फोटो येथे आहे त्यात त्यांच्या चेहेऱ्यावर असा भाव आहे की सर्व लक्ष्यवेध झाला आता कुठला बाकी आहे ? या भूतपूर्व बिकानेर नरेशांनी भारताचे नाव ऑलिंपिक व आशियाई खेळात उंचावले होते

दालनामागून दालने पार केली पाय थकले पण महाल संपत नव्हते. पाचव्या मजल्यावर राणीच्या वास्तव्यासाठी आहे गुलाबमंदिर सहाव्या मजल्यावरील महाल राणीच्या शृंगारासाठी राखलेला असे सातव्या मजल्यावर आल्यावर बिकानेर शहराचे दूरवरचे विहंगम दृश्य दिसते तेथे एकुलता एक हवामहल आहे. ही महाराजा डूंगरसिंह यांची विश्रांतीची खोली. तेथील वैशिष्ट्य म्हणजे छतावर आरसे लावले असून खाली जमिनीवर मध्यभागी पलंग आहे पलंगावर झोपल्याझोपल्या महाराजांना कोठूनही येणारी व्यक्ती छतावरील आरशातून दिसे या छोट्या महालाला चारी बाजूला काचा लावलेल्या आहेत छताच्या बाजूला लाकडी सीलिंग आहे भिंतीवर कृष्णाच्या रासलीला चित्रीत केल्या आहेत तसेच चायना पेंटिंगचे उत्कृष्ट नमुनेही आहेत पूर्वी त्यात हिरेमाणके बसवली होती आठव्या मजल्याच्या गच्चीवरून राजघराण्यात मुलाचा जन्म झाल्यावर सोने, चांदी, काशाच्या थाळया वाजवीत त्यामुळे बिकानेरच्या कानाकोपऱ्यात राजपुत्राच्या जन्माची बातमी जाई

हवामहलमधून उतरून खाली आल्यावर लालसिंह महालात आलो. या महाराजांना होता अत्तराचा शौक तेथे सेंटच्या बाटल्या आहेत एका कोनाड्यात सोन्याच्या पानाचे झाड आहे तर दुसऱ्या कोनाड्यात आहे चांदीचे झाड या झाडांमध्ये छोटे मशीन असून ते चालू केले की झाड हले पुढील शिकारकक्षामध्ये भुसा भरलेले वाघ, सिंह, सुसर हरीण, काळवीट, पाण-

घोडा, गेंडा, जगली म्हैस, आफ्रिकन बकरे यांसारखे प्राणी आहेत प्राण्याचे फोटोही आहेत बिकानेरचे गगासिंहजी महाराज हे कर्तृत्ववान राजे होऊन गेले. इ. स १९२५ मध्ये त्याच्या कारकीर्दीचा सुवर्णमहोत्सव झाला त्यावेळची, तसेच त्यांची रौप्यतुला झाली त्या प्रसगाची छायाचित्रे आहेत महाराजाचे रेशमी कपडे शोकेसमध्ये आहेत

दरबारहॉल खूपच भव्य असून मध्ये चांदीचे सिंहासन आहे. बाजूला राण्यासाठी झरोके आहेत चौदा किलो वजनाचे सोन्याचे पेंटिंग केलेले लोखडी चिलखत या हॉलमध्ये आहे तीन पालख्या व एक हौदा आहे भिंतीवरील शिल्पकृतीचे नक्षीकाम प्रेक्षणीय आहे महाराज ज्या तलवारीनी सराव करीत त्या विविध तलवारी येथे व्यवस्थित ठेवल्या आहेत. काटेरी टोकदार खिळ्यांचे टेबल येथे आहे ज्यांना सिद्धी प्राप्त झाली आहे असे सिद्ध पुरुष अनवाणी पायाने त्यावर नृत्य करतात काहीतरी दैवी शक्तीने हे शक्य होते श्री गगामहाराजांच्या जन्मशताब्दीच्यावेळी त्यानी असे नृत्य केले होते हे सिद्धपुरुष केवळ टोकदार खिळ्यांवरच नव्हे तर काटेरी तलवार, करवत, पेटलेले कोळसे याच्यावरही अनवाणी पायानी नृत्य करतात या नृत्यांची छायाचित्रे पाहिल्यावर या अघोरी कलेच्या कल्पनेने अगावर शहारे आले.

पुढे आहे शस्त्रालय विभाग येथे विविध तलवारी, रायफली, हत्ती व उटावरून वापरल्या जाणाऱ्या बदुकी, कट्यारी, मशीनगन्स, ढाली याचा सग्रह आहे त्यातील वैशिष्टचपूर्ण वस्तू म्हणजे महाराजा अनुपसिंह वापरत असलेली बारा फूट लांबीची बदूक गगासिंहजींची बदूकही तेथे आहे महाराज गगासिंहजी कार्यालय म्हणून ज्या महालाचा वापर करीत तेथे आलो पचमजॉर्जना १९११ च्या दिल्लीभेटीच्या वेळी प्रदान केलेल्या पदवीच्या प्रसगाचे भव्य तैलचित्र तेथे आहे महाराजाचा युनिफॉर्म तेथे जतन करून ठेवला आहे. शिसमच्या लाकडापासून बनवलेल्या टेबलखुर्च्या तेथे व्यवस्थित माडून ठेवल्या आहेत बिकानेरचे हे महाराज कामात नेहमी मग्न असत बिकानेरच्या उत्कर्षाची आस त्याना लागली होती. त्यांच्याबद्दल भूतपूर्व नरेश कर्णीसिंहांनी आपल्या लहानपणाच्या आठवणीत

सांगितले आहे की, जेव्हा मी छोटा होतो तेव्हा इतर भावांबरोबर दादाजींच्या कार्यालयात पोहोचलो तेव्हा ते काम करीत होते आम्ही त्यांना म्हणालो की "आता काम बंद करा आणि आमच्याबरोबर क्रिकेट खेळायला या" त्यावर दादाजी उत्तरले की "मुलांनो, यावेळी मला खेळता येणार नाही या वेळी तर मी आपली रोटी कमावीत आहे मी जर आपल्या लोकांची सेवा केली नाही तर तुम्हा सर्वांना काय खाऊ घालू ?" गंगानहर कालव्याच्या उद्‌घाटनाच्या वेळी वापरलेला नांगर हॉलमध्ये ठेवला आहे महाराजाचे भव्य तैलचित्रही तेथे आहे खरोखर हा किल्ला अगदी वैशिष्टयपूर्ण वाटला

बिकानेरचा किल्ला पाहून लालगढ राजवाड्यात आलो १९ व्या शतकात बांधलेला हा राजप्रासाद तांबड्या वालुकाश्म दगडांत घडवलेला आहे या महालाचा काही भाग राजपरिवारासाठी राखून ठेवला आहे, तर काही भागात पंचतारांकित पर्यटन हॉटेल आहे. आम्ही राजवाडा पहायला गेलो तो सुटीचा दिवस होता हॉटेल चालू होते पण राजवाड्याचा पर्यटकांना दाखवण्यात येणारा भाग बंद होता हॉटेल-व्यवस्थापकांनी आमची निराशा होऊ नये म्हणून प्रथम आम्हाला स्वागतकक्षात बसवले आमच्याबरोबर त्यांचा एक सेवक दिला त्याच्याबरोबर राजवाड्यात चक्कर मारली. प्रथम हॉटेलमध्ये रूपांतर केलेल्या रूम्स पहिल्या आधुनिक फर्निचर, आरसे, स्वतंत्र बाथरूम असलेल्या रूम्स आरामदायी वाटल्या नंतर राजवाड्यातील पोहोण्याचा तलाव पाहिला या तलावात ताजे पाणी भरण्यासाठी दीड हजार रुपये खर्च येतो जोधपूरच्या राजवाड्यातील तलावाची सर याला अर्थातच नाही महालाच्या मागील बाजूला मध्ये प्रशस्त हिरवळ आहे त्याच्यामध्ये संगमरवरी बॅंड स्टॅंड आहे बाजूला भव्य दरबारहॉलमध्ये भुसा भरलेली जंगली श्वापदे दिसतात शेजारी आहे नृत्यमहाल तेथे लाकडी फ्लोअरिंग असून सुंदर गालिचे आहेत लालगढ राजवाड्याच्या भव्यतेने प्रभावित झालो मॅनेजरचे आभार मानून तेथून बाहेर निघालो

बिकानेरच्या परिसरातील सर्व स्थळे पाहून झाली होती दुपारचे चार वाजले होते बिकानेरहून ३२ कि मी. अंतरावर गजनेर येथे आणखी एक राजवाडा तलावाच्या काठी आहे तसेच तेथे अभयारण्यही आहे. तेथे

जाण्याचा विचार होता पण टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला की राजवाडा लांबूनच पहावा लागेल आणि पक्ष्यांची संख्याही कमी झालेली आहे. त्यापेक्षा तुम्ही ३२ कि मी अंतरावरच्याच बिकानेर–जोधपूर रस्त्यावरील देशनोकच्या श्रीकरणीमाता मंदिराला भेट द्या तेथे असंख्य उंदीर पहायला मिळतील नंतर जोधपूर रस्त्याच्या दिशेने मोटार वळवली रस्ता सरळच्या सरळ पण वाहतूक अगदी तुरळक राजस्थानची लोकवस्ती अत्यंत विरळ. या वालुकामय प्रदेशात वस्ती एका चौरस मैलावर दोन अशी आहे पण बरेच अंतर गेल्यावर दोनही माणसे दिसायची नाहीत दुतर्फा वालुकामय रेताड भूमी अधूनमधून उंट दिसायचे तासभरातच देशनोकच्या मंदिराजवळ पोहोचलो

हे करणीमाता मंदिर पांचशे वर्षांपूर्वीचे आहे. मोगल राजा बाबर याचा पुत्र कामरान याच्याविरुद्ध जैसलमेरचा राजा राव जैतसी याला विजय मिळाला. त्याने जैसलमेर येथे मिळणाऱ्या पिवळ्या पत्थरापासून घडवलेल्या मूर्तीची स्थापना केली प्रथम कच्चे मंदिर उभारले बिकानेर महाराजा सूरतसिंह यांनी त्या ठिकाणी पक्के मंदिर, तटबंदी उभारली आणि दर्शनी सिंहद्वार बनवले महाराजा गंगासिंहजी यांनी मंदिरातील संगमरवरी काम केले मंदिराचे प्रवेशद्वार व दर्शनी भिंतीवरील स्थापत्य कलापूर्ण व आकर्षक आहे बाजूला दोन संगमरवरी सिंह आहेत भिंतीवर काळ्या संगमरवरातील हत्तींच्या शिल्पकृती आहेत दारावर पाने, फुले, हार घेऊन जाणारी स्त्री, वाद्य वाजवणारी सुंदरी, मोरावर बसलेले स्वार, द्वारपाल अशा अप्रतिम मूर्ती कोरल्या आहेत

सुंदर प्रवेद्वारातून आत गेल्यावर शेकडो उंदरांनी आमचे स्वागत केले त्यांच्यासाठी खास तयार केलेल्या अनेक बिळांमधून, इकडून तिकडे ते बिनधास्तपणे पळत होते. मंदिराच्या गर्भगृहासमोरील मंडपात तसेच गर्भगृहातही उंदरांचा सुळसुळाट होता गाभाऱ्याला चांदीचा दरवाजा होता दर्शनाला आलेले लोक या असंख्य उंदरांसाठी मिठाई व लाडूचा प्रसाद एका मोठ्या परातीत टाकत होते उंदीर त्यावर तुटून पडत होते या ठिकाणी उंदराला देवाचा अवतार मानतात आणि एखादा उंदीर कुणाच्या

अगावर चढला तर ते सौभाग्यसूचक मानले जाते भक्ताची तशी भावना आहे येथे उदराना मारणे एवढेच नव्हे तर त्रास देणेसुद्धा अशुभ मानले जाते

या मंदिराशी निगडीत बऱ्याच आख्यायिका आहेत बिकानेर महाराजा गजसिंह यांना मातेने जोधपूरकडून झालेल्या आक्रमणाच्या वेळी गोळी लागण्यापासून वाचवले होते, तर जैसलमेरचा राजा जैतसी व अल्वर नरेश बख्तारसिंह यांना असाध्य रोगापासून मुक्ती मिळाली होती मंदिरात असख्य उदरांची पळापळ पाहून उदय एखादा उदीर अगावर उडी मारतो की काय या काळजीत होता। उदरांमुळे मंदिरात दुर्गंधी येत होती तथापि भावना व श्रद्धा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्यामुळेच मंदिराच्या भेटीसाठी भाविकाची गर्दी होती भारतातील एकमेव असे हे 'चूहोंका मंदिर' पाहून बिकानेरकडे निघालो

परतताना बिकानेरच्या अलीकडे आठ कि मी देवीकुंडजवळ राजा बिंकाजीच्या वंशातील मृत नरेशांच्या छत्र्या पाहिल्या त्यातील महाराजा कर्णसिंह यांची सोळा स्तंभांची छत्री व महाराजा अनुपसिंहजींची भव्य छत्री कलात्मक आहे

बिकानेरची महत्त्वाची पर्यटनस्थळे पाहून शेवटी श्रीलक्ष्मीनारायण मंदिरात दर्शनाला आलो याही मंदिराच्या बाजूने उत्तम तटबंदी असून तेथून शहराचे विहंगम दृश्य दिसते चढउतारावरील, टप्प्याटप्प्यावरील घरे लुकलुकत होती लक्ष्मीनारायणमंदिर पाचशे वर्षापूर्वीचे असून महाराजा गंगासिंहजींनी त्याचा जीर्णोद्धार केला मंदिरात सर्वत्र संगमरवरी फरशी होती शांत व पवित्र वातावरणात देवीचे दर्शन घेऊन बाहेर आलो दिवाळीचे दिवस होते त्यामुळे दिव्यांची रोषणाई दिसत होती फटाक्यांचे आवाज ऐकू येत होते

स्टेशनजवळ पोहोचलो तेव्हा रात्रीचे साडेसात वाजले होते कारमधून उतरून, बिल देऊन पायीच फिरत फिरत बिकानेरच्या बाजाराच्या रस्त्यावरील चौकात आलो दिवाळीमुळे मिठाईची अनेक दुकाने नाना प्रकारच्या मिठायानी भरगच्च भरलेली दिसत होती साखरेचा भाव दहा रुपये किलो होता. त्यामुळे मिठाईचा भाव किलोला वीस ते पचवीस

रुपये होता तरीही मिठाई खरेदीसाठी खूप गर्दी होती बिकानेरला प्रसिद्ध आहेत रसगुल्ले, पापड व बिकानेरी शेव बिकानेरच्या गर्दीने फुललेल्या मुख्य रस्त्यावर मिठाई, शेव, पापड याची खरेदी करीत करीत स्टेशनवर परतलो रात्री ९ ला प्लॅटफॉर्म ओलाडून सुरतगढ पॅसेंजरमध्ये बसलो. रिझर्वेशन मिळालेले होते. एक दिवसाच्या बिकानेरच्या भेटीत पहायला मिळालेला उटाचा थवा व मंदिरातील असंख्य उंदीर कायम लक्षात रहाणार होते शिवाजी महाराजासंबंधीची म्युझियममधील कागदपत्रे पाहून धन्य वाटले होते

बिकानेर भेटीबरोबर राजस्थानची भेट संपली होती. आता वेध लागले होते उत्तरेकडील हिमाचल प्रदेशाचे रात्री साडेनऊला गाडी निघाली कडक्टरला सागून ठेवले होते की रात्री तीन वाजता सुरतगढ स्टेशन आल्यावर उठवा तेथे गाडी बदलून पुढे ब्रॉडगेजने भतींडा गाडीत बसायचे होते. रात्री गाडी बदलण्याच्या धास्तीने शात झोप मिळाली नाही. तीनला सुरतगढला पोहोचलो. हमाल कुठेच दिसेना. शिवाय थडगार वारे हैराण करीत होते उल्का–उदयसकट सर्वांनी सामान वाटून घेतले ओव्हरब्रिज-वरून ब्रॉडगेज प्लॅटफॉर्मवर आलो तेव्हा भतींडा गाडी उभीच होती. सामान चढवून दार लावून घेतले. फर्स्टक्लासच्या डब्यात कोणीच नव्हते. शातवेळी बर्थवर पडल्या पडल्या झोप लागली. सकाळी नऊला राजस्थानची रेताड भूमी ओलाडून पजाबच्या सुपीक भूमीतील भतींडा स्टेशनवर पोहोचलो होतो.

□ □

## सतलजकाठची सायंकाळ

भतींडाहून सकाळी दहाच्या सुमाराला फिरोझपूरकडे जाणारी गाडी मिळणार होती. पण रात्रीच्या प्रवासाने, सुरतगढ येथील धावपळीने, अर्धवट झालेल्या झोपेने कटाळलो होतो तेव्हा रिटायरिंग रूमचा आसरा घेतला बाथरूममध्ये नळाला पाणी कूपनलिकेचे असल्याने थोडे कोमटच होते प्रथम स्नान उरकून मग सर्वांनी चहा घेतला सरदारजी टी सी कडे तिकीटाच्या सहीसाठी गेलो तर त्याने आस्थेवाईकपणे चौकशी केली त्याने मुंबई–पुणे ही शहरे पाहिली होती त्याने सुचवले की वेळ आहे तर भतींडा गावात चक्कर मारून या येथील किल्ला पाहून घ्या

स्टेशनसमोरील बाजारच्या रस्त्याने पायी पायीच गेलो पंजाबी, गोरेपान, उंच, धिप्पाड स्त्री-पुरुष दिसू लागले राजस्थानमधून आल्यावर फरक जाणवू लागला भतींडाचा किल्ला गावातच आहे मोठ्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर किल्ल्याचा गोलाकार घेर, तटबंदी दिसली. या किल्ल्यात विटांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केला आहे अनेक ठिकाणच्या विटा काढून घेतलेल्या दिसल्या या किल्ल्यात हिंदुस्थानच्या पहिल्या राणीला – सुलताना रेझियाला कैदेत ठेवले होते अशी माहिती मिळाली

किल्ला पाहून वैष्णव ढाब्यात जेवण आटोपले भतींडाची बाजारपेठ मोठी आहे कापसाचा मोठा व्यापार चालतो विजेवर चालणारे बंब, धुलाई-मशीन स्वस्त होते पंजाबमधील जालंदरच्या आसपास ही उपकरणे तयार होतात उंटाच्या केसापासून तयार केलेली ब्लँकेटे, गालिचे दुकानात दिसत होते भतींडा स्टेशनवर परतलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते स्टेशनवरून समोरचे विजेचे प्रचंड औष्णिक केंद्र दिसत होते यशवंत ते पहायला गेले आम्ही मात्र रिटायरिंग रूममध्ये मस्त विश्रांती घेतली. गाडी पकडायची धास्ती नाही, धावपळ नाही त्यामुळे अगदी बरे वाटत होते रात्री पण तेथे चांगली विश्रांती घेतली

दुसऱ्या दिवशी सकाळी आठच्या गाडीने भतींडा – फिरोझपूर ८८ कि. मी चा प्रवास सुरू झाला रावी, चिनाब, झेलम, बियास आणि सतलज या पंचनद्यांनी समृद्ध केलेला पंजाब म्हणजे पाच नद्यांचा (आब) प्रदेश फिरोझपूरला दुपारी १२ च्या सुमाराला पोहोचलो स्टेशनवरील रेल्वे रिटायरिंग रूम मिळवली जेवण आटोपेपर्यंत एक वाजला. फिरोझपूरहून दहा कि मी अंतरावरील हुसैनीवाला येथे जाण्यासाठी रिक्षा ठरवली. रिक्षावाल्याला दुपारी चारला यायला सांगून विश्रामालयात जाऊन विश्रांती घेतली.

दुपारी चार वाजता फिरोझपूर कँट रेल्वे स्टेशनहून रिक्षाने हुसैनीवाला-कडे निघालो हुसैनीवाला येथील सतलजवरील भव्य गर्डरपुलाच्या अलीकडील बॉर्डर चेक पोस्टजवळ रिक्षा थांबली बंदूकधारी लष्करी जवानाने रिक्षाच्या नंबरची नोंद घेतली रिक्षा सतलजच्या पुलावरून मंद गतीने धावू लागली सतलजचे पुराणातील नाव शतद्रु किंवा शतद्रि. हिमालयाच्या मानससरोवरात उगम पावलेल्या सतलजचा विशाल निळाभोर प्रवाह खळखळ वहात होता सतलज पार करून रिक्षा पैलतीराजवळील चेक पोस्टजवळ थांबली बंदूकधारी सरदारजी जवानाने गाडीची परत नोंद घेतली काय सामान आहे याची चौकशी केली कॅमेरा, शबनम पिशवी हे सामान रिक्षातच ठेवले रिक्षा तेथेच थांबली शहीद भगतसिंग स्मारक पहाण्यासाठी उजव्या बाजूच्या रस्त्याने निघालो. दुतर्फा उंच उंच

निलगिरीची झाडे व रंगीबेरंगी बोगनवेली असलेला रस्ता दहा मिनिटातच पार करून शहीदाच्या स्मारकाजवळ पोहोचलो

सायंकाळची वेळ सूर्य अस्ताला जाण्यास अवधी होता स्मारकाकडे जाण्यासाठी खास घडविलेल्या लालसर रंगाचे दगड वापरून पेव्हिंग केले आहे मध्ये गुळगुळीत काळ्या रंगाचा चौकोनी चबुतरा आहे बाजूला पाण्याच्या उथळ, विशाल कुंडामुळे तलावात स्मारक उभारल्यासारखा भास होत होता मावळतीच्या सूर्यकिरणांनी चबुतरा उजळून निघाला होता २३ मार्च १९३१ च्या काळ्याकुट्ट मध्यरात्री सतलजतीरावरील या ठिकाणी एक महाभीषण शोकनाट्य घडलं होतं।

अमृतसर येथील जालियनवाला बागेत इ स १९१९ मध्ये झालेल्या भीषण हत्याकांडानंतर विद्यार्थीदशेतील भगतसिंग, राजगुरु, व सुखदेव यांना देशस्वातंत्र्याच्या भावनेने झपाटून टाकले होते कॉलेजजीवनात भगतसिंग व सुखदेव यांची जडलेली जिवलग मैत्री एकत्र फाशी जाण्याइतकी अभेद्य होती। सायमन कमिशनविरुद्ध लाहोर स्टेशनजवळ इ स १९२९ मध्ये झालेल्या उग्र निदर्शनाच्या वेळी पंजाबकेसरी लाला लजपतराय यांना ब्रिटीश पोलीस अधिकारी यांनी अमानुष मारहाण केली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला लाहोरच्या रावी नदीच्या तीरावर त्यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी हजर असणाऱ्या तरुण भगतसिंग व सुखदेव यांच्या मनात बदला घेण्याची भावना रुजली त्यानंतर त्यांना साथीदार मिळाले होते राजगुरु. इंग्रज पोलीस अधिकारी सॉंडर्स याचा लाहोरमध्ये गोळ्या घालून १७ डिसेंबर १९२९ ला खून करण्यात आला व लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यात आला हादरलेले इंग्रज सरकार तीन महिने उलटून गेले तरी खुन्याचा शोध लावू शकले नव्हते. त्यानंतर दिल्ली येथील सेंट्रल असेंब्ली हॉलमध्ये भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी धाडसाने बाँब टाकला त्यात दोघांना काळेपाणी व जन्मठेप अशी शिक्षा झाली यानंतर सुरू झाला लाहोरचा प्रसिद्ध अभियोग. भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना पोलीस अधिकारी सॉंडर्सचा कट करून वध केल्याबद्दल फाशीची अमानुष शिक्षा फर्मावण्यात आली न्यायालयात व बाहेरही फाशी वाचविण्याचा अतोनात प्रयत्न करूनही फाशी अटळ झाली २४ मार्च

१९३१ हा फाशी अमलात आणण्याचा नियोजित दिवस ठरविण्यात आला २३ मार्च १९३१ रोजी या क्रांतिकारकांच्या नातेवाईकांची शेवटची भेट ठरली फाशीच्या वाटेवरील अंतिम क्षणीही भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांचे मनोधैर्य अविचल होते मृत्यूची भीती त्याना मुळीच वाटत नव्हती. भगतसिंग तर म्हणत " मी जर हसत फाशी गेलो तर हिंदुस्थानातील माता आपला मुलगा भगतसिंग बनावा अशी इच्छा धरतील " त्यांची अंतिम इच्छा होती की " परत या देशात जन्म घेऊन मातृभूमीची आणखी सेवा करावी " नियोजित २४ मार्च १९३१ च्या सूर्योदयापूर्वी फाशी देण्याऐवजी लाहोर सेंट्रल जेलमध्ये आदल्या दिवशी – २३ मार्चला मावळत्या सूर्याच्या साक्षीने या तिघा क्रांतिकारकाना फाशीच्या तख्तावर आणले गेले ' इन्किलाब झिंदाबाद ' च्या घोषणेत हसतमुखाने तिघेही फाशीला सामोरे गेले

फाशी अमलात आणल्यानंतर लोकक्षोभाला चुकविण्यासाठी तुरुंगाची मागील भिंत तोडून गुपचूपपणे तिघा हुतात्म्यांची प्रेते बाहेर काढण्यात आली प्रेतदहनाच्या साहित्यासह मृतदेह ट्रकमध्ये भरले आणि ट्रक सतलजच्या दिशेने अंधारात धावू लागला वाटेत हिंदू व शीख धर्मगुरूना गाडीत घेण्यात आले व त्यांच्या साक्षीने घाईघाईने धार्मिक अंत्यसंस्कार या स्मारकाच्या जागी उरकण्यात आले या स्थानाचा शोध घेण्यासाठी लाहोरहून पेटत्या मशाली घेऊन बेफामपणे धावत येणारे लोक पोहोचण्यापूर्वीच मध्यरात्रीच्या सुमारास तिघा हुतात्म्यांच्या चिता धडाडल्या होत्या पहाटे चिता थंड झाल्यावर सूर्योदयापूर्वीच अस्थी गोळा करून सतलजच्या पुलावरून नदीच्या प्रवाहात विसर्जित केल्या अशी ही बाणेदार, निर्भय शहीदांची चिता रचलेली पुण्यभूमी. या महान क्रांतिकारकांची चिता येथे विझली होती, पण देशप्रेमाची ज्योत राष्ट्रात प्रज्वलित झाली होती त्या स्मारकाजवळ कोरले आहेच–

शहिदोंकी चिताओंपर लगेंगे हर बरस मेले ।
वतनपे मिटनेवालोंका,
यहीं बाकी निशाँ होगा ।

स्मारकाच्या एका बाजूला भितीवर शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांचे अर्धपुतळे आहेत दिल्ली असेंब्ली बॉम्ब खटल्यात भगतसिंगबरोबर जन्मठेप व काळेपाणी ही शिक्षा झालेल्या बटुकेश्वर दत्त यांचीही समाधी येथे एका बाजूला आहे अंदमानला काळ्यापाण्याची शिक्षा भोगल्यावर, पाटणा येथे काही दिवस घालवल्यावर बटुकेश्वर दत्त दिल्ली येथे १९६५ साली वृद्धापकाळात मरण पावले. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार शहीद भगतसिंग यांचा अंत्यविधी झालेल्या या ठिकाणाजवळच त्यांचीही समाधी उभारली २३ मार्च १९६१ साली भगतसिंग यांची माता विद्यावतीदेवी यांच्या साक्षीने उभारलेले हे स्मारक पाकबरोबर झालेल्या युद्धात १९७१ साली उध्वस्त करण्यात आले होते त्यानंतर दोन वर्षांनी परत हे स्मारक उभारले गेले स्मारकावर गुलाबपुष्प अर्पण करून भारावलेल्या मनाने निरोप घेतला खरा पण तेथे कोरलेल्या

सरफरोषीकी तमन्ना अब हमारे दिलमें है।

देखना है जोर कितना बाजूए कातिलमें है।

या पंक्ती हृदयपटलावर कायमच्या कोरल्या गेल्या होत्या

शहीदाच्या स्मारकाचा निरोप घेऊन परत हुसैनीवाला चेक पोस्टजवळ परतलो तेथून पूर्वी लाहोरकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक कि मी अंतरावर पाकिस्तान सरहद्द आहे. चेक पोस्टवरील बंदुकधारी सैनिक म्हणाला — "कॅमेरा, पिशवी हे सामान येथेच राहू द्या बॉर्डर बघून लवकर या" दुतर्फा उंच उंच निलगिरी वृक्ष व रंगीबेरंगी बोगनवेली असलेल्या रस्त्याने उत्साहाने निघालो वीस मिनिटात रस्ता पार केल्यावर भारतीय हद्दीतील लोखंडी गेट दिसली. भारतीय सशस्त्र सैनिक गस्त घालीत होते. गेटच्या बाजूला सिमेंटकॉंक्रीटची अद्ययावत् एकमजली इमारत दिसत होती योगायोगाने तेथे एक महाराष्ट्रीयन जवान भेटले श्री प्रल्हाद गस्ते हे त्यांचे नाव. त्यांच्या भेटीने आम्हाला जसा आनंद झाला तसाच आनंद त्यानाही झाला कारण फार दिवसांनी मराठी बोलणारे कुटुंब त्यांना

सरहद्दीवर भेटले होते सांगलीकडचे हे तरुण राष्ट्रसंरक्षणाचे काम करीत आहेत हे पाहून अभिमान वाटला त्यांनी मोठ्या आपुलकीने आम्हाला लष्करी अतिथिभवन दाखवले आतमध्ये तीन चार हॉल होते एका हॉल-मध्ये टी व्ही, रेडिओ होता. भारतीय संगीत ऐकू येत होते भारतीय व पाकिस्तानी सैनिक अधिकाऱ्यांच्या चर्चेच्या वेळी या अतिथीभवनाचा उपयोग होतो अशी माहिती त्यांनी दिली टी व्ही वर जालंदर व लाहोर स्टेशनवरील कार्यक्रम दिसतात. दुसऱ्या एका हॉलमध्ये राष्ट्रपिता म. गांधी, राष्ट्रपती संजीव रेड्डी यांचे फोटो होते व्हरांड्यात पंजाबी शेतकरी, अमृतसरचे सुवर्ण मंदिर व भांगडा नृत्य ही भव्य चित्रे लक्ष वेधून घेत होती

श्री गस्ते यांनी आम्हाला नंतर भारताच्या हद्दीतील गेटजवळ नेले. पंचवीस फुटांवर दुसऱ्या बाजूला पाकिस्तानचे गेट होते. त्याला हिरवा रंग दिलेला असून त्यावर चांदतारा कोरला होता भारतीय गेटपलीकडे पाकिस्तानचे लष्करी अतिथीभवन दिसले तेथील व्हरांड्यातील फाळणीचे जनक पं महमदअली जीना यांचा फोटो स्पष्ट दिसत होता दोन्ही गेटच्या मध्ये रस्त्यावर सरहद्दर्शक तिरपा आखलेला पांढरा पट्टा दिसत होता. पलीकडे राखी रंगाचा शर्ट व खाकी पँटधारी, कल्लेदार मिशांना पीळ दिलेला बंदुकधारी पाकिस्तानी जवान पाक ध्वजाजवळ पहारा करीत होता त्याची नजर कडवी होती. सरहद्दीच्या रेषेअलीकडे खाकी शर्ट पँट-धारी भारतीय जवान आपल्या तिरंगी ध्वजाजवळ पहारा करीत होता. जमिनीवरील पांढरी रेषा फाळणीने झालेल्या जखमांची आठवण करून देत होती

पहाता पहाता सूर्यास्ताची वेळ झाली दोन्ही ध्वजाजवळील सैनिकांनी आपापल्या जागा बदलल्या. त्यांनी ध्वजस्तंभावरील दोऱ्या तिरप्या रेषेत क्रॉसमध्ये धरल्या. तेवढ्यात बिगूल निनाद लागला व दोन्ही ध्वज उतर-वले गेले मग सैनिकांनी परत आपापल्या हद्दीत प्रवेश केला पलीकडच्या

हद्दीतील बॉर्डर पाहायला आलेले पाकिस्तानी नागरिक व आपल्या हद्दीत जमलेले उत्साही भारतीय ध्वज उतरवण्याचा सोहळा पाहून परतू लागले भारावलेल्या अवस्थेतच आम्हीही भारतभूमीच्या शेवटच्या टोकाचा व त्याचं रक्षण करणाऱ्या महाराष्ट्रीयन जवानाचा निरोप घेऊन चेकपोस्टवर परतलो. रिक्षा सतलजच्या पुलावरून फिरोझपूरकडे परत निघाली. सतलजवरचा पूल पार करताना सतलजचं निळ पाणी अजरामर शहीदाच्या रक्तानं जणू लालेलाल झाल्यासारखं वाटत होतं ..

◻ ◻

# फिरोझपूर ते पठाणकोट

फिरोझपूर कँट स्टेशनचा निरोप घेताना शहीदांच्या स्मृतींनी मन भारावून गेले सकाळी दहाला फिरोझपूर-जालंदर ११८ कि मी अंतराचा प्रवास सुरू झाला रेल्वेच्या दुतर्फा कूपनलिका व त्यावर बसविलेले पंप जवळ जवळ अंतरावर दिसत होते पंजाबचे मेहनती शेतकरी वर्षातून तीन पिके घेतात त्यामुळे गव्हाच्या पिकाने पंजाबची सुफला भूमी बहरली होती. वाटेत ठिकठिकाणी कापलेल्या गव्हाच्या कणसाच्या थप्प्याच्या थप्प्या लावलेल्या दिसत होत्या. गव्हाची मळणी करणाऱ्या मोठमोठ्या गिरण्या दुतर्फा दिसत होत्या भारताच्या फक्त दोन टक्के लोकसंख्या आणि भूमी असलेला पंजाब भारताच्या एकूण गव्हाच्या उत्पादनापैकी पंचवीस टक्के गहू पिकवतो !

गव्हाची समृद्ध शेते पार करीत करीत गाडीने सतलज नदीचा पूल पार केला लोहियाँखास जंक्शनवर गाडी दहा मिनिटे थांबली तेथून एक फाटा लुधियानाला जातो गव्हाच्या पोत्यांनी भरलेल्या अनेक ट्रक्स वाहतुकीसाठी उभ्या होत्या नंतर साडेबाराच्या सुमारास आले कपूरथळा स्टेशन. तेराव्या शतकात अस्तित्वात आलेले हे कपूरथळा एके काळी संस्थानच्या

राजधानीचे वैभवाने झगमगणारे ठिकाण. कपूरथळाचे वैशिष्टच म्हणजे तेथील प्रसिद्ध हिंदु मंदिर एका शिखाने ते बांधले. त्याचप्रमाणे एका मशिदीची उभारणी एका फ्रेंच शिल्पकाराच्या मार्गदर्शनाखाली झाली कपूरथळाचा जगजीत राजवाडा व शालीमार बगीचा ही प्रेक्षणीय स्थाने पहाण्याची इच्छा होती, पण सर्व सामानासह उतरावे लागले असते प्रवासात खंड पडला असता व एक दिवस मोडला असता तेव्हा कपूरथलाला न उतरता पुढे प्रवास चालू केला अर्ध्या तासातच जालंदर स्टेशनवर गाडी पोहोचली

जालंदर स्टेशनवर सामान उतरून घेतले आता रेल्वेच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा जालंदर ते पठाणकोट ११६ कि. मी अंतराचा राहिला होता. स्टेशनवर पठाणकोट गाडीची चौकशी केल्यावर कळले की आलेली गाडीच पठाणकोटपर्यंत जाते पुनः सामान चढवले स्टेशनवरच दुपारचे जेवण उरकले दुपारी तीनच्या सुमारास गाडी पठाणकोटकडे निघाली दुतर्फा हिरवीगार शेते, त्यातील हिरवागार भाजीपाला, फ्लॉवर, कोबी पाहून पंजाबमधील हरित क्रांतीचा प्रत्यय आला. तासभराने मुकेरियाँ स्टेशनवर गाडी विसावली तेथून एक फाटा अमृतसरला जातो. दिवस-भराच्या प्रवासाने सर्वांना कंटाळा आला होता उल्का—उदय पत्ते खेळून करमणूक करून घेत होते

सूर्य मावळण्याच्या सुमारास आम्ही पठाणकोट रेल्वे प्लॅटफॉर्मवर उतरलो. पठाणकोटचे पूर्वीचे नाव औदुंबर किंवा प्रतिष्ठानपूर. रेल्वेचा मुख्य प्लॅटफॉर्म खूप दूर होता हमालाने अंधाराचा फायदा घेऊन जादा पैसे उकळले. जवळजवळ एक कि मी अंतराचा प्लॅटफॉर्म चालत मुख्य प्लॅटफॉर्मवर आलो संपत आलेल्या सीझनमुळे काश्मीरहून परतलेल्या पर्यटकांनी पठाणकोटचा प्लॅटफॉर्म फुलला होता. रेल्वे रिटायरिंग रूमच्या बुकिंगच्या खिडकीजवळ आलो बुकिंग क्लार्क डुलक्या घेत होते. त्यांना बळेच उठवावे लागले रेल्वे रिटायरिंग रूम मिळाल्याने दिलासा वाटला दुमजली इमारतीचा जिना चढून वर आलो रूममध्ये होते साधे नवारीच्या सुती पट्ट्याने विणलेले पलंग. त्यावर गादी नव्हती ब्लॅंकेट साधे, बिलकुल उबदार नसलेले अर्थात एक रात्र काढायचा प्रश्न होता आणि अंधारात,

थंडीत गावात जाऊन लॉज धुंडाळण्याचा त्रास वाचला होता खरे म्हणजे पठाणकोटसारख्या महत्त्वाच्या स्टेशनवरील रिटायरिंग रूममध्ये उत्तम सोय हवी. प्रवाशाच्या सोयींकडे तर लक्ष नाहीच शिवाय त्यांच्याशी सौजन्याने बोलण्याचे भानही तेथील सेवकाना नव्हते त्याच्याशी हुज्जत घालून काहीच उपयोग नव्हता रूममध्ये सामान व्यवस्थित ठेवून हात-पाय धुतले. जिना उतरून खाली आलो थडगार वारे वहात होते प्लॅट-फॉर्मवर ब्रेड, अंडी, चहा घतला प्लॅटफॉर्मबाहेरच बसस्टँड आहे तेथे हिमाचल प्रदेशातील डलहौसी येथे जाणाऱ्या बसची चौकशी केली पहिली बस सकाळी साडेआठला होती रिटायरिंग रूमवर परतल्यावर होल्डॉल सोडला उबदार ब्लँकेट, शाली, चादरी काढल्या दिवसभरच्या प्रवासाने थकल्यामुळे झोप लगेच लागली

□ □

## लॉर्ड डलहौसीची देणगी – डलहौसी

नेहमीप्रमाणे लवकर उठून ती काका व यशवंत उल्का उदयला उठवत होते पण थंडीमुळे आम्हाला बिछाना सोडवत नव्हता साडेसातच्या सुमारास आवरून रिटायरिंग रूमच्या बाहेर पडलो चहा, ब्रेड, उकडलेली अंडी असा नाष्टा केला आठच्या सुमारास डलहौसी बसच्या तिकिटाचे बुकिंग सुरू झाले बसमध्ये उल्का-उदयने पुढच्या जागा मिळवल्या साडे आठला बस पठाणकोटहून डलहौसीकडे निघाली. ८० कि मी चा प्रवास सुरू झाला पठाणकोट–कुलू हायवेच्या रस्त्याने साधारण पाच कि मी अंतर गेल्यावर बस डाव्या बाजूला वळली

बस हळू हळू पहाडावर चढू लागली थंड वारे वहातच होते. दऱ्या-खोऱ्यांतील निसर्गाची शोभा पहात पहात प्रवास सुरू होता प्रथम धार व नंतर दुनेरा गाव लागले. बस तेथे थांबली. रस्त्यावर 'आमपापड घ्या' असा एकच पुकारा चालू होता तेथील दऱ्याखोऱ्यात आंब्याची विपुल झाडे असून आंबरस वाळवून त्यापासून पोळ्या करतात ते आमपापड. काही आमपापड खट्टेमीठे होते तर काही नुसते गोड. सर्वांनीचा त्याच्या-वर ताव मारला शिवाय ते कित्येक दिवस टिकतात म्हणून घरी नेण्या-

साठीही बरेच विकत घेतले. दुनेरानंतर थोडे पुढे गेल्यावर रस्त्यावर बोर्ड दिसला

HIMACHAL PRADESH WELCOMES YOU

हिमाचल—बर्फाच्छादित हिमालय पर्वताच्या सान्निध्यात प्रवासाला निघालो होतो. वळणाकार रस्ता पार करून एखादा पहाड पार केला की दुसरा पहाड दृष्टीला पडे पहाडामागे पहाड मागे पडत होते दुपारी बाराच्या सुमारास बनीखेत नावाचे छोटेखानी गाव पहाडाच्या कडेला लागले तेथून रस्ता सरळ पुढे चम्बाला जातो, तर उजवीकडील फाटा डलहौसीला जातो आता डलहौसी केवळ पाच कि मी अतरावर राहिले होते दुपारचे बारा वाजले तेव्हा बस डलहौसी स्थानकावर थाबली

डलहौसी आहे समुद्रसपाटीपासून २०३६ मीटर उचीवर हिमालयातील धौलाधर पर्वतराजीच्या उत्तरेकडील उतारावर तेथील थंड हवा, सुगधित ओक व पाईन वृक्षाच्या सान्निध्यातील नैसर्गिक वातावरणावर ब्रिटीश व्हॉईसरॉय लॉर्ड डलहौसी अगदी लुब्ध झाले सव्वाशे वर्षापूर्वी त्यांनी येथे प्रथम सॅनिटोरियम उभारले शिखाबरोबरच्या युद्धात विजय मिळवल्यावर लॉर्ड डलहौसी इ. स. १८५० मध्ये चम्बा खोऱ्यात आले तेथील शांत वातावरणाने ते प्रभावित झाले चम्बा राजाकडून जागा घेऊन आग्ल-पद्धतीचे हट, बगले बाधले. इ. स. १८६७ मध्ये येथे नगरपालिकेची स्थापना झाली. कॅथॉलिक नन्स व आयरिश जेसुईट लोकांनी शाळा उभारल्या उन्हाळचात वास्तव्याला येणाऱ्या पर्यटकांसाठी हळूहळू हॉटेल्सची उभारणी होऊ लागली आज डलहौसी आहे गर्दीपासून दूर, शांत, मध्यमवर्गीयांनाही परवडणारे, थोडे कमी खर्चाचे असे हिल स्टेशन साधारण तेरा कि मी क्षेत्र असलेल्या बलून, कथलोग, पोट्रैन, तेहरा व बक्रोटा या पाच टेकडचां-वर डलहौसीचा परिसर वसला आहे

स्टॅडजवळच हिमाचल पर्यटन विभागाची कचेरी होती जिना चढून वरच्या मजल्यावर आलो तेथील अधिकाऱ्याने आस्थेने चौकशी केली. उतरण्यासाठी टूरिस्ट बगल्यात दोन डबल बेडरूम्स घेतल्यास ६० रुपये चार्ज पडेल, मग त्यापेक्षा यूथ होस्टेलमध्ये पाच बेडचा एकच हॉल घेतलात तर सर्वांना एकत्र रहाता येईल व चार्ज फक्त चोवीस रुपये पडेल असे त्याने

सुचविले हिवाळा सुरू झाल्यामुळे म्हणजेच सीझन संपत आल्याने दर सवलतीचे होते यूथ होस्टेलवर लगेच फोन करून हॉल रिझर्व्ह केला स्टँडवरून दहा मिनीटातच यूथ होस्टेलवर पोहोचलो हिमाचल प्रदेशातील सर्वच गावे डोंगरावर वसलेली असल्याने घरे टप्याटप्यात आहेत रिक्षा-टांगा यासारखे वाहतुकीचे साधन येथे नाही याची प्रचीती प्रथमच आली यूथ होस्टेल तीन मजली असून खाली डायनिंग हॉल आहे सर्वांत वरच्या मजल्यावरचा प्रशस्त हॉल आम्हाला मिळाला होता बाहेर गॅलरी होती तेथून उत्तुंग गिरीशिखराचे लोभसवाणे दर्शन होत होते रात्रीच्या जेवणाची ऑर्डर देऊन, आवरून स्टँडजवळ आलो. तेथील हॉटेलमध्ये गरम गरम जेवणावर ताव मारला तेवढ्यात हिमाचल पर्यटन विभागाचा एक सेवक तेथे आला त्याने सांगितले की डलहौसीहून खजियार या २२ कि मी अंतरावरील स्पॉटला स्वतंत्र जीपने जाण्यासाठी मुंबईचे दोन प्रवासी कार्यालयात बसले आहेत तुम्हीही तेथे जाणार असाल तर तुम्ही व ते दोघे मिळून शभर रुपये खर्च येईल चाळीस ते भरतील व तुम्ही साठ रु भरा तरी खजियारला भेट द्यायची असेल तर हा चान्स चुकवू नका तुम्ही स्वतंत्र जीप केलीत तर शभर रुपये खर्च येईल अधिक विचार न करता लगेच होकार दिला आम्ही सर्व व मुंबईचे ते पारशी जोडपे सर्वजण जीपने खजियारकडे दुपारी अडीचच्या सुमारास निघालो

जीप डलहौसीच्या बाजाराच्या रस्त्याने निघून पहाडाकडच्या पब्लीक स्कूलजवळून वळाली. वळणाकार रस्ते आस्ते आस्ते पार करताना उंचच्या उंच देवदार वृक्षामधून अधूनमधून सूर्यकिरण फुलबाज्यांसारखे चमकताना दिसत होते वेळ दुपारची होती तरी थंडगार वारे अंगाला झोंबत होते. वाटेत लकडमंडी नावाची छोटी वस्ती लागली तेथे लाकडांचा व्यापार चालतो लांबच्या लांब लाकडी ओंडके व्यवस्थित कापून रचून ठेवलेले दिसले काही ट्रकमध्ये अवजड व कापलेली लाकडे भरलेली दिसली हिमाचल प्रदेशातील विपुल वनराजीमुळे लाकडाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो लकडमंडी नंतर ठिकठिकाणी रस्तारुंदीचे काम चालू असल्याने जीप हळूहळू धावत होती

तासभरचा प्रवास संपवून जीप खजियार येथील हिमाचल पर्यटन

विभागाच्या टूरिस्ट बंगल्याजवळ उभी राहिली जीपमधून उतरलो समोर उंच उंच देवदार वृक्षांनी वेढलेले एखाद्या खोलगट बशीच्या आकाराचे गोलाकार गवताळ सुंदर मैदान पाहून नकळतच 'वंडरफुल !' 'लव्हली !' असे उद्‌गार बाहेर पडले खरेच निसर्ग येथे विलक्षण सुंदर आहे निसर्ग मूळ स्वरूपात आहे आणि म्हणूनच खूप सुंदर आहे सुमारे दीड कि. मी लांब व एक कि मी रुंदीचे गवताळ नैसर्गिक मैदान निसर्गाचा सुंदर चमत्कार आहे उतार उतरून तलावाकडे जाताना मऊ व दाट गवत स्पंजासारखे पायाखाली दबले जात होते. मैदानाच्या मध्यभागी छोटेसे तळे आहे. या गवताळ मैदानावर घोड्यावरून फेरी मारून आणण्यासाठी चार पाच पहाडी घोडेवाले होते त्यातील एकाला या तलावासंबंधी विचारले तेव्हा मोडक्या तोडक्या हिंदीतून त्याने सांगितले की ही तलावात जी वनस्पती दिसत आहे त्या वनस्पतीची जाड व मोठी मुळे एकमेकात खूप गुंतलेली आहेत पावसाळ्यात पाण्याबरोबर वाहून आलेली माती या मुळावर दाबून बसली आहे आणि अशा मातीवर गवत उगवले आहे गवत आणि माती यांनी एकमेकांना इतके घट्ट धरले आहे की तलावातील पाणी त्यांना अलग करू शकत नाही अशी जमीन तयार होऊन या तलावातही एक अशाच प्रकारे तरंगते बेट तयार झाले आहे विशेष म्हणजे ते बेट वाऱ्याच्या दिशेप्रमाणे तलावात इकडून तिकडे जाते तलावावर छोटा लाकडी झुलता पूलही होता

उल्का–उदयने घोड्यावरून चक्कर मारायचा हट्ट धरला दोन घोड्यां-वर स्वार होऊन ते मैदानात चक्कर मारायला निघाले घोडे तलावाच्या कडेकडेने चक्कर मारू लागले. ती काका आणि यशवंत या मैदानाच्या मऊ रेशमी, मुलायम वेलवेटसारख्या हिरवळीवर चक्क लवंडले. मी मात्र मंत्रमुग्ध झाल्यासारखी निसर्गाचे ते देखणे रूप डोळ्यात साठवीत होते सृष्टीमधला हिरवागार रंग आणि आकाशाचा निळा रंग निरखताना दोन डोळे अपुरे वाटत होते मध्यभागी तळे, बाजूने हिरवेगार मैदान, सभोवती लांबवर पसरलेले उंच देवदार आणि ह्या सौंदर्याला लख्ख सूर्यप्रकाशाने आगळीच झळाळी प्राप्त झालेली. खरोखर एखाद्या गूढरम्य, अद्‌भुत परी-प्रदेशात आल्यासारखे वाटत होते तेवढ्यात चंदीगढहून पायी ट्रेकिंग

करीत आलेले काही कॉलेज विद्यार्थी आमच्याजवळ आले आमच्याशी गप्पा मारू लागले. त्याना आलेले अनुभव सांगू लागले. डलहौसीहून सकाळी निघून खजियारपर्यंत वनराजीतून पायी हिंडण्यात वेगळेच थ्रिल असणार मोठे उत्साही होते ते तरुण. तेवढ्यात उल्का-उदयही चक्कर मारून आले घोड्यावर बसलेल्या दोघांचे फोटो घेतले मैदानातील गोल्फचे क्रीडांगणही एका बाजूला दिसत होते. खजियारच्या निसर्गसुंदर मैदानाचा निरोप घेताना फार जड गेले.

या मैदानालगतच्या खजिनाग मंदिरात आलो पॅगोडासारखे घुमट असलेल्या या मंदिरात खजिनाग ही मूळ ग्रामदेवता अधिष्ठित आहे. खजिनागवरून खजियार हे नाव पडले हिमाचलच्या महान ऐतिहासिक परंपरेत नागपूजेचे महत्त्व आहे, मंदिरातील गर्भगृहात नागदेवतेची मूर्ती आहे हे मंदिर लाकडाचे असून बाराव्या शतकातील आहे. सोळाव्या शतकात चंबाचा राजा बलभद्रवर्मन् याने या मंदिरात पांडवांच्या उभ्या लाकडी मूर्ती उभारल्या मंदिराच्या मंडपात पांडवांच्या पूर्णाकृती उभ्या मूर्ती दिसत होत्या शक्तिशाली भीम, धनुर्धारी अर्जुन यांच्या मूर्ती तर लगेच ओळखू आल्या महाभारतातील उदात्त चरित्राचा हिमाचलच्या जनजीवनात खूपच व्यापक प्रभाव आहे चंबाचा राजा पृथ्वीसिंह याची धर्मपरायण दाइ बाल्टू हिने सतराव्या शतकात मंदिराचा जीर्णोद्धार केला.

खजिनाग मंदिर पाहून समोरच्या टूरिस्ट बंगल्यात आलो. चहाचा ट्रे मागवला खजियारच्या तजेलदार वातावरणात चहाने आणखी ताजेतवाने झालो जीप ड्रायव्हर परतण्याची घाई करू लागला पुन. एकदा ते अति सुंदर गवताळ मैदान पहाण्याचा मोह आवरला नाही चारच्या सुमारास खजियारचा निरोप घतला खजियारने काश्मीरमधील गुलमर्गच्या निसर्ग सौंदर्याची याद करून दिली होती


खजियारहून परतताना वाटेत 'कालाटोप' हा एक छानसा पिकनिक् स्पॉट २४४० मीटर उंचीवर आहे तेथे वनखात्याचे एक विश्रामालय असून आजूबाजूच्या पहाडांचे मनोरम दर्शन तेथून होते कालाटोपहून नऊ कि मी अंतर पार करून डलहौसीच्या बाजाराच्या कोपऱ्यावर जी पी ओ चौकात उतरलो. तेथून डोंगराच्या कडेने उतरून अजितसिंग रस्त्याने पंच-



वैशिष्टयपूर्ण मूर्ती, हरिराय मंदिर, चम्बा



बुध्द मंदिर, धर्मशाला



सुरम्य कांगडा घाटी

पूला या ३ कि. मी अंतरावरील स्थानाकडे निघालो. अजितसिंग हे शहीद भगतसिंग याचे चुलते १५ ऑगस्ट १९४७ या स्वातंत्र्यदिनी त्यांचे डलहौसीला प्राणोत्क्रमण झाले त्याची पंचपूला येथे समाधी आहे. म्हणून तेथे जाणाऱ्या रस्त्याला अजितसिंग रोड हे नाव दिले आहे वाटेत प्रथम शतधारा हा थंड पाण्याचा झरा लागला पहाडाच्या पायथ्याशी पंचपूला येथे पाच झरे एकत्र येऊन प्रवाह वहातो म्हणून 'पंचपूला' नाव दिले आहे. आम्ही गेलो तेव्हा झरे शुष्क होते त्यामुळे विरस झाला. विलक्षण थंडगार वारे वाहू लागले होते डलहौसीच्या बाजारच्या रस्त्यावर लगबगीने आलो.

सुरू झालेल्या थंडीमुळे सीझन संपत आला होता मोजकेच प्रवासी राहिले होते. रस्त्यावर थोडेफार गुलहौशी पर्यटक रंगीबेरंगी स्वेटर्स, शाली घालून बाजारच्या रस्त्यावर हिंडताना दिसले थंडीमुळे बरीचशी दुकाने बंद होती फिरता फिरता रस्त्यावर कडेला तीनचार व्ह्यूपॉईंट लागले तेथून खोल दऱ्या, पहाडाच्या टप्प्याटप्प्यावर उभारलेली घरे, नागमोडी रस्ते यांचे मनोरम दर्शन होत होते एका व्ह्यू पॉईंटवरून कठड्याला टेकून सूर्यास्ताची अवर्णनीय शोभा पाहिली. सूर्याचा लालभडक गोळा नुसत्या डोळ्यांनी पहाता येत होता पहाता पहाता सूर्य उंच उंच गिरीशिखरांच्या पलीकडे जाऊन दिसेनासा झाला आणि खोल दरीतील छोट्या गावामधले दिवे लुकलुकू लागले आकाशातही चांदण्या चमकू लागल्या आणि खोल दरीतही चांदण्या चमकल्याचाच भास झाला फिरत फिरत यूथ होस्टेलवर परतलो कँटीनमध्ये गरम अडाकरी, रोटी, भात, असे जेवण रुचकर होते., पण कडाक्याच्या थंडीमुळे सारखी हुडहुडी भरत असल्याने पट्कन जेवण आटोपले वर हॉलमध्ये येऊन खिडक्यांच्या काचा पक्क्या बंद केल्या, गाद्याही गार पडल्या होत्या. सेवकाकडे जादा ब्लँकेट्स मागितली तेव्हा कुठे झोप लागली एक दिवसाची डलहौसीची भेट संपली होती.

□ □

## रावी तीरावरील चम्बा

हिमाचल प्रदेशातील पहिल्या मुक्कामाच्या ठिकाणी डलहौसीला कडक थंडीने चांगलाच तडाखा दिला होता सकाळी आवरून स्टँडवर सातच्या सुमारास अगदी कुडकुडत आलो चहाचे एक दुकान उघडे होते गरम चहा घेतल्याने थोडे बरे वाटले आठ वाजता बस चम्बाकडे निघाली

चम्बा आहे हिमाचल प्रदेशातील एका जिल्ह्याचे गाव डलहौसीहून ४२ कि मी अंतर असलेले बस प्रथम बनीखेत येथे थांबली थंडीमुळे गाडीच्या डिझेल टाकीतील डिझेल गोठले होते कापडाचे तुकडे गोळा करून पेटवून ड्रायव्हरने टाकी गरम केली आणि मगच बस सुरू झाली बनीखेतहून रावी, बियास व चिनाब या हिमाचल प्रदेशातील तीन नद्यांचा प्रवाह दिसतो ! बनीखेत गेल्यावर पहाडामागून पहाड उतरून बस चम्बाकडे निघाली वाटेत पहाडी लोक हात दाखवीत तेथे बस थांबवली जाई. अर्थात बसवरच सर्व प्रवासी अवलंबून असल्याने गाडी खच्चून भरली होती थोड्याच वेळात रावी नदीचे दर्शन झाले. रावी नदीच्या कडेकडेने बस धावू लागली दगडधोंड्यातून स्फटिकासारखा वहाणारा रावी नदीचा प्रवाह सदाबहार, तजेलदार वाटला रावी नदीवरचा झुलता पूल पार

करून रावीच्या दुसऱ्या तीरावर आलो बस चम्बाच्या छोटया स्टँडवर थावली

आम्ही सर्व जण स्टँडवर थावलो आणि यशवंत पर्यटन विभागाच्या टूरिस्ट लॉजची चौकशी करण्यासाठी गेले तेथे वरच्या मजल्यावर रूम्स शिल्लक होत्या पण तेथे पाणी प्रेशरने चढत नसल्याने पाण्याची अडचण होती स्टँडजवळ खाली उताराच्या रस्त्याने गेल्यावर पी डब्ल्यू डी चे उत्तम रेस्ट हाऊस आहे तेथे चारपैकी दोन सूट रिकामे असल्याने जागा शिल्लक होती मोठा प्रशस्त हॉल, छान बेड, गालिचे, ड्रेसिंग टेबल, कोच अशा भारी फर्निचरने सूट सुसज्ज होता शिवाय संलग्न बाथरूम, गीझरची सोय होती त्या मानाने सूटचा चार्ज फक्त एकोणीस रुपये होता रेस्ट-हाऊसमध्ये प्रथम हातपाय स्वच्छ धुऊन आवरले. मग परत चढाचा रस्ता चढून स्टँडजवळ आलो व तेथून पुढे बाजारच्या रस्त्याने फिरत फिरत निघालो प्रथम पहायचे होते चम्बाचे 'चंपावती' हे पुरातन मंदिर !

हिमालयाच्या पहाडी प्रदेशातील सांस्कृतिक इतिहासात चम्बाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे हिमाचल प्रदेशातील चम्बा हा शेवटचा जिल्हा असून जम्मू व काश्मीर यांच्याशी संलग्न आहे रावी व चिनाब या नद्या या प्रदेशातून वहातात चम्बा प्रदेश वसला आहे समुद्रसपाटीपासून १८०० फूट उंचीपासून २१००० फूट उंचीच्या हिमाच्छादित पहाडात हा प्रदेश दुर्गम असल्याने मुस्लीम आक्रमणापासून बचावला गेला हिमाचल प्रदेशातील एक स्वतंत्र हिंदू संस्कृतीची विचारधारा असलेले चम्बा पूर्वी संस्थानी प्रदेश होते चम्बा नगराची स्थापना राजा साहिलवर्मन याने दहाव्या शतकात केली

राजा साहिलवर्मन याला प्रभु रामचंद्राच्या ७७ व्या पिढीतील मानतात. आपली कन्या चम्पा हिच्या नावाने त्याने चम्बा हे राजधानीचे शहर बसवले चंपावती ही त्याची एकुलती एक कन्या चरपटनाथ नावाच्या एका सिद्ध पुरुषाने चंपावतीला एक पितळी मूर्ती दिली होती. राजकुमारी चंपावती गुरुकडे दर्शनाला जाई लोकांना तिच्या चारित्र्याबद्दल संशय आला आपल्या वडिलाचा सल्ला न मानताही ती गुरुकडे जाई एकेदिवशी तिचे

पिताजी तलवार घेऊन तिच्या मागोमाग गेले त्यांच्या मनातही तिच्याबद्दल संशय होता त्यांना चंपावती ती पितळी मूर्ती पुढ्यात ठेऊन गुरुपुढे प्रार्थना करीत बसलेली दिसली आपल्यावर संशय घेतला गेल्याचे पाहून तिला दुःख झाले तिने प्रार्थना केली की मी पवित्र असेन तर मला धरणीमाता आपल्या उदरात घेईल त्याप्रमाणे धरणी दुभंग पावली व राजकुमारी चम्पा त्यात लुप्त झाली. राजाला आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप होऊन तो शोक करू लागला त्यावर आकाशवाणी झाली की 'राजा, तू शंका घेतलीस पण राजकुमारी पवित्र आहे येथे तिचे मंदिर बांध' त्यानुसार राजा साहिलवर्मनने तेथे तिचे मंदिर बांधले

आम्ही चंपावती मंदिर पाहायला गेलो जिच्या चम्पा या नावावरून नगराचे चम्बा हे नाव रूढ झाले त्या राजकुमारीच्या या प्राचीन मंदिराची आजची स्थिती बरोबर नव्हती आजूबाजूच्या वस्तीतील मुले तेथील आवारात खेळत होती मंदिराचा परिसर अस्वच्छ होता अशा प्राचीन मंदिराचे खरोखर चांगले जतन व्हायला हवे या दगडी मंदिरावर गोलाकार, भाड्याच्या आकाराचा कळस असून मंदिरासमोर सिंहमूर्ती आहे. मंदिरात महिषासुरमर्दिनीच्या रूपात राजकुमारीची मूर्ती आहे

चंपावती मंदिर पाहून बाजाराच्या रस्त्याने थोडे पुढे आलो उजवीकडे थोड्या चढाच्या रस्त्याने आल्यावर उत्तम दगडी तटबंदी असलेल्या सहा मंदिराचा प्रसिद्ध समूह दिसला या समूहात तीन विष्णूची व तीन शिवशंकराची मंदिरे आहेत मंदिराच्या प्रांगणात प्रथम दगडी स्तंभ असून त्यावर गरुड मूर्ती आहे नंतर दिसते मोठे तुळशीवृंदावन राजा साहिलवर्मन् याने लक्ष्मीनारायणाचे हे मंदिर दहाव्या शतकात उभारले सोळाव्या शतकात राजा प्रतापसिंहने मंदिराचा जीर्णोद्धार केला. ही सहा मंदिरे एकाच रेषेत असून त्यावर उघडलेल्या छत्रीच्या आकाराचे कळस आहेत पुढे प्रार्थनामंडपावर त्रिकोणी छत आहे गर्भगृहात लक्ष्मीदेवीची संगमरवरी प्रतिमा चांदीच्या चबुतऱ्यावर विराजमान आहे मूर्ती सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी अलंकृत होती देवीच्या मस्तकावर चांदीचा मुकूट होता विष्णूची चतुर्भुज, चतुर्मुख तसेच गणपतीचीही प्रतिमा तेथे आहे मंदिराच्या बाहेर दगडी भिंतीवर प्राचीन शिल्पाकृती कोनाड्यात कोरल्या

आहेत त्यात कृष्ण गोपी यांच्या देखण्या मूर्ती आहेत मंदिरात संगम-रवरी फरशा बसवलेल्या आहेत काश्मिरी ब्राह्मण पुजाऱ्याने तीर्थप्रसाद दिला

लक्ष्मीनारायण मंदिरानंतर राधाकृष्ण, चंद्रगुप्त महादेव श्रीगौरीशंकर, श्रीत्र्यंबकेश्वरमहादेव आणि लक्ष्मीदामोदर अशी एकूण सहा मंदिरे आहेत श्रीगौरीशंकर व श्रीत्र्यंबकेश्वरमहादेव मंदिरासमोर नंदी आहेत तर लक्ष्मी-दामोदर मंदिरासमोर गरुडमूर्ती आहे मंदिराच्या प्रांगणात असलेल्या काही छोटया छोटया मंदिरांची निर्मिती चम्बाचा राजा जितसिंह याची राणी शारदादेवी हिने केली चरपटनाथ या सिद्धपुरुषाची समाधीही येथे आहे. चंपावती मंदिराच्या मानाने या सहा मंदिरांचा समूह चांगला जतन करून ठेवला आहे मंदिराच्या प्रांगणात ट्रस्टचे कार्यालय असून त्यांनी आमचे नावगाव टिपून घेतले त्याच्याजवळ मंदिराला भेट दिलेल्यांच्या जुन्या याद्या आहेत. चम्बाची ही सहा पुराणकालीन मंदिरे म्हणजे चम्बाच्या वैभवशाली शिखरशैलीच्या शिल्पकलेचे प्रतीक आहे.

चंबाच्या सहा मंदिरांची भेट आटोपून बाजारच्या रस्त्याच्या टोका-जवळील हॉस्पिटलजवळ वळून 'भूरीसिंह' म्युझियम पहाण्यासाठी आलो म्युझियमच्या नवीन दुमजली इमारतीचे बांधकाम चालू असल्याने म्युझि-यममधील वस्तू शेजारच्या जुन्या इमारतीच्या एका हॉलमध्ये ठेवल्या होत्या बाहेर मोठे कुलूप लावून सील केले होते तसेच बंदूकधारी रख-वालदारही होता म्युझियम बंद असल्याने निराशा झाली तथापी चिकाटीने शेजारी असलेल्या म्युझियमच्या कार्यालयात म्युझियमचे क्युरेटर श्री सुरेंद्र मोहन सेठी यांची भेट घेतली तेथे चंबाचे इतिहासप्रेमी वार्ताहर श्री. चमनलाल चमन बसले होते श्री सेठी यांना आम्ही विनंती केली आम्ही खूप लांबून आलो आहोत आम्हाला वस्तू दाखविल्यास आभारी राहू आमच्या विनंतीला मान देऊन त्यांनी खास आमच्यासाठी म्युझियम उघडले श्री चमनलालही आमच्याबरोबर उत्साहाने आले म्युझियमचा धावता फेरफटका मारताना श्री सेठी व श्री चमनलाल वैशिष्टयपूर्ण वस्तूंचा परिचय करून देत होते राजा भूरीसिंह या चम्बाच्या कलाप्रेमी राजाने हौसेने गोळा केलेल्या कलात्मक वस्तूंचा हा संग्रह आहे.

हाताने विणलेल्या कापडावरील नक्षीकामाचे नमुने, कागदावरील डॉक्युमेंटरी छायाचित्रे, राणीच्या महालातील १९ व्या शतकातील चित्रे, कांगडा व बशोली शैलीतील चित्रे सुंदर आहेत. राणी हुक्का पीत झोके घेतानाचे चित्र मजेशीर आहे चित्रात दासीही आहे. काही उत्कृष्ट वॉलपेंटिंग्ज व मिनिएचर पेंटिंग्ज तेथे आहेत चम्बाचे वैशिष्ट्य आहे चम्बा रुमालमध्ये. चम्बाच्या रंगीबेरंगी रुमालांचे अनेक नमुने तेथे आहेत बारा इंचाच्या दोन्ही बाजूला चित्र असलेल्या कलात्मक रुमालाची किंमत पाचशे रुपये होती !

म्युझियममध्ये पहाडी प्रदेशातील विविध वाद्यांचा संग्रह जसा आहे तसाच जुन्या विविध शस्त्रास्त्रांचा संग्रहही आहे. तसेच धातूवरील प्राचीन लेखांचा संग्रह आहे तिबेटी भाषेतील प्राचीन शिलालेखांचे नमुने आहेत चंबा प्रदेशातील खेड्यांमध्ये ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या सोयी झऱ्यातून केलेल्या असत. पाण्याच्या प्रवाहासाठी खाच ठेवलेली असे अशा काही फाउंटन स्टोन स्लॅबवर नावे कोरलेली असत त्याचे काही नमुने संग्रहात आहेत लाकडावरील कोरीव कामाचे जे नमुने आहेत त्यात बुद्धाची काष्ठमूर्ती सुंदर आहे म्युझियममध्ये चंबाच्या जुन्या काही वैशिष्ट्यपूर्ण चपलांचा संग्रह आहे त्यात गवताच्या चपला उल्लेखनीय आहेत चम्बा चपलासाठीही प्रसिद्ध आहे कापडाप्रमाणे चपलावर नक्षीकाम केलेले असते पूर्वी इंग्रज अधिकाऱ्याच्या सूचनेप्रमाणे चम्बाच्या कारागीराने वजनाने हलक्या अशा चपला बनवायला सुरुवात केली. कारागीराने बनविलेल्या चपला त्या इंग्रज अधिकाऱ्याला त्याच्या मूळ कल्पनेपेक्षा अप्रतिम वाटल्या पूर्वी वापरत असलेल्या जुन्या भांड्यांचाही संग्रह आहे. त्यात एक मोठी अखंड लाकडाची बनवलेली पीठ मळण्याची परात आहे पूर्वी वापरात असलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण दिव्यांचाही संग्रह तेथे आहे.

चंबाच्या भूरीसिंह म्युझियममधील धावत्या भेटीत चंबाच्या महान सांस्कृतिक वारशाचा थोडा का होईना परिचय झाला म्युझियम व्यवस्थापकाच्या सौजन्यामुळे हा लाभ झाल्याने त्यांना धन्यवाद देऊन म्युझियमचा निरोप घेतला।

भूरीसिंह संग्रहालय पाहिल्यावर सरळ रस्त्याने थोडे अंतर गेल्यावर उजवीकडे रावीतीरावर चंबाचे ऐतिहासिक हरीराय मंदिर आहे. या छोटेखानी मंदिराच्या गाभाऱ्याच्या लोखंडी गजाच्या दाराला भले मोठे कुलूप लावलेले होते. आतील मूर्ती गजातून दिसली व दर्शन घेतले. ही मूर्ती फारच वैशिष्ट्यपूर्ण आहे समोरून पाहिल्यावर सात्त्विक व प्रेमळ मुखाचे दर्शन होते या मूर्तीच्या मागील बाजूला उग्र व भयानक रूप आहे. पूर्वीच्या काळात ज्या कोणा गुन्हेगाराला देहदंडाची शिक्षा फर्माविण्यात येई त्याला शिक्षा अमलात आणण्यापूर्वी मूर्तीच्या मागील बाजूच्या उग्र स्वरुपाचे दर्शन दिले जाई. या मूर्तीचा मागील बाजूचा फोटो आम्हाला म्युझि-यममध्ये पहायला मिळाला होता हरीराय मंदिराच्या या वैशिष्ट्यपूर्ण मूर्तीची दहा वर्षापूर्वी चोरी झाली होती मूर्ती परदेशाला पळविण्याच्या दृष्टीने सांताक्रुझ विमानतळावर आणण्यात आली होती सुदैवाने विमान-तळावर मुंबई पोलिसांच्या दक्षतेमुळे ही चोरी उघडकीला आली व मूर्ती परत सन्मानाने हरीराय मंदिरात स्थापन करण्यात आली भारताच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या या प्राचीन मूर्तीची दुदैवाने चोरी व्हावी याबद्दल वाईट वाटले

हरीराय मंदिरातील मूर्तीचे दर्शन घेऊन बाहेरच्या मोकळ्या पटांगणात आलो या गवताळ, एक कि मी लांबीच्या मैदानाला 'चौगान' असे म्हणतात अनेक शतकापूर्वी रावी नदीचा प्रवाह चौगानमधून वहात असे नदीच्या डाव्या बाजूला चंपावती मंदिर होते, तर उजव्या बाजूला हरीराय मंदिर होते. एक महात्मा चंपावती मंदिरात मुक्कामाला होते चम्बाच्या नागरिकांना हरीराय मंदिरात जाण्यासाठी रोज रावी नदी पार करावी लागे. चंबाच्या राजाने त्या महात्म्याला प्रार्थना केली की सर्वांना हरीराय मंदिराचे रोज सुलभ दर्शन होईल असे काहीतरी करा महात्मा चंबा नगरीच्या नागरिकांसह चंपावती मंदिरात गेले त्यांनी सात दिवस यज्ञ केला सात रंगाच्या (रस्सी) दोऱ्या तयार केल्या या सप्तरंगाची नावे मिंजर ठेवली असे सांगतात की यज्ञ पूर्ण झाल्यावर रावीने प्रवाहाचा मार्ग बदलला ! रावी हरीराय मंदिराच्या पलीकडे सध्याच्या ठिकाणी जाऊन वाहू लागली आणि चौगान हे मोठे मैदान तयार झाले आजही चौगानमध्ये उकरल्यावर

तेथे वाळू निघते चंबाचा प्रसिद्ध 'मिंजर मेला' चौगानवर भरतो चंबाचा राजा स्वत त्यात भाग घेतो राजवाड्यापासून मोठ्या थाटात मिरवणूक निघते सजविलेल्या रथात रघुवीर तसेच इतर देवदेवताची मिरवणूक काढतात पूर्वी रावी नदीमध्ये जिवत रेड्याला ढकलून बळी देत. हल्ली ही प्रथा बद आहे

'मिंजर मेला' सबधी एक कहाणी आहे चबाचा राजा प्रतापसिंह वर्मन याने कांगडा राज्यावर मिळवलेला विजय साजरा करण्यासाठी प्रत्येक श्रावण महिन्यात दुसऱ्या रविवारपासून मिंजर मेला साजरा होतो व तिसऱ्या रविवारी मिंजरचे रावीत विसर्जन केले जाते रावीला नारळ व फुले वहातात

पुराणातील एका ,कथेनुसार विष्णूने भस्मासूर दैत्याच्या वधासाठी मोहिनीरूप धारण केले व शिवजीने भस्मासूर वध येथेच केला त्या स्मृती-प्रित्यर्थ प्रतिवर्षी चबाचा रथमेला आयोजित केला जातो. कहाणी कोण-तीही असो चौगानचे हे मैदान मिंजर मेलाच्या वेळी आजूबाजूच्या पहाडी प्रदेशातून आलेल्या, रगीबेरंगी कपडे परिधान गेलेल्या स्त्रीपुरुषांनी फुलून जाते उत्साहाला उधाण येते. लोकनृत्य, लोकगीत, सगीत, विविध खेळ यात चबानगरी डुबून जाते मिठाई, फळे, मित्र व नातेवाईकाना वाटली जातात सुगधित अत्तरे एकमेकांना लावली जातात रावीला फुले व नारळ वाहिले जातात वरुण देवतेची पूजा केली जाते.

चबाच्या चौगान मैदानावरून गावालगतच्या पहाडांचे मनोरम दर्शन होते त्या पहाडावर नैनादेवीचे एक छोटे मंदिर दिसते. त्यासंबधी लोक-कथा अशी सागतात की, चबाचा राजा साहिलवर्मन याच्या काळात गावात मोठा दुष्काळ पडला पाण्याचे दुर्भिक्ष्य झाले चबाची राणी नैनादेवी हिने महात्मा चरपटनाथ यांच्या आदेशामुळे व तिला झालेल्या साक्षात्कारामुळे या ठिकाणी आत्मसमर्पण केले तेथे पाण्याचा झरा निर्माण झाला राणीच्या बलीदानाने चंबाला पाणी मिळाले आजही चबाचे कृतज्ञ नागरिक राणीच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रतिवर्षी मेळा आयोजित करतात. खालील लोकगीत गातात —

ठण्डा पाणी किह्या करी पीणा हो ।  
तेरे नैना हेरी-हेरी जीणा हो ।

' हे राणी, तुझ्या बलिदानाने निघालेले थंड पाणी आम्हाला कसे पिववेल ? त्यापेक्षा तू जिवंत राहिली असतीस आणि आम्ही तुझ्या नयनाच्या दर्शनाने जिवंत राहिलो असतो तर चांगले झाले असते ! '

चंबाच्या बाजारातून फेरफटका मारला लोकर व लोकरीच्या शाली स्वेटर्स, टोप्या यानी दुकाने गच्च भरली होती येथे मधही चांगला मिळतो थोडीफार खरेदी केली वातावरण कसे प्रसन्न होते सवय झाल्याने थंडीची तीव्रताही कमी वाटत होती रेस्टहाऊसवर परतलो तेव्हा नदीचा खळखळ आवाज कानावर आला रेस्टहाऊसच्या आवारात एका कडेला एका व्ह्यू पॉईंटवरून खळखळ वहाणाऱ्या रावी नदीचा नितळ प्रवाह पहात बराच वेळ थांबलो तरी मनाचे समाधान होत नव्हते रावीचे पुराणातील नाव इरावती रावीतीरावरील चंबा हे छोटे गाव जणू रावी तटावर तरंगत असल्याचा आभास निर्माण करीत होते चंबाने काश्मीरमधल्या पहलगामची आठवण करून दिली होती गर्दीपासून दूर, शहरी संस्कृती पासून अलग पहाडाच्या कुशीतील निसर्गरम्य चंबाची एक दिवसाची भेट विसरणे कधीच शक्य नाही

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५०
दा. क्र. २७३८०
ग्रंथ
शाखा

# धवलनगरी धर्मशाला

तुम्हाला नगाधिराज हिमालयाची मोत्यासारखी चमकणारी बर्फा-च्छादित शिखरे जवळून पहायची आहेत ना ? मग हिमाचल प्रदेशातील 'धर्मशाला' हिलस्टेशनची भेट चुकवून चालणार नाही चंबाहून धर्म-शालाला जाणारी थेट बस सकाळी सहाला होती पण ही बस चुकली त्यामुळे चुटपूट लागली पण मार्ग काढणे जरूर होते स्टँडवरील कंट्रोल-रने सुचविले की थोडे लांब पडेल, भाडे जास्त पडेल पण तुम्ही सकाळी आठच्या बसने पठाणकोटला जा ती बस दुपारी अडीचपर्यंत पठाणकोटला पोहोचेल पठाणकोटहून धर्मशालाकडे बऱ्याच बसेस धावतात पठाण-कोटला गेलो तर निदान संध्याकाळपर्यंत धर्मशालाला पोहोचता येईल या आशेने उत्साह आला

बरोबर आठ वाजता चंबाचा निरोप घेतला का कोणास ठाऊक केवळ एक दिवसाच्या वास्तव्यात चंबाने आम्हाला आपलेसे केले होते बस वेगात निघाली रावी नदीच्या तीरावरचे रम्य चंबा नजरेआड झाले. दहाच्या सुमारास बस बनीखेतला पोहोचली, सर्वांनी चहा घेतला बस पठाणकोटकडे निघाली ड्रायव्हर सराईतपणे स्टिअरिंग व्हील फिरवीत रस्ता पार करीत होता हिमालयातील दऱ्याखोऱ्यांतील निसर्गसौंदर्याचा

आस्वाद घेत प्रवास सुरू होता अडीचच्या सुमारास बस पठाणकोट स्टेशन समोरील बसस्टँडवर थाबली धर्मशाला बसची चौकशी केल्यावर कळले की दुपारी तीनची धर्मशाला बस 'अमृतसर अड्डा' या मुख्य स्टँडवरून सुटते चट्कन दोन सायकलरिक्षा ठरवल्या पठाणकोटच्या मध्यवर्ती स्टँडवर दहा मिनिटात पोहोचलो तीन वाजायला आले होते धर्मशाला बस अगदी निघण्याच्या बेतात होती पटापट सामान वर चढवले व प्रवाशानी भरलेल्या गाडीत कसेतरी घुसलो बसमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्येकाला जागा मिळाल्या दुपारी तीनला बस धर्मशालाकडे निघाली पठाणकोट-जवळचा रस्ता रगाबेरगी बोगनवेलीमुळे शोभिवत दिसत होता पुढे दुतर्फा दाट झाडी आहे चक्की नदी पार केल्यावर शाहपूरजवळ एक बोर्ड दिसला

KANGRA VALLEY WELCOMES YOU

हिमाचल प्रदेशातील इतिहासप्रसिद्ध, मनोरम कागडा खोऱ्यातील प्रवास सुरू झाला पुढे काही अतर गेल्यावर नदीकाठी, पहाडावर वसलेले नूरपूर गाव दिसले काश्मीर खोऱ्यात जाताना मोगलसम्राट जहांगीर येथे थाबला होता आपली आवडती राणी नूरजहान हिच्या नावावरूनच जहांगीरने नूरपूर हे नाव दिले नूरपूरला एक किल्ला दिसला नूरपूर पार केल्यावर थडगार वारे वाहू लागले हिमशिखराचे प्रथमच दर्शन झाले. रस्त्याच्या कडेला वनविभागाचा बोर्ड होता

After Green Revolution help us to bring Tree Revolution.

सर्वत्र दिसणारी हिरवीगार वनराजी आल्हाददायक वाटत होती काही अतर गेल्यावर द्रमण गाव लागले सफरचदाची बरीच दुकाने तेथे दिसली बस राजमार्ग सोडून डावीकडे नदीच्या काठाकाठाने चढ चढू लागली दिवस मावळता बस धर्मशाला बसस्टँडवर थाबली सामान उतरून घेई-पर्यंत यशवत स्टँडजवळील पर्यटन विभागाच्या हॉटेल धौलाधरमध्ये जागा आहे का याची चौकशी करून आले हमालाकडे सामान देऊन पाचच मिनिटात हॉटेल धौलाधरमध्ये पोहोचलो

हॉटेल धौलाधर प्रशस्त असून तीन मजली आहे प्रत्येक रूमला सलग्न बाथरूम, गीझरची सोय आहे प्रत्येक रूमच्या मागील बाजूला स्वतत्र बाल्कनी आहे रूममध्ये चागले फोमचे बेड, उबदार ब्लँकेट, फोनची सोय शिवाय गालिचाही होता तळमजल्यावर कँटीनची आणि लायब्ररी-

चीही सोय होती तर पहिल्या मजल्यावर टी व्ही हॉल आणखी काय हवे ? सर्वजण खूष झालो प्रथम गीझर सुरु केला सकाळी चंबा सोडताना आंघोळीला सुटी दिली होती ती भरून काढली सर्व आटोपेपर्यंत रात्रीचे आठ वाजले झोंबणाऱ्या थंडीतही फ्रेश वाटत होते सगळ्याना कडकडून भूक लागली होती आणि मग जेवण करण्याचा ठराव एकमताने मंजूर झाला धर्मशालाच्या बाजारच्या रस्त्याने फिरत फिरत दुसऱ्या टोकाला आलो वैंगन भरता, आलू मटार, आमलेट, रोटी, पुलाव असे गरम गरम जेवण मिळाल्याने पूर्ण क्षुधाशांती झाली जेवण आटोपून हॉटेल धौलाधर-मध्ये रात्री नऊच्या सुमारास पोहोचलो थंडीमुळे रस्त्यावर सर्वत्र सामसूम होती क्वचित् परदेशी पर्यटक फिरताना दिसायचे दिवसभराच्या प्रवासाने थकल्याने, पोट भरल्याने आणि उबदार ब्लँकेटमुळे कॉटवर पडल्या-पडल्या झोप लागली,

दुसरा दिवस उजाडला बाल्कनीत जाऊन आलेले उल्का-उदय आनंदाने टाळ्या पिटून सांगू लागले – ' आई बर्फाचा डोंगर बघ किती जवळून दिसतोय !" खरच होत ते हिमालयाच्या धौलाधर पर्वताच्या रांगाची बर्फाच्छादित शिखर चमकत होती धौलाधरचं मूळ नाव धवलगिरी या धौलाधर पर्वतराजीच्या नावावरूनच हॉटेलला धौलाधर हे नाव ठेवल होत उदयने फोनवरूनच ऑर्डर दिल्याप्रमाण चहाचा ट्रे रूममध्ये आला होता स्नान वगैरे आटोपून साडेआठच्या सुमारास धर्मशालाच्या बसस्टँडवर आलो धर्मशाला गाव दोन विभागात वसले आहे एक आहे लोअर धर्मशाला–जिथे मार्केट, कोर्ट बाजार, सरकारी कचेऱ्या, बसस्टँड आहे दुसरा भाग आहे अप्पर धर्मशाला– बसस्टँडपासून दहा कि मी अंतरावर पहाडाच्या उच्च भागावर इंग्रजानी वसवलेला ! कांगडाखोऱ्याचा भाग इंग्रजाच्या ताब्यात आल्यावर त्यानी कांगडा या त्या मानाने उष्ण हवेच्या प्रदेशातून पहाडावरील धर्मशाला या थंड हवेच्या ठिकाणी जिल्ह्याचे ठिकाण हलवले

अप्पर धर्मशालाला जाणारी बस सकाळी नऊला निघाली नागमोडी वळणे घेत घेत बस वर चढू लागली तेव्हा लोअर धर्मशालाचे विहंगम दृश्य दिसत होते डोंगराच्या उतारावरील छोटी छोटी लालचुटूक छपराची घरे, कॉटेजेस्, हिरव्यागार डोंगर उतरणी, दऱ्याखोऱ्यातून सैरावैरा धाव-

घारे, पिंजलेल्या पांढऱ्या शुभ्र कापसासारख ढगाचे समूह जणू एकमेकांशी पाठशिवणीचा खेळ खेळत होते उंच उंच पाईन, फर वृक्ष एकमेकांच्या गळ्यात गळा घालून जणू नाचत होते ! त्यांच्या सान्निध्यातील रस्त्याने बस आस्ते आस्ते चढ चढत होती आठ कि मी अंतर पार केल्यावर वाटेत रस्त्याच्या बाजूला एकांतवासात उभं असलेले एक जुनाट चर्च दिसले या चर्चचे नाव आहे सेंट जॉन चर्च. लॉर्ड एल्गिन या हिंदुस्थानच्या व्हाईसरॉयचा धर्मशाला येथे इ स १८६३ मध्ये मृत्यू झाल्यावर या चर्चमध्ये त्यांचा दफनविधी झाला या चर्चच्या खिडक्यावर मंहिरपीत रंगीबेरंगी काचा वापरून केलेल्या विविध आकृत्या, नक्षीकाम सुंदर आहे. लोअर धर्मशालावरून निघालेली बस अर्ध्या तासातच अप्पर धर्मशालाला पोहोचली. अप्पर धर्मशाला इंग्रजानी वसवले असल्याने त्यांनी ठेवलेली रस्त्याची काही जुनी नावे अजूनही प्रचलित आहेत. तेथील मुख्य रस्त्याचे नाव आहे मॅक्लोडगंज बसमधून उतरल्यावर प्रथम निघालो एक कि मी अंतरावरील तिबेटी मंदिर पहायला रस्त्यावर बहुसंख्य तिबेटी स्त्रीपुरुष दिसत होते पहाडाकडेच्या छोट्या रस्त्याने सकाळच्या रम्य वेळी रमत रमत अर्ध्या तासातच तिबटी मंदिराजवळ पोहोचलो

एका उंच चबुतऱ्यावर हे भव्य मंदिर विराजमान आहे इ. स १९६६ मध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या नावाखाली कम्युनिस्ट चीनने तिबेटवर आक्रमण केले. तेथील धर्मस्वातंत्र्य संपुष्टात आणले. धर्मगुरू दलाई लामा व त्यांचे अनुयायी यांना नाईलाजाने मातृभूमी सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. भारतात आलेल्या दलाई लामांच्या वास्तव्यासाठी धर्मशाला गावाची निवड करण्यात आली दलाई लामाच्या प्रेरणेने हे मंदिर इ. स १९७० मध्ये उभारले. तीस तिबेटी व भारतीय कारागीरांच्या मार्गदर्शनाखाली ७८ तिबेटी मजुरांनी केवळ नऊ महिन्यात या मंदिराचे बांधकाम केले या मंदिराचे वैशिष्टय आहे त्याच्या साधेपणात आणि स्वच्छतेत आयताकृती आकाराच्या या मंदिराच्या बाजूला प्रवेशद्वारे आहेत तेथील मंदिराची व्यवस्था पहाणाऱ्या, लाल कपडे परिधान केलेल्या तिबेटी पुजाऱ्याची परवानगी घेऊन मंदिरात प्रवेश केला मंदिरात शाक्यमुनी बुद्धाची कमलपुष्पावर अधिष्ठित नऊ

फूट उंचीची भव्य मुख्य मूर्ती आहे नागार्जुन या प्रसिद्ध धर्मगुरूने वर्णन केल्याप्रमाणे अचूक मोजमापाची ही मूर्ती आहे मूर्तीसमोर नैवद्याचा प्रसाद निरनिराळ्या बशामध्ये मांडून ठेवला होता तऱ्हेतऱ्हेची फळे, बिकिस्टे, मिठाई, अमूल बटरचे पाकीट, सुकामेवा याचा प्रसादात समावेश होता भगवान बुद्धाच्या मूर्तीच्या उजव्या हाताला दोन भव्य मूर्ती आहेत पहिली आहे आचार्य पद्मसंभव याची ते मूळचे भारताचे सिद्धपुरुष. त्यानी आठव्या शतकात तिबेटमध्ये जाऊन बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार केला बौद्धधर्म तिबेटमध्ये भरभराटीला आला बुद्ध मदिराची तिबेटमध्ये त्यानी उभारणी केली आचार्य पद्मसभव याची कमलपुष्पावर अधिष्ठित मूर्ती बारा फूट उचीची आहे मूर्तीचे मुख तिबेटच्या दिशेने आहे आचार्य पद्मसभव याच्या मूर्तीशेजारील वैशिष्टयपूर्ण मूर्ती आहे अवलोकितेश्वराची ही अवलोकितेश्वराची मूळ मूर्ती सातव्या शतकात ल्हासा-तिबट येथे उभारली होती ती तिबेटची अधिष्ठात्री देवता मानली जाई. तेराशे वर्षे या मूळ मूर्तीची पूजाअर्चा होत होती इ. स १९६६ च्या तथाकथित सास्कृतिक क्रातीत चोनव्याप्त तिबटमधील मदिरातील अधिष्ठित मूळ ऐतिहासिक मूर्ती ल्हासामधील रस्त्यावर फेकण्यात आली मूर्तीची विटबना करण्यात आली मोठ्या धाडसाने व चातुर्याने तिबेटी लोकानी मूर्तीच्या चेहऱ्याचे अवशेष नेपाळमार्गे येथे १९६७ साली आणले अवलोकितेश्वराच्या तेरा फूट उचीच्या या चादीच्या मूर्तीला एकावर एक असे अकरा मुखवटे असून एक हजार हात व एक हजार डोळे आहेत एका काचेमध्ये ल्हासामधील क्रातीत भग्न केलेल्या मूळ ऐतिहासिक मूर्तीचे अवशेष आहेत इ स १९७० साली या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली याही मूर्तीचा चेहरा तिबेटच्या दिशेने आहे आज ना उद्या परत ही मूर्ती तिबेटमध्ये मूळ ठिकाणी परत विराजमान होईल असा तिबटी भक्ताना विश्वास वाटतो मदिरातील शाक्यमुनी बुद्ध, आचार्य पद्मसभव व अवलोकितेश्वर या प्रमुख तीन मूर्ती घडविण्यासाठी सात तिबेटी तज्ञ वीस महिने कार्यरत होते मूर्ती घडविण्यात सोने, चांदी, तांबे, पारा, मोती, रत्ने याचा वापर करण्यात आला तिबेटी मदिर उभारणीचा मूर्तीसह सपूर्ण खर्च पाच लाख रुपये झाला धार्मिक तिबेटी व भारतीय लोकानी


उत्स्फूर्तपणे देणग्या दिल्या. या तीन प्रमुख मूर्तींखेरीज इतर लहान अनेक मूर्ती व स्तूप मंदिरात आहेत मंदिराच्या भव्य हॉलमध्ये मूर्तीसमोर चार रांगांमध्ये पन्नास-साठ तिबेटी बुद्धधर्मीय धर्मग्रंथ पठण करीत होते तेथे बाजूला तिबटी वाद्ये पण होती बाजूला भिंतीवर बुद्धाच्या जीवनातील काही प्रसंग चित्रीत केलेले लहान लहान पडदे सोडले होते भगवान बुद्धांना मंदिरात पांढरी रुमाल अर्पण करण्याची प्रथा आहे त्याला जेक्षा म्हणतात. मंदिरात अनेक रुमाल होते सर्वत्र प्रसन्न वातावरण होते तिबेटी पुजाऱ्याजवळ त्याच्याबरोबर फोटो घेण्याची इच्छा व्यक्त करताच त्याने आनंदाने संमती दिली मंदिराच्या पार्श्वभूमीवर त्याच्यासह फोटो काढला

मंदिराच्या पायऱ्या उतरून समोर पटांगणात आलो. तेथे सुमारे ५०–६० तरुण तिबेटी भिक्षूंच्या जोड्या होत्या. ते एकमेकाच्या हातावर टाळ्या देऊन तोंडाने तिबेटी भाषेत पुटपुटताना दिसले त्याच्या चेहऱ्यावर काही वेगळेच हावभाव होते बराच वेळ थांबूनही हा काय प्रकार आहे काही कळेना, शेवटी तेथे उभ्या असलेल्या एका रखवालदाराजवळ चौकशी केली. त्याने सांगितले की ज्योतिषशास्त्र विद्या हे तिबेटी शिकतात मागील जन्मात काय घडले, सध्याच्या जन्मातील भविष्यात काय घडणार आहे आणि पुढील जन्मात काय घडणार आहे असा तीन जन्मांतील ज्योतिष-शास्त्राचा सात वर्षांचा अभ्यास हे तिबेटी भिक्षू करतात या अभ्यास क्रमाचा एक भाग म्हणजेच हे टाळ्या वाजवून एकमेकांना ज्ञान देणे. विशेष म्हणजे दोन-तीन युरोपियन तरुणही या तिबेटी लोकांबरोबर हातावर टाळ्या देऊन या विद्येचा अभ्यास करीत होते या पटांगणाच्या दुसऱ्या बाजूला भले मोठे कंपाऊंड असून सुरुवातीला प्रवेशद्वाराजवळ बंदूकधारी रक्षक होता त्याच्याकडे चौकशी केल्यावर कळले की आतमध्ये दलाई लामाचे निवासस्थान आहे दलाई लामाच्या संरक्षणार्थ एका डी एस् पी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली खास पोलीसपथक नियुक्त केले आहे शिवाय दलाई लामाच्या विश्वासातील खास तिबेटी लोकांचे एक पथकही तेथे कायम संरक्षणासाठी असते चिनी व तिबेटी हे दोन्हीही मंगोलियन वंशातले असून त्यांच्या चेहऱ्याची ठेवण सारखीच असते.

दोघातील सूक्ष्म फरक जाणण्यासाठी हे खास तिबेटी रक्षक नेमले आहेत तिबेटी म्हणून कोणी चिनी इसमाने घुसून दगाफटका करू नये यासाठी ही योजना केली आहे दलाई लामांचे दर्शन घेण्याची इच्छा होती पण त्यांचे वास्तव्य त्या वेळी कॅनडात होते दलाई लामाचे नाही पण त्यांनी बांधलेल्या मदिराचे दर्शन घेऊन मॅक्लोडगजला परतलो

माल रोडने थोडे अतर चालल्यावर धर्मशालाचे प्रसिद्ध दल सरोवर दृष्टीला पडले उच उच फर वृक्षानी वेढलेल्या दल सरोवराच्या नितळ पाण्यामध्ये वृक्षाचे पडलेले प्रतिबिंब मनोहारी होते वृक्षांच्या रागामधून लपतछपत जाणारे सूर्यकिरण जणू एकमेकाचा पाठलाग करीत होते. रम्य दल सरोवराची भेट आटोपून मॅक्लोडगज नाक्यावर परतलो. अप्पर धर्मशालाच्या भेटीतले शेवटचे स्थान होते भागसूनाग मदिर

पहाडाच्या कडेकडेने काढलेल्या रस्त्याने सुमारे तीन किलोमीटर अतर पार केल्यावर एका भल्यामोठ्या पहाडाच्या पायथ्याशी आलो या पहाडात दगडी फरशांच्या खाणी आहेत. प्रथम मदिराचे कुड लागले त्याठिकाणी हातपाय धुवून शूचिर्भूत झालो. येथे तीन गोमुखांतून नितळ पाणी वहात होते काही भाविक तेथील थड पाण्यात स्नान करीत होते भागसूनाग मदिराच्या निर्मितीमागे पौराणिक कथा अशी आहे द्वापर-युगाच्या मध्यकाळात दैत्यराज भागसूची राजधानी अजमेर देशात होती त्याठिकाणी अवर्षणामुळे प्रजा दु:खी होती लोकानी राजाजवळ प्रार्थना केली की काही तरी कायम स्वरूपी व्यवस्था करा नाहीतर आम्ही दुसरी-कडे स्थलातर करू राजा स्वत: पाण्याच्या शोधार्थ निघाला. तो चालत चालत हिमालयातील अठरा हजार फूट उचीवरील नागसरोवरात पोहोचला राजा स्वत जादूगारही होता. त्याला मायावी शक्ती अवगत होत्या त्याने मायाशक्तीने आपल्या कमडलूत नाग सरोवरातील सर्व पाणी भरले दुसऱ्या दिवसाचा पुढचा प्रवास सुरू होण्यापूर्वी या मदिराच्या ठिकाणी तो विश्रांतीसाठी थांबला. सायकाळी नागदेवता आपल्या सरोवराच्या जागी आली त्यावेळी सरोवर कोरडे पडल्याचे तिच्या निदर्शनास आले राजाच्या पावलांचा मागोवा घेत नागदेवता भागसूराजाजवळ आली नागदेवतेने केलेल्या हल्ल्यात राजा मरण पावला. मरतेसमयी राजाने नागदेवतेची



ज्वालामुखी मंदिर



हिडिम्बा देवी मंदिर,
मनाली



पार्वती घाटी, मणिकर्ण

हिमऋतुतील मनाली ↓



प्रार्थना व स्तुती केली त्यावर नागदेवता प्रसन्न झाली व काय वर हवा ही विचारणा तिने केली राजाने विनती केली की याठिकाणी सरोवरातील कमडलूमधील पाणी सांडून कुड निर्माण झाले आहे माझ्या नावाने ते प्रसिद्ध होऊ दे. तसेच माझ्या देशात पाणी येऊ दे त्यावर नागदेवता म्हणाली की, हे स्थान प्रथम तुझे नाव व मग माझे नाव लागून प्रसिद्ध होईल त्याप्रमाणे या स्थळाला 'भागसूनाग' हे नाव पडले त्यानतर कलीयुगात धर्मचद्र नावाचा राजा येथे राज्य करीत होता भगवान शकराने स्वप्नात येऊन राजाला सांगितले की नागदेवतेच्या मदिराची येथे निर्मिती कर. त्याप्रमाणे येथे मूळ मदिर बांधले गेले. या प्राचीन मदिराचा जीर्णोद्धार दहा वर्षांपूर्वी महत गणेश गिरीजीने केला.

पायऱ्या चढून वर मदिराच्या मडपात आलो. गर्भगृहात नागदेवतेच्या मूर्तीचे दर्शन घेतले. मदिराच्या आवारात मेंढे, बकरे यांचे बळी दिले जातात व नवस फेडले जातात दर्शनाला आलेल्या अनेक स्त्री पुरुषाची गर्दी दिसली. मदिराशेजारी गुरखा बटालियनने यात्रेकरूसाठी इ स. १९६९ मध्ये बांधलेली धर्मशाळा दिसली सध्याच्या धर्मशालेचे पूर्वीचे नाव होते भागसूनाग । या भागसूनाग जलस्त्रोतानजीक यात्रेकरूसाठी पूर्वी धर्मशाळेची इमारत होती त्यांमुळे पुढे भागसूनागऐवजी धर्मशाला हे आजचे नाव रूढ झाले

भागसूनागची भेट सपवून परत मॅक्लोड गंज नावयावरील स्टँडवर आलो. स्टँडच्या जवळपास गालीचे विणण्याचे काम घरोघरी चाललेले दिसले हे काम तिबेटी लोक करीत होते. त्यासाठी खास लोकर वापरतात. हे गालीचे सुदर असून परदेशी निर्यात होतात मात्र किमती फारच होत्या. लोअर धर्मशालाला जाणारी बस उभीच होती दुपारी एकच्या सुमारास लोअर धर्मशालाला पोहोचलो दुपारचे जेवण आटोपून थोडी विश्रांती घेऊन स्टँडवर आलो धर्मशालापासून पच्चवीस कि मी. अतरावरील चामुडादेवीच्या जागृत स्थानाला भेट देण्यासाठी निघालो धर्मशालाच्या सरकारी कचेऱ्या, दवाखाना गेल्यावर रस्त्याच्या बाजूला उच उच वृक्षामध्ये एक मोठे स्मारक दिसले दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या सैनिकाच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे वॉर मेमोरियल उभारले आहे. पुढे काही अतर गेल्यावर

योल कँप दिसला तेथे लष्कराचे मोठे ठाणे आहे चारच्या सुमाराला दड या गावी बस थाबली. थोडे अतर पायी चालत गेल्यावर बाणगगा नदीच्या काठी चामुडा नदिकेश्वर मदिरात पोहोचलो. देवीच्या अलकृत मूर्तीचे भक्तिभावाने दर्शन घेतले मदिराच्या मडपात दर्शनाला आलेल्या पहाडी स्त्रियांची गर्दी होती थोड्या पायऱ्या उतरून एका प्रचड खडकाखालील गुहेत गेलो तेथे महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेतले श्रीचामुडा नदिकेश्वर हे जागृत देवस्थान आहे तसेच बाणगगा नदीच्या स्फटिकासमान पाण्याच्या प्रवाहाचे मदिराला सान्निध्य लाभले आहे

मदिर पाहून हमरस्त्यावर आलो अर्धा तास वाट पाहिल्यावर बस मिळाली रात्री आठच्या सुमाराला हॉटेल धौलाधरमध्ये पोहोचलो सर्वांनी ठरवले की तिबेटी पद्धतीच्या हॉटेलमध्ये जेवण घ्यायचे त्याप्रमाणे तेथून निघून फिरत फिरत बाजारच्या रस्त्यावरील एका तिबेटी हॉटेल-मध्ये आलो उशीर झाल्याने फारशी गर्दी नव्हती मद पाश्चात्त्य सगीत सुरू होते काही तिबेटी लोक दोन काट्यांनी भराभर शेवया खात होते. मेनू कार्ड पाहून चायना राईस व नूडल्स मागवले चायना राईस चविष्ट होता पण दुसरा आणलेला पदार्थ म्हणजे एका मोठ्या बशीत शेवयाची वेटोळी त्यावर कसला तरी बिलबिलीत पदार्थ व त्याच्यावर अड्याचे तुकडे सर्वांनी एक एक घास खाल्ला पण दुसरा घास घेण्याचे धाडस कुणीच करू शकले नाही अक्षरश अर्धपोटीच तेथून पळ काढला हॉटेल धौलाधरमध्ये टी व्ही वर पाकिस्तानमधील लाहोर स्टेशनचा कार्यक्रम काही वेळ पाहिला मुल्लामौलवी उर्दू भाषेत धार्मिक ग्रथपठण करताना दिसले नतर जालदर स्टेशनवरील गुड्डी चित्रपट थोडावेळ पाहिला दमलो असल्याने रात्री दहाच्या सुमारासच निद्राधीन झालो

□ □

# श्री ज्वालामुखीदेवी

सूर्योदयाची रम्य वेळ सूर्यदेवाची कोवळी किरणे हिमालयाच्या धवल शुभ्र बर्फाच्छादित शिखरावर पसरली होती हिमाचल बस ज्वालामुखी-देवीच्या दर्शनासाठी आम्हाला घेऊन निघाली होती बसमधील गौरवर्णीय हिमाचल कन्यका पहाडी आवाजात गाऊ लागल्या

तूने मुझे बुलाया, शेरावालीये ।
मैं आया मैं आया, शेरावालीये ऽऽ
ओ ज्योतावालीये, पहाडावालीये
तूने मुझे बुलाया ।

खरंच होत ते शेरवाली–सिंहावर आरूढ झालेली दुर्गामाता ज्वाला-मुखी देवी हिने जणू दर्शनाला आम्हालाही बोलावले होते म्हणूनच नगरमारख्या दूर गावी रहाणारे आम्ही तिच्या दर्शनाला निघालो होतो.

धर्मशाला स्थानक सोडल्यावर वळणाकार रस्ता पार करून गाडी मैदा-नाच्या प्रदेशात कांगडा बस स्थानकावर आली. मग होशियारपूर रस्त्याने धावू लागली वाटेत पठाणकोट जोगिंदरनगर नॅरोगेज गाडीचा वळणाकार रस्ता मधून मधून दिसत होता ज्वालामुखी रोड स्टेशनजवळ गाडी

थाबली गाडीत चढताना भाविक प्रवाशांनी उत्साहाने एकच घोषणा दिली. 'बोलो जयमातादी' प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात माताजीच्या दर्शनासाठी आसुसलेले भाविक मोठ्या अधीरतेने जयमातादी असा पुकारा करीत होते. एका पहाडाच्या पायथ्याशी असलेल्या ज्वालामुखी बस स्थानकाजवळ बस थाबली स्टॅंडच्या मागून पहाडाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूने दुतर्फा प्रसाद, फोटो व विविध आकर्षक वस्तू याची असख्य दुकाने होती लाल-भडक कुकू आकर्षक पद्धतीने माडलेलीही अनेक दुकाने होती पधरा मिनिटांतच पहाडाच्या पायथ्याशी (सलेल्या ज्वालामुखी देवीच्या मदिरात पोहोचलो

मदिराच्या प्रवेशद्वाराजवळच नितळ पाण्याचे एक कुड आहे त्याचे नाव 'सूरजकुड' हे कुड मोगल बादशहा अकबर याने बांधले आहे तेथील गोमुखातून सतत पाणी वहात असते. हात पाय धुवून प्रसन्न चित्ताने मदिरासमोरील मडपात प्रवेश केला तेथील काळ्या व पाढऱ्या सगम-रवराची फरसबदी आकर्षक आहे लहान मुलांचे जावळ काढायचा विधी आटोपून लहान मुलासह फोटो काढून घेताना त्याचे नातेवाईक दिसत होते मदिरासमोर मडपात देवीचे वाहन असलेले दोन पितळी सिह दिसतात. तेथील घुमटाखाली अनेक छोट्या छोट्या घटा होत्या

मदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केल्यावर समोरच्या भितीवर मध्यभागी एक कोनाडा दिसला त्याच्याभोवती चादीची महिरप केलेली होती कोना-ड्यात दर्शनासाठी वाकून पाहिले तेव्हा निळसर ज्योत दिसली याच ठिकाणी ज्वालामुखीदेवी प्रथम प्रगट झाली या ज्योतीचे पवित्र नाव 'महाकाली' असून मुक्ती देणारी पूर्ण ब्रह्मज्योती तसेच ज्वालामुखी या नावानीहि ती प्रसिद्ध आहे मोठ्या भाविकतेने ज्योतीचे दर्शन घतले येथे देवीची मूर्ती नाही हे वैशिष्ट्य आहे मदिरातील पुजाऱ्याने माहिती दिली की मदि-राच्या भितीत अशा एकूण सात ज्योती आहेत. पहिली आहे अन्नपूर्णा नावाची पवित्र देवी – ही महामाया देवीभक्ताच अन्नभाडार पूर्ण भरते दुसरी आहे चण्डी – भक्तांच्या शत्रूचा ती नाश करते तिसऱ्या ज्योतीचे नाव आहे हिंगलाज ती भक्ताच्या शारिरिक व्याधीच्या दुखांचा नाश करते मदिराच्या मध्यभागी चौकोनी कुड आहे तथं पायऱ्या उतरून जावे

लागते या कुंडात चार ज्योती आहेत पहिल्या ज्योतीचे नाव महालक्ष्मी– हिच्या पूजनाने सुवर्णाची प्राप्ती होते दुसरी आहे सरस्वती, हिच्या पूजनाने विद्या प्राप्त होते तिसरी आहे अंबिका, हिच्या दर्शनाने व पूजनाने संतती प्राप्त होते चौथी आहे अंजनादेवी. हिच्या पूजनाने दीर्घायुष्य प्राप्त होते. तेलाशिवाय प्रज्वलित झालेल्या अशा या ज्वालादेवीच्या सात ज्योती जणू बहिणी बहिणी ! त्यांच्या दर्शनपूजनाने जन्मजन्मांतराचे पाप नष्ट होऊन मनोकामना पूर्ण होते पुराणात म्हटले आहे

> सर्व देवमयी ज्वाला, पुराणेषु प्रतिपादिता ।
>
> यस्मात्तां सुप्रयत्नेन पूजयेद् भुक्तिसाधक
>
> सर्वसिद्धीप्रदा देवी तथा मुक्ति प्रदायिनी ।
>
> कलौनास्ति परो देवा त्यक्त्वा ज्वालामुखी भूवी ।।

संपूर्ण ऋद्धीसिद्धीदात्री व मुक्ती देणारी ज्वालामुखीखेरीज कलीयुगात अन्य कोणतीही देवता नाही.

ज्वालामुखी देवीच्या उत्पत्तीची पुराणकालीन कथा अशी आहे शिवपत्नी सती हिचे वडील दक्ष प्रजापती ! त्यांनी एक मोठा यज्ञ आयोजित केला होता त्यांनी सर्व देवदेवतांना आमंत्रित केले पण आपला जावई भगवान शंकर याला बोलावले नाही. सतीने शंकराला यज्ञाला उपस्थित रहाण्याचा आग्रह केला. पण शंकराने सांगितले की मला न बोलावून तुझ्या पित्याने अपमान केला आहे तेव्हा जाणे उचित होणार नाही तरी पण सती दक्ष प्रजापतीच्या– आपल्या पित्याच्या घरी यज्ञात भाग घेण्यासाठी हट्टाने गेली सतीने तेथे पाहिले की सर्व देवदेवतासाठी खास सिंहासने बनवली होती पण तिचा पती श्रीशंकर यांच्यासाठी सिंहासन नव्हते उलट सतीला पाहून तिच्या पित्याने शंकराची निर्भत्सना केली. पतीचा हा अपमान सहन न होऊन यज्ञाच्या हवनकुंडात सतीने स्वतःची आहुती दिली सतीच्या शरीरातून ज्वाला प्रगट झाल्या. त्या ज्योती सर्व जगाला भयभीत करणाऱ्या होत्या. प्रथम ती ज्योत आकाशाच्या दिशेने झेपावली नंतर

ज्योत ज्या पर्वतावर पडली तो हाच पहाड हीच ज्वालामुखी ज्योत. सतीच्या प्राणत्यागाच्या घटनेने संतप्त होऊन शंकराने प्रथम दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा क्षणभरात विध्वंस केला वैराग्य प्राप्त होऊन त्याने सतीचे मृतशरीर खांद्यावर टाकून सर्व भारतभर दु:खाने संचार करायला सुरुवात केली या प्रकाराने सर्वत्र हाहाकार माजला तेव्हा सृष्टीच्या मदतीसाठी भगवान विष्णु धावून आले त्यांनी बाणाचा सतीच्या शवावर वर्षाव केला. सतीचे अवयव अनेक ठिकाणी गळून पडले ज्या ज्या ठिकाणी ते गळून पडले त्या त्या ठिकाणी शक्तीपीठे निर्माण झाली भारतात अशी एकूण ५२ शक्तीपीठे झाली. ज्या ठिकाणी सतीची जिव्हा विष्णूच्या बाणाने गळून पडली ते हे ज्वालामुखी क्षेत्र होय तंत्रचुडामणी तान्त्रिक ग्रंथात म्हटले आहे की –

ज्वालामुख्यां महाजिह्वा देव उन्मत्त भैरव: ।

अगदी प्राचीन काळात – सतीयुगात राजा चंद्रजीला ही गोष्ट कळली की विष्णूच्या बाणाने गळालेली सतीची जिव्हा एका तेजस्वी अग्निकुंडाच्या रूपाने कोणत्या तरी पर्वतावर अस्तित्वात आहे त्याचा त्यांनी शोध घेतला पण निश्चित स्थान कळू शकले नाही तेव्हा चंद्रजी राजाने अंदाजाने नगरकोट–हल्लीचे कांगडा येथे छोटे मंदिर बांधले नंतर काही वर्षांनी राज्यातील एका गवळ्याने राजाला सांगितले की मी काही अंतरावर एका पहाडावर कायम ज्वाला प्रज्वलित झालेली पाहिली आहे राजा धावत आला व त्याने ज्वालाजीचे भक्तिभावाने दर्शन घेतले मोठ्या श्रद्धेने त्याने तेथे मंदिर उभारले पूजाअर्चेसाठी ब्राह्मणाची नेमणूक केली. मुखातून ज्वाला येते म्हणून ज्वालामुखी असे या स्थानाचे नाव प्रचलित झाले पांडवांनी वनवासात असताना या मंदिराला भेट दिली व मंदिराचा विस्तार केला.

चौदाव्या शतकात या मंदिरावर मुसलमान बादशहा फिरोज तुघलकने आक्रमण केले मंदिरातील संस्कृत ग्रंथ लुटून नेले दर्शनार्थी यात्रेकरूवर धार्मिक कर बसवला ज्वालादेवीला हे अत्याचार सहन झाले नाहीत मंदिरावर

प्रहार केल्याबरोबर लाखो मधमाशा सैन्याला डसू लागल्या. त्यामुळे सैनिक पळून गेले मोगलसम्राट अकबर बादशहा या प्रदेशात सफर करण्यासाठी जेव्हा आला तेव्हा एका भविकाने त्याला सांगितले की ज्वालामुखी प्रभावशाली शक्ती आहे तेथे तेलाशिवाय ज्योत जळते त्यावर अकबराने हे सर्व खोट आहे असे म्हणून ज्वालादेवीच्या शक्तीची परीक्षा घेण्याचे ठरवले तो स्वत मंदिरात पोहोचला. त्याने ज्योत विझविण्यासाठी मल्यामोठ्या लोखंडी तव्याखाली ज्योती गाडल्या तथापि ज्वालामातेच्या शक्तीने तवे फुटून प्रज्वलित ज्योती वर निघाल्या, पण विझल्या नाहीत । त्यानंतर अकबराने पहाडावरील पाण्याचा प्रवाह ज्योतीवर सोडला सर्व मंदिरात पाणीच पाणी झाले पण ज्योती न विझता अधिकच प्रज्वलित झाल्या. ज्वालामुखीच्या शक्तीची चेष्टा करण्याचा अकबराचा प्रयत्न असफल झाला. ज्वालाजीच्या चमत्काराने तो प्रभावित झाला अनवाणी पायाने त्याने देवीचे दर्शन घेतले व सव्वामण वजनाच्या सोन्याचे छत्र देवीला अर्पण केले. परंतु देवीने अकबराच्या मनातील पूर्वीचा संदेह व अहंकार ओळखून भेट स्वीकारली नाही सव्वामण वजनाच्या सोन्याचे छत्र तत्काल अष्टधातूचं बनल प्रवेशद्वारी कुंड बांधून अकबर परतला आजही सव्वामण वजनाचं अष्टधातूच छत्र मंदिराच्या बाजूच्या खोलीतील भगवतीमंदिरात पहायला मिळते दोन हातांनीही ते उचलता येत नाही.

पंजाबचा महाराजा रणजितसिंह ज्वालामुखीदेवीचा परमभक्त होता. त्याने मंदिराला तीन वेळा दर्शनासाठी भेट दिली इ स. १८५५ मध्ये सोन्याचा मुलामा दिलेला पत्रा छतावर चढवला आजही मंदिराच्या घुमटावर तो चकाकताना दिसतो. महाराजा रणजितसिंहाच्या पुत्राने मंदिराला श्रद्धेने भेट दिलेला चांदीचा दरवाजा आजही दिसतो

मुख्य मंदिराच्या समोर शय्यामंदिर अथवा सेजभवन आहे तेथे पत्थरात कोरलेले दोन सिंह आहेत मध्यभागी चौथरा असून दुर्गामातेची मूर्ती आहे कालीमातेच्या विविध रूपांची तेथे चित्रे आहेत तेथील पुजाऱ्याजवळ गुरुग्रंथसाहेब हा पवित्र ग्रंथही आहे

मंदिराचे दर्शन घेऊन परिक्रमा केल्यावर पायऱ्या चढून वर आल्यावर

जेथे गोरखनाथजीने तपस्या केली ते 'गोरखडिब्बी' स्थान आहे. तेथे दर्शनासाठी असलेल्या मोठ्या रांगेत सामील झालो भाविक यात्रेकरू

ओ सारे बोलो जयमातादी
ओ आते बोलो जयमातादी
ओ जाते बोलो जयमातादी
ओ कष्ट निवारे जयमातादी
प्रेमसे बोलो जयमातादी

अशा उत्स्फूर्त घोषणा देत होते. गोरखडिब्बी या ठिकाणच्या कुंडाचे नाव रुद्रकुंड असून तेथे पाण्यातून प्रगट झालेली ज्योत पुजारी दाखवतात. विशेष म्हणजे गोरखडिब्बीतील पाणी गुरु गोरखनाथाच्या शक्तीने थंड आहे तर ज्वालादेवीच्या शक्तीने उकळते। प्रेम आणि श्रद्धेने जो यात्री दर्शन घेतो त्याला माताजी आशीर्वाद देते, पापनाश करते, मनोकामना पूर्ण करते व ज्याच्यावर प्रसन्न होते त्याला स्पर्श करून साक्षात दर्शन देते.

असे हे जागृत देवस्थान ज्वालामुखीमाताजीवर भक्ताचे केव्हढे प्रेम व श्रद्धा आहे हे साक्षात् डोळ्यानी पाहिल्यावर देवीच्या दर्शनाचा लाभ झाला हे भाग्याचे वाटले प्रत्येक भाविक हिंदुधर्मियाने आयुष्यात एकदा तरी याठिकाणी येऊन नतमस्तक व्हावे असे हे स्थान आहे मंदिरापासून स्टँडकडे परतताना वाटेत प्रसाद, फोटो, कुंकू याची खरेदी करून एका भोजनालयात दही, आलूपरोटे यावर ताव मारला स्टँडवर आलो तर कांगडाकडे जाणारी बस तयारच होती. दुपारी दोनच्या सुमारास बस कांगड्याकडे सुटली व बसमध्ये भाविकाचा उद्‌घोष सुरू झाला.

जोरसे बोलो जयमातादी
ओ प्रेमसे बोलो जयमातादी
लाटावाली जयमातादी.
ओ शेरवाली जयमातादी

□ □

# सुरम्य कांगडा घाटी

ज्वालामुखीहून ३४ कि मी अंतराचा प्रवास संपवून कांगडा बसस्टँड-वर उतरलो महाभारतकालात कांगडाचे नाव होते त्रिगर्त – तीन घाटींची भूमी त्रिगर्तचा राजा सुशर्मचंद्र याने महाभारतीय युद्धात कौरवांना पांडवांविरुद्ध युद्धात मदत केली अर्जुनाने त्रिगर्त सेनेचा पराजय केला व राजा सुशर्म याचा वध केला पुरातनकालात कांगडा जालंदर क्षेत्र या नावाने ओळखले जाई. पद्मपुराणात वर्णन केले आहे की विष्णूने जालंदर दैत्याचा वध केला वधाच्यावेळी या क्षेत्रात दैत्याचा कान पडला म्हणून या क्षेत्राला कानगढ नाव पडले त्यावरून पुढे कांगडा नाव पडले सम्राट् हर्षवर्धन याच्या काळात येऊन गेलेला सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू - एन् - त्संग याने सातव्या शतकात या प्रदेशातून प्रवास केला होता त्याने या प्रदेशाबाबत म्हटले आहे की जालंदर उर्फ त्रिगर्त या प्रदेशाचा विस्तार पूर्वपश्चिम १६७ मैल व दक्षिणोत्तर १३३ मैल असा आहे गुरखा लोकांच्या आगमनानंतर कांगडा त्रिगढ नावाने ओळखले जाई त्रिगढचा अर्थ बाणगंगा, नयागुल व कुरली या तीन नद्यांची भूमी धौलाधर पर्वतराजीच्या पायथ्याशी विस्तृत पसरलेली कांगडा घाटी शाहपूर ते बैजनाथपर्यंत ३५ मैल पसरली

आहे धर्मशाला ते कांगडा दरम्यान सर्वात जास्त बारा मैलांची नदी आहे. मोगल बादशहा अकबर याच्या काळात कांगडाची प्रसिद्धी होती कांगडादुर्ग, बासमती तांदूळ, नेत्रइलाज आणि नाकावरील शस्त्रक्रियेसाठी त्यावेळी गुन्हेगाराला दंड म्हणून नाक कापण्याची शिक्षा बऱ्याच वेळा दिली जाई अकबराने एका अपराध्याला ही शिक्षा दिली कांगड्याच्या शल्य-चिकित्सकाने डोक्याबरील कातडं काढून कौशल्याने नाक दुरुस्त केले. तो अपराधी परत आपल्या नाकासह दरबारात हजर पाहून अकबराला अचंबा वाटला कांगड्याच्या शल्यचिकित्सकाला जहागीर मिळाली. कालांतराने शस्त्रक्रियेची ही विद्या लुप्त झाली कांगडाची चित्रकारी शैली तर गेली दोन शतके प्रसिद्ध आहे अठराव्या शतकात राजा संसारचंद कटोच याने चित्रकलेला आश्रय दिला

कांगडा येथील दोन स्थानांना भेटी द्यायच्या होत्या. एक कांगडादुर्ग व दुसरे गावातील प्राचीन वज्रेश्वरीदेवी मंदिर प्रथम किल्ला पाहाण्यासाठी ज्वालामुखीरोडवरील पाच कि मी अंतरावरील बाणगंगानदीच्या कडेला असलेल्या जकात नाक्यापर्यंत बसने गेलो खरे म्हणजे ज्वालामुखीहून कांगडाकडे येताना या नाक्यावर उतरलो असतो तर उलटा हेलपाटा वाचला असता नाक्यावर उतरल्यावर हळू हळू चढ चढून साधारण दीड कि. मी अंतरावरील पुराणवस्तु संरक्षण कार्यालयात गेलो तेथील एक सेवक आमच्याबरोबर किल्ला दाखवायला आला त्याने सांगितले की मांझी व बाणगंगा या नद्यांच्या संगमामध्ये वसलेल्या १ कि मी लांबीचा किल्ला मध्यभागी फक्त तीस मीटर रुंद आहे 'रणजितसिंहद्वार' हे किल्ल्याचे मुख्य दार असून तेथून वर गेल्यावर किल्ल्याच्या दगडी भिंतीत ठिकठिकाणी असलेली छिद्रे दिसतात टहळणीसाठी व बंदुका उडविण्यासाठी ही पूर्वीची खास व्यवस्था होती नंतर वर पोहोचल्यावर दर्शनी दरवाजा दिसतो. त्यावर द्वारपालाच्या भग्न मूर्ती आहेत किल्ल्याच्या आतील प्रांगणात भग्नावस्थेतील लक्ष्मीनारायण मंदिर आहे हे दगडी मंदिर पांडवकालीन मानले जाते एका छोट्या जैनमंदिरात आदिनाथ भगवान याची पंधराव्या शतकातील ध्यानस्थ मूर्ती आहे तेथे भग्न अवस्थेतील जुना शीशमहाल दिसला. तसेच तेथे पूर्वीची टांकसाळ असलेल्या इमारतीचे अवशेष आहेत.

महमूद गजनीने त्याचा विध्वंस केला होता. थोडे अंतर चढून माथ्यावर आलो तेथे राजाचे महाल होते. बाजूला राजासाठी चौकी होती तेथून बाणगंगा नदीचे दर्शन घेऊन ते पूजापाठ करीत राजपरिवाराच्या गप्पा गोष्टी, विश्रांती यासाठी तेथे आयताकृती मोठे पटांगण दिसले बाजूला बाणगंगा नदी सुमारे शंभर मीटर खोलवर खडकातून वहाताना दिसते या किल्ल्याच्या चारी बाजूला खोल दऱ्या आहेत किल्ल्याच्या दक्षिण भागात कपूरसागर जलाशय असून तेथे जाण्यास जुन्या दगडी पायऱ्या दिसल्या.

या कांगडा किल्ल्याने इतिहासाचे अनेक चढउतार पाहिले हा किल्ला कोट कांगडा अथवा नगरदुर्ग या नावाने ओळखला जाई महाभारत काळात हा किल्ला त्रिगर्तचा राजा सुशर्मचंद्र याने बांधला अलेक्झांडर उर्फ सिकंदर राजाने इ स पूर्वी चौथ्या शतकात बियास नदीच्या तटावर पोहोचून परतताना हा किल्ला घेण्याचा प्रयत्न एक अश्वरोही तुकडी पाठवून केला होता. महमूद गजनीने अकराव्या शतकात या किल्ल्याचा कब्जा घेतला. त्यानंतर तीस वर्षे तो त्याच्या ताब्यात होता. नंतरची तीन शतके मात्र तो हिंदूंच्या नियंत्रणाखाली होता मोगल बादशहा जहांगीर याने हा किल्ला जिंकला व तेथे मशीद बांधली नंतर पहाडी हिंदू राजा संसारचंद व शीख राजा रणजितसिंह याच्या अधिकारात किल्ला होता. नंतर इंग्रजांच्या नियंत्रणाखाली तो आला. इ. स १९०५ मधील्च्या भूकंपात किल्ल्याची मोठी हानी झाली. वैभवसंपन्न असा हा किल्ला आज मात्र भग्नावस्थेत आहे.

कांगडा किल्ला पाहून गावातील प्रसिद्ध वज्रेश्वरीदेवीच्या मंदिरात आलो हे मंदिर महाभारत काळात सुशर्मचंद्र राजाने बांधले असे मानले जाते तसेच या देवीच्या मंदिरात प्रतिष्ठापनेच्या वेळी ३६० देवी जमल्या होत्या असे मानतात या ठिकाणी सतीची वक्षःस्थळे गळाली होती म्हणून हेही शक्तीपीठ मानले जाते मंदिराभोवती दगडी तटबंदी असून मंदिर उंच चबुतऱ्यावर आहे. मंडपात काळ्या व पांढऱ्या रंगाची उत्तम फरसबंदी आहे वाघ व सिंह या देवीच्या वाहनाच्या पितळी मूर्ती आहेत. छतावर कांगडा शैलीची चित्रे आहेत.

गर्भगृहात चांदीचा मांडव व चांदीच्या अनेक छत्र्या आहेत. देवीचा पितळी मुखवटा स्वर्णमंडित असून अलंकृत मूर्ती आहे या मंदिराच्या ऐश्वर्यतेची कीर्ती दूरवर पसरली होती महमूद गजनीने अकराव्या शतकात मंदिरावर आक्रमण करून हजारो मण सोने, चांदी, जडजवाहीर, हिरे लुटून उंटावर लादून नेले मंदिराला आग लावली धर्मांध फिरोजशहा तुघलकने चौदाव्या शतकात आक्रमण करून मूर्तीचे तुकडे केले त्यात गोमांसाचे तुकडे मिसळले, ते पोत्यात भरले व ब्राह्मणाच्या गळ्यात अडकवले केव्हढी ही विटंबना ! जहांगीरच्या काळात मंदिराला भेट दिलेल्या थॉमस कोरयट याने लिहून ठेवले आहे की हे मंदिर खूप संपन्न असून शुद्ध सोने–चांदी याच्या पत्र्याने मढवलेले आहे शीख महाराजा रणजितसिंह यांची देवीवर श्रद्धा होती त्यांच्या महाराणी चंदकौरने कळसावर सोन्याचा पत्रा चढवला

मंदिरात नवरात्रात उत्सव होतो. तसेच शिवाने दक्षाचा यज्ञ मोडण्याची जबाबदारी ज्याच्यावर सोपवली होती त्या वीर बहादुरचा उत्सवही मे, जून महिन्यात होतो मंदिरातील पुजाऱ्याने कांगडाचा राजा संसारचंद याने १८३० मध्ये लिहिलेला संस्कृत शिलालेख दाखवला भक्ताची मनोकामना पूर्ण करणाऱ्या देवीचे दर्शन घेऊन बाजारच्या रस्त्याने परतलो. कांगडा शैलीचे विश्वविख्यात चित्रकार शोभासिंह यांनी काढलेले सोनी–महिवाल ह्या प्रेमिकाचे चित्र अनेक दुकानात दिसले ६९ वयाचे श्री शोभासिंह हे पालमपूरजवळ अन्द्रेता या छोट्या निसर्गरम्य खेड्यात रहातात. ' कांग्रा वधू ' हे त्यांचं चित्र लेडी माऊंटबॅटनच्या संग्रहात होते उमरखय्याम, साकी, राम कृष्ण, सूरदास, भगतसिंग, रणजितसिंह इ त्यांची तैलचित्रे प्रसिद्ध आहेत शीख धर्मगुरूंची त्याची चित्रेही प्रसिद्धच आहेत राष्ट्रपती भवन तसेच चंदीगड व अमृतसर येथील संग्रहालयात त्याची चित्रे आहेत आपल्याकडे राजा रविवर्मा यांची चित्रे घरोघरी आढळतात त्याप्रमाणे शोभासिंह याची चित्रे उत्तर भारतात घरोघरी फ्रेम करून लावलेली आहेत

कांगड्याच्या बाजारातून स्टॅंडकडे परत जाताना कांगडा घाटीतील

रूपवान पहाडी स्त्रियांचं दर्शन झालं. कांगडी स्त्रिया आपल्या सौंदर्यासाठी इतिहासकालापासून प्रसिद्ध आहेत. कांगडा जिंकण्यासाठी जहांगीरबरोबर आलेली नूरजहान राणीसुद्धा येथील पहाडी स्त्रियांच्या सौंदर्याने प्रभावित झाली होती. कांगडा स्टँडवर पोहोचलो तेव्हा सायंकाळचे सात वाजले होते एक दिवसाची ज्वालामुखी, कांगडा भेट आटोपून धर्मशाला येथे रात्री आठच्या सुमारास पोहोचलो

□ □

## कांगडा घाटीतून कुलू घाटीकडे

पहाटे पाच वाजताच हॉटेल धौलाधार मध्ये सर्वांची आवराआवर सुरू झाली होती तीन दिवसांचा धर्मशाला येथील सुखद मुक्काम संपला होता सहाच्या सुमाराला स्टँडवर पोहोचलो तेव्हा धर्मशाला–बैजनाथ–मंडी बस उभीच होती स्टँडवर घाईघाईत चहा घेतला सव्वासहाच्या सुमाराला गुलाबी थंडीत बस धर्मशालाहून निघाली हिमाचल प्रदेशमध्ये बस अगदी वेळेवर निघत. सातच्या सुमाराला कांगडा स्टँडवर बस थांबली परत एकदा चहा झाला बस आता पठाणकोट–मंडी या राजमार्गावर कांगडा घाटीत धावू लागली मार्गात डोंगराच्या उतारावर टप्प्याटप्प्याची शेती दिसत होती ३५ कि. मी अंतर पार केल्यावर पालमपूर हे कांगडा घाटीतील मध्यवर्ती ठिकाण लागले चहाच्या हिरव्यागार मळ्यांनी वेढलेले पालमपूर हे गाव टुमदार वाटले पालमपूर येथूनच जवळच्या अंद्रेता या छोटेखानी निसर्गरम्य गावात विश्वविख्यात शौख चित्रकार शोभासिंहजी रहातात

पालमपूरहून सोळा कि मी चा प्रवास आटोपून बैजनाथच्या स्टँडवर साडेदहाच्या सुमारास पोहोचलो स्टँडवर सामान उतरवून घेतले बैजनाथचे पुराणकालीन मंदिर स्टँडजवळच आहे. पुढे कुलूला जाण्यासाठी गाडी साडे-

बाराच्या सुमाराला होती वेळ भरपूर होता स्टँडवरून पाचच मिनिटात बैजनाथच्या मंदिरात पोहोचलो

बैजनाथचे पुरातन नाव होते किरग्राम. मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर प्रथम दोन नंदी दिसले एक नंदी उभा आहे तर दुसरा बसलेला आहे मंदिर पश्चिमाभिमुखी आहे प्रवेशद्वारी नवग्रह द्वारपाल आहेत. भगवान शंकर व सहा भुजाचा गणपती या मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मंडपातील चार स्तंभावरील शिल्पकृती प्रेक्षणीय आहेत त्यावर लक्ष्मी व विष्णु यांच्या मूर्ती कोरल्या आहेत

मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केल्यावर पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या ब्राह्मण पुजाऱ्याने तीर्थ व प्रसाद दिला दर्शन घेतल्यावर माहिती विचारल्यावर पुजाऱ्याने पौराणिक कथा सांगितली दहा मस्तके असलेल्या रावणाने शिवशंकराची घोर तपश्चर्या करून त्याला प्रसन्न केले रावणाने हवनकुंडात नऊ वेळा डोके आपटले व भगवान शंकराने वैद्याचे काम करून ते दुरुस्त केले म्हणून त्याला वैद्यनाथ हे नाव पडले बैजनाथ हे वैद्यनाथचे अपभ्रंश रूप भगवान शंकर प्रसन्न झाल्यावर रावणाने सांगितले की तुमची मी लंकेत स्थापना करणार आहे त्यावर शंकराने अट घातली की मला लंकेपर्यंतच्या लांबच्या प्रवासात खांद्यावर उचलून न्यावे लागेल. वाटेत कुठेही क्षणभरही खाली ठेवायचे नाही. रावणाने ते मान्य केले व शंकराला खांद्यावर घेऊन रावणाचा प्रवास सुरू झाला वाटेत रावणाला लघुशंका लागली रावणाने शंकराला खाली ठेवले झाले, शंकराने घातलेली अट मोडली ज्याठिकाणी शंकराला ठेवलेल्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना झाली तेच हे बैजनाथ

मंदिराच्या मंडपातील शारदा लिपीत लिहिलेला शिलालेख पुजाऱ्याने दाखवला या मंदिराची निर्मिती इ स ८०४ मध्ये झाली मनु आणि अहु या नावाच्या दोन सधन व्यापारी बंधूंनी ह्या मंदिराची निर्मिती केली. मंदिराच्या शिल्पकाराचे नाव थोडू होते हा शिल्पकार नगरकोट अथवा विद्यमान कांगडा नगरचा रहिवासी होता हे मंदिर शिखर शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे मंदिराची प्रदक्षिणा करताना कार्तिकेय, काली आणि सूर्यदेवतांच्या शिल्पकृती दिसल्या त्या उल्लेखनीय आहेत बाजूला दूरवर

शीतगंगा नदी दिसत होती मंदिराच्या आवारात माकडे मात्र खूप होती भूकंपात या मंदिराला हानी पोहोचली होती कांगडाचा प्रसिद्ध राजा संसारचंद याने मंदिराचा जीर्णोद्धार केला या रावणकालीन प्राचीन मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर मात्र कमालीची अस्वच्छता होती भिकाऱ्यांनी उभारलेल्या गलिच्छ झोपड्यामुळे सर्वत्र घाण होती हे मंदिर पुराणवस्तू संशोधन खात्याकडे आले आहे, अशी माहिती तेथे मिळाली. त्यांच्या एका सेवकाशी याबाबत बोलल्यावर मंदिराच्या आजूबाजूची सुधारणा करण्याची, बाग करण्याची योजना असल्याचे त्याने सांगितले

मंदिराच्या आवाराबाहेर येऊन स्टँडवर आलो कुलूकडे जाणाऱ्या बसची वाट पाहू लागलो दुपारी साडेबाराला पठाणकोट-कुलू-मनाली या बसमध्ये प्रवेश मिळाला व वैजनाथचा निरोप घेतला निसर्गरम्य कांगडा घाटीतील प्रवास संपला होता आता बस निघाली होती मंडीकडे. दुपारचे तीन वाजले तेव्हा बस जोगिंदरनगर या मोठ्या स्टँडवर थांबली हे शहर पठाणकोट–जोगिंदरनगर या नॅरोगेज रेल्वेचे शेवटचे ठिकाण चहा-पाणी, फराळासाठी बस अर्धा तास थांबली शनिवारचा उपवासाचा दिवस होता. स्टँडवर दूध व मिठाई चांगली मिळाली जेवण आटोपून ताजेतवाने होऊन ड्रायव्हरने गाडीचे चक्र हातात घेतले जोगिंदरनगर–मंडी हा ५६ कि मी अंतराचा प्रवासाचा पुढील टप्पा सुरू झाला जोगिंदरनगर स्टँड सोडल्यावर काही अंतरावर पहाडाच्या पायथ्याशी असलेले भव्य विद्युत्केंद्र दाखवीत यशवंत म्हणाले की, इंग्रजांनी जोगिंदरनगरच्या उंच पहाडावर धरण बांधून पाणी अडवले ते पाणी पाईपने उतरवून हे जलविद्युतकेंद्र बांधले. उन्हाळ्यात आजूबाजूच्या पहाडांवरचे बर्फ वितळते आणि मग जलाशय थंडगार पाण्याने भरला जातो तेथील पाणी इतके थंड असते की हाताची बोटे गारठल्याशिवाय रहात नाहीत अशा तऱ्हेने बर्फाच्या वितळलेल्या पाण्याचा कल्पकतेने उपयोग केलेले हे भारतातील एकमेव जलविद्युत्केंद्र होय. रस्त्याच्या कडेला एका बाजूला विद्युत्केंद्र दिसत होते तर दुसऱ्या बाजूला पहाडावरील धरणाकडे जाण्यासाठी विजेवर चालणाऱ्या ट्रॉलीमार्गाचे रूळ दिसत होते बसमधील या विद्युत्केंद्रातील एक इंजिनियर सांगत होता की, या ट्रॉलीमार्गाचा उतार इतका स्टीप

आहे की ट्रॉलीमध्ये बसणाऱ्या व्यक्तीला वर धरण पहाण्यासाठी परवानगी घेण्याच्यावेळी लिहून द्यावे लागते – 'ट्रॉलीला अपघात झाल्यास त्याची जबाबदारी व्यक्तिगत राहील ' पहाडाच्या उतारावरील ट्रॉलीचा मार्ग पाहून तंत्रज्ञाच्या कल्पकतेचे कौतुक वाटले. प्रकल्प पहाण्याची यशवंतांची इच्छा होती पण वेळेअभावी शक्य झाले नाही

जोगिंदरनगर प्रकल्पाचे ठिकाण सोडल्यावर बसचा वेग वाढला. एक घाटरस्ता ओलांडला की दुसरा घाट सुरू होई. वळणाकार रस्ते पार करीत बस मंडी गावाअलीकडे आली, तेव्हा बियास नदीचे प्रथम दर्शन झाले मंडी हे हिमाचल प्रदेशातील जिल्ह्याचे प्रसिद्ध गाव. शिवालिक पहाडाच्या पायथ्याशी वसलेल्या मंडीतून कुलूघाटी, लाहुल स्पीतीकडे प्रवेशमार्ग आहेत प्राचीन काळात लडाख, तिबेटमधील व्यापारी कुलूघाटीतून मंडीकडे येत व पुढे पंजाबमधील होशियारपूरला जात प्राचीन व्यापारी मार्गावरील मंडी हे महत्त्वाचे ठिकाण होते व्यापारी वस्तूंची देवाणघेवाण येथे करीत म्हणून मंडी हे नाव पडले. काहींच्या मते माण्डव्य ऋषींनी येथे बियास नदीच्या उजव्या तटावर दीर्घ तपश्चर्या केली यावरून मंडी हे नाव रुढ झाले पुराण काळातील मंडीचे नाव होते सुकेत कुलू व त्रिगर्त (कांगडा) येथून अर्जुनाचा अश्वमेध घोडा हिमालयीन क्षेत्रातून जाताना गेला होता. मंडीला बियासवरील झुलता पूल ड्रायव्हरने कौशल्याने वळून पार केला. मंडीच्या मोठ्या बाजारात प्रथम बस थांबली तेथे बरेच प्रवासी उतरले व बस पुढे स्टॅंडवर थांबली स्टॅंडसमोर मोठे पटांगण दिसत होते. तेथे मुले खेळत होती दिवसभरच्या प्रवासाने आम्ही मात्र अगदी कंटाळून गेलो होतो. कांगडाघाटीचा प्रवास संपवून कुलूघाटीत प्रवेश करण्यासाठी मंडी पर्यंतचा प्रवास संपला होता स्टॅन्डवर चहा घेतला. सफरचंदे घेतली. बस चेकिंगसाठी डेपोत गेली दिवस मावळू लागला थंडी वाढू लागली. तासभर मंडीला वेळ गेल्यावर बसचा कुलूघाटीत प्रवास सुरू झाला बियास नदीच्या कडेकडेने नागमोडी रस्ता पार करीत तासभरात पंडोह गावाजवळ आलो. तेथे बरेच प्रवासी उतरले पंडोह याठिकाणी बियास नदीला ७५ मीटर उंचीचे धरण बांधून बियासचे पाणी अडवले आहे हे अडवलेले पाणी मोठ्या पहाडातून बोगद्याद्वारे मंडीजवळील बग्गी या ठिकाणी पोहोचवले जाते.

तेथून कॅनॉलद्वारे हे पाणी सुंदरनगरपर्यंत आणून पहाडातील आणखी एका बोगद्यातून भाक्रा धरणाच्या गोविंदसागर जलाशयात सोडले जाते, अशी माहिती एका प्रवाशाने दिली. खरोखर बियास व सतलज या दोन नद्या जोडणाऱ्या आशिया खंडातील या महत्त्वाकांक्षी जोडयोजनेप्रमाणे उत्तरेकडील गंगा व दक्षिणेकडील कावेरी नदीची जोडयोजना अंमलात आली तर भारत देश सुजला सुफला झाल्याशिवाय रहाणार नाही असा विचार मनात आला पंडोह धरणाच्या भिंतीवरून बस बियासच्या पैलतीरावर आली. त्यानंतर बस व बियास दोघींचा जणू पाठलाग सुरू झाला ! ठिकठिकाणी रस्ता रुंद करण्याच्या कामामुळे फोडलेल्या दगडाचे ढीग रस्त्याच्या कडेला होते त्यामुळे मार्ग निरुंद होता एका बाजूला उंच पहाड तर दुसऱ्या बाजूला खोल दरीतील बियासचा प्रवाह ! ड्रायव्हर कौशल्याने व सफाई-दारपणे हळू हळू गाडी चालवीत होता गाडीचे चक्र वळविण्यात थोडी जरी चूक झाली असती तरी बसला बियासमध्ये जलसमाधी मिळण्याचा धोका होता या धास्तीमुळे प्रवाशाच्या मनावर दडपण होते पण ड्रायव्हर मात्र निर्विकारपणे गाडी चालवीत होता. उदय ड्रायव्हरजवळच्या सीटवर बसला होता ड्रायव्हर अगदी गब्बरसिंगसारखा दिसत होता त्या दोघांची चांगली दोस्ती जमली होती उदयला त्याने हिंदीतून विचारले की तुमच्या गावाला एवढे उंच पर्वत आहेत का ? एवढी खोल पाण्याने भरलेली नदी आहे का ? उदय मोडक्या तोडक्या हिंदीत म्हणाला, "हमारे यहाँ डोंगर तो छोटे हैं और हमारे गांवकी नदी तो बिनपानीकी कोरडी है।"

वळणाकार पहाडाच्या कडेकडेचा रस्ता तासभराने पार केल्यावर बस रस्त्याच्या कडेला एका देवळाजवळ थांबली पुजाऱ्याने बसमध्ये येऊन सर्वांना प्रसाद दिला. प्रवाशांनी दक्षिणा दिली अवघड घाटातून सुखरूपपणे पार केल्याबद्दल सर्वांनी भक्तिभावाने देवाला बसमधूनच नमस्कार केला. रात्री आठच्या सुमाराला बस औट या गावातील निरुंद रस्त्याच्या कडेला चहासाठी थांबली थंडीमुळे समोरच्याच हॉटेलमध्ये चहा घेण्यासाठी प्रवाशांची एकच झुंबड उडाली आम्हा दोघांचा शनिवारचा उपवास असल्याने सफरचंद, शेंगा, चहा यावरच भागवले चहा घेऊन ड्रायव्हरने ताजेतवाने होऊन नव्या दमाने गाडी चालवण्यास सुरुवात केली औट गाव सोडल्यावर

बजौरा हे गाव आले तेथे सफरचंदे विकणारे फळवाले बरेच दिसले. गाडीत ओळख झालेल्या कुलूघाटीतील एका कुटुंबाने माहिती दिली की बजौरा हे गाव बसेश्वर महादेवाच्या पौराणिक मंदिराच्या शिल्पकृतीसाठी प्रसिद्ध आहे बजौरा गाव सोडल्यावर कुलूपर्यंतचा शेवटचा पधरा कि मी चा टप्पा सुरू झाला गडद अंधारातून नागमोडी रस्ते पार करीत असताना लुकलुकणारे दिवे दिसले तेव्हा शेजारचा प्रवासी म्हणाला 'वो देखो कुलू आ गया !" सामानाची आवराआवर केली बस प्रथम कुलूच्या धालपूर मैदानाजवळील सर्किट हाऊसनजीकच्या स्टॉपवर थांबली पर्यटनखात्याचे रेस्टहाऊस तेथेच आहे पण तेथे जागा न मिळाल्यास रात्री गावात दोन कि. मी अंतर जाण्याची पचाईत होईल, शिवाय येथे वाहतुकीचे साधन नसल्याने पायीच तंगडावे लागेल म्हणून कुलू स्टँडवरच उतरण्याचा निर्णय घेतला कुलू स्टँडवर बस थांबली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते धर्मशाला ते कुलू या दिवसभराच्या पधरा तासाच्या प्रवासाने अगदी थकून गेलो होतो ड्रायव्हर मात्र उत्साही दिसत होता 'याद रखना बच्चे लोगो' असे म्हणून त्याने उदयच्या पाठीवर थोपटून निरोप घेतला. प्रवासाने थकल्याने रात्री हॉटेलची जास्त चौकशी करायला उत्साह नव्हता स्टँडसमोरील जवळच्याच कुलू व्हॅली हॉटेलमध्ये हमालाकरवी सामान नेले खोली लहान होती पण इलाज नव्हता सर्वांना कडाक्याची भूक लागली होती शेजारीच चांगले, स्वच्छ हॉटेल होते रोटी, दही, बैंगनभरता, मटारभात यावर ताव मारला. रात्री लॉजवर परतलो थकल्यामुळे पडल्या पडल्याच झोप लागली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# कुलू – देवतांची घाटी

कुलूघाटीतील वास्तव्याचा पहिला दिवस सूर्य उजाडायला थोडा अवधी होता. लॉजच्या गच्चीवर उभे राहिलो तेव्हा पहाडाच्या कुशीत आपली सखी बियास हिच्या सान्निध्यात अजून निद्रिस्त असलेल्या छोटेखानी कुलूचे मनोहारी दर्शन झाले कालाचा ओघ अनंत आहे आजच्या कुलूची कहाणी हजारो वर्षांपूर्वीची आहे सुरुवातीचे आदिमानव याठिकाणी रहात होते रामायण आणि विष्णुपुराण यात कुलूचा उल्लेख कुलता या नावाने आहे. हिमालयात आर्यांनी ज्याठिकाणी सर्वप्रथम आपली वस्ती केली ती ही कुलूभूमी. आजच्या बियासचे पुराणकालातील नाव आहे अर्जीकिये ऋग्वेद या विश्वातील पहिल्या मानलेल्या ग्रंथात सप्तनद्याबाबत म्हटले आहे

इम मे गंगे यमुने सरस्वती, शुतुद्रि स्तोम सचथा परुष्णया

असिक्न्या मरुद्वृधे वितस्तया अर्जीकीये शृणुह्या सुषोमया

कुलूभूमी तेव्हा आर्जीकभूमी या नावाने ओळखली जाई प्राचीनकाली आर्यलोक या ठिकाणी सोमरस प्राशन करीत व देवतांनाही भेट देत आर्जीक शब्द आर्थिक या शब्दाचा अपभ्रंश महामुनी वसिष्ठ ऋषी याना पाशातून

मुक्त केल्यावर आर्जिकियेचे नाव 'विपाशा' पडले. वेदाचे संकलन व पुराणांची रचना विपाशाकाठी कुलूभूमीत झाली.

अयोध्येचा राजा दशरथ याला तीन राण्या होत्या पण राजाला पुत्र नव्हता पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्टी यज्ञाची योजना केली गेली त्यासाठी ज्याने स्त्रीचे मुख पाहिले नाही अशा कुलूत देशातील महान तपस्वी ऋषी शृंग याना पाचारण करण्यात आले यज्ञसमाप्तीनतर ऋषीशृग यांनी दिलेल्या प्रसादामुळे महाराणी कौसल्येला रामचद्र, सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न आणि कैकेयीला भरत या पुत्ररत्नाची प्राप्ती झाली या ऋषीशृग याच प्राचीन मंदिर कुलूघाटीत बजाराजवळ आहे रामजन्माशी निगडीत अशी ही कुलूभूमी

महाभारतकालात भीमाचा विवाह हिडिंबादेवी या मनालीच्या तांडी राजाच्या बहिणीशी झाला तर विदुराचा विवाह तांडीच्या मुलीशी झाला होता. विदुराला मुखर (मकड) आणि भोट पुत्र झाले भोटने लाहुलस्पीती वसवले तर मुखरने बियासच्या डाव्या तीरावर 'मकराह' गाव वसवले मकडस हे कुलूचे आणखी एक पुराणकालातील नाव प्रारभी कुलूघाटीतील पहाडात कोल आदिवासी रहात दस्युराज कौलितर शम्बर हा कुलूत देशाचा मोठा राजा होऊन गेला

सस्कृत वाङ्मयातील विशाखदत्त याच्या 'मुद्राराक्षस'मध्ये कुलूतचा उल्लेख काश्मीरसारख्या पाच मोठ्या राज्यात केला असून राजा चित्रवर्मन याचं वर्णन केल आहे 'किरातार्जुनीय' या सस्कृत नाटकात महाकवी कालिदासाने वर्णन केल्याप्रमाणे भगवान शकराने अर्जुनाला येथेच दिव्य अस्त्र दिले हिमालयात या क्षेत्रात किरात लोक रहात होते

कौटिल्य अर्थशास्त्रात कुलूतचं वर्णन मगध देशाचा पाडाव करणारे राज्य म्हणून केले आहे तसेच पाटलीपुत्र येथे चद्रगुप्त मौर्याच्या झालेल्या राजतिलक समारंभात कुलूत देशाचा राजा हजर होता बाणभट्टाच्या 'कादबरी'मधील पत्रलेखा ही एक नायिका कुलूत देशाची राजकन्या दाखवली आहे 'राजतरगिणी'मध्ये चम्बाच्या राजाने कुलूत नरेशाला स्वकुल्य कुलूतेश्वर म्हटले आहे कुलूत देशाचा एक भाग कुलांतपीठ नावाने ओळखला जातो. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू एन् त्सगने सातव्या शतकात

या भागातून प्रवास केला होता त्याने लिहिले आहे की कुलू जालंदर कांगडाच्या पूर्वेला ११७ मैलांवर स्थित आहे

कुलूघाटी 'देवतांची घाटी' म्हणून ओळखली जाते त्यासंबंधी पौराणिक कथा अशी आहे कुलू घाटीत उत्तरेला शेवटी मलाणा हे प्राचीन गाव आहे. हे गाव आपल्या वैशिष्टयपूर्ण प्राचीन संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. मलाणाचा देव जम्बलु आपली पत्नी नरोल हिच्याबरोबर या घाटीतील एका खिंडीतून जात होता. त्याच्याजवळ एका करंड्यात बऱ्याच देवदेवता होत्या खिंडीमधून जात असताना जोरात आलेल्या वाऱ्याने करंडा उघडला गेला व वाऱ्याने त्यातील सर्व देवदेवता कुलूघाटीत विविध ठिकाणी पडल्या. ज्या ज्या ठिकाणी त्या पडल्या तेथे त्याचे वास्तव्य झाले अशी ही कुलूभूमी पहाण्याची फार उत्कंठा वाटत होती

सकाळी स्नान वगैरे आटोपून प्रथम कुलूचे महत्त्वपूर्ण दैवत श्री रघुनाथजी यांच्या दर्शनाला गेलो. रघुनाथजींचे मंदिर स्टँडपासून साधारण एक कि मी अंतरावर थोडे उंच चढल्यावर आहे हे मंदिर राजा भगवंत-सिंह याच्या मालकीचे असून मंदिरात बाहेरून दर्शन घ्यावे लागते गाभाऱ्यात पुजाऱ्याखेरीज प्रवेश नाही मंदिरातील संगमरवरी कट्टा चांदीने सुरेख मढवलेला असून त्यावर प्रभू रामचंद्राची तसेच हनुमानाचीही मूर्ती आहे अयोध्येहून १७ व्या शतकात कुलूचा राजा जगतसिंह याने ही मूर्ती आणली. असे म्हणतात की एका ब्राह्मणाच्या शापातून वाचण्यासाठी राजाने राज्याची सर्व धनदौलत या मूर्तीत गुंतवली. राजगादी रघुनाथजींना अर्पण केली त्यास्मरणार्थ प्रत्येकवर्षी कुलूला दसरा सणाचा भव्य सोहळा सुरू झाला.

कुलूचा दसरा प्रसिद्ध आहे धालपूर मैदानात विजयादशमीच्या दिवशी सुरू झालेला हा सोहळा सात दिवसपर्यंत चालतो त्यावेळी कुलूघाटीतील सर्व देवदेवता सन्मानाने आणल्या जातात त्यांची रथातून मिरवणूक काढली जाते जणू देवदेवतांचे समेलनपर्व सुरू होते दसऱ्याच्यावेळी रघुनाथजींच्या दर्शनाला विविध वस्त्र-आभूषणांनी नटलेल्या ग्रामकन्यका येतात हातात नव्या बांगड्या चढवतात रघुनाथाचा लाकडी रथ सुशोभित केला जातो पडदे, फुले, माळा यांनी तो सजवला जातो कुलूचा विद्यमान राजा व नागरिक रथाभोवती प्रदक्षिणा घालतात दोऱ्यांनी रथ मैदानाच्या दुसऱ्या

टोकाला ओढला जातो कुलूघाटीतील सर्व देवदेवतांच्या निशाणधारी पालख्या त्याचे पुजारी भक्तासह सवाद्य मिरवतात सर्व घाटी शंख, घंटा, तुतारी, ढोल या परंपरागत वाद्यांच्या आवाजात बुडून जाते नृत्यसंगीतात, उत्साह व आनंदात कुलूघाटी अखंड डुबून जाते या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कुलू घाटीतील मनालीच्या शक्तिमान हिडिंबादेवीचे आगमन झाल्या-खेरीज हा सोहळा सुरू होऊ शकत नाही तसेच मलाणाची 'जबलू' देवता या सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी न होता बियासच्या पैलतीरावरून फक्त निरीक्षण करते

कुलूपासून दहा कि मी अंतरावर आठ हजार फूट उंचीवर असलेले बिजली महादेव मंदिर दूर पहाडावर दिसत होते. तेथे शिवजींची पिंड आहे. या मंदिरामागे आख्यायिका आहे ती अशी – या पहाडावर रहाणारा कुलंत नावाचा शक्तिशाली दानव देवदेवतांना त्रास देई भगवान शंकराने त्रिशुलाने त्याच्यावर प्रहार केला तेव्हा कुलंतचा मृत्यू झाला. रक्त विपाशा नदीपर्यंत वाहू लागले तथापि शंकराला वाटले की कुलंत परत जिवंत होऊ शकेल म्हणून त्याने इंद्राला वारंवार वीज पाडण्याची विनंती केली. त्याप्रमाणे वीज पडली व कुलंतचा मृत्यू झाला या कुलंतवधाच्या घटनेने कुलू नाव प्रचलित झाले असावे असाही समज आहे बिजली महादेव मंदिर ज्या शिखरावर आहे ते स्थान मथाण नावाने ओळखले जाते भगवानांनी कुलंतच्या माथ्यावर प्रहार केला म्हणून मथाण नाव पडले मथाण हा माथाचा अपभ्रंश झाला शिवरात्रीला येथे मेळा भरतो व श्रद्धाळू भाविक शिव आणि पार्वती यांच्या पालख्या खांद्यावर घेऊन जातात उत्सव साजरा होतो कुलंत वधानंतर शिवाने जसे अद्भुत नृत्य केले तसे नृत्य करतात. मंदिरातील पिंडीवर दर बारा वर्षांतून एकदा वीज पडते व पिंड भंगते. पुजाऱ्याला स्वप्न पडून त्यात पिंडीचे तुकडे कुठे पडले ते कळते सकाळी पुजारी मग ते तुकडे गोळा करतो गावातून घराघरातून शुद्ध लोणी गोळा केले जाते व भग्नपिंडीवर माखले जाते. परत शिवलिंग तयार होते असे हे बिजली महादेव मंदिर। याच स्थानावर भगवान शंकराने अर्जुनाला पाशुपत अस्त्र दिले असे मानले जाते इतक्या उंचीवरील चढण शक्य नसल्याने बिजलेश्वराला खालूनच प्रणिपात करून मुक्कामी परतलो.

दुपारी जेवण व विश्रांती घेतली चारच्या सुमाराला स्टँडजवळील बियासच्या एका झुलत्या पुलावर उभे राहिलो तेथून कुलू खोऱ्यातील निसर्गसौंदर्य पाहू लागलो बियासच्या दोन्ही तीरांवर जास्तीत जास्त दोन किमी रुंद व दक्षिणोत्तर ऐंशी किमी लांब असलेल्या कुलूघाटीचं सौंदर्य आगळंच आहे कुलूघाटी तिन्ही ऋतूत जितकी सुंदर असते तितकीच उत्साहदायी असते हिवाळ्यातील गुलाबी थंडीत कुलूच्या दऱ्याखोऱ्यातील टप्प्याटप्प्याची शेते निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तांबूस रंगांनी उजळून निघाली होती सफरचंदांचा मौसम संपल्याने सफरचंदाच्या झाडांनी तांबूस पिवळा रंग धारण केला होता वसंत ऋतूत कुलू खोरे शुभ्र फुलांनी उजळून निघते तर वर्षाऋतूत कुलूघाटीचे रूपांतर होते हिरव्यागार गालीच्यात ! येथील हिमाच्छादित उंच उंच पहाड, देवदारचे घनदाट हिरवेगार जंगल, प्रफुल्लित करणारे हवामान, सुंदर बहरलेली वनश्री, झुळझुळ वहाणारे झरे सगळे काही अलौकिकच ! निसर्गसौंदर्याची जणू खाणच असलेली कुलूची रंगीबेरंगी घाटी चित्रकार, छायाचित्रकार अथवा निसर्गप्रेमी पर्यटकालाही पृथ्वीवरील स्वर्गाचा जणू भास करून देते कुलू घाटीतील पहाड सुंदर ! भूमीही सुंदर आणि लोकही !

देवदेवतांचे वास्तव्य असलेली पौराणिक महत्त्वाची कुलूघाटी मनु, वसिष्ठ, महर्षी व्यास, शृंगी, परशुराम या ऋषीमुनींच्या वास्तव्याने पुनित झाली आहे कुलूघाटी शांत, रम्य व काहीशी गूढ वाटते कुलू म्हणजे केवळ भौगोलिक महत्त्वाचे एक पर्यटन स्थळ नाही, तर युगा-युगांतरातून निनादत वहाणाऱ्या बियासनदीच्या निनळ जलधारातून जणू जुन्या संस्कृतीची कहाणी गुंफली गेली आहे बियास जणू हिमाचलच्या सांस्कृतिक जीवनाचं अविभाज्य अंग बनली आहे.

बियासच्या काठाकाठाने फेरफटका मारून कुलूच्या आखडा बाजारात आलो थंडगार वारे वहात होते. कुलू शाल, कुलू टोपी यांची खरेदी करून रात्रीचे जेवण आटोपले व मुक्कामी परतलो

□ □

## पार्वती घाटीतील रम्य मणिकर्ण

कुलूघाटीतील वास्तव्यातील दुसऱ्या दिवशी भेट द्यायची होती मणिकर्णला उष्ण पाण्याच्या कुंडासाठी प्रसिद्ध असलेले मणिकर्ण आहे कुलूपासून चाळीस कि मी अंतरावर पार्वती घाटीमध्ये पार्वती नदी ही बियासची उपनदी

सकाळी स्नान वगैरे आटोपून कुलू स्टँडवर साडेआठच्या सुमारास आलो गरम आलू परोटे, दही असा नाष्टा झाला गरम चहाने थंड वातावरणातही उत्साह वाटू लागला नऊ वाजता बस मणिकर्णकडे निघाली सफरचंदाच्या बागाच्या सान्निध्यात दहा कि मी अंतर पार केल्यावर बस भून्तरच्या बाजारातील स्टँडवर थांबली. भून्तर येथे छोटा विमानतळ असून कुलू-मनालीला विमानाने येणाऱ्या प्रवाशांसाठी उन्हाळ्यात वाहतूक चालू असते. भून्तर बाजारापासून एक कि मी अंतरावर पुराणकालीन आदिब्रह्माचे मंदिर असल्याची माहिती मिळाली भून्तरमध्ये प्रवाशांनी बस खचाखच भरली भून्तर सोडल्यावर बस डाव्या बाजूला वळाली बियासचा पूल पार केल्यावर दगडांतून, खडकातून खळखळ वहाणाऱ्या पार्वतीनदीचा बियास नदीशी भुईंज गावी झालेला झालेला संगम दिसला बस आता पार्वती-

नदीच्या कडेकडेने धावू लागली उंच उंच डोंगरकडे कपाऱ्यातून खळखळ वहाणाऱ्या पार्वती नदीच दृश्य अलौकिक होत निसर्गसौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेत प्रवास चालू होता भुन्तरहून २३ कि मी अंतरावरील 'जारी' या पार्वतीनदीकाठच्या डोंगरावर वसलेल्या छोटया गावी बस थांबली जारी गावाहून १२ कि मी अंतरावर असलेले 'मलाणा' गाव हे कुलू घाटीतले शेवटचे गाव पुरातनकालात महर्षी जमदग्नी येथे राहिले होते

जारी गाव पार केल्यावर आठ कि मी अंतराचा प्रवास संपवून बस पार्वती नदीच्या कडेच्या कसोल गावी थांबली तेथे नदीकाठच्या पटांगणात मुक्कामासाठी टूरिस्ट हट व फॉरेस्ट रेस्ट हाऊस दिसले उंच उंच पहाडां-मधून वहाणाऱ्या पार्वती नदीचे दृश्य मोठ मनोरम होतं कसोलहून तीन कि मी अंतर पार केल्यावर बस एका प्रचंड पहाडाच्या पायथ्याशी साडे-अकराच्या सुमारास थांबली कंडक्टरने सांगितले की थोडे चालत गेले की मणिकर्ण आहे बस वळविण्यासाठी पुढे मार्ग नाही म्हणून बस येथेच थांबते कुलूला परतण्यासाठी शेवटची बस दुपारी तीनला आहे बसमधून प्रवासी उतरले अर्धा कि मी अंतर पायी पार केले आणि पार्वती नदीच्या पैलतीरावर जाण्यासाठी झूलता पूल दिसला तेवढयात उदय म्हणाला " आई, त्या पहा पलीकडे किती वाफा दिसताहेत " खरोखर, पलीकडच्या काठावरून कुंडातून निघणाऱ्या वाफा पाहून आश्चर्यचकित झालो वाफा इतक्या प्रचंड होत्या की जणू वाफांचे ढग जमले आहेत असा भास होत होता इतर प्रवाशांबरोबर हळूहळू अरुंद पुलावरून जाताना पूल हादरत होता उल्का उदयने आमचे हात धरले हादरणाऱ्या पुलावरून जाताना वरवर मजा वाटत होती पण मनात भीती वाटत होती पार्वती नदीचा खळाळणारा प्रवाह पुलाखालून अखंडपणे वहात होता पूल पार करून एका भव्य गुरुद्वाराजवळ आलो मणिकर्णला शीख गुरु नानक यांनी आपल्या शिष्यांसह भेट दिली होती म्हणून येथे गुरुद्वार उभारण्यात आले

पार्वतीघाटीच्या प्रवेशद्वारी वसलेल्या मणिकर्णसंबंधी पुराणात एक मजेशीर कथा आहे शिवपार्वती स्नानासाठी एकदा नदीत उतरले असता पार्वतीने कर्णफुले नदीच्या काठी काढून ठेवली दोघांनी मनसोक्त

जलविहार केला त्यानंतर नदीच्या काठावर आल्यावर काठावर काढून ठेवलेली कर्णफुले पार्वतीला नाहीशी झालेली दिसली शिवशंकराने देवांवर कर्णफुले शोधायची कामगिरी सोपवली शोध घेत घेत काही देव भूगर्भात पाताळात शेषाकडे गेले तरी पण कर्णफुले दृष्टीला पडली नाहीत कर्णफुले न सापडल्याने शंकराने रागाने तांडवनृत्य सुरू केले पृथ्वी हादरू लागली आता मात्र कर्णफुले चोरलेल्या शेपाला भूगर्भात दडून रहाणे अशक्य झाले. तो जेथून बाहेर पडला त्याठिकाणी पार्वती नदीच्या काठी उष्ण पाण्याचे झरे वहातात पार्वतीच्या कर्णातील मण्यामुळे ही घटना घडली म्हणून या जागेला ‘ मणिकर्ण ’ नाव पडले

मणिकर्णचे गुरुद्वारा बंदिस्त आहे बाजूला भिंतीची तटबंदी आहे प्रवेश-द्वारातून प्रवेश केल्यावर डाव्या हाताला स्त्रियांच्या स्नानासाठी बंदिस्त कुंड आहे तर उजव्या बाजूला पुरुषासाठी कुंड आहे कुंडात ताज्या गरम पाण्याचा अखंड प्रवाह येतो पाणी इतके उष्ण आहे की नदीतील थंड पाणी पंपाने उपसून गरम पाण्यात मिसळले जाते या पाण्यात एका प्रवाशाने तांदूळ भरलेली कापडाची पुरचुंडी काही वेळ ठेवली दहा मिनीटांत भात शिजून तयार ! प्रसाद म्हणून त्याने हा भात वाटला भर दुपारची वेळ होती तरी थंडी खूप होती नैसर्गिक उष्ण पाण्यात मनसोक्त स्नानाची मजा सर्वांनी लुटली स्त्रियांसाठी खास बंदिस्त स्नानगृह असल्याने व्यव-स्थित स्नान करता आले उदयला तर गरम पाण्यातून बाहेर निघवेना कारण अंग चांगले शेकून निघत होते कुंडातील उष्ण पाणी गंधकयुक्त व रेडिओॲक्टिव्ह गुणधर्म असलेले आहे येथील स्नानाने त्वचारोग कायमचे जातात असा समज आहे खरोखर मणिकर्ण येथील निसर्गाची किमया काहीऔरच आहे पार्वती नदीचे पाणी हात गारठण्याइतके थंडगार तर शेजारी कुंडातील पाणी चटके बसण्याइतके उकळणारे ! लॉजमध्ये एक बादलीभर गरम पाण्याला एक रुपया पडत होता येथे स्वच्छ गरम पाणी विनामूल्य, मनसोक्त आणि शिवाय औषधीही होते स्नान केल्याने कमालीचे ताजेतवाने वाटत होते प्रथम गुरुद्वारात जाऊन दर्शन घेतले, गुरुद्वाराच्या वरच्या मजल्यावरून पार्वती घाटीचे मनोरम दृश्य पाहू लागलो पार्वती नदी जल्लोषात वहात होती भर दुपारी उसळत्या तुषारातील दिसणारे इंद्रधनु-ष्याचे सौंदर्य पाहून देहभान हरपले मुख्य कुंडाच्या बाजूलाही उकळत्या

पाण्याची एकदोन कुंडे दिसत होती त्यातील पाणी अक्षरश उकळत होते.

गुरुद्वारातून खाली परतलो यात्रेकरूसाठी मोफत जेवण्याची सोय लंगर-मध्ये केली आहे / भात, कढी, रोटी, राजमाची आमटी व आचार असे जेवण मिळाले जेवणानंतर प्रत्येकाने आपले ताट वाटी व ग्लास स्वच्छ धुवून परत आणून द्यायचे ही त्याची अट चांगली वाटली भांडे स्वच्छ धुतले नसेल तर परत ते धुवायला लावत या गुरुद्वारात उतरण्यासाठी खोल्यांची सोय असून अंथरूण पांघरूणाचीही व्यवस्था आहे

गुरुद्वाराखेरीज मणिकर्ण गावात लक्ष्मीनारायणाचे प्राचीन मंदिर आहे. तेथील स्तंभावर नक्षीकाम सुरेख आहे. उत्सवाच्या वेळी प्राचीन मूर्तीची रथातून मिरवणूक काढतात मंदिराच्या पुजाऱ्याजवळ जुने 'कुलान्तपीठ महात्म्य हे हस्तलिखित आहे

मणिकर्णचा निरोप घेऊन झुलत्या पूलावरून परत आलो हादरणारा झुलता पूल अक्षरश डोळे मिटून पार केला, आणि सुटकेचा निश्वास टाकला दुपारी तीनला बसचा परतीचा प्रवास सुरू झाला वाटेत ठिक-ठिकाणी प्रवाशाची चढउतार चालूच होती रस्त्याच्या कडेने कुणीही कुठेही हात दाखवला तरी बस थाबत होती बसमध्ये मुळीच जागा नव्हती तरी एके ठिकाणी तीनचार गोऱ्यापान पहाडी स्त्रियांचा थवा आत शिरला एकीच्या हातात मोठे गाठोडे होते त्यात लोकर भरलेली होती गर्दीमुळे हे तर अगदी चेपून गेले होते तेवढ्यात एक पहाडी तरुणी त्याच्याशी काहीतरी बोलली काय बोलली ते कळले नाही पण त्यांचा चेहरा मात्र थोडा खुलला. तेवढ्यात बसमध्ये उभे राहून हातात सांभाळता न येणारे लोकरीचे गाठोडे त्या पहाडी स्त्रीने यांच्या मांडीवर सांभाळण्या-साठी ठेवले त्यावेळी त्याचा थोडा खुललेला चेहरा एकदम उतरला !

मणिकर्ण ते कुलू हा तीन तासांचा परतीचा प्रवास गाडीतील गर्दीमुळे असह्य झाला तरी पण मणिकर्णच्या भेटीने मिळालेल्या अद्भूत अनुभवा-मुळे ह्या त्रासाचे काही वाटत नव्हते उष्ण पाण्याच्या कुडाचा निसर्गाचा चमत्कार, पार्वतीघाटीतील निसर्गसौन्दर्य आणि पार्वतीच रौद्र स्वरूप विसरणे अशक्य आहे !

☐ ☐

# मनाली, प्रीती जडली तुजवरी

कुलू-मनाली चाळीस कि मी अंतराचा प्रवास सकाळी दहाला सुरू झाला कुलू आहे बाराशे मीटर उंचीवर, तर मनाली १९२६मीटर उंचीवर. बियास नदीच्या कडेकडेने कुलू खोऱ्यातील निसर्गसौन्दर्याचा आस्वाद घेत मनालीकडे प्रवास सुरू झाला होता. प्रथम आठ कि मी. अंतरावर रायसन नावाचे छोटेखानी गाव लागले. पर्यटन खात्याने बियास-नदीच्या काठी हिरव्यागार मैदानात बांधलेल्या लाकडी हट्स दिसत होत्या रायसन गाव सफरचंदाच्या बागासाठी प्रसिद्ध आहे. कुलू ते मनालीच्या मध्य अंतरावर आहे कातरेन गाव कातरेन प्रसिद्ध आहे मत्स्यउद्योगासाठी. कातरेन हा कुलू खोऱ्यातील जास्तीत जास्त रुंदीचा भाग. संपत आलेल्या सफरचंदांच्या सीझनमधली शेवटच्या बहराची सफरचंदे स्टँडवर खरेदी केली. सफरचंदांची गोडी अवीट होती बसने कातरेन सोडले. बस आता हळूहळू चढ चढू लागली .' पतलीकुल ' नावाच्या छोटेखानी गावाजवळ बस थांबली. येथून बियासनदीवरचा झुलता पूल ओलांडल्यावर पाच कि मी अंतरावरील कुलू खोऱ्यातील जुने प्रसिद्ध ' नग्गर ' गाव लागते. पतलीकूल गेल्यावर पुढे रस्त्याच्या कडेला बटाटयाच्या पोत्याच्या असंख्य

थप्प्या लागलेल्या दिसत होत्या. मनालीच्या पुढे असलेल्या रोहतांग खिंडीच्या पलीकडील लाहुल स्पीती खोऱ्यात बटाट्याचे अमाप पीक येते आठ दहा दिवसातच रोहतांग खिंडीत बर्फवृष्टी होऊन खिंड सहा महिने बंद होणार होती म्हणूनच बटाटे तेथून येथे आणून ठेवले होते आणि येथूनच ते सर्वत्र विक्रीसाठी नेण्यात येतात नंतर वलाथ गावाच्या अलीकडे गरम पाण्याची कुंडे आहेत. स्नानासाठी तेथे गाड्या थांबून उतरलेल्या प्रवाशांची गर्दी दिसत होती

दुपारी बाराच्या सुमारास बस मनालीला पोहोचली प्रथमदर्शनीच मनालीचं किती मोहक रूप दिसलं मनाली आहे कुलू खोऱ्यातील शेवटचं सुंदर रमणीय स्थान उंच उंच पाईन वृक्षांनी मनालीचे पहाड झाकून टाकले होते मनाली आहे एक छोटेसा नी चार पाच हजार वस्तीचे गाव पुराणकालात मनू यांची याठिकाणी तपोभूमी होती. मनालीचे पूर्वीचे नाव मन्वालय—मनाल. महर्षी मनूचे निवासस्थान येथे अजूनही आहे असे सांगतात की सर्व सृष्टीत जलप्रलय झाल्यानंतर मनुमहाराजाची नौका येथेच लागली हिमाचल प्रदेशचे लोककवी श्री गोपाल दत्त यांनी या संबंधी म्हटले आहे

यहीं कहीं थे मनु गीत गाते
बैठे शिला पे मनको रिझाते
श्रद्धा यहीं हो मनु यज्ञ तृप्ता
जागी जगाता जग शून्यतासे
देखे यहीं थे मनुने निराले
दृश्य नये औ मेघ काले
नौका यहीं पे मनुकी लगी थी
गाथा यहीं से जग की चली थी ।

सृष्टीची प्रथम निर्मिती जेथे झाली असे हे मनाली महाभारत काळात हिडिंबादेवी याच पहाडी प्रदेशात वास्तव्य करून राज्य करीत असे इंग्रजांच्या काळात येथील थंड हवेवर आणि निसर्गसौंदर्यावर लुब्ध होऊन

एका इंग्रजाने मनालीच्या पहाडांच्या बाजूला एका टेकडीवर एक छोटे-खानी घर बांधल. 'डफदरबार' हे त्या वेळच्या वसाहतीच नाव हाही भाग आजही मौजूद आहे.

मनालीच्या स्टँडवर पोहोचल्यावर सामान उतरवून घेईपर्यंत उदय व यशवंत स्टँडजवळच्या दहा मिनिटाच्या अंतरावरील पर्यटन कार्यालयात गेले मनालीच्या जुन्या टूरिस्ट बंगल्यात चार बेड असलेल्या सूटचे रिझ-र्वेशन त्यांना मिळाले. तसेच 'रोहतांग पास' ला जाणाऱ्या मिनीबसचे रिझर्वेशन तिसऱ्या दिवसाचे मिळाले मनाली–सिमला या परतीच्या प्रवा-साचेही रिझर्वेशन करून ठेवले. मुख्य तिन्ही गोष्टी साधल्यावर हे स्टँडवर परतले. हमालाकरवी सामान घेऊन मनालीच्या मुख्य रस्त्याने चालत चालत टूरिस्ट बंगल्याकडे निघालो बाजारचा रस्ता संपल्यावर थोड्याशा चढाच्या मार्गाने गेल्यावर उंचच उंच देवदार वृक्षाचे राखीव वन दिसले. त्याच्या शेजारी आहे सर्कीट हाऊस व नेहरू याठिकाणी इ स १९५८ साली विश्रांतीसाठी वास्तव्याला होते सर्किट हाऊसच्या डाव्या बाजूला रस्त्याने वळाल्यावर मोठ्या आवारात प्रथम दिसला नवा तीन मजली टूरिस्ट बंगला नव्या बंगल्यात प्रत्येक रूममध्ये दोन बेड आहेत तर आम्ही उतर-लेल्या जुन्या बंगल्यात चार बेड्स होते कुटुंबाला उतरण्यासाठी जुना बंगला चांगला प्रशस्त आहे बंगल्यात पोहोचल्यावर सामान लावले उबदार ब्लँकेट, गालीचा, उबदार पडदे, कपाटे, संलग्न बाथरूम या सर्व सोयी होत्या फक्त गीझर नव्हता पण गरम पाणी मिळणार होते खिडकीवरील पडदे बाजूला सारले तेव्हा उंच पहाड व त्यावरील उंच देवदार याचे दर्शन झाले हातपाय धुवून कँटीनमध्ये गेलो. चहा, ब्रेड घेऊन उत्साह आला

मनालीच्या भेटीतील पहिले ठिकाण होते हिडिम्बादेवी मंदिर टूरिस्ट बंगल्याजवळ छोट्या पहाडावर 'डुंगरी' येथे हे मंदिर साधारण दोन कि. मी अंतरावर आहे. तसेच शॉर्टकटची पाऊलवाटही आहे अर्ध्या तासातच उंच देवदार वृक्षाचे वन लागले हे देवदार वृक्ष शेकडो वर्षांपूर्वीचे जुने मानले जातात या वृक्षांच्या सान्निध्यातच हिडिम्बादेवीचे पुरातन मंदिर आहे हिडिम्बा ही मनाली येथील निषादकन्या व हिडंब राक्षसाची बहीण. लाक्षागृहात जळण्यापासून वाचल्यानंतर पांडव हिडिम्बासुर देशात प्रथम

आले एका पहाडावर महाकाय भीम झोपला असताना त्याच्या पौरुषावर व रूपावर लुब्ध होऊन हिडिम्बाने भीमाकडे प्रेमयाचना केली भीमाने माता कुंतीच्या सल्ल्याने हिडिम्बाबरोबर विवाह केला वर्षभराच्या गृहस्थाश्रमात हिडिम्बेला घटोत्कच हा पुत्र झाला पुढे तो हिडिम्बासुर या पहाडी प्रदेशाचा राजा झाला महाभारतयुद्धात घटोत्कच पांडवांच्या बाजूने लढला व अर्जुनाला वाचवण्यासाठी स्वत धारातीर्थी पडला त्यानतर हिडिम्बादेवी येथेच राहिली व राज्य पाहू लागली.

हिडिम्बादेवीच्या मदिराचे शिखर एखाद्या पॅगोडासारखे आहे. लाकडी प्रवेशद्वारावर कृष्ण, गणेश, धनुर्धारी अर्जुन, देवेंद्र, राधाकृष्ण, शिव यांच्या मूर्ती आहेत तसेच दरवाजावर नवग्रहाचा पट्टा कोरला आहे हे मदिर म्हणजे काष्ठकलेचा उत्कृष्ट नमुना होय. उजव्या बाजूला टकरी लिपीत जुना लेख कोरला आहे त्यानुसार राजा सिधसिंग याचा पुत्र राजा बहादूरसिंग यानी इ स १५५३ मध्ये हे मदिर बांधले मदिरात आठ भुजा असलेली हिडिबादेवीची मूर्ती आहे खाली सिंह कोरला असून एका प्रचड शिळेखाली देवीचे चरण आहेत हे मूळ मदिर पांडवांनी बाधले होते कालातराने ते जळाले. उत्खननात त्याचे अवशेष सापडले पुराणवस्तु सशोधन खात्याचे लोक मदिराची साफसफाई करीत होते त्यातील एकाने सागितले की येथे नवरात्रात मोठा उत्सव होतो तसेच मे महिन्यात तीन दिवसाची जत्रा भरते

हिडिम्बादेवी मदिर पाहून निघालो तेव्हा सायकाळचे पाच वाजले होते. सूर्यनारायण केव्हाच मावळले होते थडगार वारे सुटले होते. परतताना वाटेत काही कॉलेज तरुण दिसले ते मराठीत बोलत होते बऱ्याच दिवसानी मराठी ऐकायला मिळाले म्हणून केव्हढा आनद झाला. त्याची ओळख करून घेतली ते पुण्याच्या अभिनव कला महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. घनदाट देवदार वृक्षांच्या सान्निध्यात उभे राहून मराठीत गप्पा मारताना मौज वाटत होती टूरिस्ट बगल्यावर पोहोचलो तेव्हा खूप अधार पडला होता तपमान २° से पर्यंत उतरले होते कँटीनमध्ये अगदी कुडकुडत पोहोचलो कसेबसे जेवण आटोपले वेटर म्हणाला की आणखी आठ दहा दिवसानी बर्फ पडेल मनालीचे रस्ते, घरे, वृक्ष सारे काही बर्फाने आच्छादून



रोहताग पास, मनाली लेह मार्ग



निसर्ग सुंदर खजियार



वाइल्ड फ्लॉवर हॉल, सिमला

जाईल बंगल्यावर परतलो तेव्हा चांगलेच गारठलो. उबदार डबल ब्लॅकेट अंगावर घेतले तेव्हा कुठे बरे वाटले

मनालीच्या वास्तव्यातील दुसरा दिवस ! पहाटेच वॉचमनच्या नावाने कुणी तरी मारलेल्या हाका बराच वेळ ऐकू आल्या मग काचा फोडल्याचा खळ्ळ आवाजही ऐकू आला सकाळी उठल्यावर कळले की रात्री एक कुटुंब मुक्कामाला आले व त्याना पहाटेच काश्मीरकडे जायचे होते. पण वॉचमनने रात्री व्हरांड्याच्या मुख्य गेटला कुलूप लावले हाका मारूनही तो उठला नाही तेव्हा ते कुटुंब व्हरांड्याच्या काचा फोडून बाहेर पडले व निघून गेले. त्याची स्वतःची कार होती सकाळी सकाळीच काचांचा ढीग पाहून वॉचमनने कपाळाला हात लावला

सर्व आवरून बंगल्याच्या आवारात उभे राहिलो तेव्हा पाईन वृक्षांनी आच्छादलेल्या हिमालय पर्वताच्या चकाकणाऱ्या हिमशिखराआडून झालेल्या सूर्यनारायणाच्या दर्शनाने मोहित झालो. खरच, मनालीवर निसर्गाचा किती वरदहस्त आहे मनालीवर त्यामुळेच प्रीती जडली होती. हिमालयाच्या लोभस दर्शनाने महाकवी कालिदासानेही हिमालयाची स्तुती केली आहे –

अस्त्युत्तरस्यां दिशी देवतात्मा
हिमालयो नाम नगाधिराज
पूर्वापरौ तोयनिधी वग्याह्य
स्थित. पृथिव्या इव मानदण्ड

पूर्व आणि पश्चिम समुद्रापर्यंत पोहोचलेला, पृथ्वीचा जणू मानदंडच असा हिमालय नावाचा देवतास्वरूप पर्वतराज उत्तरदिशेला पसरलेला आहे

टूरिस्ट बंगल्यात आवरून पर्यटन कचेरीजवळ आलो हॉटेल आदर्शमध्ये चहा व ब्रेकफास्ट घेतला अनेक पाश्चिमात्य पर्यटकानी हॉटेल गच्च भरले होते. मनालीच्या वास्तव्यातील दुसऱ्या दिवशी सकाळी भेट द्यायची होती कुलू खोऱ्यातील मनालीहून १८ कि. मी. अंतरावरील ऐतिहासिक

नग्गर या गावाला. नग्गरची भेट आटोपून दुपारी मनालीला परतायचे होते नंतर भेट द्यायची होती मनालीजवळील वसिष्ठ कुंडाला

नग्गरला जाणारी बस पर्यटन कचेरीजवळ उभी होती. मनाली-नग्गर बस साडेआठ वाजता निघाली बियास नदीच्या डाव्या तीराच्या कडेकडेने बसचा प्रवास सुरु झाला. प्रथम जगत्सुख या छोटेखानी गावाजवळ गाडी थांबली जगत्सुख ही कुलूची सर्वात जुनी राजधानी. बारा राजांनी तेथे राज्य केले या गावात कळस असलेले, शिल्पकृतींनी सजलेले प्राचीन शिव-मंदिर आहे तसेच गायत्रीदेवीचेही एक मंदिर आहे गायत्रीदेवीचे हे मंदिर भारतातील एकुलते एक मानले जाते जगत्सुख गेल्यानंतर बस बियासच्या डाव्या तीरावर वळणाकार रस्त्यांनी धावू लागली हिमालयाच्या पहाडांची शोभा पहात पहात प्रवास सुरु होता नग्गर गावाच्या पायथ्याशी बस थांबली बरोबर सामान नसल्याने चट्कन उतरलो वेळ सकाळची साडेनऊची सूर्यदेव उंच पहाडाआड लपल्याने रस्त्यावर ऊन नव्हते पर्वत शिखरांवर मात्र ऊन दिसत होते. थंड झोंबणारे वारे हैराण करीत होते. दोन कि. मी अंतराचा चढाचा वळणाकार रस्ता पार करून नग्गर कॅसलजवळ अर्ध्या तासात पोहोचलो नग्गरचा हा कॅसल छोटा किल्ला राजा सिद्धसिंह याच्या काळात १६ व्या शतकात बांधला गेल्याचा उल्लेख कुलूच्या गॅझेटियरमध्ये आहे कॅसलच्या जवळ डाव्या हाताखाली काही दगडी शिळा रोवलेल्या दिसल्या कुलूच्या मृत राजाराणीच्या स्मरणार्थ त्या उभारल्या आहेत त्यांपैकी एक आहे कुलूच्या राणीची. त्यासंबंधी दर्दभरी कथा ऐकायला मिळाली

नग्गरच्या या कॅसलजवळ एकदा कुलूच्या राजाने कुस्त्यांचा मेळावा आयोजित केला होता राजा व राणी कॅसलच्या बाल्कनीतून कुस्त्यांचा सोहळा पहात होते त्यावेळी राजाने सूचकतेने राणीला प्रश्न केला "तुला या ठिकाणी कोणत्या पुरुषाचे रूपसौंदर्य आवडले ?" राजाला वाटले की राणी उत्तर देईल, 'राजा तुमच्या सौंदर्य सौन्दर्याला तोड नाही' पण राणीने कुस्त्या खेळणाऱ्या एका उमद्या तरुणाकडे बोट दाखवून सांगितलं की, हा तरुण सुंदर व उत्तम सौष्ठवाचा आहे झाले! अपेक्षित उत्तर न आल्याने राजाचा मानभंग झाला .त्या तरुणाबद्दल असूया उत्पन्न होऊन

राजाने अनिवार रागाने त्या तरुणाला तिथल्यातिथे शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली शिक्षा तेथेच अमलातही आणली राजाच्या अती क्रौर्याने राणीला एवढा धक्का बसला की तिने कॅसलच्या बॅल्कनीतून स्वतःला पहाडाखालच्या दरीत झोकून देऊन प्राणत्याग केला राणीच्या स्मृतिप्रीत्यर्थ कॅसलजवळ उभारलेली शिळा तिच्याभोवती गुफलेल्या या भावनोत्कट प्रसगाची आठवण करून देते नग्गरच्या या कॅसलचे सध्या रेस्ट हाऊसमध्ये रूपांतर केले आहे तेथे वास्तव्याला आलेले परदेशी पर्यटक दिसले

कॅसल पाहून नग्गरची सुप्रसिद्ध आर्ट गॅलरी पहाण्यासाठी निघालो कुलू राज्याची जगत्सुख येथे असणारी राजधानी विसुधपाल यांच्या काळात नग्गरला स्थलांतरित झाली. सतराव्या शतकापर्यंत तेथे अकरा राजांनी राज्य केले पूर्वी नग्गरमार्गे तिबेटमधून चीनशी व्यापार होई आर्टगॅलरीकडे जाताना नग्गर गावातील पॅगोडासारखी असणारी अकराव्या शतकातील गौरीशकर, त्रिपुरासुदरीदेवी, चतुर्भुज विष्णु अशी चारपाच पुरातनमदिरे दिसली

नग्गर कॅसलहून चढाचा रस्ता पार करून अर्ध्या तासातच आर्टगॅलरीच्या आवारात पोहोचलो पहाडाच्या कुशीतील छोटेखानी बगल्यात प्रसिद्ध रशियन चित्रकार कर्नल निकोलस रोरिक याच्या निसर्गचित्राची आर्ट गॅलरी आहे निकोलस रोरिक यांचा जन्म रशियामधील सेंट पीटर्सबर्ग येथे ९ ऑक्टोबर १८७४ रोजी झाला चीन, तिबेट मध्य आशिया येथे भटकती केल्यावर ते हिमालयाच्या सान्निध्यात निसर्गचित्रे काढण्याच्या निमित्ताने इ स १९२७ मध्ये आले नग्गरच्या निसर्गसौंदर्याने ते एवढे मोहित झाले होते की एखाद्या ऋषीमुनीप्रमाणे येथे हिमालयात राहिले. मडीच्या राजाकडून हॉल इस्टेट म्हणून ओळखली जाणारी ही जागा १९२८ मध्ये त्यांनी खरेदी केली वीस वर्षे ते तेथे राहिले भारतीय कलासस्कृती-बद्दल त्यांना आत्मीयता वाटू लागली कर्नल रोरिक हे पडीत नेहरूचे मित्र होते पडितजी १९४२ साली येथे आले तेव्हा त्यांच्यासमवेत राहिले होते. सात हजारावर चित्रे काढणारे रोरिक केवळ चित्रकारच नव्हते. तर कवी, लेखक व पुराणवस्तुसशोधकही होते.

हॉल इस्टेट मध्ये पोहोचल्यावर तेथील व्यवस्था पहाणाऱ्या एका कुलू स्त्रीने कुलूप उघडून आम्हाला आतील दालनात नेले आतील तीन दालनांत कर्नल रोरिक याची निसर्गचित्रे लावली आहेत या निसर्गचित्रांत हिमालयाचे निरनिराळे मूड्स चित्रांकित केले आहेत चित्रकलेविषयी माझा फारसा अभ्यास नाही पण ही निसर्गचित्रे जरा भडक रंगाची वाटली एका दालनात वॉलनट या लाकडाच्या कोरीव काम केलेल्या काही पेट्या आहेत वॉलनट लाकडाला वाळवी कधीही लागत नाही चित्रकार कर्नल रोरिक इ. स. १९४७ साली मरण पावले. त्यानंतर त्यांच्या मालकीची ही इस्टेट सोव्हेटोसल्व रोरिक या त्यांच्या मुलाकडे आली हे सुद्धा चित्रकार असून आपल्या पित्याची उज्ज्वल परंपरा ते पुढे चालवीत आहेत त्यांनी लाहुल स्पीती खोऱ्यातील निसर्गचित्रे काढली आहेत विशेष म्हणजे त्यांच्या पत्नी भारतीय -- बंगाली असून त्यांचे नाव देविकाराणी आहे. या दोघांचे वास्तव्य बंगलोरला असून उन्हाळ्यात ते येथे येतात अशी माहिती मिळाली आर्टगॅलरी पाहिल्यावर आवारात चक्कर मारली बंगल्याचा बाकीचा खाजगी निवासाचा भाग बंद होता निघण्यापूर्वी तेथील व्हिजीट बुकमधील थोरामोठ्यांचे अभिप्राय वाचायला मिळाले.

आर्टगॅलरी पाहून त्वरेने मोठ्या रस्त्यावरील स्टॉपजवळ आलो हिमालयाच्या दर्शनासाठी आलेले काही परदेशी पर्यटक तेथे भेटले त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी हिमालयातील रोहतांगपर्यंतच्या दिसणाऱ्या पर्वत शृंखलांच्या निसर्ग सौंदर्याने तृप्त झालो असे सांगितले गर्दीपासून दूर दूर अशा येथील शांत व अद्‌भुत वातावरणात समाधान लाभते असेही ते म्हणाले आर्ट गॅलरीच्या निमित्ताने पर्यटक नगरला येतात तसं पाहिलं तर तीन हॉलमधील ही शेदीडशे निसर्गचित्रे कुलू अथवा मनाली येथे एखादे छोटं म्युझियम स्थापून ठेवता आली असती पर्यटकाचा या आडवळणी गावाचा हेलपाटा वाचला असता पण हिमालयाचे नगरहून जे अनुपम दर्शन होते त्याला मात्र पर्यटक मुकतील. हिमालयाचे सौंदर्य पहात पहात, चढ चढत आर्टगॅलरीकडे जाताना एक वेगळाच आनंद मिळतो

मनालीकडे परत जाण्यासाठी दोन तास थांबलो पण बस मिळाली नाही., त्यामुळे काळजी वाटत होती. तेवढ्यात एक जीप आली त्यातील ड्रायव्हर

म्हणाला की, वीस रुपयास तुम्हाला मनालीला पोहोचवतो बस लवकर येण्याची आशा नाही सर्वांना हायसे वाटले त्याने सांगितले की थेट मनालीच्या मार्गाने जाण्याऐवजी बियास ओलाडून पतलीकूल येथे मिळणाऱ्या कुलू–मनाली हायवेने जाऊ उतार असल्याने विना पेट्रोल जीप हळू हळू बियासच्या झुलत्या पुलापर्यंत आली पूल ओलाडून पतलीकूलला पोहोचलो मनालीला दुपारी एकच्या दरम्यान आलो

ज्या जीपने नग्गरहून मनालीला आलो त्या जीपच्या ड्रायव्हरला विचारले की वसिष्ठ कुंडाकडे स्नानासाठी जायचे आहे जाऊन परत येण्यासाठी किती पैसे घ्याल ? त्याने सांगितले की ही ट्रीप वीस रुपयात होईल तसं पाहिल तर वसिष्ठ गाव मनालीपासून चार कि मी अतरावर बियास नदीच्या डाव्या तीरावर आहे पुष्कळ पर्यटक पायीच वसिष्ठ येथे चक्कर मारतात पण आम्ही नग्गरच्या भेटीत पायी चालण्याने थकलो होतो परत पायी चालायला उत्साह नव्हता तेव्हा जीप ठरवली व पधरा मिनिटांतच टेकडीवरील रस्त्याजवळ पोहोचलो जीप तेथे थाबली पायऱ्या उतरून हिमाचल पर्यटन विभागाने नवीन बांधलेल्या स्नानघरापर्यंत पोहोचलो. वसिष्ठ कुडातील उष्ण पाण्याच्या झऱ्यातून पाणी नळाद्वारे या स्नानगृहात खेळवले आहे येथे दोन प्रकारची स्नानगृहे आहेत एक आहे साधे तर दुसरे डिलक्स साध्या बाथरूमचा चार्ज माणशी तीन रुपये तर डिलक्सचा पाच रुपये निसर्गनिर्मित फुकट मिळणाऱ्या गरम पाण्यावर पैसे मिळवण्याचा हा अजबच प्रकार ! कुलूजवळील मणिकर्णला गुरुद्वाराच्या आवारातील पार्वती नदीवरील उष्ण पाण्याच्या कुडात स्नान करण्याची किती उत्तम सोय होती शिवाय चार्जही काही नव्हता या उलट येथे बाथरूमच्या नावाखाली पैसे उकळण्याचा प्रकार तसेच बाथरूमसाठी बुकिंग करा मग नबर लागेल व नबर लागायला किती वेळ लागेल हे सागता येणार नाही असे अरेरावीचे उत्तरही सेवकाकडून मिळाले तेव्हा आंघोळीचा नाद सोडावा की काय अशा विचारात असतानाच दुसऱ्या एका चौकीदाराने आस्थेवाईकपणे सुचविले की वरच्या रस्त्याने एक कि मी अंतरावर वसिष्ठ गाव आहे तेथे मूळ कुड आहे तेथे फी नाही शिवाय सोयही उत्तम आहे तेथे जाऊन स्नान करा त्याप्रमाणे रस्त्यावर आल्यावर जीप

ड्रायव्हरला सर्व परिस्थिती सांगितली. त्याने वसिष्ठ गावात पोहोचवले या छोटेखानी गावात पूर्वी वसिष्ठ ऋषींच्या आश्रम होता. गावातच वसिष्ठ मंदिराच्या आवारात गरम पाण्याचे कुंड आहे स्त्रियांसाठी बंदिस्त स्नानगृह होते. येथे प्रत्येकासाठी स्वतंत्र बाथरूम नव्हते पण स्नानासाठी चार्ज नव्हता, या उष्ण व गंधकयुक्त पाण्यातील स्नानाने ताजेतवाने व उत्साही झालो मंदिरातील वसिष्ठ ऋषींच्या काळ्या रंगाच्या विशाल उभ्या पाषाणमूर्तीचे दर्शन घेतले.

मनालीच्या वास्तव्यातील दुसऱ्या दिवशी नग्गर व वसिष्ठ कुंड पाहून दुपारी चारच्या सुमारास मनालीच्या बाजारच्या रस्त्यावर पोहोचलो भूक खूप लागली होती. पण जेवणाची वेळ टळून गेल्याने फराळावर भागवले. मग मनालीच्या बाजाराच्या रस्त्याने फेरफटका मारला सीझन संपत आला होता मफलर, कानटोप्या अशी थोडीफार खरेदी केली. सफरचंदांचाही सीझन संपला होता 'विंटरग्रीन' या प्रकाराचे हिरवेगार सफरचंद बाहेरून हिरवे, कच्चे दिसत होते. पण होते खूप गोड दुकानदाराला विचारले की "अजून किती दिवस सीझन आहे?" तो म्हणाला–" बस आखरी दो चार दिन। फिर बर्फ गिरेगा तो मनालीके रास्तेपर कुत्ताभी नही दिखेगा!" रस्त्यावरचा फेरफटका संपला तेव्हा संध्याकाळचे पाच वाजून गेले होते थंडगार वारे झोंबू लागले टूरिस्ट बंगल्यात लगेच परतलो. रात्रीचे जेवण कँटीनमध्ये आटोपले. मनालीची दोन दिवसांची भेट अविस्मरणीय होती आता कुलूघाटीतल्या भेटीचे शेवटचे लक्ष्य होते रोहतांग पास.

□ □

# ' प्रेतांच्या मैदानाची ' रोमांचकारी सफर

वेळ सकाळची सातची. थंडी कडाक्याची सर्वांच्या एकमताने आंघोळीला बुट्टी देण्याचा ठराव मंजूर झाला हातपाय धुऊन आवरले आठच्या सुमारास झोंबणाऱ्या थंडीत कुडकुडत पर्यटनकचेरीच्या आवारात पोहोचलो बस रोहतांगकडे नऊ वाजता निघणार होती समोरील आदर्श हॉटेलमध्ये आमलेट, ब्रेड, चहा असा नाष्टा आटोपला पावणे नऊला मिनी टूरिस्ट बस आली रिझर्वेशन अगोदर काढलेले असल्याने पुढच्या सीट मिळाल्या होत्या उदय उल्काने खिडकीजवळच्या सीट पटकावल्या नऊ वाजता बस रोहतांगकडे निघाली गाडीतील निम्मे प्रवासी महाराष्ट्रीयन होते. तसेच स्पेनहून एकटी आलेली एक युवतीही होती. ती मेडिकलची विद्यार्थिनी होती काही हिप्पी पण होते सर्व प्रवासी थंडीशी सामना देण्यासाठी स्वेटर्स, मफलर्स, कोट, शाली, हातमोजे, कानटोप्या यांच्यासह जय्यत तयारीत होते.

मनालीची उंची आहे १९२६ मीटर तर रोहतांग पासची आहे ३९७८ मीटर मनाली–रोहतांग या ५१ कि मी अंतरामध्ये दोन हजार मीटर उंचीचा चढ चढायचा होता मनाली रोहतांग रोडवर पाच कि मी. अंतर

पार केल्यावर डाव्या बाजूला दूरवर दिसणाऱ्या एका पर्वताकडे बोट दाखवून गाईडने सांगितले की– हा इद्रकील पर्वत तेथे अर्जुनगुफा आहे. कौरवाबरोबर द्यूत खेळून सर्वस्व गमावलेले पांडव वनवासाला गेले वन-वासात असताना व्यासऋषींच्या आदेशानुसार अर्जुन या इंद्रकील पर्वतावर येऊन पोहोचला. तेथे इद्राचे दर्शन झाले मग अर्जुनाने शकराला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या केली शकराने किराताचे रूप घेऊन अर्जुनाची परीक्षा घेतली त्याच्याशी युद्ध केले

**अर्जुनस्य परीक्षार्थं सग्रामम् करो शिवा**

**ददौ तस्मै स्व शस्त्राणि वर अभयमेवच ॥**

अर्जुनाच्या बल व पराक्रमाने प्रभावित होऊन त्याला पाशुपतअस्त्र प्रदान केले

थोडे अतर पार केल्यावर बस रस्त्याच्या कडेला असलेल्या कुडाजवळ थाबली गाईडने सागितले की, हे नेहरु कुड रोहताग येथील खिडीतील भृगुतीर्थातील पाणी या कुडात येते या कुडातील पाणी आयुर्वेदिक जडी-बुटीमिश्रीत औषधी गुण असलेले असे मानले जाते प नेहरु जेव्हा मनालीला येत तेव्हा या कुडाचे पाणी त्याना पुरवले जाई म्हणून या कुडाला नेहरु कुंड नाव पडले या पाण्याच्या प्राशनाने माणूस चिरतरुण राहातो असे गाईडने सांगितले तेव्हा कुडातील पाणी पिण्याची प्रवाशांमध्ये अहमअहमिका लागली

बारा कि मी अतर पार केल्यावर कोठी हे छोटे गाव लागले तेथून मोठमोठ्या पहाडाचे दृश्य मोठे विलोभनीय दिसत होते कोठीजवळ बियास साधारण एक कि. मी खोल अरुद दरीतून वहाते या खोल खडकात निळसर रगाचे हिमपक्षी वास्तव्य करतात खोल खडकातून वहाणाऱ्या बियासचे दृश्य चित्तथरारक होते कोठी गाव ओलांडले आणि रोहतागकडे जाणाऱ्या चढाच्या रस्त्याचा पहिला टप्पा सुरू झाला रस्त्यावर मेंढपाळ शेळ्यामेंढ्याचे मोठमोठे कळप घेऊन जाताना दिसत होते थोड्याच

दिवसात सर्वत्र बर्फवृष्टीला सुरुवात होणार होती म्हणूनच मेंढपाळ आपले शेळ्यामेंढ्यांचे कळप घेऊन पायथ्याकडे जाताना दिसत होते लांब लांब लोकर असलेल्या या मेंढ्यांच्या कळपाबरोबर संरक्षणासाठी भलेदांडगे, लांडग्यासारखे कुत्रे दिसत होते बस एका पहाडावरून दुसऱ्या प्रचंड पहाडावर गोलाकार वळणे घेत आकाशाच्या दिशेने जणू झेपावत होती ढग अगदी जवळ आल्यासारखे वाटत होते मागे पाहिले तर पहाडावरचे वळणाकार रस्ते सापाच्या वेटोळ्यांसारखे दिसत होते. बसचा वेग मंद होता आस्ते आस्ते बस चढाचा रस्ता चढत होती रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी लोखंडी चकचकीत पाईप रोवलेले दिसत होते त्यावर पाच मीटरपर्यंत खुणा होत्या. हिमवृष्टी झाल्यावर रस्त्याचा अचूक मार्ग ओळखण्यासाठी व बर्फाचा थर रस्त्यावर किती मीटर उंचीचा आहे हे ओळखण्यासाठी त्याचा उपयोग होतो बर्फ पडल्यानंतर चेन असलेल्या मोटारींनी रस्त्यावरील बर्फ सरकून वाहतूक थोडीफार खुली करता येते असे गाईडने सांगितले रस्त्यावर ठिक-ठिकाणी पहाडांवर लिहिले होते, किंवा बोर्ड लावले होते की – ' टेढीमेढी सडक खुबसूरत है लेकिन खतरनाक भी है । पहले बचाव बादमें किस्मत, जल्दी भी क्या है ? '

एका बर्फाच्छादित शिखराकडे निर्देश करीत गाईडने सांगितले की ही ' सोलंग व्हॅली ' आहे सोलंग व्हॅलीतील ग्लेसियरचे – हिमनदीचे प्रथम दर्शन झाले आणि बर्फाच्छादित शिखराचे अगदी जवळून दर्शन झाल्याने प्रवा-शाच्या आनंदाला उधाण आले रस्त्यावर ठिकठिकाणी रस्तारुंदीचे काम सुरू होते खरोखर, रोहतांगसारख्या अवघड मार्गावर रस्ता निर्माण कर-ण्याचं काम केवळ कौशल्याचेच नव्हे तर खूप जोखमीचेही आहे हा रस्ता निर्माण करताना शेकडो मजुरांचं बलीदान झालं अचानक झालेल्या हिमवृष्टीत कित्येकदा मजूर गाडले गेले एक विलक्षण करुण हकीकत तर अशी आहे की एक मजूर स्त्री आपल्या लहान मुलाला स्तनपान देत असताना अचानक हिमवृष्टीत गाडली गेली सहा महिन्यानंतर बर्फ वितळल्यावर हवा स्वच्छ झाल्यावर मार्ग परत खुला करताना ती मृत माता त्या मुलाला छातीला कवटाळलेल्या अवस्थेतच दिसली !

थोडे अंतर पार केल्यावर रहाला फॉलजवळ बस थांबली बियास नदी येथे उंचावरून झेपावून धबधब्यासारखी पडते रहाला नावाचा राक्षस महाभारतकालात या पहाडी प्रदेशात रहात असे तो लोकांना फार त्रास देत असे. भीमाने या राक्षसाला ठार मारले रहाला फॉलची उंची समुद्र-सपाटीपासून ८५०० फूट आहे रोहतांग खिंडीकडे चढाचा शेवटचा मोठा टप्पा येथून सुरू झाला भर दुपारीही गार वारे झोंबत होते रस्त्यावर काही काही ठिकाणी बर्फाचा थर जमला होता हिमालयातील हिमवृष्टीच्या पहिल्या दर्शनाने बसमधील मुले आनंदाने टाळ्या वाजवू लागली दुपारी बाराच्या सुमाराला बस घाटमाथ्यावर थांबली तेथे दोन छोटी उपहारगृहे दिसली बसमधून उतरल्यावर भर दुपारीही वहाणाऱ्या जोराच्या सुसाट वाऱ्याने सर्व प्रवासी हैराण झाले तेथील उपहारगृहे तिबेटी लोक चालव-तात. सर्वांनी भात, राजमाची आमटी, चहा, ब्रेड घेतला प्रचंड वाऱ्या-मुळे काही सुचत नव्हते इथ इतका वारा, तर मग रोहतांगवर किती असेल अशीच धास्ती प्रत्येकाला वाटू लागली. एका महिला प्रवाशाने तर शेवटी उपहारगृहाच्या चालकांना विचारलेच–"हम यहाँसे उड तो नही जायेंगे?" तिबेटी चालक हसून म्हणाले, "नही बहेनजी, ऐसा नही होगा." पण खरोखर वारा तुफान होता लाहुलवासी साहसी पदयात्री हिवाळ्यात बस बंद झाल्यावर मुक्कामाला येथे थांबतात तरी पण मुक्काम म्हणजे जणू मृत्यूला आमंत्रण ! या गावाचं नाव होतं मढी ! येथील एक ऐतिहासिक हकीकत रोमांचकारी तशीच भयप्रदही आहे. पंजाबचा राजा रणजितसिंह याचे घोडेस्वार सैनिक तिबेटवर स्वारी करण्यासाठी रोहतांग खिंडीतून जाण्यापूर्वी या गावाजवळ पोहोचले त्यावेळी अचानक हिमवृष्टी झाली हजारो सैनिक बर्फाखाली गाडले गेले. सहा महिन्यांनी जेव्हा बर्फ वितळले तेव्हा गाडल्या गेलेल्या मृत सैनिकांची प्रेते बर्फामुळे जशीच्या तशी ताजीतवानी आढळली ! सैनिक गाडले जाऊन त्यांची मढी झाली म्हणून या गावाचं नाव मढी पडलं ! ही हकीकत ऐकून प्रवाशांनी हिम-वृष्टीची धास्तीच घेतली घोंघावणाऱ्या प्रचंड वाऱ्यात सर्वांनी बसकडे पळ काढला घाईघाईत सर्वजण बसमध्ये चढले बसच्या काचा बंद केल्या आता शेवटचा टप्पा सुरू झाला–रोहतांग पासकडे !

दुपारचा एक वाजून गेला बस शेवटचा चढ चढून

रोहतांग जोत
समुद्र तलसे उंचाई ३९५५ मीटर
मनाली–लेह उच्चतम मार्ग
प्रवेश लाहौल घाटी

या बोर्डाजवळ थाबली रोहतांगला पोहोचल्यावर असे वाटले होते की येथे आजूबाजूच्या उच पर्वतानी बाजूला हटून ऋषीमुनींना वाट करून दिली होती । नेहमी ऑक्टोबर महिन्यात बद होणारी खिड अजून हवामान स्वच्छ असल्याने प्रवाशांसाठी खुली होती आम्ही गेलो ती तारीख होती १७ नोव्हेंबर १९८० सुदैवाने आकाश निरभ्र होते पण आकाश केव्हा अभ्राच्छादित होईल आणि हिमवृष्टी सुरू होईल याचा नेम नसतो ऑक्टोबर महिन्यात हवामानाच्या परिस्थितीनुसार वाहतूक चालू असते. एकदा का बर्फ पडले की ही खिड सहा महिन्यासाठी बद होते रोहतांग खिंडीजवळ बस थाबताच सर्वजण घाईने खाली उतरले. आणि सर्वत्र आजूबाजूला बर्फच बर्फ पाहून आनदाला पारावार उरला नाही सर्वजण बर्फावर गेले स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता मढीच्या मानाने थडी व वारे खूपच कमी होते. पांढऱ्याशुभ्र मोत्याप्रमाणे बर्फ चमकत होते उल्का, उदय गाडीतील इतर मुले बर्फावर उभी राहून एकमेकावर बर्फ फेकू लागली. मोठी माणसेही सारा मोठेपणा बाजूला ठेवून मनसोक्तपणे बर्फात खेळू लागली लाटा-लाटांसारखे बर्फ, कठीण दगडासारखे बर्फ, भुसभुशीत बर्फ किती प्रकार होते त्यातही दूरदूर ठिकाणाहून आलेले प्रवासी जीवनात आलेला हा आनदाचा क्षण मनमुरादपणे लुटत होते स्पेन देशातील, हजारो मैल पार करून आलेली नूरिया हर्षभराने गप्पा मारीत होती. गिर्यारोहणाची तिला आवड होती. प्रवासीसाहित्य पाठीवर घेऊन फिरणाऱ्या या नूरियाने आपण आता परत बसने येणार नाही तर सावकाश पायी ट्रेकिंग करीत परतणार हे सागताच तिच्या धाडसाचे विलक्षण कौतुक वाटले. कुणी बर्फा-वर उड्या मारीत होते, कुणी थडीतही बर्फ चक्क खात होते, तर कुणी

फोटो काढण्यात मग्न होते भर दुपारची वेळ असूनही सूर्यकिरण अगदी कोवळे वाटत होते बाजूला छोटयाशा मैदानात दगड धोंडे गोळा करून बांधलेली छोटी कुटीरे दिसली अचानक होणाऱ्या हिमवृष्टीपासून बचाव करण्यासाठी ती बांधली होती

रोहतांग – तिबेटी भाषेत रोह म्हणजे प्रेत व थांग म्हणजे मैदान थोडक्यात रोहतांग म्हणजे 'प्रेतांचे मैदान'– शवस्थान. पूर्वीच्या काळी या खिंडीतून प्रवास करीत असताना अनेक प्रवासी अचानक होणाऱ्या हिमवृष्टीत सापडून मृत्युमुखी पडत काहींच्या मते 'रोह' शब्द आरोहचे संक्षिप्त रूप आहे व तांग शब्द तुगचा अपभ्रंश आहे म्हणून रोहतांग म्हणजे आरोहतुग याचा अर्थ चढाईचे शिखर असाही मानला जातो. रोहतांगच्या या खिंडीच पुराणातील नाव आहे भृगुतुग आदिऋषी भृगु यांच हे तपस्थळ आहे भृगुतीर्थ या नावाने ते विख्यात आहे अर्जुनाने नियमभग केल्यामुळे बारा वर्षांची वनवासाची शिक्षा त्याला मिळाली वनवासात असताना अर्जुनाने भृगुतुग येथे यात्रा केली होती पांडव अखेरच्या महाप्रस्थानकाळात हिमालयात येथे राहिले असे मानले जाते एवढेच नव्हे तर पांडवांचे शेवटचे स्वर्गारोहणाचे मार्गक्रमण रोहतांगहूनच झाले असे मानले जाते रोहतांगच्या पलीकडे आहे लाहुल तेथील लोकांचा आजही विश्वास आहे की शेवटी द्रौपदी जेव्हा कोसळली व तिचे प्राणोत्क्रमण झाले तेव्हा तिचा अंतिम संस्कार चंद्रा व भागा नदीच्या लाहुलमधील 'तांडी' येथील संगमावर झाला तेथे महास्मशान आहे.

रोहतांग शेजारी महर्षी व्यासाचा आश्रम होता तेथे शेजारी आहे 'व्यासकुंड' या दगडाने बांधलेल्या पाच फूट उंच चौकोनी कुंडातून व्यास–बियास नदीचा उगम झाला आहे व्यासच पुराणातील नाव अर्जीकिये प्राचीन साहित्यात या नदीला 'हिमवतपादनिसृता' असे म्हटले आहे. ही नदी आर्य जनजाती, संस्कृती व साहित्य यांच्याशी घनिष्ट निगडीत आहे विश्वामित्र ऋषींनी वसिष्ठ ऋषींच्या शंभर पुत्रांना संतापाने ठार मारले होते कारण फक्त वसिष्ठ ऋषीच त्यांना ब्रह्मर्षी मानत नव्हते पुत्रशोकाने विव्हल होऊन वसिष्ठांनी स्वतःला दोरीने बांधून व्यास नदीत झोकून

दिले पण या नदीने त्याच्या या पाशाला नष्ट केले व आत्महत्येपासून त्याचा बचाव केला म्हणून तिला 'विपाशा' हे नाव पडले

रोहतागसंबंधी काही अद्भुत गोष्टी प्रचलित आहेत. जिफो नावाचा एक शक्तिशाली लडाखी सेनापती लडाखहून भूतरला–कुलूच्या पुढे दहा कि मी एका चपळ व आश्चर्यकारक शक्तीच्या घोड्यावरून एका दिवसात प्रवास करी एके दिवशी खूप घाई असल्याने त्याने लडाख ते भूतर या प्रवासात आपल्या व घोड्याच्या शक्तीने रोहतागची खिंड निर्माण केली रोहताग खिंडीच्यावर सहाशे फूट उंचीवर छोटेसे 'साराकुंड'-शीतल सरोवर आहे या हिमकुंडात स्नान केल्यास शारीरिक व्याधीपासून मुक्तता मिळते असा तेथील आजूबाजूच्या लोकांचा विश्वास आहे मोगल सम्राट अकबर याच्या एका सुंदर मुलीचा पाय अधू होता दरबारातील हिंदू पंडितांनी अकबराला सल्ला दिला की हिमालयातील साराकुंडात स्नान केल्यास अधू पाय चांगला होईल तत्काल सर्वत्र शोध घेतला गेला कुलू खोऱ्यातून रोहताग खिंड चढून आल्यावर साराकुंडाचा शोध लागला या कुंडातील पाण्यात त्या मुलीचा पाय बुडविल्यावर अधू पाय सरळ झाला. या कुंडात स्नान केल्यावर महारोगापासून मुक्ती मिळाल्याच्या हकीकतीही उपलब्ध आहेत. प्रत्येक वर्षी भाद्रपदात येथे यात्रा भरते.

रोहतागच्या एक कि मी लांबीच्या खिंडीच्या दक्षिणेला मनाली, कुलू आहे तर दुसऱ्या बाजूला आहे लाहुल स्पीतीचे खोरे रोहताग आहे लाहुल स्पीतीचे प्रवेशद्वार. एका बाजूला व्यास नदी, देवदार, पाईन वृक्षांचे वन तर दुसऱ्या बाजूला वृक्ष नसलेली सदैव बर्फाच्छादित शिखरे इकडे हिमाचल आहे तर दुसऱ्या बाजला आहे बर्फाने महिनोन महिने गोठलेल्या कमी पाऊस असलेल्या लाहुल स्पीतीच्या हिमआर्त प्रदेशाची अजब दुनिया येथे प्राणिमात्राच्या संसाराचा शेवट झाला आहे असे वाटते पण हा अंत नाही कारण पलीकडे चंद्र आणि भागा या नद्याचा लाहुल स्पीतीचा प्रदेश आहे

रोहतागची रोमांचकारी भेट आटोपली होती दुपारचे दोन वाजून गेले होते खिंडीत साचलेल्या बर्फावर मुलाचे मनसोक्तपणे खेळून झाले होते. फोटोही काढून झाले होते. भर दुपारी थंड वारे वहात होते व्यासकुंडातील बियासचा उगमस्थानीचा छोटा जलौघ पाहून तिच्याच सान्निध्यात रोहताग

भटीच्या सुखद, विलक्षण आनंददायी स्मृती घोळवीत परतीचा प्रवास सुरू झाला होता १३३२६ फूट उंचीवर रोहतांगला उगम पावलेली बियास प्रत्येक मैलाला १२६ फूट खाली झेपावत होती मनाली कुलू मार्गाने पंजाबातील कपूरथळा येथपर्यंतचा २९० मैलांचा प्रवास करून बियास सतलजला-शतद्रुला मिळते या बियासने हिमाचलला रूप दिल, आकार दिला, शील दिल आणि संस्कारही ! खरच, बियास ही एका अनोखी जगातील आगळी वेगळी नदी आपल्या सान्निध्यातील लोकांच्या जीवनात उत्साह आणि ताजेपणा आणणारी ! या विपाशाने वसिष्ठांना पाशातून मुक्त केले होते पण आम्ही मात्र बियासतटीच्या कुलू, मनाली रोहतांग या सौंदर्यस्थळांच्या परत भेटीच्या इच्छेसाठी बियासच्या पाशात-बंधनात अडकलो होतो.

❑ ❑


## मनाली ते सिमला

मनालीच्या टूरिस्ट बंगल्यात पहाटे साडेचारलाच उठलो. थंडी इतकी होती की उबदार ब्लँकेटमधून बाहेर यावेसे वाटत नव्हते पण सकाळी सहाच्या बसने सिमल्याकडे निघायचे होते लवकर उठून आवरणे आवश्यक होते सर्व आवरून पर्यटन कचेरीजवळ आलो तेव्हा साडेपाच वाजले होते. रस्त्याने सर्वत्र अगदी सामसूम होती पर्यटनकचेरीजवळ मात्र शेकोटी पेटवून थंडीपासून बचाव करणारे लोक दिसत होते गाडीवर मिळालेल्या चहाने थंडी थोडी कमी वाटू लागली रिझर्वेशन असल्याने बसमध्ये ड्रायव्हरच्या मागे जागा मिळाल्या सहा वाजता मनाली–सिमला २६८ कि मी अंतराचा प्रवास सुरू झाला बसच्या काचा बंद होत्या तरीपण थंडी वाजत होती. बियास नदीच्या सान्निध्यात परतीचा प्रवास सुरू होता. रोहतांगला दिसलेले मेंढ्याचे कळप पुन्हा भेटले बर्फ पडायला सुरुवात होण्याच्या अगोदर ते कमी उंचीच्या मैदानी प्रदेशात परतत होते कुलू स्टँडवर बस पोहोचली तेव्हा दिवस उजाडला होता स्टँडजवळच्या हॉटेलमधून यशवंतानी गरम गरम आलूपरोठे न्याहारीसाठी आणले होते परोठ्यांवर ताव मारत मारत प्रवास सुरू होता भूंतरचा बाजार पार करून बस पुढे निघाली बियास

मात्र आमची साथ सोडत नव्हती. एका बाजूला उंच पहाड तर दुसरीकडे खोलवर वहाणारी नितळ प्रवाहाची बियास. औट गावात बस थांबल्यावर चहा झाला आणि मग विलक्षण अवघड घाटातून बस नागमोडी रस्ता पार करीत पंडोह धरणापर्यंत बारा वाजण्याच्या सुमाराला पोहोचली उजेडात धरण पहायला मिळाले दुपारी साडेबाराच्या सुमाराला बस मंडीला पोहोचली कुलूघाटीत प्रवेश करण्यापूर्वी मंडीला आठवड्यापूर्वी तासभर थांबलो होतो स्टँडवर चहा, ब्रेड घेतला बस चालवण्यासाठी दुसरा ड्रायव्हर आला सिमल्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला रस्ता चांगला रुंद होता वाटेत सुंदरनगर नावाचे नावाप्रमाणेच सुंदर शहर लागले तेथे रस्त्याच्या बाजूने मोठा कॅनॉल दृष्टीस पडला. बियास, सतलज या नद्या जोडणाऱ्या जोड योजनेप्रमाणे पंडोह धरणाने बियासचे अडवलेले पाणी पहाडातील बोगद्यातून आणून या कॅनॉलमध्ये सोडले आहे. या कॅनॉलद्वारे बियासचे पाणी पुढे सतलजच्या जलाशयात सोडले आहे दुपारी तीनच्या सुमारास सलापड नावाच्या गावी एका टेकडीवर भव्य विद्युत्केंद्र दिसले वळणाकार रस्ते पार करीत, पहाडामागून पहाड पार करीत प्रवास सुरूच होता दुपारच्या चहाची वेळ झाली होती चारच्या सुमाराला बस सतलजकाठच्या बिलासपूर स्टँडवर थांबली बिलासपूर हे हिमाचल प्रदेशातील जिल्ह्याचे गाव बिलासपूरचे जुने नाव आहे व्यासपूर तेथे पुरातन व्यासगुफा आहे. भाक्रा धरणाच्या विशाल जलशयाचे–गोविंदसागरचे बॅक वॉटर बिलासपूरपर्यंत ७० कि मी पोहोचले आहे बिलासपूरला गोविंदसागरच्या प्रचंड जलाशयाचं विहंगम दृश्य दिसलं सतलजच्या जलाशयाच्या मंद लाटा दुरूनही दिसत होत्या वाटेत पर्यटनविभागाचं 'लेक व्ह्यू कॅफे' आहे बिलासपूरला सर्वांनी चहा घेतला

बिलासपूर–सिमला ९० कि. मी. अंतराचा प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरू झाला सकाळपासूनच्या प्रवासाने सर्वजण मरगळून गेलो होतो उल्का, उदय तर सारखे विचारायचे सिमल्याला केव्हा पोहोचू ? पण अजून तीन तास प्रवास करायचा होता. घाट रस्ता संपत नव्हता बस एका पहाडाच्या माथ्यावर असताना सूर्यनारायण अस्ताला जाताना दिसले खालील दऱ्याखोऱ्या, पहाडाची शिखरे या सर्वांवर जणू सोनेरी मुलामा






सिमला दर्शन – दिवसा आणि रात्री



सौदर्यशाली चैल राजप्रासाद



यशवत, उल्का, सौ मेधा, उदय, ती. काका–सिमला

चढवला गेला पहाडाच्या माथ्यावरून बसने प्रवास करताना दिसलेले हे दृश्य कायमचे मनावर कोरले गेले आता अंधार पडू लागला दऱ्याखोऱ्यात वसलेल्या वस्त्यांमधून लुकलुकणारे दिवे दिसू लागले रात्री आठच्या सुमाराला असंख्य दिव्यांनी झगमगणाऱ्या पहाडावरील सिमला नगरीचे लांबून दर्शन झाले आकाशातील असंख्य तारका जणू पहाडाच्या उतारावर उतराव्यात किंवा असंख्य झगमगणारी रत्ने पहाडावर विखरावीत असा भास झाला

बस साडेआठच्या सुमाराला रेल्वे स्टेशनजवळील स्टॉपवर थांबली. सकाळी सहा ते रात्री साडेआठ या सुमारे पधरा तासांच्या प्रवासाने अगदी थकून गेलो होतो त्यात बसमधून उतरताच हमालांनी एकच गलका केला. त्यांनी प्रवाशांना अगदी घेरून टाकले आपापल्या नबरचे बिल्ले प्रवाशां-जवळ दिले स्टॉपवर अंधारच होता त्यामुळे सर्वत्र नुसता गोंधळ उडाला. शेवटी एक हमाल ठरवला सामान कसेबसे खाली उतरवले हमालांच्या तडाख्यातून सुटलो तर हॉटेल एजंटांच्या तडाख्यात सापडलो सीझन संपलेला असल्याने येणारे थोडे पर्यटक आपल्याकडे कसे येतील या प्रयत्नात ते होते. आपापल्या हॉटेलचे कार्ड प्रवाशांजवळ देऊन आपलेच लॉज कसे सोयिस्कर, चांगले व स्वस्त आहे हे ते समजावून सांगत दिवसभराचा प्रवास, रात्रीची वेळ, तशातच थडगार वारे सुटलेले प्रवासी चागलेच वैतागले हॉटेलसचे दर मात्र ऑफसीझनमुळे थोडे कमी वाटले. तीन बेडच्या, सलग्न बाथरूम असलेल्या रूमचा दर पचेचाळीस रुपये होता. एका हॉटेल एजंटाबरोबर टप्प्याटप्प्याचा चढ चढून लॉजवर आलो सर्व शहर डोंगरावर वसलेले असल्याने वाहतुकीचे रिक्षासारखे साधन नव्हते त्यामुळे हमालाजवळ सामान देऊन पायीच सर्व चढाचा रस्ता चढावा लागला. थडगार वाऱ्यातही घामाघूम झालो हमालाचे अव्वाच्या-सव्वा बिल चुकते केले. त्याच्याशी हुज्जत घालायला मुळीच त्राण नव्हते थंडीमुळे लॉजमधील कँटीनमध्येच जेवण घेतले लॉजमधील रुम मात्र चागली असल्याने, दिवस-भरच्या प्रवासाने खूप थकल्याने व चढाच्या रस्त्याने बरीच पायपीट करावी लागल्याने कॉटवर पडल्यापडल्या झोप लागली.

☐ ☐

# सिमला– पहाडातील निसर्गसुंदर शहर

सिमला –इंग्रजानी वसवलेले पहाडातील थंड हवेचे शहर सिमल्याचा
परिसर अठराव्या शतकात नेपाळ राज्याचा भाग असून गुरख्यांच्या
अमलाखाली होता. इ स. १८१९ मध्ये इंग्रजांच नेपाळमधील
गुरख्यांविरुद्ध युद्ध सुरू झाले त्यावेळी इंग्रज सैनिक येथील घनदाट,
वृक्षराजी असलेल्या परिसरातील थंड व शांत वातावरणात विश्रांतीसाठी
तंबू ठोकून वास्तव्य करून राहू लागले येथील हवेने उत्तेजित होऊन परत
ताज्या दमाने लढू लागले मेजर केनेडी या इंग्रज अधिकाऱ्याने स्वतःच्या
वास्तव्यासाठी 'केनेडी हाऊस' या नावाची पहिली पक्की वास्तू उभारली
आज याच केनेडी हाऊसमध्ये हिमाचल प्रदेशच्या सचिवालयाचा कारभार
चालतो मेजर केनेडीने तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड ॲमहर्स्ट याना
स्वतःबरोबर सिमल्याला रहाण्याचे आमंत्रण दिले गव्हर्नरांची सिमला
भेट फलदायी ठरली व सिमल्याच्या उत्कर्षाला नवी दिशा मिळाली.
इंग्रजांनी वसवलेल्या 'सिमला' शहराचे नाव मात्र येथील पहाडावरील
'शामला' देवीच्या वास्तव्यामुळे रूढ झाले

सिमल्याच्या वास्तव्यातील पहिला दिवस सकाळीच 'जयमाताजी'च्या

भजनाने जाग आली रात्री पूर्ण विश्रांती मिळाली होती चांगली झोप झाल्याने सर्वांनाच उत्साह वाटत होता प्रथम चहा मागवला मग सर्व आवरून नऊ वाजता लॉजबाहेर सिमला दर्शनासाठी निघालो सिमल्यातील पहिल्या दिवशी इंग्रजांनी उभारलेल्या महत्त्वाच्या वास्तूच्या भेटीचा कार्यक्रम होता सर्वप्रथम पाच कि मी अंतरावरील समरहिल टेकडीवर पोहोचलो

पूर्वीच्या काळात व्हाईसरॉयचे निवासस्थान असलेल्या 'व्हाईसरॉय लॉज'च्या विस्तृत आवारात प्रवेश केला ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानात कारभार सुरू झाल्यावर कलकत्ता हे प्रथम राजधानीचे ठिकाण होते. तेथील उष्णतेला कटाळून सिमला येथे ग्रीष्मकालीन वास्तव्यासाठी निवासस्थान बांधण्याचे ठरवले. त्या दृष्टीने इ स. १८७० मध्ये तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मेयो यांनी हे लॉज उभारण्यासाठी पावले टाकली या वास्तूचे पूर्वीचे नाव होते रीट्रीट ! लॉर्ड डलहौसी, लॉर्ड क्लाईव्ह असे अनेक व्हाईसरॉय येथे राहून गेले. लॉर्ड माउंटबॅटन हे या निवासस्थानात रहाणारे शेवटचे गव्हर्नर जनरल. या भव्य निवासस्थानात शयनघराची रचना अशी चपखलपणे केली आहे की सूर्यास्ताच्या वेळची हिमालयाची अवर्णनीय शोभा मोठमोठ्या तावदानातून पहाता येते लेडी एडविना माउंटबॅटन येथून नेहमी निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत पाईन वृक्षाच्या दाट छायेतील भव्य बगीच्यातील, शांत वातावरणातील ह्या वास्तूत देशाच्या इतिहासातील अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले स्वातंत्र्यानंतर राष्ट्रपती येथे उन्हाळ्यात वास्तव्याला येत सध्या येथे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज' या संस्थेचा कारभार चालतो व्हाइसरॉय लॉजसमोरच सिमल्याचे म्युझियम आहे इ स १९७४ साली उद्घाटन झालेल्या या संग्रहालयात २००० कलात्मक वस्तूंचा संग्रह आहे त्यापैकी नूरपूर कांगडा येथील वझिर कर्तारसिंग यांच्या पेंटिंगचा संग्रह उल्लेखनीय आहे

समर हिलवर आणखी एक ऐतिहासिक महत्त्वाचे निवासस्थान आहे. राजकुमारी अमृतकौर (पंजाबचा परागंदा राजा दुलीपसिंह यांच्या कन्या आणि भूतपूर्व केंद्रीय आरोग्यमंत्री) यांचे छोटेसे कॉटेज आहे. म. गांधी

सिमल्याला जेव्हा चर्चेसाठी येत तेव्हा येथे उतरत. शांत वातावरणातील हे कॉटेज महात्माजींच्या साधेपणाला साजेसे आहे.

सिमला येथील सध्याच्या राज्यपालांचे निवासस्थान असलेल्या 'राज भवन' या वास्तूचे पूर्वीचे नाव 'पीटर हॉफ' इंग्रजांनी इ स १८८० साली ती उभारली लॉर्ड डफरीन हे व्हाइसरॉय पूर्वी येथे राहिले होते वीस दालने असलेली ही भव्य दुमजली इमारत म्हणजे शिल्प व काष्ठ-कलेचा अद्वितीय नमुनाच राजभवनाच्या आवारातील वेलवेटसारखी मुलायम हिरवळ आल्हाददायक वाटते. हिंदुस्थानच्या विभाजनानंतर येथे पंजाबचे सर्वोच्च न्यायालय होते म. गांधी यांच्या खूनखटल्याशी ही वास्तू निगडीत आहे येथेच म गांधींच्या खून खटल्याचे काम चालले व गोडसे-आपटे यांची फाशीची शिक्षा कायम झाली या ऐतिहासिक भवनात श्रीमती गांधी व पाक पतप्रधान पैगंबरवासी भुट्टो यांच्या वाटाघाटीसाठी शिखरपरिषद भरली होती. प्रवासाहून परतल्यावर १३ जानेवारी १९८१ ला ही इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडली असे वर्तमानपत्रात वाचण्यात आले इमारतीतील कलात्मक फर्निचर, सुंदर निसर्गचित्रेही भस्मसात झाली या दुर्दैवी घटनेबद्दल फार हळहळ वाटली

राजभवननंतर माल रोड ओलांडून पूर्वी केनेडी हाऊस पण आजचे हिमाचल प्रदेशचे सचिवालय असलेल्या वास्तूला भेट दिली त्यानंतर फिरत फिरत 'हिमाचलभवन' कडे निघालो. या वास्तूचे पूर्वीचे नाव 'बार्न्स कोर्ट' काही इंग्रज गव्हर्नर येथे राहिले होते इंग्रजानंतर पंजाबचे पहिले हिंदी गव्हर्नर सर सिकंदर हयातखान येथे राहिले होते विशाल आवार असलेल्या या दुमजली इमारतीत अनेक दालने असून तळमजल्यावर भव्य डायनिंग हॉल आहे मध्यभागी जिना आहे. कलापूर्ण गालिचे व अद्ययावत् फर्निचर यांनी हिमाचल भवन सुसज्ज आहे. इंदिरा गांधी व पं भुट्टो यांच्या १९७२ च्या वाटाघाटीनंतर येथेच सिमला करार अस्तित्वात आला आज या भवनात हिमाचल पर्यटनविभागाचे 'अतिथीगृह' आहे टेकडीच्या कोपऱ्यावर उभारलेल्या या वास्तूतून पहाडावरील निसर्गशोभा सुंदर दिसते हिमाचलभवनकडे जाणारा रस्ता उंच उंच पाईन वृक्षराजीतून

जातो हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांची निवासस्थानेही याच रस्त्यावर आहेत इंग्रजांनी उभारलेल्या या इमारती पाहिल्यावर त्यांच्या चोखंदळपणाची साक्ष पटते निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमी असलेल्या जागा निवडण्यात त्यांच्या कलात्मक दृष्टीचा परिचय होतो दुपारी लॉजवर परतलो भोजन आटोपून विश्रांती घेतली व सायंकाळी सिमल्याच्या प्रसिद्ध मालरोडवर आलो

सिमल्याच्या गजबजलेल्या मालरोडवर आल्यावर आपण इंग्लंड, अमेरिका येथील एखाद्या प्रसिद्ध रस्त्यावर तर आलो नाही ना असे वाटते इतका हा रोड पॉश आहे रस्त्याच्या दुतर्फा असलेली विविध प्रकारच्या मालाने खच्चून भरलेली दुकाने, त्यातील सेल्समेन, तसेच नागरीकही सारे काही पॉश वाटते एका टोकाकडील हॉटेल ओबेरायपासून फेरफटका मारायला सुरुवात केली सुरुवातीला एक भव्य लिफ्ट आहे माणशी एक रुपया असा तिचा चार्ज आहे अगदी खालच्या तळाशी उभा असलेला माणूस दोन टप्प्यात लिफ्टने मालरोडवर येतो इमारतीचे मजले पार करण्यासाठी लिफ्ट आपण पहातो पण संपूर्ण शहराचेच टप्पे पार करण्यासाठी असलेली ही लिफ्ट आगळी वेगळीच म्हणावी लागेल पर्यटन विभागाने सिमल्याचा मालरोड व स्टेशनरोड यांना जोडणारी ही लिफ्ट सुरू केली इमारतीला जशा पायऱ्या असतात तशा शहराचे टप्पे पार करण्यासाठी पायऱ्याही आहेत थोडे पुढे गेल्यावर दीडशे वर्षांपूर्वीचे 'गेयटी थिएटर' आहे इंग्रजांच्या काळात शेक्सपीअर, अॅगाथा ख्रिस्ती यांच्या नाटकांचे प्रयोग येथे होत हिंदी चित्रपट सृष्टीतील विख्यात गायक स्वर्गीय कुंदनलाल सैगल यांचा संगीताचा पहिला कार्यक्रम येथेच झाला नंतर दिसते नगरपालिका भवन. या ठिकाणी रस्ता बराच रुंद आहे. उत्कृष्ट शिल्पकलेच्या या वास्तूत इ. स. १८५१ मध्ये नगरपालिका स्थापन झाली मालरोड थिएटर्स क्लब, रेस्टॉरंट, बॉलरूम, बँका या महत्त्वाच्या वास्तूंनी अगदी खच्चून भरला आहे तसेच फॅशनेबल दुकानेही आहेत भारी कपडे परिधान करणाऱ्या, टापटीप रहाणाऱ्या नागरिकांमुळे मालरोडला वेगळेच सौंदर्य प्राप्त होते

नगरपालिका भवनावरून थोडे पुढे गेल्यावर आहे स्कँडल पॉईंट या नावासबधी थोडे नाजूक प्रकरण गुफले गेले आहे पन्नास वर्षांपूर्वी व्हाईसरॉयच्या कुटुबातील एक आंग्ल युवती एका रुबाबदार देखण्या भारतीय राजपुत्रावर आषक झाली ते प्रेमी युगुल या ठिकाणी एका सकेत स्थळी घोड्यावर बसून पहाटेच्या वेळी गुप्तपण येत व एकमेकाना भेटत प्रेमाच्या आणाभाका घेत. सिमल्याच्या ब्रिटिश सोसायटीला एक आंग्लयुवती एका भारतीयाशी प्रणयाचे खळ खेळते हे कसे आवडणार ? त्याना या प्रकरणाने धक्काच बसला त्यानी तिला भारतीय राजपुत्राला भेटण्यास बदी केली तर राजपुत्राला सिमल्याचे दरवाजे कायमचे बद केले घडलेल्या या अनैतिक प्रकारामुळे या ठिकाणाचे नाव स्कँडलपॉईंट असे रूढ झाले स्कँडलपॉईंट आज ओळखला जातो 'लाला लजपतराय' चौक या नावाने तेथे त्याचा भव्य पुतळा आहे भारत पाक विभाजनानतर लाहोरमध्ये असलेला हा पुतळा येथे आणून उभारण्यात आला लाला लजपतराय चौकाजवळ मालरोड गर्दीने अगदी फुलला होता रगीबेरगी स्वेटर्स, मफलर्स, सुदर शाली पाघरलेले हिमाचलचे नागरिक तसेच पजाब, दिल्ली, मुबई कलकत्ता या देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले पर्यटक यांच्या गर्दीने रस्ता फुलली होता ही गर्दी पाहून मालरोडबद्दल म्हटलेल्या 'The mall is a smiling river of life' या वाक्याचा प्रत्यय आला

लाला लजपतराय चौकाने सरळ माल्रोडने पुढे गेल्यावर जनरल पोस्ट ऑफिस, स्टेट बँक, रेल्वे ऑफीस, सेसिल हॉटेल या प्रमुख इमारती लागतात लाला लजपतराय चौकाच्या वरच्या बाजुला सिमल्याच्या सर्वात उचावरील रिजपॉईंटकडे जाणारा विस्तत रस्ता आहे प्रथम रस्त्याच्या बाजूला हिमाचल प्रदेशची पर्यटन कचेरी आहे. पुढे गेल्यावर गोलाकार छत्री असलेला रिजपॉईंट आहे तेथून सायकाळी सिमल्याच्या आसमतात दिसणारी शोभा अवर्णनीयच रिजच्या शेवटी टोकाला आहे सिमल्याचे प्रख्यात भव्य चर्च ब्रिटिश साम्राज्याच्या काळात दर रविवारी सकाळी व्हाईसरॉय व त्याचा लवाजमा व्हाईसरॉय लॉजमधून सजलेल्या बग्गी, रिक्षा यातून येऊन चर्चमध्ये प्रार्थनेला जमत या चर्चशेजारी आहे स्टेट लायब्ररी चर्च व लायब्ररी यामधून जाणारा रस्ता जाखू टेकडीकडे जातो

चर्च पाहून रिजकडे परतताना रस्त्याच्या बाजूच्या लाकडी रेलिंगवर मजेत शांतपणे गप्पा टप्पा करणारी हौशी मंडळी दिसली आजूबाजूला पहाडाचे मनोरम दृश्य दिसत होते म्हणूनच दिवसाच्या सिमल्याचे दोन शब्दात वर्णन करतात 'Simala is scenic and silent' सिमल्याची लोकसंख्या आहे सुमारे ऐंशी हजार पण उन्हाळ्यात येणाऱ्या पर्यटकांमुळे ती तिप्पट होते पहाडातील या निसर्गरम्य गावात पूर्वी एक मजली लाकडी घरे व बर्फ वितळल्यावर ते वाहून जाण्यासाठी उतरती पत्र्याची छपरे होती आज मात्र चार पाच मजली काँक्रीटच्या इमारती उभारल्या जाऊन सिमल्याचे सौंदर्य कमी होऊ लागले आहे अशी खंत जुनी मंडळी व्यक्त करतात

रिज पॉईंटवरून मालरोडवर परतून थोड्या पायऱ्या उतरल्या की— मिड्ल बाजार, लोअर बाजार या सिमल्याच्या अरुंद रस्त्याच्या बाजार• पेठा लागतात. होजिअरी, मिठाई, धान्य, फळ-फळावळ इ सर्व प्रकारच्या वस्तू मालरोडपेक्षा कमी दराने मिळणाऱ्या दुकानांची येथे रेलचेल आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय ग्राहकांची येथे गर्दी दिसली.

अंधार पडू लागला होता टप्प्याटप्प्यावर वसलेल्या घरातून लुकलुकणारे दिवे चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणे दिसत होते दुकाने बंद होऊ लागली होती. पण सिमला निद्रिस्त व्हायला अवकाश होता नाईटक्लब सुरू झाले होते. रात्रीच्या सिमल्याचे तीन शब्दात वर्णन करायचे झाले तर डान्स, डिनर' ड्रिंक यामध्ये डुबलेले पहाडातले शहर!

□ □

# सिमल्याचा रमणीय परिसर

सिमल्याच्या वास्तव्यातील पहिल्या दिवशी सिमल्याच्या निरनिराळ्या दर्शनीय स्थळांना भेटी दिल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सिमल्याच्या नजीकची स्थळे पहाण्यासाठी हॉटेल मॅनेजरमार्फतच कारची व्यवस्था केली होती. हिमाचल पर्यटन विभागाच्या मार्फत कंडक्टेड टूर आयोजित केल्या जातात. पण आपल्या मनाप्रमाणे, कमीजास्त वेळ प्रेक्षणीय स्थळे पहाण्याच्या दृष्टीने कारने जाणे सोयीस्कर. पाच जणांचा ग्रूप असेल तर कारने गेल्यास बस इतकाच दर पडतो

सकाळी आठ वाजता फियाट कार घेऊन कारचा मालकच लॉजजवळ आला तो स्वत च ड्रायव्हिंग करणार होता पतियाळा संस्थानात पूर्वी नोकरी केलेला, कल्लेदार मिशा असलेला हा गोरापान कार मालक पहाडीमिश्रित हिंदी भाषेत आमच्याशी गप्पा मारीत होता त्याने सुचवले की, दिवसभरच्या प्रवासात वाटेत चागले जेवण मिळणार नाही तर दुपारच्या जेवणासाठी बरोबर टिफीन घेऊ माझ्या ओळखीचा हॉटेलमालक चागले जेवण बरोबर देईल. सकाळचे नऊ वाजले आणि कारमधून सिमल्याचा परिसर पहाण्या-

साठी निघालो वाइल्ड फ्लॉवर हॉल, कूफी, मशोब्रा, फागू, इंदिरा हॉलिडे होम व चैल अशा अनुक्रमाने स्थळे पहायची होती

सिमला सोडल्यावर प्रथम एक बोगदा लागला कार मालकांनी या बोगद्या-बद्दल बरीच माहिती दिली इ स १८५० मध्ये मेजर ब्रिगने हा बोगदा बांधला तत्कालीन कमांडर इन चीफ लॉर्ड किसींजर याच्या गंभीर अप-घाताला हा बोगदा कारणीभूत ठरला होता लॉर्डसाहेब-वाईल्ड फ्लॉवर हॉल-या आपल्या निवासस्थानातून बग्गीतून सिमल्याला सायकाळी येत होते बोगद्यात समोरून एक हमाल पायी येत होता समोरून येणारी बग्गी पाहून तो बोगद्यात कडेला थांबला तथापि मंद प्रकाशात त्याला चुकवताना बग्गीचे घोडे बिचकले व वळाले. यात लॉर्डसाहेबाचा पाय फ्रॅक्चर झाला. त्यानी बग्गीतून उडी टाकली म्हणून फ्रॅक्चरवरच निभावले वरील अपघाता-नंतर हा बोगदा दुप्पट रुंद करण्यात आला आतून पांढरा रंग दिला गेला. तसेच दिवाबत्तीची चांगली व्यवस्था करण्यात आली

बोगदा पार केल्यावर चार कि मी अंतरावर संजोली नावाचे छोटेखानी गाव आहे सिमल्याचे हे छोटे सुंदर उपनगर. सिमल्यापेक्षा कमी खर्चात रहाण्यासाठी संजोली सोयिस्कर आहे शांत वातावरण असल्याने संजोलीला 'हेवन ऑफ रेस्ट' असे म्हटले जाते संजोली प्रसिद्ध आहे तेथील दुर्गादेवी मंदिर व बौद्धविहार यासाठी संजोलीहून सिमल्याच्या जाखू हिलवरील हनुमान मंदिर, तसेच शामला देवीमंदिर, कूफी आणि चैल यांचे विहंगम दर्शन होते कार संजोलीच्या बाजारच्या रस्त्यावरील हॉटेलजवळ थांबली. कारमालकानी सुचविल्याप्रमाणे बरोबर टिफीन न्यायचा होता गरम आलू परोटे तयार होईपर्यंत चहा घेतला परोटे, दही असा डबा घेऊन वाइल्ड फ्लॉवर हॉलच्या दिशेने निघालो. सिमल्याहून तेरा कि मी अंतर पार झाले आणि कार वाइल्ड फ्लॉवर हॉल असलेल्या टेकडीच्या पायथ्याजवळ थांबली

वाइल्ड फ्लॉवर हॉल हे ब्रिटीश कमांडर इन चीफ लॉर्ड किसींजर यांचे निवासस्थान इ स १९०३ साली लॉर्ड कर्झन व्हाईसरॉय असताना लॉर्ड किसींजर यांची कमांडर इन चीफ–मुख्य सेनापती म्हणून हिंदुस्थानात नेमणूक झाली लॉर्ड किसींजर आपल्या अचूक लष्करी निर्णयाबद्दल प्रसिद्ध

होते. हिंदुस्थानात येण्यापूर्वी नाईल नदी पार करून सुदान–आफ्रिका येथे त्यांनी अद्वितीय पराक्रम गाजवला होता व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन हे ब्रिटीश साम्राज्याचे प्रतिनिधी तर लॉर्ड किसीजर हे ब्रिटीश सेनाप्रमुख सेनापती श्रेष्ठ की व्हाईसरॉय श्रेष्ठ ? या वादामुळे दोघामध्ये मतभेदाची दरी निर्माण झाली त्यातून ते एकमेकाचा द्वेष करू लागले पण त्यातूनच निर्माण झाली 'वाईल्ड फ्लॉवर हॉल' ही अद्वितीय वास्तू वाईटातून चागल्याची कधी कधी निर्मिती होते ती अशी व्हाईसरॉय लॉज असलेल्या समरहिल टेकडीपेक्षा २०० फूट अधिक उच असलेली कूफ्रीजवळील जागा वाईल्ड फ्लॉवर हॉल बाधण्यासाठी निवडून आणि तेथे हे सरस निवासस्थान बांधून लॉर्ड किसीजरने जणू व्हाईसरॉय पेक्षा आपण श्रेष्ठ असल्याचे सिद्ध केले

'वाईल्ड फ्लॉवर हॉल' पहाण्यासाठी प्रत्येकी एक रुपया फी टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या पर्यटनकचेरीतच वसूल केली गेली. सकाळच्या रम्य वातावरणात दुतर्फा उच उच देवदार वृक्षाच्या रांगा असलेला रस्ता चढू लागलो अर्धा कि मी लांबीचा हा चढाचा रस्ता पार करीत असताना एका फोटोग्राफरने आम्हाला गाठले वाइल्ड फ्लॉवर हॉलच्या पार्श्वभूमीवर फोटो काढून घेण्याचा तो आग्रह करू लागला सध्याकाळी फोटो तुम्हाला तुमच्या लॉजवर आणून देतो असे त्याने म्हटल्यावर त्याला नाही म्हणणे जड गेले तोही मग आमच्याबरोबर निघाला थोड्याच वेळात सुदर फूल-वेली, हिरवळ, बगीचा याच्या सान्निध्यातील ही सुदर दुमजली वास्तू दृष्टीला पडली इमारतीला भव्य पोर्च असून प्रशस्त व्हराडा आहे बाहेरून जिना आहे मोठमोठी दालने, निसर्ग शोभा पहाण्यासाठी काचा लावलेल्या भव्य खिडक्या, थडी निवारण्यासाठी हर्थ–फायर प्लेस (भट्टी) असलेले हे निवासस्थान मौल्यवान फर्निचरने सुसज्ज आहे. या वास्तूची शोभा दोन्ही ऋतूत तितकीच आल्हाददायक असते. उन्हाळ्यात उत्साहदायी तसेच हिवाळ्यात फॅसिनेटिंग ! हिवाळ्यात उतरत्या छतावर बर्फ पडते पण आतमध्ये फायरप्लेसमध्ये जळण चालू असल्याने दालने उबदार असतात

लॉर्ड किसीजर या वास्तूत भव्य दरबार भरवीत शेवटी लॉर्ड कर्झन राजीनामा देऊन इ स १९०५ मध्ये इग्लंडला परतले लॉर्ड किसीजर नतर ही वास्तू हॉटेल व्यवसायातील मिसेस होट्झ यांनी विकत घेतली.

हिमाचल पर्यटन विभागाने या वास्तुचे अलिशान हॉटेलमध्ये रूपांतर केले. या हॉलच्या समोर एक व्ह्यू पॉईंट आहे तेथून हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांचे विहंगम दृश्य दिसते तेथून कूफीपर्यंत घनदाट जंगलातून जाणारी एक पाऊलवाटही आहे शांत वातावरणात त्या पाऊलवाटेने जाऊन निसर्ग-सौंदर्याची एक वेगळी मजा लुटता येते या हॉलच्या बाजूला पर्यटन-विभागाने लॉग हट्स—लाकडी केबिन कॉटेजसारख्या बांधल्या आहेत असे म्हणतात की ब्रिटिश साम्राज्याची सत्ता व वैभव लयाला गेले पण वाईल्ड फ्लॉवर हॉल आजही वैभवाने तळपतो व्हाईसरॉय व कमांडर यांच्या स्पर्धेत उभारल्या गेलेल्या या वास्तूसाठी निसर्गसुंदर जागा निवडण्यात लॉर्ड किचनर यांनी दाखवलेल्या चोखंदळपणाचा व रसिकतेचा प्रत्यय आला आठवण म्हणून फोटोग्राफरने सर्वांचे दोन फोटो या वास्तूसमोर काढले

वाइल्ड फ्लॉवर हॉल पाहून चढाच्या रस्त्याने साधारण तीन कि मी अंतर गेल्यावर कूफी हे छोटे गाव लागते सिमला ही ग्रीष्मकालीन राजधानी तर पहाडावरील कूफी आहे शीत ऋतूतील राजधानी कूफीची उंची आहे २६२२ मीटर (८६०० फूट) हिवाळ्यात बर्फाच्या थराने कूफी झाकले जाते आणि मग बर्फावरील स्केटिंग, स्कीईंग यांसारख्या खेळाची मजा लुटायला ठिकठिकाणाहून पर्यटक येतात परदेशी क्रीडा-प्रेमीही विंटरस्पोर्ट फेस्टिव्हलला जमतात खास हिवाळी कपडे परिधान करून पहाडाच्या उतारावरील बर्फावरच्या खेळांना उधाण येते म्हणूनच कूफीला भारताचे 'स्वित्झलँड' म्हणतात हिवाळी खेळाचा मनसोक्त आनंद लुटून वाईल्ड फ्लॉवर हॉलमध्ये विश्रांतीसाठी गर्दी होते बर्फावरील खेळाप्रमाणे कूफी प्रसिद्ध आहे बटाटा संशोधन केंद्रासाठी

कूफीपासून दोन कि. मी अंतरावरील मशोब्रा हे एक निसर्गसुंदर स्थान आहे ओक व पाईन वृक्षांच्या सान्निध्यातील शांत, आल्हाददायक वातावरणातील मशोब्राची शोभा आगळीच.

पुढे सहा कि मी अंतर पार केल्यावर क्रेगॅन हे दर्शनीय स्थळ आहे तेथील टेकडीवरून आजुबाजूच्या पहाडाचे दृश्य छान दिसते. टेकडीवर रेस्ट हाऊस असून भोवती विस्तृत हिरवळ व बगीचा आहे इटलीमधील

आल्प्स पर्वतात राहिलेले काऊंट ऑफ केगानो यांनी इटालियन शैलीचा हा व्हिला अठराव्या शतकात बांधला पुढे बारा कि मी अंतरावर 'नलदेरा' हे रमणीय स्थान आहे नलदेराचे मूळ नाव नलदेव लॉर्ड कर्झनने याठिकाणी गोल्फकोर्स स्वत च्या देखरेखीखाली उभारले नलदेराच्या निसर्गसौंदर्याने लॉर्ड कर्झन इतके प्रभावित झाले होते की त्यांनी आपल्या अलेक्झांड्रिया या लहान मुलीचे दुसरे नाव 'नलदेरा' असे ठेवले

मशोब्रा नलदेरा पाहून 'फागू' येथे पोहोचलो फागू प्रसिद्ध आहे सफरचंदाच्या बागासाठी तसेच गिरी व्हॅलीचे सुंदर दृश्य तेथून दिसते प्रत्येक निसर्गप्रेमी व्यक्तीला फागूच्या घनदाट वनसौंदर्याने आनंद झाल्याशिवाय रहाणार नाही

कुफ्रीला परत येऊन थोडे पुढे गेल्यावर 'चिनी बंगला' लागतो चिनी बंगल्याचे दुसरे नाव आहे 'इंदिरा हॉलिडे होम' पाईन वृक्षराजींच्या सान्निध्यातील हा बंगला उत्तमोत्तम फर्निचरने सजलेला आहे आजूबाजूला निसर्गसौन्दर्याची मनसोक्त उधळण ईश्वराने केली आहे बंगल्याच्या आवारात तिबेटमधून आणलेले काळेभोर धिप्पाड,केसाळ याक (Snow horse) होते या दोन याकचे मालक पर्यटकांना याकसह फोटो काढण्याचा किंवा याकवरून चक्कर मारण्याचा आग्रह धरीत होते पण उल्का उदय त्या प्राण्याला पाहूनच नको म्हणत होते दुपारचे अडीच वाजले होते. भर दुपारीही थंडगार वारे उल्हसित करीत होते आता लक्ष लागले होते टिफीनकडे. टिफीनचा डबा उघडून पराठे व दही यांच्यावर ताव मारला. शेजारच्या हॉटेलमध्ये चहा घेतला मग उत्साहाने निघालो चैलच्या सफरीसाठी !

सर्पाकार रस्ते पार करीत, उंच देवदार वृक्षांची व सफरचंदाच्या बागाची शोभा पहात चैलला पोहोचलो पूर्वी चैल होता – नेपाळमधील गुरख्यांच्या कथाळ राज्याचा भाग नेपाळ युद्धानंतर हा पहाडी प्रदेश १९ व्या शतकात इंग्रजांच्या ताब्यात आला स्वातंत्र्यापूर्वी चैल ही पतियाळा महाराजांची ग्रीष्मकालीन राजधानी होती पतियाळा महाराजांना दोन गोष्टींचा शौक होता – एक फुलाचा आणि दुसरा क्रिकेटचा त्यासाठी महाराजांनी

देशविदेशातून फुलझाडांची अनेक रोपे आणली चैलचे सौदर्य खुलवले. चैलच्या पहाडावर त्यांनीच जगातील सर्वात उच्च क्रिकेट ग्राऊडची उभारणी केली

प्रथम आम्ही चैल बाजाराचा रस्ता पार करून वळणाकार रस्त्यानी चढ चढून २१५० मीटर उचीवरील क्रिकेट ग्राऊडवर पोहोचलो पहाडावर एवढे भव्य ग्राऊड तयार करण्यासाठी काय कष्ट पडले असतील याची कल्पनाच केलेली बरी डोंगराचा उचवटयाचा भाग फोडून व उताराचा भाग दगड, मुरुमाने भरून हे छानपैकी लेव्हल ग्राऊड तयार करण्यात आले आहे आम्ही ग्राऊडवर गेलो तेव्हा ग्राऊडवर माकडांची गर्दी जमली होती ! एवढया उच्च ग्राऊडवर क्रिकेट खेळणे एक थ्रिलच ! पूर्वीच्या काळात राजे, महाराजे यांच्या शौकाला सीमा नव्हती हेच खरे पतियाळा महाराजा भूपिदरसिग व राजकुमार यादवेंद्रसिग दोघेही क्रिकेटचे शौकीन इग्लंडच्या एम् सी सी संघ विरुद्ध हिंदुस्थानच्या सघाचे कप्तानपदही महाराजा यादवेंद्रसिग यांनी भूषविले होते या क्रिकेट ग्राऊडवर टेनिसकोर्टही आहे तसाच भव्य पॅव्हेलियन आहे सध्या हे भव्य क्रीडांगण व आजूबाजूच्या कॉटेजेस इ परिसर पब्लिक स्कूलच्या ताब्यात असून क्रीडांगणावर क्रीडास्पर्धा आयोजित केल्या जातात

चैलचे अद्वितीय क्रिकेट ग्राऊंड पाहिल्यावर उच उच दाट देवदार वृक्षांमध्ये लपलेल्या राजप्रासादाच्या प्रशस्त आवारात आलो महालासमोर मऊ रेशमासारख्या मुलायम विस्तृत हिरवळीवर माडलेल्या खुर्च्यांवर हौशी पर्यटक त्यांच्या कुटुबासह निवांत गप्पा मारीत होते त्यात प्रेमाने कुजबुजणारी नवदापत्ये, मित्र मैत्रिणीही दिसत होत्या लॉनच्या बाजूला सुदर फुले बहरली होती कडेला स्पीकरवर पाश्चात्य सगीताची मादक धून मद स्वरात ऐकू येत होती कुठे धावपळ नाही, गोंगाट नाही, सगळे कसे शात शांत ! इतक्या उचावर शहरी वस्तीपासून निर्माण केलेला एकांतवासातला हा महाल म्हणजे मधुचद्राला आलेल्या प्रेमी युगुलाचा स्वर्गच !

नव्वद वर्षापूर्वी चैलच्या या पहाडावर काही नव्हते इ स. १८९१ मध्ये पतियाळा महाराजानी इग्रजाना २१ लक्ष रुपयांचा नजराणा देऊन चैलच्या पहाडापैकी राजगढ या पहाडावरील २५ हेक्टरची ही भूमी

संपादन केली नवीन बांधायच्या महालाचा आराखडा नक्की करून पाया-भरणीस सुरुवात केली पाण्यासारखा पैसा खर्च करूनही काही अदृश्य शक्तीमुळे पाया भरणीचे काम सफल होऊ शकले नाही देशातील कुशल कारागीराना पाचारण करण्यात आले तरी यश आले नाही महाराजा हवालदिल झाले सुंदर महाल उभा करणं त्यांचे स्वप्न होते पण निसर्ग त्यांना साथ देत नव्हता शेवटी गावातील काही प्रतिष्ठित व्यक्तींनी त्यांना सुचविले की शेजारच्या टेकडीवर सिद्धपुरुष सिद्धबाबाचे मंदिर बांधा तुमचे मनोरथ पूर्ण होतील याप्रमाणे महाराजानी सिद्ध बाबाचे मंदिर उभारले त्यांच्या आशीर्वादाने महालाचा पाया परत भरला गेला पत्थर आणि लाकूड वापरून पहिला महाल तयार झाला त्यावेळी त्या महालाचे नाव होते – 'महाराजाविला'

काही काळानंतर पतियाळा राज्याच्या गादीवर प्रसन्न व्यक्तिमत्वाचे महाराजा भूपिंदरसिंग आरूढ झाले पंचमजॉर्जनी तर त्यांच्या उमद्या व्यक्तिमत्त्वावर खूष होऊन आपल्या काही ए. डी सी पैकी एक ए डी सी म्हणून महाराजाची नियुक्ती केली त्यामुळे काही इंग्रज अधिकारी त्यांचा द्वेष करू लागले तशातच एक 'नाजूक' प्रकरण उपस्थित झाले सिमल्याच्या थंड हवेत व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन व्हॉईसरॉय लॉजमध्ये मुक्कामाला होते. पतियाळा महाराजा भूपिंदरसिंग सिमल्याला आपल्या महालात उन्हाळ्याला वास्तव्याला होते भारतीय राजे महाराजानी इंग्रज अधिकाऱ्याना पार्टी देऊन खूष करण्याची अहमअहमिका लागे पतियाळा महाराजानी एक डिनर पार्टी आयोजित केली लेडी कर्झन या आमन्त्रित मुख्य पाहुण्या होत्या महाराजानी त्याना पार्टीच्या वेळी एक मौल्यवान साडी भेट दिली एवढेच नव्हे तर मोठ्या आग्रहाने त्याना ती परिधान करायला लावली झाले ' हजर असलेल्या छायाचित्रकाराने आपले काम अचूक केले त्यांनी साडी नेसलेल्या लेडी कर्झनचा पतियाळा महाराजा समवेत फोटो घेतला दुसरा दिवस उजाडला इकडे व्हाईसरॉयलॉजमध्ये चहा पितापिता पेपर वाचताना डिनरपार्टीची हकीकत व साडी नेसलेला लेडी कर्झनचा फोटो पाहून लॉर्ड कर्झनचे पित्त खवळले । प्रथम मेमसाहेबावर ते गरम झाले आणि पतियाळा महाराजांची सिमल्याहून उचलबांगडी करून त्यांना सिमल्याला येण्यास मज्जाव केला ।

पतियाळा महाराजाना सिमल्याला केलेला मज्जाव 'चैल'च्या पथ्यावरच पडला, महाराजा भूपिंदरसिंगने पूर्वीच्या महाराजाविलात खूप फेरबदल केले महाल अधिक सुंदरतेने सुसज्ज केला उत्तमोत्तम बेल्जियम ग्लासचा वापर केला आणि या महालाचे नाव पडले— 'शीशमहल' इ स १९५० उजाडल्यावर पतियाळा महाराजांनी चार वर्षे खपून एक एक दालनाची सजावट आधुनिक पद्धतीने केली त्यातील पलंग, सोफा इ फर्निचर अद्यया- वत बनवून घेतले सुंदर नक्षीकामाच्या गालिच्यांनी महालाची शोभा वाढविली 'शीशमहल'चे नवे नाव 'चैल पॅलेस' रूढ झाले

महाराजांना क्रिकेटप्रमाणे फुलझाडाचा अतोनात शौक त्यांनी खास बावीस माळी लावून बगीच्याची उभारणी केली परदेशातूनही अनेक रोपे आणली फुलवेली, हिरवळीने चैल पॅलेस बहरून टाकला !

चैलमहालात उत्साहाने प्रवेश केला आज तेथे आहे हिमाचल पर्यटन विभागाने चालविलेले अलिशान हॉटेल इ स १९७२ साली महाराजांनी हा महाल हिमाचल प्रदेश सरकारला विकला पर्यटनविभागाने त्यात भर घालून त्याचे सुंदर हॉटेलमध्ये रूपांतर केले चैलच्या या हॉटेलमध्ये मुख्य वीस सूट आहेत वरच्या मजल्यावर 'महाराजा' 'महाराणी' सूट आहेत त्यांचे सौंदर्य काय वर्णावे ? भव्य नक्षीदार पलंग, सोफासेट, त्याला साजेसे पडदे, उंच पूर्णाकृती आरसे, अत्याधुनिक फर्निचर, टबबाथ, कलात्मक स्वच्छता- घर, पाश्चिमात्य आणि पौर्वात्य संगीताच्या ध्वनीलहरी ऐकविण्याची योजना टी व्ही सेट, टेलिफोन, गालिचे, निसर्गचित्रे यांनी सूट सजले आहेत या खेरीज 'राजकुमार' आणि 'राजकुमारी' सूटही आहेत खरंच या अलिशान महालात राहिल्यावर महाराजा आणि महाराणी झाल्याचे सुख उपभोगता येईल चैलचा हा अनोखा महाल म्हणजे मानी महाराजाने इंग्रज सत्तेच्या त्या वेळच्या सिमल्याला दिलेले योग्य प्रत्युत्तर !

सध्याकाळ होऊ लागली सोनेरी सूर्यकिरणांनी पहाडावरील एकांत- वासातला हा महाल उजळून टाकला महालाच्या परिसरातील उंच देवदार वृक्ष, फुले, हिरवळी यावर कोवळी सूर्य किरणे पडली दूरवर पहाडातील सिमल्याचे दर्शन तेथील लुकलुकणाऱ्या दिव्यांमुळे झाले. फुलांचा सुगंध

दरवळत होता चैल महालाची सफर होती, जणू अरेबियन नाईटमध्ये वर्णन केलेल्या एखाद्या स्वप्न महालाची ।

चैलचा निरोप घेताना या निसर्गसुंदर स्थळाला धावती भेट द्यावी लागली याची रुखरुख लागली चैलच्या सौंदर्याचा आस्वाद घ्यायचा म्हणजे येथे मुक्काम करायला हवा चैलहून निघून रात्री दहाच्या सुमाराला सिमल्याला मुक्कामी आलो लॉजमध्ये जेवण घेतले. तेवढ्यात फोटोग्राफर आला वाईल्ड फ्लॉवर हॉलच्या पार्श्वभूमीवर काढलेले फोटो त्याने आणले होते उत्सुकतेने फोटो पाहिले फोटो चांगले आले होते

सिमल्याच्या वास्तव्यातील शेवटचा दिवस रूममध्ये चॅनल म्युझिक सिस्टिमवरील गुरु नानक यांच्या गोड भजनांनी जाग आली थंडीमुळे आंघोळीला सुटी दिली चहापाणी आवरून फिरत फिरत मालरोडवरून सिमला रिजवर आलो सकाळच्या कोवळ्या थंडीपासून बचाव करण्यासाठी लोक रस्त्याच्या कडेवरील कट्ट्यावर बसले होते सिमला रिज समोरील कॅंटीनमध्ये चहा घेतला पण तो महागात पडला कारण तेथे कॅमेरा विसरला

उपवास असल्याने वेफर्सची पाकिटे पिशवीत बरोबर घेऊन फिरत फिरत रिजवरील चर्च व लायब्ररी यामधून असलेल्या रस्त्याने जाखू टेकडी चढायला सुरुवात केली तीन कि मी लांब असलेले हनुमानाचे मंदिर पहायचे होते सिमल्याच्या पूर्वेला असलेली जाखू टेकडी २४४० मीटर उंचीवर आहे टेकडी जसजशी चढू लागलो तसतसे पाय मात्र दुखू लागले कारण टेकडीचा चढ एकदम सरळ असा होता उल्का, उदय मात्र उत्साहाने पुढे जायचे व थकलेल्या आमची वाट पहायचे बाकी आमच्या ती काकांचा उत्साह मात्र दांडगा वयाच्या ७० व्या वर्षी महिनाभर उत्साहाने प्रवास केला काही दुखत असो काडीमात्र तक्रार केली नाही सर्व प्रवासात थंडी असो किंवा काही असो सकाळी सर्वांच्या अगोदर उठून स्नान आटोपून उत्साहाने तयार होणार प्रवासात काही अडचण आली तरी ॲडजेस्ट होणार.

जाखू टेकडीचा सरळच्या सरळ चढ चढत असताना वाटेत काही गोरे-पान पहाडी मजूर जाड फळ्या, लाकडी ओंडके पाठीवर वाहून नेताना दिसत होते ते अगदी घामाघूम झाले होते. पाठीवरच्या ओझ्याने वार वाकले होते त्यांचे कष्टमय जीवन पाहून कणव वाटली टेकडी चढायचा शेवटचा टप्पा कठीण होता या टप्प्यापर्यंत घरे, वस्ती आहे पायऱ्यांवर थोडी विश्राती घेतली मग उंच वृक्षांमधील पायऱ्या चढत टेकडीवरील हनुमान मंदिराजवळ पोहोचलो तेव्हा शेकडो माकडांनी आमचे स्वागत केले ! प्रवासी टाकत असलेल्या फुटाण्यावर ती ताव मारत होती एकमेकांशी भाडत होती

हे हनुमान मंदिर दगडी असून त्यावर उतरते छप्पर आहे मंदिराला शिखर नाही सर्वत्र असलेली स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे गाभाऱ्यात हनुमानाची मुकुटधारी सुंदर मूर्ती आहे लंकेच्या युद्धात मेघनादाकडून मूर्च्छित झालेल्या लक्ष्मणाला वाचवण्यासाठी रामभक्त हनुमान येथे सजीवनी वनस्पती आणण्यासाठी आले येथील महात्म्याला भेटून वनस्पतीचा परिचय करून घेतला व काही काळ विश्रांतीसाठी येथे थाबले त्यावेळेपासून येथे हे मंदिर आहे खरोखर रामायण महाभारतातील देव-देवता प्रवासात ठिकठिकाणी भेटल्या होत्या मनालीला हिडिंबादेवी भेटली, कुलूला प्रभू रामचंद्र, रोहतांगला व्यासमुनी आणि आता सिमल्याला हनुमानजी ! मंदिरासमोरच्या वृक्षाखाली विश्रांतीसाठी बसलो मर्कटलीला पहाताना गमत वाटत होती शेंगा पळविणाऱ्या व त्या फोडून खाणाऱ्या माकडाची उदयला गमत वाटत होती तर उल्का मात्र स्तब्ध होती, कारण मागच्या प्रवासात मथुरेला एका माकडाने तिच्या अंगावर उडी मारली होती. त्यामुळे तिने माकडाची धास्ती घेतली होती. तेवढ्यात दोन धिप्पाड माकडे आमच्याच दिशेने धावत आली आम्ही घाबरून बाजूला पळालो. माकडांचे लक्ष होते वायरच्या पिशवीतील वेफर्सच्या पुड्यांकडे ! पिशवीतील शाल, टॉवेल, रुमाल भराभर बाजूला फेकून त्यांनी सर्व पुडे हस्तगत केले व पळून गेले आणि आमच्यासमोर वेफर्स खात बसले !

जाखू टेकडीवरील हनुमान मंदिराच्या दर्शनाबरोबरच सिमला सफर संपली होती. टेकडीवरून सिमल्याच्या आसमंताचे दृश्य न्याहाळले आणि

मग जाखू टेकडी उतरू लागलो रिज पॉईंटवर पोहोचल्यानंतर उताराच्या रस्त्याने साधारण ३ कि. मी. चालल्यावर 'अॅनाडेल' या सिमल्याच्या प्रख्यात ग्राऊंडवर चक्कर मारली पूर्वी तेथे क्रिकेट ग्राऊंड होते फूटबॉल स्पर्धेचे जनक सर डयूरँड यांनी इ. स १९०२ साली प्रथम येथे फूटबॉल स्पर्धा सुरू केल्या. तेथील स्पोर्ट क्लब मार्फत पोलो, क्रिकेट, फूटबॉल यांच्या मॅचेस तेथे होतात. त्याचप्रमाणे हॉर्स शो व डॉग शो तेथे होतात. हे ठिकाण उत्कृष्ट पिकनिक स्पॉट आहे तेथील भेट आटोपून लॉजवर परतलो

लॉजवर परतल्यावर हॉटेलचे बिल चुकते केले सुटकेसेस सकाळीच भरून ठेवल्या होत्या. जेवण आटोपले. दुपारी बाराच्या सुमाराला रेल्वे स्टेशनवर पोहोचलो तेवढयात सिमल्याची छोटी टॉय ट्रेन प्लॅटफॉर्मवर लागली रिझर्वेशन केले असल्यामुळे स्वतंत्र कंपार्टमेंट मिळाल्याने काळजी नव्हती साडेबारा वाजले आणि रेल्वेने शिटी दिली मोठया जड मनाने सिमल्याचा निरोप घेतला. परतीचा प्रवास सुरू झाला होता.

□ □

## सिमला ते दिल्ली

तीन दिवसाच्या सिमल्याच्या वास्तव्यात या पहाडातील निसर्गसुंदर शहराच जे लोभस दर्शन झाल होत ते विसरणं अशक्यच. आपण एखाद्या युरोपियन शहरात तर वावरत नाही ना असा भास होत होता छोटया रेल्वेने सिमला सोडले तेव्हा एकप्रकारच्या अनामिक हुरहुरीने मन बेचैन झाले भारतातील उटीपासूनची अनेक हिलस्टेशनस् पाहिली होती. पण सिमला ते सिमला त्याची सर कोणत्या हिलस्टेशनला येणार? सिमला सोडल्यावर गाडी थांबली समरहिल स्टेशनवर

समरहिल स्टेशन पार केल्यावर वळणाकार मार्गाने छोटेखानी रेल्वेचा प्रवास सुरू होता ही रेल्वे सुद्धा इंग्रजांचीच देणगी. लॉर्ड कर्झनने ही रेल्वे लाईन सुरू करण्यात स्वत: रस घेतला. एच्. एच्. हॅरिंग्टन या रेल्वे चीफ इंजिनिरच्या मार्गदर्शनाखाली इ. स. १९०२ मध्ये कलका–सिमला या ९६ कि. मी लांबीच्या रेल्वेमार्गाचे काम सुरू झाले. पहाडातील सर्वात लांबीचा हा रेल्वेमार्ग अनेक दऱ्याखोऱ्यांतून, पहाडांतून जातो मार्गात शंभरच्यावर बोगदे घ्यावे लागले अनेक अडीअडचणीवर मात करून हा मार्ग दोन वर्षात पूर्ण करण्यात आला तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी स्वतः

या मार्गाचे इ स १९०४ मध्ये उद्‌घाटन केले तेव्हा सर्वांच्या उत्साहाला, आनंदाला पारावार नव्हता मार्गावर प्रत्येक स्टेशनवर जमलेल्या लोकांनी उत्साहाने उत्स्फूर्त जयजयकार करून गाडीचे स्वागत केले होते

गाडीचा नागमोडी प्रवास चालूच होता बोगदा आला की उल्का, उदय किती नंबरचा बोगदा गेला ते मोजायचे पहाडातील गार वारे डब्यातही अगावर शहारे आणीत होते. साधारण ६४ कि मी अंतराचा प्रवास झाल्यावर गाडी बरोग स्टेशनवर थांबली. वेळ दुपारची चारची गार सोसाटयाचा वारा वहात होता. स्टेशनवर चहासाठी प्रवाशांची एकच झुंबड उडाली चहा, ब्रेड, वडा घेतला तेव्हा बरे वाटले गाडीने शिटी दिली अर्धा तास थांबलेली गाडी निघाली आणि लांबच्या लाब बोगद्यात शिरली सिमला-कलका मार्गावरील एक कि मी लाबीचा हा सर्वात लाब बोगदा सपला आणि आमची 'हॉलिडे टूर' जणू संपली आता वेध लागले होते परतीचे अधार पडू लागला लुकलुकणाऱ्या दिव्याचे कलका गाव दिसू लागले सुरुवातीला मोठी फॅक्टरी लागल्यावर कलका स्टेशनला साडेसहाच्या सुमारास गाडी पोहोचली सिमला कलका ही टॉयट्रेनमधला प्रवास अविस्मरणीयच

गाडीतून उतरलो तर समोरच्या प्लॅटफॉर्मवर अबालाकडे जाणारी गाडी असलेली दिसली हमालाकरवी सामान त्यात ठेवले स्टेशनवर चहा, केक, केळी घेतली कलकाचा रेल्वे प्लॅटफॉर्म अत्यत स्वच्छ व चकचकीत होता सात वाजता गाडीने कलका स्टशन सोडले गाडी अबाल्याकडे धावू लागली वाटेत चंदीगड स्टेशनवर गाडी थाबली त्यामानाने गाडीला विशेष गर्दी नव्हती रात्रीचे नऊ वाजले तेव्हा आम्ही अबाला कँटच्या भव्य रेल्वे प्लॅटफॉर्मवर आलो रेल्वे ओव्हर ब्रिज ओलाडून प्लॅटफॉर्म नबर एकच्या वेटिंग रूममध्ये आलो अबाला-दिल्ली व्हाया सहरणपूर-मीरत असे आमचे प्रवासाचे सर्क्युलर तिकीट असल्याने त्या मार्गाने जाणारी नानगल डॅम एक्सप्रेस रात्री दोनला येणार होती गाडीला अवधी बराच होता, प्रथम रेल्वे कँटीनमध्ये जेवण आटोपले जेवण अत्यत बेचव होते. परत वेटिंगरूममध्ये आलो बेडिंग उघडले. थोडी विश्राती घेतली. हातपाय

पसरले पण झोप येणे शक्यच नव्हते दिल्लीकड जाणाऱ्या मेल एक्सप्रेस गाड्याचा खडखडाट चालू होता

रात्री दोनला नानगल डॅम एक्सप्रेस आली पण गाडी अगदी गच्च भरलेली. फर्स्टक्लासचे डबेही गच्च भरलेले पॅसेजची जागाही अडवलेली तेवढ्यात घोषणा सुरू झाल्या त्यावरून कळले की दिल्लीला पार्लमेंटवर मोर्चा नेण्यात यायचा होता व त्यात सामील होण्यासाठी निघालेल्या पंजाब मधील उच्यापुऱ्या, तगड्या विद्यार्थ्यांनी डबे अडवले होते. 'ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन झिंदाबाद'च्या घोषणांनी स्टेशन दुमदुमून गेले बिचारे प्रवासी धावपळ करीत होते पण जागा कुठेच नव्हती टी सी आले पण त्यांनी सांगितले तरी विद्यार्थी डब्यातून उतरत नव्हते उलट टी. सी ला फेकून देण्याच्या धमक्या ते देऊ लागल्यावर त्यांनीही पळ काढला. शेवटी आम्ही एका कंपार्टमेंटमध्ये कसेबसे घुसलो सामान चढवले निदान बसायला मिळाले स्टेशनवर गाडी थांबली की विद्यार्थ्यांच्या घोषणा सुरू होत. तेव्हढ्यात ती काकांच्या अंगावरचे ब्लँकेट गायब झाले. इकडे तिकडे पाहिले तर एका विद्यार्थ्याने ते स्वत:च्या अंगावर पांघरलेले दिसले त्याला विचारताच त्याने दिल्ली येताच देईन ब्लँकेट, ते घेऊन पळून नाही जाणार असे उलट आम्हालाच सुनावले त्यांची अरेरावी पाहून गप्प बसलो झोप नसलेल्या अवस्थेत मोठ्या अवघडलेल्या स्थितीत, कर्कश घोषणा ऐकत ऐकत प्रवास सुरू होता सकाळ झाली गाझियाबाद स्टेशनवर गाडी थांबल्यावर तोंड धुवून चहा घेतला सकाळी नऊच्या सुमाराला जुन्या दिल्ली स्टेशनवर आलो तेव्हा हायसे वाटले त्या विद्यार्थ्याने मात्र आठवणीने ब्लँकेट परत दिले गाडीतून उतरलेले शेकडो विद्यार्थी दोन रांगातून घोषणा देत पार्लमेंटकडे निघाले

गाडी बदलून नव्या दिल्ली स्टेशनवर तासभरात आलो आता फक्त काळजी होती दिल्ली–नगर रिझर्वेशनची नवी दिल्ली स्टेशन जवळच्या लॉजवर रिक्षातून आलो. सामान लावले आधोळी केल्या आवरून कॅनॉट प्लेसमधील रेल्वे आरक्षण कार्यालयात दुपारी बाराच्या सुमारास पोहोचलो दीड तासभर रांगेत उभे राहिल्यावर दुसऱ्या दिवसाच्या झेलम एक्स्प्रेसच्या वेटिंग लिस्टमधील नावात आमच्या नावाचा समावेश झाला त्यावरच

समाधान मानावे लागले रिझर्वेशनचे काम संपल्यावर जेवणासाठी जवळच्या हॉटेलमध्ये शिरलो तेथेही खूप गर्दी होती. गरम रोटी, दही, पुलाव बैंगन-भरता, आलूमटार जेवण तर मस्त मिळाले जेवण आटोपेपर्यंत दुपारचे तीन वाजले होते रात्रीचे जागरण, दगदग यामुळे विलक्षण थकलो होतो. सहा वर्षांपूर्वी दिल्ली तीन दिवस संपूर्ण पाहिली होती त्यामुळेही परत काही पहाण्यात उत्साहच वाटत नव्हता तरीपण मुलाच्या आग्रहास्तव टेंपो करून लाल किल्ल्याजवळ आलो चांदनी चौकात चक्कर मारली पण दम-ल्याने उत्साह नव्हता. थोडीफार खरेदी करून लॉजवर सध्याकाळी पाचच्या सुमाराला पोहोचलो ज्याने त्याने विश्रांतीसाठी कॉटवर शरीर झोकून दिले पडल्या पडल्या सारेजण झोपी गेलो. आणि कुंभकर्णी झोप लागली. सायंकाळी पाच ते सकाळी आठ एवढी झोप काढून प्रवासाचा शीण घालवला

सकाळी आठ वाजता उठलो तेव्हा कसे प्रसन्न वाटत होते स्नान, चहा आटोपून ताजेतवाने होऊन साडेनऊला लॉज सोडले. टाम्याने दहा मिनिटात नवी दिल्ली स्टेशनवर आलो

□ □

## १७८ अप् झेलम एक्स्प्रेस

अकरा वाजता झेलम एक्स्प्रेस धाड धाड आवाज करीत नवी दिल्ली रेल्वेस्टेशनच्या प्लॅटफॉर्म नंबर चारवर आली. गाडी थांबल्यावर समोरच फर्स्टक्लासचा डबा दिसला. प्लॅटफॉर्मवर तुफान गर्दी होती फर्स्टक्लासच्या डब्यासमोर गर्दी होती. आत शिरून सर्व कंपार्टमेंटमध्ये चौकशी केली. पण बर्थ तर सोडून द्या, सिटींगची सुद्धा व्यवस्था होण्याचे चिन्ह दिसेना. जागे-अभावी दिल्लीलाच थांबावे लागते की काय या काळजीने निराश झालो तेवढ्यात एका प्रवाशाने सुचविले की सर्वांत मागे आणखी एक फर्स्ट-क्लासचा डबा आहे तिथे प्रयत्न करा. हमाल आणि आम्ही सर्वजण अक्षरश: प्लॅटफॉर्मच्या गर्दीतून पळत पळत, धक्के देत व धक्के खात तेथे पोहोचलो. प्रथम लगेजरूममध्ये सामान चढवले. गाडीत कंडक्टर महाशय चार्ट घेऊन होतेच मोठ्या नम्रतेने व अजीजीने त्याना विनंती केली की काहीतरी व्यवस्था करा. नकारघंटा देऊन काही जमणार नाही असे त्यांनी सांगितले. तोपर्यंत गाडी सुरू झाली ती. काका, यशवंत हे 'जी' या कूपे कंपार्टमेंटमध्ये तेथील प्रवाशांना विनंती करून बसले. तेथील एक

प्रवासी आग्ऱ्याला उतरणार होता व दोन पुढे भोपाळला. मी, उल्का, उदय दुसऱ्या एका कंपार्टमेंटमध्ये अॅडजेस्ट झालो

गाडीचा वेग वाढला होता दिल्लीचा फरीदाबादपर्यंतचा वाढलेला परिसर डब्यातून दिसत होता. दुपारी दीडला मथुरा स्टेशन वर गाडी पाच मिनीटे थांबली मथुरेच्या पेढ्याचे पाकीट घेतले आग्रा कँटला पोहोचलो तेव्हा अडीच वाजले होते आग्ऱ्याला एक प्रवासी उतरल्याने उदय त्याच्या बर्थाजवळ गेला स्टेशनवर छोटे संगमरवरी ताजमहाल व आग्ऱ्याचा पेठा विक्रीला होते. यशवंतानी कंडक्टर महाशयांना परत विनंती केली तेव्हा चार्ट उघडून त्यांनी सांगितले की 'जी' कंपार्टमेंट भोपाळला रिकामा होईल तेथे सर्वजण रात्रभर अॅडजेस्ट व्हा. रात्रीचा प्रश्न सुटल्याने सुटकेचा निःश्वास टाकला आग्रा सोडल्यावर झेलम वेगाने निघाली धौलपूर स्टेशन गेल्यानंतर चंबळ खोऱ्यातील भयानक दऱ्या–विहड डब्यातून दिसू लागल्या याच खोऱ्यात कित्येक दरोडेखोरांनी लपतछपत आश्रय घेतला होता चंबळच्या खोऱ्याचा हा भाग नीट विकसित केला तर हजारो एकर भूमी शेती लागवडीखाली येईल असे ती काका म्हणाले दुपारी चारच्या सुमारास ग्वाल्हेर स्टेशनवर झेलम उभी राहिली झेलम गाडी फास्ट आणि चांगली पण तिला डायनिंग कार नाही त्यामुळे फार गैरसोय होते प्लॅटफॉर्मवर घाईगर्दीत चहा उरकला स्टेशनजवळून ग्वाल्हेरचा भव्य किल्ला दिसत होता झेलम पुन वेगात निघाली उल्का उदयबरोबर पत्ते खेळायला दुसऱ्या कंपार्टमेंटमध्ये गेली मी डब्यातील दुसऱ्या महिला प्रवाशाशी ओळख काढून हिंदीत बातचीत करून वेळ काढीत होते संध्याकाळी सहाच्या सुमारास झाशी स्टेशनवर झेलम विसावली राणी लक्ष्मीबाई यांनी इंग्रजाविरुद्ध शर्थीने दिलेली झुंज आठवली झाशीचा किल्ला पहायला परत कधी तरी यायचंच असा निश्चयही केला झाशी सोडले तेव्हा अंधार पडू लागला. रात्री साडेआठच्या सुमारास बीना स्टेशन आले दुपारी चारला ऑर्डर दिल्यामुळे स्टेशनवरून डब्यात जेवणाची ताटे आली रेल्वेप्रवासातील शेवटचे जेवण जेवणाला चव नव्हती, पण पोटाला आधार म्हणून ठीक होते बीना स्टेशनवर गाडी जवळ जवळ तासभर थांबली. कारण झेलमच्या इंजिन-

मध्ये बिघाड झाला होता. कर्मचारीवर्गाने थोडा वेळ दुरुस्तीचा प्रयत्न केला. नंतर शेजारी दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या मालगाडीचे इंजिन काढून ते लावले. झेलम पुन: निघाली पण वेग मंदावला होता. उशीर होत होता. झेलम भोपाळला नऊ ऐवजी साडेदहाला पोहोचली. उदय जेथे बसला होता तो 'जी' कंपार्टमेंट रिकामा झाला होता. सर्वजण रात्री एकत्र आलो. होल्डाल सोडले. ब्लॅंकेट, उशा काढल्या. डब्याचा दरवाजा पक्का लावला. दीर्घ प्रवासातली शेवटची रात्र सुरू झाली.


होय, शेवटची रात्र – झेलमच्या बर्थवरची मोठ्या समाधानाची. महिनाभर केलेल्या प्रवासाचा चित्रपट जणू डोळ्यासमोर तरळत होता ! महिन्यापूर्वीची नवजीवन एक्सप्रेसमधील बर्थवरची रात्र आठवली. एवढा दीर्घ प्रवास कसा पार पडेल या चिंतेने घेरलेली आणि आता शेवटची रात्र–दीर्घ प्रवासाची यशस्वी सांगता झाल्याच्या आनंदाच्या उर्मींची !

हल्दीघाटीतून कुलूघाटीपर्यंतच्या प्रवासातील आठवणी सुखदच ! भारताच्या महान सांस्कृतिक वारशाचा प्रत्यय ठायी ठायी आला होता. हल्दीघाटीतील चेतक चबुतऱ्यासमोर उभे राहिल्यावर महाराणा प्रताप आणि चेतक यांच्या स्मृतीने मन भारावून गेले होते. राजस्थानच्या रणरणत्या मरुभूमीतील राजपूत रमण्यांच्या जोहारांनी पुनित झालेले जोधपूर, जैसलमेर येथील दुर्ग पाहिले होते. कलाकुसरींनी सजलेल्या जैसलमेरच्या हवेल्यांतून राजपूत रमणीचे दर्शन झाले होते. समच्या वाळ-वटात पावले उमटली होती पण दुसऱ्या दिवशी ती पुसली गेली असतील याचीही जाणीव होती. जोधपूरच्या उमेदभवनने राजेशाही विलासाची यथार्थ कल्पना दिली होती. बिकानेरच्या उंट प्रजनन केंद्रामधील छोट्या छोट्या उंटांच्या कळपाचे दर्शन हा विलक्षण अनुभव होता. सर्वात हृद्य अनुभव सतलजकाठच्या शहीद भगतसिंगच्या स्मारकाचा व भारत–पाक बॉर्डरवर भेटलेल्या मराठी जवानाच्या भेटीत मिळाला होता. हिमालयाच्या कुशीतील, पांडवांनी वास्तव्य केलेल्या भूमीत प्रवास करण्याचे भाग्य लाभले होते. मनालीला हिडिंबादेवी, कुलूला रघुनाथजी, तर बैजनाथला रावणाने बसवलेल्या शिवलिंगाचे दर्शन झाले होते. सिमल्याला उंच जाखू पहाडावर भेटले होते हनुमानजी तर कांगडयाला

वज्रेश्वरी देवी आणि ज्वालामुखीला सिंहावर आरूढ झालेली दुर्गामाता! धर्मशालाच्या तिबेटी मंदिरातील गौतमबुद्धाच्या मूर्तीसमोर नतमस्तक झालो होतो रोहतांगची साडेतेरा हजार फूट उंचीवरील सफर हा आयुष्यातील एक रोमांचकारी अनुभव होता आधुनिक सिमल्याच्या दर्शनाने इंग्रजांच्या रसिकतेचा प्रत्यय आला होता. हिमाच्छादित शिखरे, देवदार, पाईन, ओक, सुगंधी वृक्षराजी, तजेलदार फुले यांनी बहरलेल्या हिमाचल प्रदेशातील सफरीचे मंतरलेले दिवस डोळ्यासमोर येत होते. राजस्थानची रेताड भूमी, पंजाबची हरितभूमी व हिमालयाच्या खोऱ्यातील हिरवीगार वनश्री व हिमशिखरे यांचे दर्शन घेताना भारतातील भौगोलिक विविधता अनुभवायला मिळत होती रावी, सतलज, बियास या नद्यांच्या खोऱ्यांतील प्रवास संपवून झेलममधील बर्थवरचा शेवटचा प्रवास मोठ्या समाधानात पार पडला सकाळी दहाला १७८ अप् झेलम एक्सप्रेस अहमदनगर स्टेशनवर विसावली होती

REFBK-0024387

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५७
२३६७
ग्रंथ शाखा


उत्तर
पाकिस्तान
काश्मीर
लाहुल स्पिती
चम्बा
डलहौसी
रोहतांग पास
पठाणकोट
मनाली
हुसेनिवाला
कुलू
मंडी
फिरोजपूर कँट
सिमला
चेल
भतिंडा
अंबाला
नेपाळ
दिल्ली
बिकानेर
ओसियां
लोद्रुवा
जैसलमेर
आग्रा
जोधपूर
मारवाड
राणकपूर
नाथद्वारा
उदयपूर
हल्दी घाटी
अहमदाबाद
भोपाळ
इटारसी
बडोदा
खांडवा
सुरत
जळगांव
मनमाड
मुंबई
अहमदनगर
पुणे